जी. ए. कुलकर्णी

## जी ए कुलकर्णी यांच्या १८ कथांवरील चर्चा- भाग -४




- जखम ( पारवा )
- जन्म ( रक्तचंदन )
- ठिपका ( काजळमाया )
- डाग ( निळासावळा )
- दीपस्तंभ १ व २ ( सांजशकुन )
- नाग ( पारवा )
- निळ्या चेहऱ्याची आकृती(सांजशकुन)
- पडदा ( निळासावळा )
- पत्रिका ( सांजशकुन )
- पराभव ( रक्तचंदन )
- पाणमाय ( सांजशकुन )
- पातक ( सांजशकुन )
- पारधी ( हिरवेरावे )
- पाळणा( पारवा)
- पुनरपि( काजळमाया)
- पुरुष( रक्तचंदन)
- प्रदषिणा( काजळमाया)

# जीए कथास्वाद
## भाग ४

# जीए कथास्वाद ४

## जी ए कुलकर्णी यांच्या कथांवरील चर्चांचे संकलन


## संकलन व संपादन- सुनीळ सामंत



## ई प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

9987737237



या पुस्तकातील सर्व लेखनाचे व चित्रांचे अधिकार त्या त्या लेखकांकडे व चित्रकारांकडे आहेत. पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# जीए कथास्वाद ४

जखम ( पारवा )

जन्म ( रक्तचंदन )

ठिपका ( काजळमाया )

डाग ( निळासावळा )

दीपस्तंभ १ व २ ( सांजशकुन )

नाग ( पारवा )

निळ्या चेहऱ्याची आकृती( सांजशकुन )

पडदा ( निळासावळा )

पत्रिका ( सांजशकुन )

पराभव ( रक्तचंदन )

पाणमाय ( सांजशकुन )

पातक ( सांजशकुन )

पारधी ( हिरवेरावे )

पाळणा( पारवा)

पुनरपि( काजळमाया)

पुरुष( रक्तचंदन)

प्रदषिणा( काजळमाया)




जीवन इतके अनंतरुप आहे की अगदी
संपूर्णपणे माझ्यासारखेच आयुष्य असलेला
माणूस पूर्वी कधी झाला नाही व पुन्हा कधी
होणार नाही. त्या दृष्टीने प्रत्येक सामान्य माणूस
देखील अद्वितीय असतो. मी गेल्यानंतर एक
अव्दितीय भावविश्व पूर्णपणे विरुन जाणार आहे

# प्रास्ताविक

मराठीतील सर्वोच्च कथालेखकांमध्ये ज्यांचे नांव अग्रक्रमाने घ्यावे अशा श्री जी ए कुलकर्णी यांच्या शताब्दीचे वर्ष २०२२-२०२३. या वर्षाचे सार्थक व्हावे या हेतूने जीएंच्या कथांचे प्रेमी एकत्र येऊन त्यांनी एकावेळी फक्त एक कथा घेऊन त्यावर जमेल तितकी सखोल चर्चा करून, त्या कथेतून काय मिळाले ते सांगण्याचा प्रयत्न केला. जीए यांची कथा लोलकासारखी प्रत्येकाला वेगळा प्रकाश, वेगळा रंग दाखवते. हिऱ्यासारखे जीएंच्या कथेला अनेक पैलू असतात आणि वेगवेगळ्या वाचकांना त्यातले वेगवेगळे पैलू दिसतात.

चौघांनी आपल्याकडचा एक एक रुपया दिला आणि त्यातून एक एक रुपया घेतला, तर प्रत्येकाकडे एकच रुपया रहातो. पण प्रत्येकाने एक एक विचार दिला तर चौघांकडे चार चार विचार जमा होतात. विचारांच्या या शिस्तबद्ध पण मुक्त देवाणघेवाणी मुळे ही चर्चा अत्यंत आनंदमय झाली. होते आहे. या चर्चेत इतरांनाही आनंद घेता यावा यासाठी हा संकलित पुस्तकप्रपंच.

- संकलक- सुनीळ सामंत (9869674820)

# चर्चेतील सहभागी व्यक्ती

आशा भागवत
अतुल ठाकूर
अभयकुमार कुलकर्णी
अलका तडकलकर
अशोक पाटील
उमेश तुपे
कस्तुरी महेश
जयश्री जंगले
माधव पुराणिक
दिलिप बडे
नागेश कुलकर्णी
नितीन वैद्य
निशा क्षिरे
परमजीत सिंग
प्रदिप कुलकर्णी
प्रमोद कुलकर्णी
प्राची बापट
मंजिरी देशमुख
मनमोहन आंबेकर
महेश आफळे
मिलिंद सकपाळ
मिहीर ठकार

यतीन गुळवणी
राजेश उनवणे
राम कुलकर्णी
लक्ष्मीकांत देशपांडे
लखन दगडे
वंदना बोकील
वर्षा हळबे
विलास वाघोलीकर
विशाखा आपटे
विशाखादत्त
विश्वेश्वर नांदेडकर
वैभव कुलकर्णी
शिवाजी कुऱ्हाडे
श्रीकांत देशमुख
संजीव कुलकर्णी
साधना डोंगरे
सुनीळ सामंत
सुमन महामुनी
स्नेहल बोकील
हेमंत खडके
पुरुषोत्तम मोने
मेघा महाजन

# 'जखम' - कथासंग्रह -पारवा - - जी ए कुलकर्णी

'जखम' कथा - कथासंग्रह -पारवा - लेखक- जी ए कुलकर्णी

- विवेचक - व्ही एस वाघोलीकर

1 ) जीए कुलकर्णी यांनी अस्तित्वाचे अनेक स्तर व- त्याचे सामाजिक, आर्थिक, शारीरीक, मानसिक, विश्वाशी संबंध असलेले चैतन्याचे पैलू, दाखवले आहेत.

2 ) अस्तित्वामधील मानासिक विश्व, महत्वाचे असते. त्यांनी अनेक कथांत, माणसांची मानसिक आंदोलने सूक्ष्मपणे दाखवली आहेत. उदाहरणार्थ - कसाबमध्ये, सोनू, येसूबाई व केशवराव यांची मानसिकता दाखवली आहे. घरमध्ये मधुकाकांची, घर बांधण्याची मानसिक जिद्द, त्याचे इतरांवर होणारे मानसिक परिणाम दाखवले आहेत. इत्यादी अनेक कथांची उदाहरणे देता येतील. परंतु अशा अनेक कथांमध्ये वाचकाचे लक्ष, जास्त करुन कथेतील घटनांकडे जाण्याची शक्यता असते.

3 ) याशिवाय त्यांच्या काही कथा, मनाच्या आंदोलनावर, रूढार्थाने वेडेपणावर, प्रकाशझोत टाकतात. उदाहरणार्थ, बाधा, वीज, भोवरे, राक्षस इत्यादी. प्रस्तुत 'जखम' कथेतील, गोविंदरावांच्या बापू मुलाचा, रुढार्थाने वेडेपणात कसा बदल झाला, हे दाखवले आहे -

**कथानक - पात्रे-- गोविंदराव, पत्नी सावित्रीबाई, स्वैपाक करणारी रमा, मुलगा बापू आहेत. गोविंदराव हे कुटुंबप्रमुख, सुखवस्तू, मोठे माडीचे घर असलेले, बँक लॉकर असलेले, बायकोकडे दागीने असलेले, प्रतिष्ठीत, व्यावसायिक आहे. जीएंच्या या कथेत लहान कुटुंब दाखवले आहे, हा एक विशेष आहे. गोविंदरावांच्या पोलीस, डॉक्टर यांच्याशी ओळखी आहेत. आजूबाजूंच्या लोकांवर जरब आहे. ते व्यावहारिक आहेत. पैशाच्या मागे धावून, स्वार्थ साधणारे आहेत. प्रसंगी मन कठोर आहेत.. जीएंनी कथेत त्यांना सविस्तरपणे रंगवले आहे. ते वाचण्यासारखे आहे. उदाहरणार्थ ते, सुपारीचे खांड स्वतःकडे घेवून दुसऱ्यास न देता, खिशात टाकणारे आहेत. मुलगा -बापूमुळे आपली प्रतिष्ठा कमी होईल हे पाहिल्यावर, ते मन- कठोर होतात. व खऱ्या, खोट्या खटपटी करून, उंच -लांब भिंतींच्या मेंटल हॉस्पीटलमध्ये त्याला ठेवतात. येथून कथा सुरू होते.

कथेशेवटी, गोविंदराव, बायकोच्या मनाचा विचार न करता, त्यांचा मित्र श्रीपाद, शेवटी मेंटल हॉस्पीटलमध्ये कसा वारला, हे उघडपणे सांगतात. त्यामुळे बायकोला रडू येते. समाजात अशी मनकठोर माणसे कशी असतात हे येथे दाखवले आहे.

4 )- बापूच्या मानसिक आंदोलनाबद्दल सामर्थ्याने जी ए लिहितात -

"**गेले आठदहा दिवस बापूच्या वागणुकीत चमत्कारिक फरक पडला होता. आणि त्यामुळे सावित्रीबाईंच्या जिवाचा थरकाप होऊ लागला होता. एखादी किडलेली तुळई करकरत वाकडी होत असता पाहात असावे, त्याप्रमाणे त्यांचा जीव गोळा होऊ लागला होता, बापू कुठे खेळायला गेला होता कुणास ठाऊक, पण तेथे तो तोंडाला फेस येऊन पडला. घरी आणल्यावर, थोड्याच वेळात तो शुद्धीवर

आला, दुसऱ्या दिवशी हिंडूफिरू लागला. पण त्याचे डोळे बदलले होते. कशाची तरी वाट पाहात असल्याप्रमाणे तो मध्येच चमकून ऐकत असे. कशाची तरी भीती वाटत असल्यामुळे, बावरून अंग आकसत असे. पानात आमसोल दिसताच, जणू साप दिसल्याप्रमाणे भेदरून तिकडे बोट दाखवत, तो किंचाळू लागला. जेवायला बसला, त्या वेळी चुकून त्याच्या आमटीच्या वाटीत एक मोठे आमसोल पालथे आले. त्याला लहानपणापासून सोलांचा अतिशय कंटाळा हे खरे, त्याने ताट उचलून भिंतीवर आदळले, व अंगातील शर्ट फाडून त्याच्या चिंध्या केल्या. साऱ्या बांगड्या वाढल्या आणि चेहऱ्यावर दोन ओरबडल्याठिकाणी रक्ताचे दोरे दिसू लागले. त्याला आवरून अंथरुणात झोपवेपर्यंत सावित्रीबाई घामाघूम झाल्या. रात्रभर विकल चेहऱ्याने, त्या त्याच्या शेजारी बसून होत्या. मध्येच बापूने त्यांना हाक मारली, व त्यांच्या चेहऱ्यावरील रेघोट्या पाहून विचारले, "आई, हे मी काहीतरी केलंय ?" सावित्रीबाईचे डोळे पाण्याने भरले. त्यांना वाटले बापूला म्हणावे, "तुझा काही दोष नाही रे, सारं माझंच चुकलं. माझ्या ओट्यात सोन्याची माती झाली. "त्या म्हणाल्या, "छे, मी शेजारच्या बेबीला घेतलं होतं पाच मिनिटं. तिची नखे उठली आहेत. " पण तू झोप आता. पण बापूऐवजी त्यांनाच झोप आली, व त्या बाजूला आडव्या झाल्या. बापू झोपला नाही. तो शून्य नजरेने वर पहात पडला होता. कडेपाटाच्या लाकडावर अनेक साप वेडेवाकडे होत कुठेतरी पळत होते, एकमेकात अडकत होते. त्यांच्यामध्ये डोहासारखे वर्तुळ होते व त्यावरील पांढरट डाग एखाद्या डोळ्याप्रमाणे दिसत होता. तो आपल्याकडे पाहतो, आपला डोळा त्याच्याकडे पाहतो, मग पुन्हा तो आपल्याकडे पाहतो...... ही गंमत पाहून बापू स्वतःशीच हसत होता. त्या डोहातील पाणी मध्येच थरथरू लागले. त्याच्या लाटा पसरत खाली आल्या. बापूने हात उंचावून एका लाटेला हळूच स्पर्श केला. तिला चाकूसारखी थंड धार होती.

त्याला एकदम तहान लागल्यासारखे वाटले. पण त्याने सावित्रीबाईंना हाक मारली नाही. तो उठला व त्या लाटांच्या वर्तुळांना ढकलत स्वयंपाकघरापुढे चालत आला. चालताना त्याची सावली सावज हेरल्याप्रमाणे सावकाश सरकत होती. बापू तिच्याकडे तिरप्या नजरेने पाहात होता. दरवाजातून आत शिरताना, ती भिंतीवरून पुढे येऊन आपणाला धरणार असे त्याला वाटू लागले, व त्याने टुणदिशी उंबऱ्यावरून आत उडी घेतली. बाजूलाच व्हरांड्यात स्वयंपाकीण काकू -रमाकाकू, शाल पांघरून झोपल्या होत्या. त्या शालीचा रंग आमसोलासारखा होता. पाय दुमडून झोपलेल्या त्या आकृतीकडे पाहताच, त्याच्या साऱ्या शिरा ताणल्यासारखा झाल्या, डोक्यात एकदम गोळा येऊन लालभडक फुटला, त्याचं अंग दिवटीसारखे पेटले. त्याने कोपऱ्यातील सोवळ्याचे कपडे वाळत घालण्याची काठी उचलली, व तो रमाकाकूंवर ताडताड प्रहार करू लागला. ओरड्यामुळे सावित्रीबाई धावत आल्या. त्यांना पाहताच बापूने शांतपणाने काठी कोपऱ्यात उभी केली. रमाकाकू, सावित्रीबाई आरडत ओरडत, ती आत धावेपर्यंत दोनचार तडाखे तर तिला मिळालेच. तो तांब्याभर घटाघटा पाणी प्याला व सावित्रीबाईजवळ येत म्हणाला, "आई, आज डोक्यात सारखे ठणठण होतंय बघ. "सावित्रीबाई मटकन् खाली बसल्या. "

5)बापूला झटके - एपीलेप्सी - येत असतात. पूर्वीही हॉस्पीटल मध्ये ठेवले होते . त्याची मानसिक आंदोलने कशी होतात, हे जी ए सामर्थ्यांने दाखवतात -

"गेल्या वर्षीही त्याला असाच झटका आला होता. त्याने शाळेत मास्तरांकडे दौत भिरकावली होती, त्याला शाळेत काड्याची पेटी कशी मिळाली, कुणास ठाऊक. त्याने शेजारच्या बाळकृष्णाची पुस्तके, वह्या घेऊन त्यांची शेकोटीच पेटवली. त्या वेळी त्याला दोन महिने हॉस्पिटलमध्ये राहावे लागले. परत आला त्या वेळी तो बराच वाळला होता, पण अगदी शांत झाला होता. खुर्चीत बसून पुस्तकाचे

एकच पान, तो तास न तास वाचायचा. पण काही वेळा खाकी पोषाखातील कुणी आले की घाबरून, " साहेब आले-साहेब आले. " म्हणत तो सावित्रीबाईशेजारी येऊन उभा राहात असे. "

6)- काही वाक्ये - ठिकठिकाणच्या चिंध्या गोळा करून गोविंदरावांनी कंजुषपणे आयुष्य झाकले होते .

- ड्रायव्हरला बजावले - एक रुपया म्हणजे विशेष नाही . पण आम्ही आयुष्यात कधी फसणार नाही !

- आपल्या मागे कोण आहे ? एकुलता एक मुलगा . तो असा डागाळलेला निघाला . नशीब म्हणायचे झाले आपले . असे म्हणून गोविंदरावांनी एक वेलदोडा सोलून तोंडात टाकला .

- बापूचे जग वेगळे . आपले जग वेगळे . त्याला जे दिसते ते तसे आपल्याला का दिसणार ? दुर्दैवाने सारे आवाक्याबाहेर गेले तर तो राहील वेड्या एकाकी समाधानात .

7 )- कथेमध्ये रघूभट घरी आल्यावर, गोविंदराव, बायकोच्या मनाचा विचार न करता, त्यांचा मित्र श्रीपाद, शेवटी मेंटल हॉस्पीटलमध्ये कसा वारला, हे उघडपणे सांगतात . त्यामुळे बायकोला रडू येते.

- शेवटी जी ए म्हणतात - रिकाम्या भांड्यात काही न टाकता अंगावरील लक्तरेही हिसकावून घेवून हाकलून दिलेल्या भिकाऱ्याप्रमाणे गोविंदराव शरमून अंग चोरून अगदी एकाकी बसले .

8)याप्रमाणे मानवी अस्तित्वातील मानसिक विश्वाचा भाग जीएंनी उलगडून दाखवला आहे. अस्तित्व असते . पण ते असेही विस्कळीत, अव्यवस्थीत असते . त्यामुळे आकाशस्थ शक्तींच्या संदर्भात, सजीव अस्तित्वाला अर्थ आहे का ? तो कोणता ? हे जीए त्यांच्या कथांतून शोधतात . व ते प्रश्न वाचकालाही पडतात . रूढार्थाने वेड असलेल्या माणसाकडे, मानसशास्त्रज्ञ व तत्वज्ञ म्हणून जीए पाहतात व वाचक सुन्न होतो . अशी ही जीएंची विलक्षण भारलेली कथा, वाचक विसरू शकत नाही.

विलास वाघोलीकर

गौरी देशपांडे: आपण खूपच नेमके विवेचन केले आहे. जीएनच्या सर्वच कथांमध्ये पात्रांच्या मानसिक विश्वाचे इतके बारकाईने प्रकटीकरण असते की आपणच ते जगतो आहोत असे वाटते. आणि जीएनची ते मांडण्याची शैली सुद्धा unique आहे. कथा सांगताना कुठे आजूबाजूच्या घटनांचे वर्णन संपून एखाद्या पात्राचे मानसिक विश्व सुरू होते ते पटकन कळत नाही. बारकाईने समजून घ्यावे लागते. ह्या कथेतच पहा..

बापूची आई त्याला झोप म्हणुन सांगून स्वतः झोपी जाते व इकडे बापूची मानसिक आंदोलने सुरू होतात. किती प्रत्ययकारी आहे ते वर्णन! आपण ते सगळं अक्षरशः स्वतः बापू बनून अनुभवू शकतो. जी एनच्या प्रतिभेला सलाम !

सर, सुंदर विश्लेषण केलेले आहे आपण... ! कथेतील पात्रांची मानसिक आंदोलने जीए नेहमीच ताकदीने उभी करतात. कथा लिहिण्यास सुरुवात करण्यापुर्वी

ते किती अभ्यास, चिंतन करीत असतील याची आपल्याला कल्पनाच करावी लागते..

एखादी कथा लिहिताना ते त्या काळात ती कथा कितीवेळा परत परत लिहीत असतील व पुन्हा त्यात सुधारणा किती करीत असतील याची माहिती नाही.. लेखनिक ही त्यांनी ठेवला नव्हता.. त्यामूळे त्यांच्या अतिशय जवळच्या व्यक्तीच यावर भाष्य करू शकतील. असो.

जखम कथा अफलातून लिहिली आहे जीएं यांनी...

सर, आपण केलेले रसग्रहण व विचारलेले प्रश्नही चिंतन करावे असे आहेत.. !

आपले अभिनंदन वाघोलीकर सर!

जखम कथेत बापूच्या जन्माचे रहस्य जीएंनी ज्या पद्धतीने सांगितले आहे, ती लिखाणाची जीएंची स्टाइल अफलातून आहे.. !

धन्यवाद सर... ! 🙏

राजेश उनवणे

उनवणे सर बापू च्या जन्माचे रहस्य कथेतून नेमके काय हे समजले नाही. प्लीज त्याबद्दल सांगाल तर बरं होईल.

वाघोलीकर सरांचे विवेचन नेहेमीप्रमाणे खूप छान

विशाखा आपटे

'बापू हा श्रीपादचा मुलगा आहे.. '

.. जेव्हा जेव्हा कथे मध्ये श्रीपादचा उल्लेख येतो तेव्हा तेव्हा, सावित्रीबाईच्या मानसिक आन्दोलनाचे वर्णन जीएंनी अतिशय संयतरित्या केलेले आहे व त्यातून ते हे रहस्य सूचित करतात.. ! 🙏

राजेश उनवणे

हो, दोघांमध्ये साम्य दाखवले आहे हे खरेच. पण त्यातून असा निष्कर्ष काढता येईल का?

विशाखा आपटे

त्यामुळे गोविंदरावना या घराशी आतड्याचा संबंध आहे असे वाटत नाही. सावित्रीबाईच्या दुःखात आपण उपरे आहोत, कुठेच आपले म्हणायला काही नाही, हे कथेतील वाक्य गोविंदरावना हे रहस्य माहित असल्याचाच निर्देश करते.

राजेश उनवणे

हो. वाचताना मलाही पुसटसे तसे वाटले होते... पण स्पष्ट लिहिलेले नसल्याने तसा अर्थ काढावा की नाही कळत नव्हते. आपण शब्दश: अर्थ समजावून सांगितलात त्याबद्दल धन्यवाद.

विशाखा आपटे

आपण अतिशय प्रामाणिकपणे आपले विचार मांडलेले आहेत.. हे कौतुकास्पद आहे.. ! 👍

दोनच उदाहरणे मी वरती नमूद केलेली आहेत.

कथेतील अनेक उदाहरणे देऊन बापू हा श्रीपादचाच मुलगा आहे हे स्पष्ट करता येईल.. ! 🙏

राजेश उनवणे

विलासजी आपण संपूर्ण कथानक कमीत कमी शब्दांत उत्तमरित्या सादर केल्याबद्दल आपले आभार. आपण या कथेतील सौंदर्यस्थळेही व्यवस्थित विषद केली आहेत.

राजेश उनवणे यांनी हेरलेला मुद्दाच या कथेतील केंद्रिय भाग आहे. पण तो अस्पष्ट ठेवून जीएंनी वाचकांवर सर्वस्वी सोपवला आहे हेच या कथेचे वैशिष्ट्य.

वेगवेगळे कथाकार आहेत प्रत्येकाचे काही चांगले व काही वाईट म्हणता येईल असे वैशिष्ट्य आहे. मराठीतील बहुतांश कथा सुरुवात वाचल्यावर पुढे थोडेफार चाळल्यावर आणि शेवटचा एक पॅरेग्राफ वाचल्यावर वाचल्यावर, आपल्याला कथा समजते. जीएंच्या बहुतांश कथा अशा वरवर चाळून समजत नाहीत. अनेक कथा तर एकदा वाचूनही समजत नाहीत. त्या अनेकदा व बारीक-सारीक शब्दांकडे नीट लक्ष दिल्यावरच समजतात. जखम ही अशीच एक कथा या कथेतील एका महत्त्वाच्या पात्राकडे फारसे लक्ष जात नाही, किंवा लक्ष जाणार नाही

याकडे जीए लक्ष देतात. ते पात्र म्हणजे श्रीपाद. श्रीपाद हा गोविंद रावांचा मित्र बालपणीचा मित्र. पण त्याच्या जाण्याचे दुःख, त्याचा नुसता उल्लेख सुद्धा सावित्रीबाईंना मरण यातना देऊन जातो. श्रीपाद आणि सावित्रीबाई यांचे संबंध कसे असतील याचे याचा उल्लेख जीए अत्यंत हलक्या हाताने दोन चार ओळीत ओझरता करतात. श्रीपाद हसताना त्याच्या डोळ्यांच्या कडांना सुरकुत्या येत त्या सुंदर दिसतात, श्रीपादला ही असाच आजार होता, तो आठ दहा दिवस गोविंदरावांच्या घरी राहिला होता, आणि जाताना अतिशय आनंदाने उत्फुल्ल मनाने गेला. फक्त एवढ्या चार ओळी. पण या चार ओळींतून बापू चे जन्मरहस्य समोर येते. त्यात भटजी पापाचा उल्लेख करतात. म्हणजे या गोष्टीचा गावगन्नाही झालेला असावा. गोविंदराव सोडून इतरांना हे ठाऊक असावे याचाही जीए ओझरता उल्लेख करतात. सावित्रीबाईंना श्रीपाद, पाप हे शब्द ऐकताना मेल्याहूनही मेल्यासारखे होते.

जीए वाचताना कायम, प्रत्येक शब्द, अगदी स्वल्पविरामाकडेही व्यवस्थित लक्ष द्यावे लागते. त्यांचे शब्द केवळ आरास म्हणून कथेला सौंदर्य देण्यासाठी निरर्थक पणे योजलेले नसतात. प्रत्येक शब्दामागे काहीतरी कार्यकारण भाव असतो.

जीएंसारखा एक महान कथाकार आपल्यात होऊन गेला ही अभिमानाची गोष्ट आहे.

या कथेला जखम हे शिर्षक देण्यामागे जीएंना काय अभिप्रेत असावे याचा विचार करतो आहे.

सुनीळ सामंत:

गोविंदराव (1)श्रीपादच्याबाबतीत बोलत असताना —प्रकाशनळीत हळूहळू प्रकाश भरत जावा त्याप्रमाणे माईंच्यात ऊष्ण सुख पसरले आणि त्यांचे दुःख थोडे कमी झाले.... आणि हासताना त्यांच्या (श्रीपादच्या)डोळ्याच्या कोपऱ्या जवळ छान सुरकुत्या पडायच्या, .. हे त्यांच्या तोंडाशी आलेले शब्द तसेच दडपले....

(2) —महादेवाचे अंधाऱ्या तोंडाचे देऊळ होते व आत पणती दिसत नव्हती.

(3)—रुंदट जाड चेहऱ्याच्या गोविंदरावाचे वर्णन —कोणाला काही देऊ न शकणारा (जोखमार )

शेवट —त्या क्षणी त्याना आपल्या दारीद्र्याची, रितेपणाची फार जाणिव झाली व चिंध्यांखालील जखम उघडी पडली. आणि रिकाम्या भांड्यात काही न टाकता अंगावरील लक्तरेही हिसकावून हाकलून घातलेल्या भिकाऱ्या प्रमाणे ते शरमून अंग चोरून एकाकी बसले......

गोविंदराव हा बऱ्यापैकी कोरड्या मनाचा आणि तसाच प्रॅक्टीकल माणूस आहे. मूल होण्यासाठी त्याने श्रीपादचा खुबीने वापर केला पण त्याचा आजारही मुलात आला..... **आपल्यातल्या कमीची भावना आणि हे आपण घडवले याची मानसीक वेदना म्हणजेच ——जखम**

जीएंनी माईंच्या तोंडी— लवकर बरा होऊन ये, घराला तुझ्या शिवाय दिवा नाही " हे वाक्य दिले आहे.

गोविंदरावानी श्रीपादला सहा महीने घरी आणून ठेवले होते आणि त्याचा नियोगा साठी वापर केले होता. तशी व्यवहारी, रूक्ष मनोवृत्ती गोविंदरावांची आहेच.

पण या सगळ्याची आणि स्वतः मधील कमीपणाची भावना कथेच्या अगदी सुरवाती पासूनच जीए प्रकट करतात ! **तीच जखम** !

वैभव कुलकर्णी

त्या क्षणी त्याना आपल्या दारीद्र्याची, रितेपणाची फार जाणिव झाली व चिंध्या खालील जखम उघडी पडली. आणि रिकाम्या भांड्यात काही न टाकता अंगावरील लक्तरेही हिसकावून हाकलून घातलेल्या भिकाऱ्या प्रमाणे ते शरमून अंग चोरून एकाकी बसले या ओळी वाचताना कृपण गोविंदरावांचीही दया येते.

सुनीळ सामंत:

सुनील सर, विवेचन सुरेख केले आहे आपण. वाघोलीकर सरांनीही कथेतील सौन्दर्यस्थळे सुंदर रीतीने समजावून सांगितली आहेत. वैभव सरांनी पण नेमके मुद्दे सांगितले आहेत. आपणा तिघांनाही धन्यवाद.. ! 🙏

अशा चर्चेतून कथेतील आणखी काही मूल्यवान चिजा सापडतात.. हे महत्वाचे.. !

---- 'जीएंच्या बहुतांश कथा वरवर चाळून समजत नाहीत. अनेक कथा तर अनेकदा वाचूनही समजत नाहीत. त्या अनेकदा व बारीक-सारीक शब्दांकडे लक्ष दिल्यावरच समजतात'-- हे आपले मत अगदी योग्य. त्यामूळेच कित्येकदा या कथा गूढ वाटतात. पण त्यातील भाषेचे सौन्दर्य वाचकाला भुरळ घालतेच. हे काहीतरी विलक्षण लिहिलेले आहे असे वाटते. काही कथा लगेच समजतात तर काही परतपरत वाचाव्या लागतात. कथा समजल्यावर त्यातील सौन्दर्यस्थळे शोधून समजून घ्यावी लागतात आणि त्यासाठीही कथा पुन्हा वाचावी लागते..

'जखम' कथेचे कथानक अगदी साधे-सरळ आह…

वैभवजी, आपण सावित्रीबाईच्या मनातील श्रीपाद विषयीचे विचार नेमकेपणाने सांगितलेले आहेत.. ते आवडले.. !

'वहिनी, सिलेक्शन माझे आहे बर का ' हे साडीच्या रंगावरून आलेले वाक्य गोविंदरावांचे तोंडी असले व श्रीपादला चार-सहा महिने त्यांनी घरी ठेवून घेतला असला तरी ही मदत लहानपणीचा मित्र म्हणुनच त्यांनी केलेली आहे.. !

मूल होण्यासाठी गोविंदरावनी मित्राचा वापर केला यास पुष्टी देणारे वाक्य कथेत नाही... !

पण जेव्हा असे घडून गेले तेव्हा ही वस्तुस्थिती गोविंदराव स्वीकारतात. पण उघडपणे कधीच बोलून दाखवत नाहीत. बोलतात ते अस्पष्टपणे.

आपल्यातील कमीपणाची भावना, ती वेदना म्हणजेच --जखम -- हे मात्र आपले अगदी योग्य मत आहे.. व ते पटते.. !

राजेश उनवणे

होय.

गोविंदरावानी श्रीपादला वापरून घेतले असे कथेत कोठेही सूचक नाही.

पण त्यांचा स्वभाव बघता मला तसे वाटत होते.

आपले निरिक्षण ऊत्तम आहे.. 🙏 👍

वैभव कुलकर्णी

धन्यवाद राजेशजी. आपण जखम-चा नेमका संदर्भ दिल्याबद्दल.

खरे सांगायचे तर विशाखाजींसारखेच माझेही झाले होते. मनात कुशंका होती पण अविश्वासही होता. तुम्ही जन्माचे रहस्य हे शब्द ठळक केल्यामुळे पुन्हा कथा नीट वाचली आणि कुशंका खरी ठरली. पण तरीही जखम चा संदर्भ कळेना. शेवटचे -भिकाऱ्याची लक्तरेही काढून घेतली- हेही समजना. आता ही कथा लख्खपणे समोर उभी राहिली. सर्वांचे मनापासून आभार.

महत्त्वाचे म्हणजे जीएंच्या कथा बारकाईने आणि पुन्हापुन्हा वाचणे आले.

सुनीळ सामंत

खरे आहे. एकदा वाचून ह्या कथा समजणे कठीण आहे. कथेतील बारकावे समजावल्याबद्दल सर्वांचे आभार 🙏 🙏

सावित्रीबाईंच्या हातातील बिलवर आणि हाराचा उल्लेख परत परत येतो. तो गोविंदरावांची चांगली संपत्तीक स्थिती दर्शवण्यासाठी की त्यातही काही सुप्त अर्थ दडलेला आहे?

त्यांना दागिने नकोसे झाले आहेत हे तर जेव्हा त्या ते काढून फणेरी पेटीत ठेवू लागतात त्या प्रसंगात लक्षात येते.

विशाखा आपटे

गोविंदरावांचे एक वाक्य आहे. गाडीवाल्याला ते पैसे जास्त देतात. पण त्याला तसे सुनावतातही. "नाहीतर त्याला वाटायचे, आपण यांना फ़सवले. एक रुपया गेलेला विशेष नाही. पण आम्ही आयुष्यात कधी फ़सणार नाही

हे वाक्य गोविंदरावांचा स्वभावविशेष आहे. ते फ़सणारे नाहीत.

---

जीएंची ही कथा वाचताना मला कायम जाणवले की (हे आधीही लिहिले आहे) हिंदी फ़िल्मप्रमाणे त्यांच्या व्यक्तीरेखा चांगल्या किंवा वाईत नसतात. त्या अत्यंत व्यामिश्र असतात. आणि हेच तर सत्य आहे. कोणतीच व्यक्ती एकपदरी, two dimentional नसते. जीएंच्या कथा वाचताना आपली माणसाची पारख करण्याची कुवत विकसित होत जाते.

सुनीळ सामंत:

' जखम 'कथेवर वाचक प्रतिसाद देत आहेत त्याबद्दल आभार. एखादी कथा हिरा आहे, असे समजले तर, वाचकाच्या व्यक्तिनिष्ठ विचाराप्रमाणे तो त्या हिऱ्याकडे पहातो. भाग । प्रमाणे तो संपूर्ण हिरा, त्याचा आकार, रंग, कलाकाराचे कौशल्य पाहील. भाग 2 प्रमाणे तो हिऱ्याचा एखादा पैलू कसा घडवला आहे हे पाहील.

- माझ्या विवेचनात मी या कथेकडे माणसाचे - अस्तित्वाचे मनोविश्व कसे बदलते व जगापासून तुटते हे पाहण्याचा प्रयत्न केला. मी बापूला मध्यवर्ती धरून त्या घटनेचा इतरांच्यावर कसा मानसिक परिणाम होतात ते पाहीले. प्रत्येक माणूस थोडाफार वेडा असतो. त्याचे इतरांना प्रमाण कमी अधिक वाटते. व माणूस काही कारणाने वेडेपणाकडे खूप जावून तुटक होवू शकतो. म्हणून ही कथा कोणाचीही होवू शकते.

- काही वाचकांनी बापू वेडा का झाला, त्याची जन्मतः काय कारणे, त्याचे जैविक वडील कोण, याचा, म्हणजे कथेच्या एका पैलू चा शोध घेतला. अर्थात तो त्यांचा अधिकार मान्य करून खालील लिहित आहे.

मी डेव्हील्स ॲडव्होकेट होवून वाचकांनी केलेल्या बापूच्या जन्माच्या विश्लेषणाकडे पहात आहे. माझे मुद्दे याप्रमाणे -

श्रीपाद 4 महिने गोविंदरावांकडे राहीला. यावरून सावित्रीबाईच्या गरोदरपणाचा संबंध येत नाही. गोविदरावांकडे रमा ( व कदाचित इतर कर्मचारी. ) दिवसभर कामावर असतात. घर माडीचे आहे. त्यामुळे गोविंदरावांचे बायकोकडे लक्ष होते. " बापू तू माझा आहेस "असे आई म्हणणार. त्यातून काही सिद्ध होत नाही.

सावित्रीबाईना श्रीपाद अतिथीसारखा महत्वाचा वाटला. त्याचे स्वभाव गुण चांगले होते.

"बापू श्रीपादसारखा वाटला "असे म्हणण्याने काही सिद्ध होत नाही. तो मातृमुखी देखणाही झाला असेल.

श्रीपाद वेडा झाला. बापू वेडा झाला. यावरून काही सिद्ध होत नाही. गोविंदरावांनी, त्यांच्या आजीने लाकडे म्हणून हाडे आणली होती, हे सांगीतले होते. तो अनुवंश तिकडूनही येवू शकतो.

मुलाला मेंटल हॉस्पीटलमध्ये पाठवले, याचे आईला खूप दुःख झाले असेल. अशा वेळी वडीलांनी, श्रीपाद हॉस्पीटलमध्ये मेला म्हटल्यावर -" आपला मुलगा ही असाच मरणार "या विचाराने आई श्रीपादच्या नावावरून दचकली. व रडू लागली. यावरून काही सिद्ध होत नाही.

कथेत जखम सगळ्यांना झाली आहे. आईला मुलगा येतो का जातो, या विचाराची जखम झाली आहे. गोविंदरावांना दौलतीला वारस नाही, याची जखम झाली आहे. दुकानदार रघूही पुडी देवून रडतो.

हा सर्व विचार करता प्रत्येकाने भाग I मध्ये सांगीतल्याप्रमाणे कथेचा समग्र विचार करून मनोविश्व किती महत्वाचे आहे हे पहावे व या कथेचा आस्वाद घ्यावा ही विनंती. धन्यवाद.

विलास वाघोलीकर

👍

विलासजी 🙏 ,

जीएंची एक उपमा मला फार फार सूचक वाटते.

श्रीपादच्या आठवणीने प्रकाशनळीत हळूहळू प्रकाश भरत जावा तसे ऊष्ण सुख शरीरभर पसरले.

या फक्त आणि फक्त एकाच वाक्यात जीए बरेच काही सांगून जातात असे वाटते.

प्रमोद कुलकर्णी

ऊष्ण सुख हे शब्द जास्त सुचक आहेत का ?

वैभव कुलकर्णी

विलासजी, अत्यंत महत्वाचे विवेचन. प्रत्येक कथेवर चर्चा करताना कोणितरी ती चर्चा अशी १८० अंशांतून घुमवणेही आवश्यक आहे.

---

जीएंच्या सुरुवातीच्या कथांपैकी जखम ही एक. जरी अधूनमधून जीए अस्तित्ववाद आणि नियतीवादाला कथांतून स्पर्श करत होते तरी पहिल्या दोन कथासंग्रहांत मुख्यतः मानवी संबंधांतील गुंतागुंत व मनोव्यापारांतील खोलवरच्या प्रवाहांचा शोध हे त्यांचे मुख्य कथाविषय होते. त्यामुळे ही कथा जीएंनी सूचकपणे जी विधाने केली आहेत त्यांच्याकडे लक्ष ठेवूनच वाचावी असे मला वाटते. जीएंचा पारवा हा कथा संग्रह बराचसा स्त्रीपुरुष संबंधांभोवती फ़िरतो. त्यातील काही कथा स्त्रीपुरुष विवाहबाह्य संबंध व पापपुण्याच्या कल्पनांभोवती फ़िरतात.

काकणे, शलॉट, जखम, बळी, नाग, रातराणी, भेट, पाळणा, निरोप, व्यथा या कथा आठवून पहा. एक वेगळी कथा आहे ती- रात्र झाली गोकुळी.

सुनीळ सामंत

बरेच सूचक संदर्भ आहेत. त्यामुळे निश्चित पने बापू श्रीपाद चच मुलगा होता.

विश्वेश्वर नांदेडकर:

एकदम लखलखीत सत्य 👍

वैभव कुलकर्णी

जी ए एकही शब्द विनाकारण लिहीत नाहीत

सुनीळ सामंत

स्त्रीय: चरित्रम वर जी ए बरेचदा खूप कठोर होतात.

विश्वेश्वर नांदेडकर

आई, बहीण, मावशी, बऱ्याच कथांत पत्नी या संदर्भात जीए घरंदाज लिहितात. पण उनाड स्त्रीयांच्या बद्दल कठोर होतात.

यतीन गुळवणी

निष्ठेची अपेक्षा न बाळगता स्त्री सुख उपभोगावे, असे एक वाक्य त्यांच्या कथेत आहे.

विश्वेश्वर नांदेडकर:

पूर्ण वाक़्य असे आहे आत्म सयम् न सोडता मदिरापन करावे. सावलीत राहुन सुर्य परकाशचे आदर करावे. निष्ठेची अपेक्षा न करता स्त्री सुख भोगावे हे शस्त्र वचन आहे

परमजित सिंग:

हे सर्व खोटे आहे. जी ए स्त्री साठी सर सरसकट लिह्तात. आता एक दोन सांगतो. 1. वघलला घाण असते. सर्पा ला विश असते तसे स्त्री ला निर्लज पणा च अंग असते. पन्नास साठ वर्ष जगले लया माणसाला बाई ने केलेलया विश्वासघात चे

आश्चर्य का वाटावे. आपण सर्पा ला अंगा खंद्या वर खेळवतो दध पजवतो त्याने दंश केल्या वर आप्ल्या ला आश्चर्य वाटते काय.

विहिरीचा तळ, घोड्याच पार्श्वभाग आणि स्त्री चे मध्य भाग वर कधी विश्वास करु नये.

सगळ्यात मोठा आकडा बाई च्या दोन पायाचा.

लता काय वेलि काय त्याना चढाया साठी कोणते ही झाड चालते.

असे आणखी असंख्य वाक़्य आहे

फक़्त बहिनी बद्दल त्यंना ममत्व होते

विशाखाजी, दागिन्याविषयी आपला प्रश्न योग्य आहे.

गोविंदराव हा एक कंजूष माणूस म्हणून जीएनी दाखवलेला आहे. गोविन्दरावांची सांपत्तिक स्थिती, त्यांचे छोटे घर व सावित्रीबाईच्या अंगावर चढवलेल्या गुंजाभर सोने यांतूनच त्यांनी दाखवली आहे. त्या गुंजभर सोन्यामध्ये दोनच दागिने कथेत येतात. एक गळयातील हार -जो अंधारात चमकतो व दुसरे हातातील बिलवर-जे थोड्याशा हालचालीने किणकिणते..

गोविंदरावाविषयी सावित्रीबाईच्या मनात एक प्रकारची चीड आहे. त्यांचे बोलणे तिला आवडत नाही. त्यांच्या जाड ओठातून आलेले शब्द अंगावर चिकट थेंबासारखे पडत आहेत असे वाटून तिचे त्रस्त होणे अथवा "जरा गप्प बसा व जा इथून" असे ओरडुन सांगावेसे वाटणे यातून ते दिसून येते.

बापूला हाॅस्पीटलला कसे नेले व सात रूपये ड्रायव्हरला द्यावे लागल्याचे ( 'पाच रूपये बस होते. सहा म्हणजे डोक्यावरुन पाणी--') दोनदा गोविंदराव सांगतात.

.... यावर सावित्रीबाईं कांही बोलत नाही.

पण त्यांनी गळ्यातील हार काढुन फणेरी पेटीत लगेच बसल्याबसल्या टाकला व हातातील बिलवर काढण्यासाठी त्यांनी हात वळविताच, "सारे कशाला काढतेस?" असं गोविंदरावनी म्हटल्याने सावित्रीबाई बिलवर काढत नाहीत.

पण पुढे कथेत जेव्हा श्रीपादचा उल्लेख गोविंदरावाच्या तोंडी येतो तेव्हा सावित्रीबाई चरकून, उठून बसताना त्यांचे बिलवर ( नेमके) खळखळते.

सावित्रीबाईनी फक्त गळ्यातील हार फणेरी पेटीत टाकणे, बिलवर हातातच ठेवणे व श्रीपादची आठवण निघाली की तो बिलवर खळखळणे... आणि कथेच्या शेवटी गोविंदरावचे मनातले विचार शब्दबद्ध करताना

--" तिच्या दु:खात आपण अखेर उपरेच, हे त्यांना फार बोचले. बापू, सावित्री काय, फणेरी पेटीतील हार काय, किंवा रक्त आटवून बांधलेले हे घर काय, कुठलेच आपले म्हणायला काही नाहीच. कुठेच आतड्याचा संबंध नाही. "-- असे लिहून गोविंदराव यांची मानसिक स्थिती जीए दाखवतात. त्यामध्ये

तेव्हा गोविंदरावना हार आठवतो पण बिलवर आठवत नाही..

.... यात आपण निर्देश केलेला सुप्त अर्थ निश्चितपणे आहे... आणि तो अर्थ शोधण्याचे स्वातंत्र्य जीए वाचकांवर सोपवून टाकतात... !

मग... 'ते बिलवर श्रीपादने दिलेले आहे काय ?' असाही अंदाजात्मक सुप्त अर्थ रसिक वाचक काढू शकतात... !

राजेश उनवणे

कथेत श्रीपादची भूमिका - बिल्वर देण्याइतकी वाढत चालली आहे. असो.

विलास वाघोलीकर

सर, नमस्कार.. !

सुनीलजी यांनी नमूद केल्याप्रमाणे जीए कथेतील प्रत्येक शब्द तोलून मापून लिहितात, हे खरेच आहे.. !

त्यांच्या प्रत्येक कथेत काहीतरी नाट्य आहेच.. जीएं सारखे प्रतिभावान साहित्यिक हे नाट्य शब्दांचा सामर्थ्यशाली उपयोग करून कधी कधी उघडपणे दाखवतात तर कधी कधी सुप्तावस्थेत ठेवतात.. !

जीएंसारखे अनेक प्रज्ञावंत कलाकार ज्या भावावस्थेत एखादी कलाकृती निर्माण करतात, तेव्हा त्या कलाकृतीचा आस्वाद घेताना त्यातील भावार्थ शोधण्याचा प्रयत्न वाचक नेहमीच करत असतात. अशावेळी त्यांनी शोधलेला भावार्थ दरवेळी मूळ कलाकाराच्या त्या कलाकृतीतील भावावस्थेशी मिळताजुळता असेलच असे नाही.. याची असंख्य उदाहरणे देता येतील.. देऊ शकतो!

.. त्यामुळे कदाचित जखम कथेतून मी काढलेले बापूच्या जन्माचे रहस्य चुकीचेही असू शकते... ! 🙏

राजेश उनवणे

विलासजी 🙏 जीएंची कथा आपण सर्वच आपापल्या अनुभवसंचितातून..... (set of experiences ) जगत असतो, जीए ती कथा आपल्याकडून जगवून घेतात, अनुभवून घेतात !

त्यामुळे प्रत्येकाचे perseption किंवा समज आणि ऊमज वेगवेगळी असणारच....... आणि त्यातूनच आपापले तर्क आणि कल्पना विलास अपरीहार्यतेने सुरू होतात.

आणि ते काही चुक नाही.

........ यातूनच कथा कोणकोणत्या अँगलने, एकादे प्रकाशमान झगझगीत रत्न फिरवून निरखावे तशी निरखून पाहीली जाते, पुन्हा पुन्हा अनुभवली जाते.

मी स्वतःतर आहे बापूला कोणता आजार असावा ? या विषयी psychiatry ची पुस्तके चाळतोय..... 😂 😂 😂 Schizophrenia, SPD, delusional paranoia, intermittent explosive disorder........ असे अनेक मानसिक आजार, आणि त्यांची अनुवंशीकता पण शोधतोय.......

कशा साठी ?

शेवटी भाग जाऊन हाती शुन्य मिळणार हे माहीत असुनही ऊगाचच काहीतरी धागेदोरे जुळवायची व्यर्थ धडपड.....

*मला वाटते हेच जीएंच्या कथांचे सामर्थ्य आहे *

अगदी बरोबर बोललात 👍

अनेक कथांमधे पात्रां भोवती जीए उपमा आणि वाक्यांचे पिरॅमीड रचत जातात

त्यातील एखादेच वाक्य खूप खूप सूचक किंवा असंख्य अर्थानी परत तेथेच येणारे किंवा वाचल्यावर मनात लगेच जे प्रकटीकरण होते तेच असणारे वगैरे वगैरे

मला वाटते आपण सर्वांनी बापूच्या जन्मरहस्याची चर्चा थांबवूया...

सुनीळजी छान विवेचन 👍

ही लहान कथा नाही. या कथेतील प्रत्येक पात्र एक एक कादंबरी आहे.......

वैभव कुलकर्णी

# जन्म – जी ए कुलकर्णी- कथासंग्रह -रक्तचंदन

सुनीळ सामंत: जन्म ही कथा एका गरीब लहान मुलाच्या, मारत्याच्या, आयुष्यातील एका दिवसाची आहे. वरवर पाहता ती बालमानसशास्त्र विषयक कथा वाटते. पण तसे नाही. सारे जगच जणू शत्रु झालेल्या एका व्यक्तीची ती कथा आहे. खुद्द स्वतःची आई त्याला खाऊ देत नाही. मारत्या मधला भाऊ आहे. मोठा भाऊ नोकरी करतो म्हणून त्याला खाऊ, आणि लहान भाऊ लहान आहे म्हणून त्याला खाऊ. वडील तर वडीलच, त्यांना तर सर्वात पहिला घास द्यावा लागणार. तेव्हा राहिले दोघेच मारत्या आणि त्याची आई. ते दोघेही बिचारे कायम उपाशी.

त्यात शाळेमध्ये शिक्षक जे काही शिकवतात त्यात मारत्याला अजिबात रस नाही. इतर मुलांच्या खोड्या काढणे, विशेषतः छान कपडे घालून येणाऱ्या, अभ्यासू, नाजूक धीरेंद्र ला त्रास देणे त्याला विशेष आवडे. धीरेंद्र वरून त्याने आपल्या कुत्र्याचे नावही धीरु ठेवले होते. मोठा भाऊ, वडील, गुरुजी, धीरेंद्र, किट्ट्या या साऱ्यांचाच मारत्याला सतत राग येत असे. श्रीमंत घरातील व्यंकू नावाच्या एका वेडसर मुलाचे काम त्याला करावे लागे. व्यंकूची कथा अजूनच वेगळी. त्याचा भाऊ त्याला सांभाळू पाहतो, तर वहिनी त्याचा राग राग करते.

व्यंकू कडचे पोहे आणि आठ आण्याचे नाणे मिळवताना मारत्याने केलेला अभिनय केवळ उच्च दर्जाचा मानावा लागेल. ते आठ आणे घेऊन मारत्या जेव्हा जत्रेमध्ये जातो तेव्हा ते नाणे कोणीतरी चोरते, आणि उलट मारत्यावरच चोरीचा आळ येतो. हे पाहून वाचकालाही कळवळा येतो. पण त्याचे वडील मात्र त्याचे काही

ऐकूनच घेत नाहीत आणि त्याला बेदम मारतात. शेवटी मारत्या वडिलांचे पैसे घेऊन फरार होतो. पण जाताना तो व्यंकू चे आठ आणि परत करतो.

कथेला अनेक अनेक पैलू आहेत. मुलावर होणारा अन्याय हा एक पैलू. मानवी आयुष्यात अचानक घडणाऱ्या, आयुष्यातला अचानक लाभ आणि तोटा, अकल्पित घटना हा दुसरा पैलू. आणि माणसामाणसांतील व्यामिश्र भा्व संबंध हा तिसरा पैलू. मारत्याचे तत्त्वज्ञान आणि नीती अनितीबद्दलचे त्याचे स्वतःचे परिमाण. घरातून जाताना तो भावाच्या सायकलचा टायर तोडतो, पण कुत्र्याला मात्र व्यवस्थित दफ़न करतो. बापाचे पैसे चोरतो पण व्यंकूचे पैसे परत देतो. त्याचे हे तत्त्वज्ञान व निती समजून घेताना वाचकाला प्रश्न पडतात.

या हून एक वेगळी सौंदर्यपूर्ण बाजूही या कथेला आहे ती म्हणजे

जी ए नी केलेली एकेका घटनेची वर्णने. कुत्र्याचे शेवटचे आचके देत मरणे, मारत्याची वखवखणारी भूक, टमाम फ़ुगलेली जत्रा, बापाने दिलेला मार मारत्याने खाणे, व्यंकू चे घाबरणे, या घटना शब्दा द्वारे इतक्या जिवंत केल्या आहेत की जणू काही त्या आपण प्रत्यक्ष पहातच आहोत.

जन्म ही कथा जीएंच्या कथांतील भूक आणि लहान मुलं या बाबतची एक लक्षणीय कथा आहे. मराठीत या विषयावर फ़ारशा कथा नाहीत. कारण त्यात मनोरंजन नसते. पण वास्तव तर हेच आहे.

सुनीळ सामंत: या कथेतून मला अनेक प्रश्नही पडले आहेत.

पहिला- या कथेला "जन्म" हे शिर्षक का दिलं असेल?

सुनीळ सामंत:

विलास वाघोलीकर : जन्म-1) या 18 पानांचे कथानक सुनीळजींनी थोडक्यात दिले असून, कथेचे सारही दिले आहे. त्याबदल त्यांचे आभार मानतो

-2) जी एंनी अनेक कथांत दाखवलेली हातातोंडाशी गाठ असून जगणारी माणसे, या कथेतही आहेत. कुसुमगुंजा (2) मध्ये दाखवलेली भूक, येथेही मारत्याच्या वाट्याला येते. बाबा व परशा काम करून चिल्लर आणणार. त्यात पाच पोटांची भूक भागत नाही. मारत्याला नेहमी मागेच रहावे लागते. त्यात काकाचा खून पाहून, वेडसर झालेल्या व्यंकूची देखभाल करायचे, तो काम करतो. पण अशा वेडसर व्यंकूला भीती दाखवून हाच पोहे खातो. (जाता जाता - जखम कथेतील बापूला मेंटल हॉस्पीटलमध्ये काय पर्याय मिळाला असेल हा विचार पडू शकतो. म्हणून तर बापू तेथील साहेबांना घाबरत असतो. )

-3) पण जत्रेत पैसे जातात. रिबन चोरल्यावर मार मिळतो. व घरी बाबा अगदी खुर्चीच्या लाकडाने मारतो. आई तानीही हिडीसफिडीस करत असते. पण कुठेतरी कळवळते. या साऱ्या जन्माच्या मारहाणीतून व भूकेतून मारत्या, व्यंकूला त्याचे आठ आणे देवून, रेल्वेने दूर मोठ्या शहरात एकटाच बेवारस जीणे जगण्यासाठी जातो.

- 4)पुनरुक्ती वाटेल - पण कोंडीत पकडणारे अव्यवस्थित, विस्कळीत, अस्तित्व घेवून मारत्या जन्माला येतो. व अस्तित्वाचा एक पैलू दाखवतो. म्हणून जीएंनी कथेला 'जन्म 'शिर्षक दिले आहे.

धन्यवाद. विलास वाघोलीकर

शुभांगी इनामदार : जन्म हे शीर्षक का दिले असावे ह्याचा अर्थ मला शेवटच्या परिच्छेदात जाणवला.

मारत्या जे आयुष्य जगतोय त्याला तो कंटाळलेला आहे. साधी पोटाची भूक भागेल इतके अन्नही त्याला मिळत नाहीये. वर रोजची मारहाण! त्याच्या खोड्या किंवा उचापात्या ह्या कशावरील तरी रागाची प्रतिक्रिया म्हणून येतात. अगदी किट्ट्याचे किंवा व्यंकूचे खाणेही तो हिसकावून खात नाही('त्याला वाटले, जर आजही व्यंकूने काही न खाता ते आपल्याला दिले तर काय गंमत होईल!') मात्र ते मिळावे म्हणून तो युक्ती करतो व व्यंकूने स्वतः आग्रह केल्यावरच खातो. 'गाईचे खाणे कोण खाते कधी ? 'ही जाण असणारा तो, असह्य भुकेपोटी " कोण बालिस्टर आलाय पाहायला म्हणत"ते भिजलेले भाकरीचे तुकडेही खातो. जत्रेत त्याचे चिल्लर बांधलेले फडके चोरीला जाते त्या तिरीमिरीत तो रिबन चोरतो पण आपला पट्टा तो गाडीवाला काढून घेतो हे त्याला सहन होत नाही. तो चोर नाहीये. पण - 'उद्या सगळेजण चोर म्हणतील, आणि चोरी झाली माझी. घरी खायला नाही आणि बाबा विष घालेलही. मग धीरप्रमाणे अंगावर माशा बसतील' -ह्या भीतीमुळेच तो घर सोडतो. (अजून एक-- 'महादू भटांची ओलीकिच्च लाकडे कोण चोरून नेणार. एकदा तानीबाईने एक लाकूड उचलून आणले तर त्याला विस्तव शिवेना आणि धुराने सारे घर ठार आंधळे झाले' जी. ए. प्रत्त्येक शब्द व वाक्य तोलून मापून काही विशिष्ट हेतूने योजतात ह्याचे प्रत्यंतर इथे येते. तिने एक लाकूड उचलून आणले, चोरले नाही!चूल पेटवण्याच्या गरजेपोटी केलेली उचल, त्याला चोरी कसे म्हणता येईल आणि त्या एका लाकडाने महादूभटाला कितीसा फरक पडणार?कदाचित हे पाहिलेले असल्यामुळेच मारत्या चिल्लर हरवल्याच्या रागात, प्रतिक्षिप्त क्रियेने गाडीवाल्याची रिबन उचलतो. जी त्याला धीरच्या गळ्यात बांधायची असते. धीरेंद्र ची कुचेष्टा म्हणून कुत्र्याच्या पिल्लाचे नाव धीर ठेवलेले आहे पण कधी कधी वाटते मारत्याला त्याचे त्रासदायक जगणे सुसह्य व्हावे म्हणून त्याने गोळा केलेला तो धीर

आहे) मारत्यामधे एक निरागस हट्टी मूल लपलेले सतत जाणवते. जे प्रामाणिक आहे. म्हणूनच जड अंतःकरणाने तो व्यंकूचे आठ आणे परत करतो. तो दुष्ट, खुनशी नाहीये पण धीरेंद्रच्या खोड्या करतांना, किट्ट्याला मारतांना, बाबाला कडकडून चावल्यावर त्याची प्रतिक्रिया आठवून हसतांना, त्याची तंबाखू ची पिशवी विहिरीत भिरकावल्यावर किंवा घर सोडून जाता-जाता परश्याच्या वाटचा भात गिळतांना व त्याच्या सायकलचे टायर फाडतांना मारत्याला होणारा असूरी आनंद जाणवतो. हे सगळे त्याने त्याच्यावरच्या अन्यायाचा सूड म्हणून केले असेच वाटते. लाकूडअड्ड्यावरच्या महादूभटाला त्रास देणे असो किंवा म्यनिसिपालिटीचे बल्ब फोडणे असो, ह्या सगळया परिस्थितीच्या वैफल्याने आलेल्या प्रतिक्रिया आहेत.

त्याला हे सगळे सोडून जायचे आहे. ('आता संपले, सारी आतडी तुटली, सारे कर्ज फाडले. आता मागे काही राहिले नाही. राहिले ते सारे पुढे समोरच. लाल निळे दिवे, आगगाडीची धडधड, तिची कर्कश शीळ. ')

हे जगणे मागे सोडून तो पुढील प्रवासाला निघाला आहे.

मूल जन्माला येतांना गर्भाशियाच्या भिंतींच्या आकुंचन प्रसरणातून पुढे सरकते व अंधारातून उजेडात येते आणि जन्म होतो. (जी. ए. लिहितात-'नंतर दोन्ही बाजूंच्या भिंतींनी दाबत पुढे आणून त्याला जन्म दिल्याप्रमाणे मारत्या कोपर्यावरच्या प्रकाशात आला आणि एकदम नाळ तुटल्याप्रमाणे तो एक नवी भूक घेऊन एका आडवाटेने लाल निळ्या दिव्यांच्या चमक्या बसवलेल्या रेल्वे लाईनीकडे धावू लागला. ')ह्या नवीन जन्मात चांगले जगणे वाटेला येण्याची ही भूक आहे.

-शुभांगी इनामदार

मारत्या हे कॅरॅक्टर पून्हा नव्याने अनुभवले.

अत्यंत गरीबी, भूक आणि आठ दहा वर्षाचे वाढीचे वय, घरातील गरीबीने आणि अशिक्षीतपणाने वाट्याला येत असलेला तुसडेपणा, ...... शाळेतल्या धिरज

सारखे आयुष्य न मिळाल्यामुळे त्या वयात येणारा मत्सरी द्वेष, जत्रेत साध्यासूध्या स्वप्नांची झालेली राख..... त्यातून जन्माला आलेली ऊद्विग्नता आणि चिडून जाऊन केलेली रिबीनीची चोरी !

नंतरचा अपमान, त्याच्याच पट्याची चोरी आणि घीरचा मृत्यु, बापाने बेदम मारणे.... गोठ्यातले अंबोण खाण्या पर्यंत झालेली भूकेची परवड.....

यातूनच एक बंडखोर व्यक्तीत्व जन्म घेते.......

मारत्या स्वतःच नकळत पूढच्या दहा वर्षाचा स्पॅन सांगून टाकतो !

आणि या नविन जन्मात तो काय बनेल हे जीए वाचकांवर अलगदपणे सोडून देतात

-वैभव कुलकर्णी

जन्म या कथेच्या विश्लेषणानंतर मी लिहिले होते की मला काही प्रश्न आहेत. त्यातला फक्त एक प्रश्न मी मांडला. कथेचे नाव 'जन्म ' का? शुभांगी मॅडमनी या एका प्रश्नाचे उत्तर देताना माझ्या इतर सर्व प्रश्नांची उत्तरे दिली. जणू त्यांना माझे इतर प्रश्नही आपोआपच समजले. किंवा त्यांनाही ते पडले आणि त्यांनी त्यांचा माग काढला असावा. मारत्याची नैतिकता हा मला पडलेला सर्वात मोठा प्रश्न होता. तो चोर आहे की नाही? त्याच्यावर चोरीचा आळ येतो तेव्हा त्याला खूप राग येतो, शरम वाटते. पण स्वतःच्याच वडिलांच्या खिशात तो चोरी करतो, ते त्याला योग्य वाटते. हे मला समजत नव्हते. मारिओ पुझो यांच्या गॉड फादर कादंबरीच्या आधी एक वाक्य आहे "देअर इज अ क्राईम बिहाइंड एव्हरी फॉर्च्यून". या वाक्याचा व्यत्यास असा होतो की प्रत्येक गरीब अयशस्वी माणसाच्या परिस्थिती मागे त्याची नैतिकता असते. मी जेव्हा जेव्हा एखाद्या क्षेत्रातल्या लायक पण अयशस्वी किंवा गरीब व्यक्तीला भेटतो, तेव्हा मला सर्वात प्रथम जाणवतात ती त्याची त्याने स्वतःवरच लादून घेतलेली (वा घरातल्या संस्कारांतून आलेली) नैतिकतेची बंधने. पैसे चोरीला

गेल्यावर भूक वखवखत असताही मारत्या प्रथम उचलतो ते खाऊ नाही. धीर साठी रिबन उचलतो. बापाचे पैसे चोरल्यानंतरही मारत्या प्रथम त्यातले अर्धे (हातातून सुटत नसतानाही) व्यंकूला परत करतो. तिथे मला एका सिनेमातला प्राणचा डायलॉग आठवतो "तुमने ठीकही सुना है. चोरोंकेही तो उसूल होते है". मारत्या जेव्हा आपले उसूल, आपली नैतिकता, आपली सदसद्विवेकबुद्धी यांची तो पुनः-रचना करील तेव्हा मारत्याचा मारुतीराव होईल ही एक शक्यता जीएंनी कथे अंती ठेवली आहे. त्याचा नवा जन्म होणे आहे. हे जाणवून दिल्याबद्दल शुभांगी मॅडमचे अनेकानेक आभार. नाहीतर मी ही कथा एका गरीब मुलाचे अधःपतन होणे या अर्थीच पहात होतो. आत्ता खरी कथा समजली. (असे वाटते, कदाचित अजून काही खोल असेल)

-सुनीळ सामंत

जी. एं. च्या कथा नेहमीच खूप अस्वस्थ करतात. अनेक प्रश्न निर्माण करतात. प्रत्येक कथा एखाद्या kaleidoscope सारखी आहे. परत परत वाचतांना नवीन काहीतरी दृष्टीसमोर येते. ह्या ग्रुपवर आल्यापासून त्यांच्या कथेतील वेगवेगळे पैलू समजायला खूप मदत होतेय.

=- शुभांगी इनामदार

आज कितव्यांदा "जन्म" वाचली ते आठवत नाही. पण तरीही दरवेळी नवनवीन काही सापडतेच.

नायकाचं नाव मारुती का बुवा? त्यातल्या वाऱ्याचे गुण ? मारत्या फ़ुग्याप्रमाणे फ़ुगला... की हनुमंती गुण?

व्यंकू? व्यंगामुळे?

कुत्रा धीर? धैर्यासाठी?

जीए प्रत्येक व्यक्तीरेखा सटीक, स्पष्ट, रेखीव उभी करतात. अगदी या सुरुवातीच्या कथांतूनही हे दिसते.

देशपांड्यांकडची मोलकरीण अगदी ओझरता संदर्भ आहे. पण तरीही तिला व्यक्तीमत्व द्यायला जीए चुकत नाहीत. व्यंकूचा भाऊ, वहिनी, रामणा पोलीस, एक एक व्यक्तीरेखा काही सेकंदांची. तरीही लक्षात रहाणारी. शोलेमधल्या सांभा किंवा नाई सारखी.

ही कथा वाचताना वाटले जीए सिनेमाची कथा लिहीत आहेत. इंटरव्हलपर्यंतची लिहीली आणि नंतरची कथा वाचकांवर सोडून दिली.

"मैं जब इस शहरमें आया था तो मेरे पास एक फ़ूटी कौडीभी नहींथी. कुछ था तो मेरे मां का दिया हुवा आशिर्वाद" हा हा हा.

मारत्या चा मारुतीराव झाल्याची कथा कोणीतरी लिहायला हवी.

-सुनीळ सामंत

अगदी योग्य निष्कर्ष!जी. एं. च्या कथा चित्रकथाच वाटतात!

मारत्या परशाला" बोगस दिलीप कुमार "म्हणतो तर मोलकरीणला" नर्गीस सारखी दिमाखात चालते असे म्हणतो. " सहसा त्यांच्या कथेत असे उल्लेख फार कमी आढळतात. पण तेव्हाच्या काळात चित्रपट-नाटक किंवा रेडिओ पलिकडे करमणूक नव्हती. मारत्याचे लहान वय लक्षात घेता त्याला असलेले हिरो हिरा‌ॅईनचे आकर्षण किंवा त्याच्यावरील प्रभाव सहजच लक्षात येतो. खरतर परिस्थिती पाहता त्याने जत्रेतील तंबूत थोडेफार चित्रपट असेच अर्धवट, किंवा कनातीतून लपून पाहिले असावेत असे वाटते.

- शुभांगी इनामदार

# ठिपका - जी ए कुलकर्णी - ( काजळमाया )

अलका तडकलकर : या ग्रुपचे मुख्य आकर्षण म्हणजे जी ए कुलकर्णी सर. त्यांचे साहित्य म्हणजे मराठीचा अभिमान. अशा ग्रुप मध्ये मला येण्याची संधी मिळेल असे पूर्वीही वाटले नव्हते. परंतू आले आणि इथे जीए चे साहित्यातले बारकावे बघायची संधी मिळाली. यासाठी मनःपूर्वक आभार. मा. सुनीळ सामंत सरांना तर खूप खूप धन्यवाद. त्यांनी मला लगेच एक कथा विवेचनास देऊन फार बरे केले. कारण त्यामुळेच मी जी ए याची काही पुस्तके मी बाजारातून विकत घेतली व निवांत पणे वाचायला सुरुवात केली. कोणते पुस्तक आधी वाचावे व कोणते नंतर वाचायचे असे काही न ठरवता सरळ काजळमाया कडे वळले. पण जी ए लवकर कळत नाहीत हे प्रकर्षाने जाणवले.

तरीही एक प्रयत्न म्हणून या पुस्तकातील ठिपका ही कथा वारंवार वाचत जमेल तसे विवेचन करत आहे. यासाठी मी अगोदर मा. विलास वाघोलीकर सरांचे मार्गदर्शन घेतले. त्यांचे खूप खूप आभार.

...............................................

ठिपका विवेचन- अलका तडकलकर

। ) ठिपका ही कथा शोधकथा आहे. जीवन आणि मृत्यू अशा दोन वाटा त्यात आहेत. त्या वाटेवर काय शोध लागतात हे पहात वाचक पुढे सरकतो.

2 ) पहिल्या वाटेवर जिथे जीवनाची ओढ आहे. तिथेही जगणे शोधायचे आहे. धनगर समाजातील अनेक कुटुंब गावरानाचे माळरान झाल्यामुळे गाव सोडून जातात. रामण्णा हा वयस्कर माणूस मागे राहतो. त्याचा मुलगा राचय्या, सून भवरी, आपल्या सोबत उरलेल्या शेळया मेंढ्या घेऊन जगण्याच्या वाटेला निघून जातात. रामण्णाला झोपडीआणि जीवनावश्यक वस्तू ठेवून. पण पोटची नातेच जणू तुटल्याप्रमाणे रामण्णा अस्वस्थ होतो व बेचैन अवस्थेत झोपडीबाहेर येत समोर दिसणाऱ्या टेकडीवरच्या ठिपक्यासारखे देवूळ पहायला निघतो. ही मरणाची वाट. ही दुसरी वाट. तर दुसऱ्यांच्या मदतीवर जगणारा व आपल्याला कोणीतरी वाचवेल या आशेवर झोपलेल्या अपंग मुलाची तिसरी वाट.

3)रामण्णा टेकडीवर चालायला लागतो तेव्हा वाटेत त्याला गारूडी कम डबा सिनेमावाला - संन्यासी - भुत्या - लहान अशक्त पांगळा मुलगा हे भेटतात - टेकडी -डोंगर अवघड चढणीचा असतो. तो दमतो. पण शेवटी पांढऱ्या ठिपक्यासारखे दिसणारे देवूळ एक मोठ्ठे स्वयंचालित गोल गोल फिरणारे देवूळ असते. रामण्णा विस्मयाने पाहतो. त्या देवळाला प्रत्येक खांबामागे दरवाजा असतो. पण समोरचा दरवाजा बंद होतो. आधीचा, नंतरचा दरवाजा उघडा असतो. रामण्णा अचंबित होतो. पण शेवटी धाडस करून मागच्या दरवाजातून आत जाण्यासाठी उडी मारतो. पण नाही. तो जोरात फेकला जावून पडतो व सूचकतेने दाखववले आहे, की मरतो.

4) मनोरंजन, भाषाशैली, खटकेबाज संवाद व वातावरण वर्णन यामुळे हा पहिला प्रवाह वाचक, एखाद्या घटनाप्रधान कथेप्रमाणे वाचत जातो.

5 ) आता याकथेतून शोधायचे म्हणजे, प्रत्येक पात्राचा, प्रसंगाचा, घटना क्रमाचा अर्थ शोधणे.

रामण्णा हा मुमुक्षु म्हणजे जीवनाचे सार शोध घेणारा एकमेव आहे. कोणी तो प्रयत्न करत नाही. तो सर्वांबद्दल संवेदना असणारा आहे. मु ल गा, सून, कुत्रा, अशक्त पांगळा मुलगा यांबद्दल संवेदनशील आहे. पण जीवनसार शोधायचे म्हणून तो सर्व पाश तोडून कष्टाचा प्रयत्न करायला निघाला आहे.

त्याला डबा सिनेमावाला भेटतो. तो कलेचे तुकडे दाखवतो. त्यात राणी, माणसे, युद्ध इत्यादी असते. मनोरंजन असते. हा गारूडी - डबा सिनेमावाला म्हणजे कलावंताचे प्रतिबिंब आहे. तो जीवनात जगण्याची लालसा - सौंदर्य दाखवतो. पण तो. धनलोभी आहे. त्याला सोन्याचा साप हवा आहे. तो कधी मिळणार नाही. त्याचा जीवनसाराचा भाग येथे संपतो.

संन्यासी - हा तत्वज्ञ आहे. जीवनातील, अनुमान -सुसंगती -विसंगती दाखवून जीवनसार मिळेल असे त्याला वाटते. इंद्रियजन्य ज्ञानावर त्याचा विश्वास नाही. श्रद्धाही नाही. मृत्यू हेच सत्य असे त्याला वाटते. पण त्याला ज्ञानगर्व आहे. इस्किलारमधील तत्वज्ञ - मद्य पाणी आहे व पाणी मद्य आहे असे तर्काने दाखविण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे त्याच्या जीवनसाराचा हा भाग अपुरा आहे.

भुत्या-त्याची 'वरील देवळात जगदंबा आहे' ही श्रद्धा आहे. त्या श्रध्देमुळे इंद्रियनिष्ठ ज्ञानावर त्याचा विश्वास नाही. म्हणून तो अंध आहे. म्हणून त्याचा जीवनसाराचा भाग अपुरा आहे.

लाकडाच्या वखारीतील मुलगा - हा अपंग, अशक्त दाखवला आहे. दिवस जात आहेत. त्याला संन्याशाने मृत्यूचे भाकित सांगितलेले असते तर जोगतीणीने

उपायही. त्यामुळे कुणीतरी देवळाला घेऊन जाईल याची वाट पहात आहे. त्याला जीवन रहस्य कळणार नाही. रामण्णा मात्र संवेदनशील मुमुक्षु आहे. पण जीवनसार शोधण्याचा प्रवास खडतर आहे. ते सर्व कष्ट घेवून तो देवळाच्या पायऱ्यांपाशी जातो.

देउळ, हे साधे देवूळ नाही. ते विश्वाचे रूप आहे. ते गरगर फिरत आहे. तारकांप्रमाणे लखलखत आहे. त्याचा समोरचा दरवाजा बंद होतो. म्हणजे सहजासहजी त्याचे स्वरूप कळत नाही. मागचे पुढचे दरवाजे अर्धवट उघडतात. तेवढेच आपल्याला दृश्य विश्व कळते. आणखी कळण्यासाठी उडी मारली तर रामणणाची वाचा जाते. लाल प्रकाशाने डोळे दिपतात. त्याला जे दिसले असे वाटते, ते सांगण्याआधीच तो गतीमान, अनिर्वचनीय विश्वाकडून फेकला जावून संपतो.

शेवटच्या क्षणाचेही ज्ञान माणूस इतरांना सांगू शकत नाही. माकड नि माणूस काय दोघेही अनंत शक्तीच्या हाताचे खेळणे. माणूस बुध्दीवान असूनही नेमक्या कोणत्या वाटेवर जावे हे कळत नाही व ज्ञानानंतरही कोणी पूर्वीच्या जगात येवू शकत नाही, असे दाखवले आहे. सर्व चाचण्या यशस्वी केल्यावर अनंतमध्ये पायऱ्या नष्ट होवून नायक एकटाच तेथे बसतो. हे दाखवले आहे.

शेवटी नेति नेति हे खरे. अशी ही अनेक प्रवाहांची मुख्य कथा सांगते. प्रतिभावंत जीएंना माझा नमस्कार.

विशेष आभार मा. विलास वाघोलीकर सरांचे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे मी हे लिहू शकले.

..............................................

कथासार ही कथा वाचून झाल्यावर मला असे वाटले की एखादी गोष्ट दुरून खूप लहान वाटते. आकर्षित करणारी असते परंतू महतप्रयास करून तिच्या जवळ

जाताच अपेक्षाभंग होतो. कधीकधी मन रूष्ट होते. ठेच लागावी असे काहीसे होते. असे कसे देवा तुझे विश्व देखणे क्षणोक्षणी बदलतात इथे भाव मनातले हे कळून चुकते.

लांबी रुंदी नसलेला आकार म्हणजे टिंब/ठिपका. पांढराशुभ्र. इथे टेकडीवर मंदिराचे प्रतिक आहे. विचित्र परिस्थितीत सापडलेला रामण्णा तिथे जाऊन काहीतरी मार्ग सापडेल या आशेवर टेकडी चढत जातो. पण शेवटी तो ठिपका स्वयंप्रकाशित मोठ्ठा गोल असल्याचे दिसते. खरेतर तेवढ्या उंचीवर गेल्यावर हातापायांची शक्ती भरपूर खर्चलेली असते. त्यामुळे त्याचे डोळे गरगरू लागतात... भास होतो मंदिर फिरत असल्याचा आणि एवढ्या दूरवर येऊन काहीच हाती न लागले ही घोर निराशा रामण्णा ला निर्जीव करून सोडते. शेवटी काय तर दुरून डोंगर साजरे

धन्यवाद.... डॉ. अलका तडकलकर

डॉ. तडकलकर. आपली जाणिव सदृढ आहे. मंदिरातील दर्शनाने रामण्णा भयभित होतो. जसा, श्रीकृष्णाने अर्जुनाला विश्वदर्शन केल्यावर अर्जुन घाबरतो, मला हे पहावत नाही, हे विश्वदर्शन थांबव. तद्वत रामण्णाची अवस्था होते. जि. ए. आपल्याला नेहमी वैश्विक सत्याची ओळख करून देतात. वास्तवात मानवी मेंदु विश्वदर्शन करू शकत नाही. अवकाशाचा अदांच मानवाच्या बुद्धी -तर्क-बोध आणि शोधाच्या पलिकडे आहे. याची मानवाने खात्री बाळगावी.

-दिलिप बडे

डॉ. अलकाजी यांना मनापासून धन्यवाद.. ! 🙏

अतिशय सुंदर व सोप्या भाषेत विवेचन. कथेचे मर्म अगदी बरोबर सांगितले आहे.

या रुपककथेतील गारुडी, संन्याशी, भुत्या, अपंग मुलगा यांचे रुपकात्मक अर्थ आपण व्यवस्थित सांगितल्याने कथा समजायला मदत होते. रामण्णाच्या मुमुक्षूत्वाबद्दल आपले स्पष्टीकरण अगदी दाद देण्याजोगे आहे.

मुमुक्षू व्यक्ति आत्मबोधासाठी तळमळत असते. आत्मज्ञान प्राप्त करण्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्याची त्याची तयारी असते. ठिपक्याविषयी रामण्णाला सुरवातीस, तो प्रपंचात गुरफटलेला असताना ओढ नव्हती. पण आयुष्याच्या संध्याकाळी गेल्या आठ-दहा वर्षात त्यास ठिपक्या विषयी कुतूहल वाटू लागले आहे. तो ठिपका काय आहे-कसला आहे हे पाहण्यासाठी प्रत्यक्ष जाण्याचे त्याने दोन-चारदा ठरवले होते. कधीतरी नक्की जायचे हे ठरवूनही प्रापंचिक जीवनातील अनेक प्रसंगांमूळे त्याला ते शक्य झालेले नाही. पण ओढ कायम आहे. रामण्णाचे सर्व पाश आता सुटलेले आहेत. आता ती ओढ अधिक घट्ट झालेली आहे. त्याला फक्त ते मंदिर, तो ठिपका कसला आहे हे पहायचे आहे. बाकी त्याचे काही मागणे नाही. तो निरपेक्ष, निस्पृह आहे, लोभ-मोह काही उरलेले नाहीत. जीवनसार शोधणारा रामण्णा म्हणून मुमुक्षू आहे, हे अगदी योग्य वर्णन.

श्री. दिलीपजी यांनी वरती म्हटल्याप्रमाणे, जीए त्यांच्या अशा रुपक कथातून मानवी मेंदूला अतर्क्य असणाऱ्या वैश्विक सत्याची ओळख करून देण्याचा, तिचा शोध घेण्याचा सतत प्रयत्न करताना दिसून येतात. तो या कथेतही आहे.

जीएनी लिहिलेले या कथेच्या रूपकात्मकतेमधील व संभाषणातील अनेक बारकावे वाचल्यानंतर अचंबित व्हायला होते. आणि.. सूक्ष्माचे विराट दर्शन कथेतून

रुपकात्मतेने सांगणाऱ्या प्रतिभावान जीएंच्यासमोर खरोखरच नतमस्तक व्हावेसे वाटते.

पुन:श्च धन्यवाद.. !

राजेश उनावणे

अलका तडकलकर : धन्यवाद सर

आपली प्रतिक्रिया वाचून खूप छान वाटले. आयुष्यात प्रत्येक गोष्टी मनासारखी होत नसते. तरीपण आज ना उद्या होईल या आशेवर माणूस जगत असतो. आशा आणि निराशा जणू आयुष्यातले जंतर मंतर आहे. पण ते शब्दातून दाखविणारे जीए अद्वितीय. 🙏

सुनीळ सामंत: डॉ. अलकाजींनी अतिशय सार्थ शब्दांत या कथेचे नेमके विवेचन केले आहे. मला तरी ही कथा जेवढी कळली होती त्याहून अधिक या विवेचनानंतर कळली. आणि त्यामुळे मला या चर्चेत तत्त्वज्ञानाच्या अंगाने काही भर घालता येईल असे दिसत नाही. दिलिपजींनी म्हटल्याप्रमाणे अलकाजींनी तिथे विश्वदर्शन हा शब्द वापरून कथा उंचीवर नेली. विवेचन अतिशय आवडले. एक समृद्ध अनुभव मिळाला.

हे विवेचन वाचल्यावर कथा पुन्हा एक्दा वाचायला घेतली आहे. आज त्यावर जमेल तशा टिपणी लिहीत जाईन.

डॉ. अलकाजी, विलासजी, दिलीपजी यांचे आभार.

सुनीळ सामंत: राजेशजी, अहाहा.

तुमचा "सूक्ष्माचे विराट दर्शन" हा शब्दसमुच्चय अतिशय आवडला.

तुमच्या विवेचनातून श्रीमदशंकराचार्यांच्या गीताविवेचनाची आठवण झाली. गीतेकडे अनेक अंगांनी पाहिले जाते. भक्तीयोग (ज्ञानेश्वर), कर्मयोग (टिळक) इत्यादी. पण शंकराचार्यांना भावला तो ज्ञानयोग. निव्वळ कुतुहल. निव्वळ जिज्ञासा. ज्ञानपिपासा. तीच रामण्णाकडे आहे.

सुनीळ सामंत: ठिपका- जीए कुलकर्णी- काजळमाया

ठिपका ही कथा मला दोन कथांची एक जोड कथा वाटते. आणि त्यातला जो पूर्वार्ध आहे तो मला कितीही वेळा वाचला तरी पुन्हा पुन्हा वाचावासा वाटतो. राचय्या, रामण्णा, भवरी, मेंढ्या आणि कुत्रा यातील सहज उमललेले प्रेमसंबंध इतके प्रामाणिक आणि नैसर्गिक आहेत की त्यावर जीव ओवाळून टाकावा. उघड्या आकाशाखाली आणि मोकळ्या जमिनीवर राहणारी ही जमात, त्यांचे एकमेकांशी संबंध ही तसेच मोकळेढाकळे, कसलेही कृत्रिम आवरण नसणारे, आणि कोणत्याही भाषेचे, शब्दांचे, अलंकरण नसलेले.

निघताना राचय्या रडला नाही की चेपून गेल्याप्रमाणे मुळुमुळु बोलला नाही. त्याने केले काय तर आपल्या जिवापाड जपलेल्या वहाणा आणि जाकीट बापासाठी ठेवून गेला. सून भवरी सुद्धा तिला तिच्या बापाने दिलेले चिका सारखे शुभ्र पांढरे कांबळे आपल्या सासऱ्या साठी ठेवून गेली. रामण्णानेही त्यांना दिलेला आशीर्वाद किती गोड! “पुढे डोळ्यात मावणार नाही एवढं गवत, गवताच्या पात्या इतकी पुढं मेंढरं, आणि मेंढरांइतकं लेकुरवाळं मिळू दे रे बाबा तुम्हाला”. निसर्गाच्या अत्यंत

जवळ, निसर्गाचा भागच होऊन जगणारे हे मनुष्यप्राणी पाहून मला तरी हा भाग पुन्हा पुन्हा वाचावासा वाटतो.

या भागात जीएंच्या शब्द कळेने फार मोठी उंची गाठली आहे.

मेंढ्यांचे बेबे सुद्धा अस्पष्ट झाले तेव्हा या ठिकाणी एकदम भयाण झाले.

दहा मैल गवताचे हिरवे पान नव्हते की कधीच आटणार नाही असा समज ज्या विषय होता त्या वीरभद्राच्या तलावात रखरखीत उन्हात जळणारे डोळे ओले करायलाही पाण्याचा टिपूस उरला नव्हता. मेंढ्यांच्या पाठीवर नुसता हात ठेवला की त्यांच्या अंगातील हाडे वच दिशी हात चावत आणि हातांच्या निव्वळ दाबाने त्या बसकण मारत. नाही म्हटले तरी गेल्या दोन-तीन महिन्यात 14 मेंढ्या हिरवे ओकत कोरडे खोकत आडव्या झाल्या होता.

आता खांद्यावर आडवी टाकून तो उभा होता अशीच आडवी काठी टाकून तो येथे प्रथम आला त्यावेळी तो भूईतून वर आला असेल नसेल.

सारा जन्म जागेपणी, झोपेत भोवती मेंढ्यांचा कुंद केसाळ वास होता.

दूरच्या तरण्याताठ्या पोरी झगमग लुगडी खोचून भरगच्च कणसा सारख्या पोटऱ्या घेऊन लग्नाने येथे आल्या, लेकुरवाळ्या झाल्या. दिवस सरले तशी त्यांच्या अंगातील हाडे तक्रार करू लागली त्यांचे बापे कातडीने सैल पडू लागले. रात्री कांबळ्यावर एकदा अंग टाकल्यावर पहाटेलाच छेडलेल्या तारे प्रमाणे ताडकन जागा होणारा रामणा आता अंगाला चिकटलेल्या लेंड्यांप्रमाणेच जमिनीला अर्धा एक तास जादा चिकटून वेळ काढू लागला.

भवरी म्हणजे केवड्याचे कणीस. होती निंबाचा पाला तोडताना तिने नुसती खुण केली असती तरी ते झाड पाला देण्यासाठी एखाद्या गुलामाप्रमाणे तिच्यासमोर आनंदाने वाकले असते.

जीएंचा हा कथाभाग माझ्या मध्यमवर्गीय मनाला खूप आनंद देतो. अगदी मोकळे मोकळे झाल्यासारखे वाटते. असे वाटते कि कुठे या सिमेंटच्या घरांमध्ये आपण आपले आयुष्य वाया घालवतो आहोत, कसले कसले फालतू विचार घेऊन मनाशी कुढत असतो! एकदा उठावे आणि अशा धनगरांच्या पालावर जाऊन निवांत उरलेले आयुष्य संपवून टाकावे. नाही नाही, खऱ्या अर्थाने जगावे.

जीए फार निराशावादी, शून्यवादी, अस्तित्ववादी विचारांनी लिहितात व त्यांचे वाचल्यावर ज्गण्याची आसक्ती नाहीशी होते असे म्हटले जाते. पण त्यांच्या अनेक कथा वाचताना जीवनाविषयीची आसक्ती वेगळ्या अर्थाने वाढते असा माझा अनुभव आहे.

सुनीळ सामंत

दिलिप बडे: जाणावे असे एकच तत्व अवकाश. प्राणी ते मानव, ते देवत्व हा माणसाचा प्रवास चढत्या क्रमाने व्हावा. आणि द् यान युक्त कर्म भक्ती ठरते. हे चारही मार्ग समजावण्यासाठी वेगळे आहेत. पण जगताना त्यात एकत्व असावे. रामण्णाच आयुष्यभर ठिपक्या कडे आकर्षित होण. ठिपक्यातच विलीन होण हा मानवी जिवनाचा प्रतिकात्मक प्रवास जि. ए. नी रेखाटला आहे.

अलका तडकलकर : हो अगदी बरोबर. पंचतत्वापैकी आकाश/अवकाश तत्व मोठे व अनुभवण्यासही अमर्याद.

गौरी देशपांडे: किती सुंदर लिहिलंय ! अतिशय खुलेपणाने लिहिलेलं प्रत्येक वाक्य पटलं. ✌️

विलास वाघोलीकर: ठिपका कथा-डॉ. अलका मॅडम यांनी कथेचे खूप छान विवेचन केले आहे. पुन्हा कथा वाचल्यावर, मला आणखी जे लक्षात आले. ते येथे मांडत आहे. कथेतील कथानक पकड घेणारे -एक टेकडी कडील प्रवासवर्णन - वाचकाला वाचायला लावणारे - आहे. त्यातील काव्यार्थ मात्र विचार करायला लावतो.

माणसाकडे जीवनाचे सार शोधताना काय मार्ग आहेत ?

' | )पहिला तत्वज्ञानाचा. ते वैज्ञानिक असेल किंवा विगमनात्मक असेल. पण तसे सर्व तत्वज्ञान मृत्यू कल्पनेपाशी जावून थांबते. मृत्यू सत्य आहे. बाकी क्षणभंगूर आहे. हे मान्य करून तत्वज्ञानाला पुढे जावे लागते. मृत्यू येणार. मग जीवन, कठोरपणे- का संवेदनशीलतेने घालवायचे, हा पुढचा प्रश्न आहे. संन्यासी, कठोर जीवनाचा अंत मृत्यू आहे हे सांगतो. सोन्याचा साप मारतो. अपंग कधी मरेल याची वाट पहातो. असा हा संन्यासी तत्वज्ञानी तर्कावर अवलंबून आहे. व म्हणून त्याला मर्यादा पडतात.

2 ) दुसरा मार्ग श्रध्देचा. माझ्या वचनावर किंवा पूर्ववचनावर विश्वास ठेवून जगावे, असे श्रध्दावान -भुत्या - सांगतो. श्रद्धा ठेवली तर काळा अंगारा पिवळा

दिसेल. मृत्यू आहेच. पण श्रद्धा ठेवली तर जीवन आहे. म्हणून तो अपंग मुलाला धीर देत असतो. जीवनात श्रद्धेला स्थान आहे. आई वडीलांवर श्रद्धा ठेवून मूल मोठे होते. अडचणीत सर्व मार्ग संपले तरी श्रध्देवर माणूस डोंगर चढतो. म्हणून भुत्यालाही महत्व आहे. पण तो अंध आहे. पराकोटीच्या श्रद्धेने जगात विनाश झालेला आपण पहातो..

3 ) शक्यतांचे अनेक पर्याय सांगणाऱ्या कलावंताचाही मार्ग आहे. गारुडी - डबा सिनेमावाला -अशी चित्रे दाखवतो. तो नसला तर जीवनात फक्त काळे -पांढरे राहील. शक्यता अजमावूनच पुढे जाता येते. पण कलावंताला पैशाचा - सोन्याच्या सापाचा - लोभ झाला की, कला मनातील न राहता, लोकानुरंजानाची होते. मग लिखाण चटपटीत पातळीवरचे राहते. येथे जी ए स्वतःच्या कलेला पारखत आहेत, असे वाटते. लेखनातून - कलेतून पैसाच मिळाला पाहीजे, असे कलावंताला वाटू लागते. प्रतिभावंत त्या लोकानुरंजनाकडे लक्ष देत नाहीत.

3 )अपंग मुलगा सर्वसामान्य माणूस असून दिवस घालवण्यातच अडकलेला असतो.

ही कथा 'काजळमाया' पुस्तकात आली. नंतर जीएंच्या प्रवासी, अनंत सारख्या कथा आल्या. त्यांतही नायकाच्या प्रवासाचे असेच टप्पे दाखवले आहेत.

अनंत कथेप्रमाणे, शेवटी विश्वाचे दर्शन व सार काढणे हे अनिर्वचनीय आहे, हे दाखवले आहे. माणसाला व मानवजातीला विश्व किती मोठे आहे- कसे आहे, हेसुध्दा मर्यादित आयुष्यात कळू शकत नाही. मग त्याचे सार काढणे, माणसाच्या कल्पनेच्या शक्तीबाहेरचे आहे. जीएंनी विश्वाचे अवाढव्य स्वरूप अनेक कथांत दाखवले आहे. स्वामीमध्ये... हा गोलक आहे तरी कसला.. परिच्छेद महत्वाचा

आहे. माकडाचे काय.. कथेत लाखो प्रकाशवर्ष अंतरावरचे तारे सांगितले आहेत. म्हणून येथे स्वयंचलित गरगर फिरणाऱ्या देवळाचे रूपक वापरले आहे. अनंत मध्ये, नायक शिखरावर गेला तरी दार उघडले जात नाही. येथेही समोरचे दार उघडत नाही. मागच्या दाराकडे रामण्णा उडी मारतो तर फेकला जावून मरतो. ते मृत्यूसमयीचे ज्ञानही तो सांगू शकत नाही. म्हणून वरवर वाचनीय वाटणाऱ्या या कथेत, विश्वाच्या व नियतीच्या अनिर्वचनीयतेची दिशा दाखवली आहे. हे प्रतिभवावंत जीएंना शक्य झाले आहे. धन्यवाद. विलास वाघोलीकर

राजेश उनवणे : वाह, सुनीलजी.. , 👌 ..

आता या लिखाणालाही 'अहाहा' म्हणायलाच हव.. !

अतिशय मोकळेपणाने लिहिलेत आपण.. !

पालावरचे धनगर-मेंढ्या यावरील आपले लिखाण वाचून 'बनगरवाडी' ची आठवण झाली.. 👍 👌

सुनीळ सामंत: ठिपका या कथेच्या उत्तरार्धाबाबत अलकाजींनी इतके विस्तृत व नेमके लिहिले आहे की त्यावर अजून काही भाष्य उरलेले नाही असे वाटले होते. आणि तेच खरे आहे. परंतू डबा सिनेमेवाला मात्र माझ्या मनात वेगळेच चित्र उमटवून गेला. मला तर तो स्वतः जीए च आहेत असे वाटते. आपल्या शब्दांनी वेगवेगळी दृश्यं कथा कहाण्या सांगता सांगता जीवनाचा अर्थ सांगणारे. वाचक आहेत की नाहीत याची फ़िकिर न करता आपल्याला जे सर्वोच्च वाटेल तेच लिहिणारे जीए.

आणि तत्त्वज्ञानाविषयीचे तत्त्वज्ञान, अस्तित्ववादाबद्दलचे त्यांचे मतही त्यांनी त्या बाईस्कोपवाल्याच्या तोंडच्या शब्दांतून व्यक्त केले आहे.

----

त्या अंधारात एक गोल, लहानसे पण फार दूरचे वाटणारे रंगीत जग जागे झाले. लालभडक पोशाख घातलेली राणी हिव्यांचा मुकुट घालून सिंहासनावर बसली आणि हजारो लोक मान लंबवून तिच्यापुढे नम्र झाले. अनेक घोडेस्वार धुळीतून धावले. प्रेतांचा खच पडला. सोन्याच्या झगझगीत नाण्यांचा लखलखीत लाल-निळया रत्नांचा डोंगराएवढा ढीग दिसला, राजवाडे उभे राहिले, शहरे जमीनदोस्त झाली, घरे बेचिराख झाली... ट् कडकड कंट्कट् आवाजाने अनेक चित्रांची एक मिरवणूकच डोळयांपुढे सरकली. शेवटी गारुड्याने कड्कड् असा आवाज करून वाटी थांबवली व खोका मागच्या बाजूने बंद केला.

डोळे बाहेर घेऊन रामण्णाने चेहरा हालवला. रंग, गती, उन्माद, वैभव यांची धुंदी त्याच्यावरून कमी कमी झाली.

“ हे सगळं कसं होतंय बघू तरी. तो खोका उघडून दाखव मला. " पुढे सरकत रामण्णा उत्सुकतेने म्हणाला.

पण गारुड्याने हात उचलीत त्याला थांबवले. " हां हां ! गड्या, ठेचाळलास बघ तू इथं !" तो म्हणाला. "एक सांगतो बघ तुला हिताची गोष्ट! आवडलं की नाही सगळं ! बस्स, झालं तर मग ! पुढं जाऊन कश्शाच्या मागे जाऊन का-कसं असल्या उठाठेवी करू नये बघ कधी शहाण्याने! नाचऱ्या मोराच्या मागे गेलं की काय दिसतं माहीत आहे नव्हं ? "

----

जी ए इथे असेच सांगत आहेत की आनंदाने जग बाबा, आणि जगण्याचा आनंद घे. उगीच त्याच्या मागे मागे जाऊन तत्त्वज्ञान, अर्थ शोधायच्या भानगडीत पडू नकोस. आहे त्यात आनंद मान. दिसलं त्यात सुख मान. मजा कर. चार दिवस आहेस ते जगून घे. टंकडकट्ट आवाज जाला की ते बंद होणार आहे.

- परमजीत सिंग-- ठिपका या कथे ची चर्चा वाचली. मी फक़्त कही सुंदर लाईन सांगणार आहे. 1गारुडी म्हणाला शहाण्यान आप्ल्या गळयातळया दाव्याची लांबी मोजून घ्यावी तेवदी माया सोडअवी तेवडयाच जागेत काय धिंगाणा घालावा आणि गप्प बसावे. 2 अनुभवी शहाण्या डोळयांनी स्थिर पणे समोर पहात बसलेले लहानसर पण हजार सुरकुत्या तोंडावर असलेले एक लाल माकड निश्चल बसलेले होते. 3 गडया धन्द्याचे कसब कामाचा हात असा कधी मारतोय होय. 4 अरे जे दिसत तेवढंय्न् माणसाने फसूनं जाऊ नये. तो सगळा वर वरचा नखरा. 5. चेहरया पेक्षा कवटी खरी. कवटी पेक्षा राख खरी. आणि राखे पेक्षा माती खरी. 6. कारणं हा जास्त सत्य नाग आहे. पुर्वीचा नाग महणजे बेगडी सोंग होते. 7. असेलही नसेलही अस मह्णुयाला शीक बाबरे तेच खर शहाण पण. 8 भुक लगलेली असली की सगळी प्रथ्वी अवळया एवढी वाटू लगते. आणि भुकच नसली की आवळादेखील प्रथ्वीएवडा वाटू लगतो.

9. एक सांगतो बघ तुला हिताची गोष्ट. आवडले की नाही सगळे बस्स झाल तर मग. पुढे जाऊन कश्याच्या मागे जाऊन का कस असल्या उठाठेवी नये बघ कधी शहाण्यान. नाचरया मोरा च्या मागे गेले की काय दिसत माहित आहे नव्ह 10. हो

आणखी एक ओठ चेहरा याची कसलिही साक्ष नसलेला एक आवज अगदी हलक्या स्वरात म्हनला आणि मग सारेच निशब्द झाले

दिक्काल शब्द पण छान आहे.

दिशा आणि काळ.

दिशा नसेल तर काळही नसतो.

व काळ नसेल तर दिशाही नसते.

इरावती कर्वे यांनी यावर मोठे छान लिहिले आहे.

-प्रमोद कुलकर्णी

"ठिपका" हे नाव कथेला देण्यामागे काय विचार असावा? बिंदू, टिम्ब किंवा असे काही नाव का दिले नाही?

मला ह्याबद्दल असं वाटतं की

बिंदू, टिम्ब आपण रेखतो, त्यांना एक निश्चित गोल आकार असतो. ठिपक्याची बाह्यरेखा विशिष्ठ प्रकारची नसते. तो लहान किंवा मोठा कसाही असू शकतो, आणि कशाचाही असू शकतो... ठिपक्यात एक नैसर्गिक सहजता आहे आणि अनिश्चितता ही आहे.

त्यातून डोंगरावर दिसणाऱ्या किंवा ज्याचा शोध घ्यायचा आहे त्या सत्याचं स्वरूप नक्की काय आहे यातील धूसरता अधोरेखित होते.

- विशाखा आपटे

# डाग जी ए कुलकर्णी ( निळासावळा )

डाग - ( निळासावळा छंद 1955 )- विवेचन व्ही एस वाघोलीकर

- जी ए कुलकर्णी यांचा 'निळासावळा 'पहिला कथासंग्रह. 'छंद 'मासिकामध्ये 1955 मध्ये ही प्रसिद्ध झालेली कथा आहे. जीएंचे कथालेखन सुरवातीचे असण्याचा तो काळ होता. जीएंनी त्यांच्या कॉलेज मासिकांतही काही लिखाण केले होते. त्यावेळी खांडेकर इत्यादींचे वाचन चालू असणार. त्यावेळची ही छोटी कथा आहे.

कथानक- विवाहीत नायक, मीना पत्नी, वसंत मुलगा, असे कुटुंब छोट्या कोशात आनंदाने रहात होते. कदाचित नायक 3 5 अधिक वर्षे वयाचा असेल.

- व अचानक या त्रिकोणात 'ती' आली. लहान गावात वारंवार दिसली. पण नायकाला तिचे डोळे, चापून चोपून नेसलेली साडी पाहून, ती मनात ठसली.

- बोलणे, चालणे नाही. नजरानजर. पण अशा वेळी पतीचे लक्ष संसारात कसे रहात नाही, हे लेखकाने दाखवले आहे. पत्नीच्या बोलण्यातून लक्ष उडणे, मुलाच्या खेळण्यातून लक्ष उडणे, अशी उदाहरणे देवून - मनावरचा हा डाग दाखवला आहे.

- शेवटी मध्यमवयीन पती तिला "कारटे "- म्हणतो. व कथा संपते.

-" कारटे, आपल्या डोळयातील काजळाचा माझ्या आयुष्यावर निष्कारण कायमचा डाग पाडलास !"

सुनीळ सामंत: अतिशय सुंदर सुरुवात करून दिल्याबद्दल विलासजींचे आभार.

जीएंच्या इतर कथांच्या मानाने ही कथा लहान आहेच, पण कथेचा आवाकाही तसा छोटा आहे.

सुनीळ सामंत: डाग- जी ए कुलकर्णी- निळासावळा

डाग ही जीएंच्या इतर कथांहून वेगळी आहे. विलासजींनी म्हटल्याप्रमाणे ती अगदी सुरुवातीच्या कथांमधली, जीए स्वतःचा सूर शोधत असतानाची आहे. ही कथा मला बरीचशी तेव्हाचे यशस्वी लघुकथाकार अरविंद गोखले यांच्या वळणाची वाटली. पण यात जीएंच्या धारदार शब्दकळेची तीव्रता मात्र खास जीएंची खासियतच आहे. म्हणून मी त्या कथेतील तो वर्णनाचा भाग देत आहे.

*मी तिला पाहिले. मीनासाठी वारभर कापड आणण्यासाठी मी दुकानात गेलो होतो. त्या वेळी ती माझ्या बाजूला उभी होती. निरनिराळ्या तरुण रंगांची रेशमी तलम वस्त्रे बोटावरून सरकवून ती पाहात होती. त्यांचा फुलपाखरू आनंद तिच्या डोळ्यांत दिसत होता. तिची बोटे जर व्हायोलिनवरून फिरली असती तर त्यातून अशा तऱ्हेचे रंग बाहेर पडले असते.

*ती मला एखाद्या तेजाच्या हिरव्या कळीसारखी वाटली. **साऱ्या शरीरभर रेखीव व कुलवंत रेशमी मिजास पसरली होती**. गळ्याखाली जांभळसर छायेचा भाग पांढऱ्या, नाचऱ्या साटिनात नाहीसा झाला होता. एवढ्या अंतरावरही मन धुंदीने भोवळले. तिने सहज मान वर करून पाहिले, आणि **मला दोन काळेभोर चटके बसले**. काजळाची एक सुबक रेषा तिने डोळ्यांखाली ओढली होती, आणि त्यामुळे **तिच्या नजरेच्या धारेला विष चढले होते**.*

*ती निघून गेली. कापड न घेताच मी परत आलो. इतके दिवस अगदी जपून ठेवलेले काही तरी हातातून पडून फुटल्याची मला सारखी जाणीव होत होती, व उदास वाटत होते. त्यानंतर ती मला अनेकदा दिसली. सायंकाळी पावणेसहाला हातावर पुस्तकांचा संभार घेऊन ती येत असे. हे लक्षात आल्यावर ती येईपर्यंत, ती जाईपर्यंत, माझी पावले तिथे वळून गुंतवळू लागली. **एकदा ती अबोली, सळसळणारे पातळ नेसून आली. तिने गळ्याभोवती जळत्या निळ्या रंगाचा***

***स्कार्फ गुंडाळला होता. मॅग्नोलियामधून निळी ज्योत जवळ येईपर्यंत ती सरळ समोर बघे, पण जवळून जाताना मात्र खिडकी उघडून हळूच पाहिल्याप्रमाणे तिचे डोळे वळत.*** *आणि* ***तिची नजर काळ्या लखलखीत सुरीप्रमाणे लाल ओरखडा काढीत असे.***

**घरी सुद्धा तिच्या उन्मत्त गंधाच्या आठवणीने मनावर पावले उमटत**

प्रमोद कुलकर्णी: अरविंद गोखले यांच्या मंजुळा या कथा संग्रहाची आठवण झाली.

दिलिप बडे: सामंत सर, हळुवार-फुलपाखराचा विहार -पांढर्या मातीच्या गंधाचा वाटावा असा जि. एं च्या संवेदनशील मनाचा आरसा डाग कथेतील या अवतरणात जाणवला. धन्यवाद.

अलका तडकलकर : डाग दोन पानांची ही कथा आहे. परंतू प्रत्येक शब्द आणि ओळ वाचकाला खिळवून ठेवते.

प्रमोद कुलकर्णी: सुरुवातीला त्या संसारात पोसवलेल्या केळीची तृप्तता आणि आळसावलेल्या डोळ्यांचे सुख होते.

तिच्या आगमनाने तोच संसार ठिकठिकाणाहून जमवलेली लक्तरांचा वाटू लागला!

# दीपस्तंभ १ व २ जी ए कुलकर्णी ( सांजशकुन )

दीपस्तंभ I व 2 - सांजशकुन पुस्तक - लेखक - जी ए कुलकर्णी

विवेचक - व्ही एस वाघोलीकर

1)दीपस्तंभ I व 2 या कथा मला प्रमेय कथा वाटतात. त्यातील काही समजले, व काही समजले नाही. पण तरीही या महत्वाच्या कथांवर लिहावेसे वाटते.

2)वाचकाने सर्व कथा वाचली पाहीजे. जीएंनी प्रवासाचे रूपक जीवनासाठी अनेकदा घेतले आहे. त्याप्रमाणे ही कथा, न थांबता संपूर्ण वाचून, विचार करणे हाही एक प्रवास आहे.

कथानक -

3)अनामिक प्रवासी प्रवास करत आहे. त्याला अनेक गोष्टी भेटतात. पण डावीकडे, उजवीकडे, वर, खाली कसेही गेलात, तरी शेवटी मृत्यू भेटणार आहे. यावेळी ओ हेन्री यांच्या पिस्तूल केंद्रित कथेची आठवण होते. ( त्या कथेचे नाव आठवत नाही. पण प्रत्येक पर्यायात शेवटी एकच पिस्तूल येते, व कधी अपघाताने, कधी खून होवून, कधी आत्महत्या करून, नायकाचा मृत्यू होतो. )

4)या कथेत उंच माणूस - तरूण स्त्री - अशा रूपांत नियती येते. पहिल्या कथेत नायकाला, नियती हाताला धरून, दीपस्तंभाच्या डाव्या दरवाजातून खाली नेते. तेथे तो खोल समुद्रात - पाणबुड्यासारखा उतरतो. तेथील खोल समुद्राचे विलक्षण वर्णन केले आहे. पण समुद्रप्राणी त्याचा पाठलाग करतो. व लाल रंग वेढल्याप्रमाणे तेथे मृत्यू होतो. -" लाल रंग उसळला व गडद काळोखात विरून गेला "- म्हणजे रक्त सांडून मृत्यू येतो.

5)दीपस्तंभ २ मध्ये, नायक उजव्या दाराने जातो. स्त्री - नियती - विविध आमिषे दाखवून त्याला त्या दरवाजातून जाण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करते. विलक्षण फूल - विलक्षण रत्न - विलक्षण मोहाची वासना, समोर येवूनही तो ( इच्छास्वातंत्र्य वापरून ) उजव्या दाराने वर वर जातो. त्याला विलक्षण अवकाश - घुमट दिसतो. पण त्याला स्पर्श करताच देहाचा दाह होवून, रक्ताचा थेंब व थेंबही आटतो व नायक जीर्ण होवून मृत्यू पावतो. या भागात शब्दांचा संदर्भ आहे. त्यामुळे प्रत्येक शब्द घासूनपुसून वापरणाऱ्या कलावंताचा मृत्यू येथे दाखवला आहे. या कलावंताला सौंदर्य कळते. पण फुलात, रत्नात, वासनेत न गुंतता तो अवकाशाचा शोध घेण्यासाठी वर वर घुमटाकडे जातो. दोन्ही कथा लक्षात घेतल्या तर, रक्त सांडून किंवा रक्त आ टून मृत्यू येतो. जीएंचे मृत्यूवरील हे भाष्य लक्षणीय आहे.

6)काही वाक्ये -

- स्त्री म्हणते, " त्या दीपस्तंभावरचे नाव तुमचेच आहे. मग ते का वाचता. "

-आता फार वेळ उरला नाही. संध्याकाळ होईल. पिशवी येथेच ठेवायची.

-दिवस उगवल्यावर चांदणी उगवावी, त्याप्रमाणे ते फूल फार उशीरा माझ्या आयुष्यात आले. त्याला शोभेल असा नेमका रेखीव शब्द शोधायला मन आनंदाने झिजवले असते.

-या क्षणिक गोष्टींपेक्षा मला दीपस्तंभाच्या शुभ्र ज्योतीकडे पहायचे आहे. त्यात जांभळा रंगही विसर्जित होतो.

-नुसत्या दृश्याने रक्ताची झगझगीत वीज झाली असती.

-शब्दांत रक्ताची धग नसेल तर, असले शब्द मेलेल्या फुलपाखरांच्या पंखांच्या ढिगाऱ्यासारखे वाटू लागतात.

7)जीएंचे दिशादर्शन -जीएंच्या जीवनदृष्टीकोणात इच्छा स्वातंत्र्य आहे. म्हणून रस्ते - दरवाजे - निवड दाखवली आहे. पण अंतिम सत्य मृत्यू आहे. व तो मृत्यूक्षण, इच्छास्वातंत्र्य असूनही, अनाकलनीय, अनिर्वचनीय, नियतीच्या चौकटीत ठरतो. म्हणून नियतीची अंतिम शक्ती लक्षात ठेवून, निर्णय घेतानाही, "न-अहंकारी जीवन " जगावे लागते. असे या कथेत प्रतिभावंत जीएंनी कलात्मकतेने दाखवले आहे. धन्यवाद - विलास वाघोलीकर

सुनीळ सामंत: जीए कुलकर्णी यांची दीपस्तंभ एक ही कथा सांजशकुन या कथासंग्रहातील आठवी कविता- कथा आहे. ही कथा 1973 ला प्रथम प्रसिद्ध झाली.

सांजशकुन या कथासंग्रहाला एक विशिष्ट कथा अनुक्रम आहे अस्तिस्तोत्र पासून सुरु होणारा हा कथासंग्रह अहम या कथेपाशी संपतो. हा क्रम निराशावादी, शून्य वादापासून सुरू होतो तो मानवी अहम, अस्तित्ववादा पर्यंत प्रवास करतो.

त्यामुळे या आठव्या कथेतील तत्त्वज्ञान हे बरेचसे शून्यवादाकडे झुकणारे असले तरीही ते पूर्णतः शून्य वादी नाही. (नसावे. कारण हा क्रम जीएंनीच ठरवलेला आहे)

दुसरे म्हणजे या कथेवर मला ग्रेस यांच्या प्रतिमा काव्याची सावली जाणवली. ग्रेस यांच्या कवितेत येणाऱ्या गूढ प्रतिमांची साखळी या काव्यकथेतही जाणवते. ग्रेस यांच्या कवितांचा अर्थ लावणे योग्य की अयोग्य हा वादाचा मुद्दाअ आहे (हा वाद या ग्रुपवर नको). पण जीएंच्या कथेचा अर्थ लावणे हे आपल्याला क्रमप्राप्त आहे. दुसरे म्हणजे जीए को्णताही शब्द विनाकारण, केवळ छान वाटला म्हणून वापरत नसत. त्यामुळे त्यांच्या शब्द न शब्दाची छाननी करणे ओघाने येतेच.

विलासजींनी म्हटल्याप्रमाणे ही कथा एक प्रमेय कथा आहे आणि यातील प्रत्येक शब्द हा त्या प्रमेया चे सूत्र दर्शन दिशादर्शन करत असतो. या प्रत्येक सूत्राचा अर्थ लावाअ तरच हे प्रमेय सुटेल. कोणत्याही सूत्राकडे दुर्लक्ष केले तर या प्रमेयाचे उत्तर चुकेल.

उदाहरणार्थ- “ही तुझी पिशवी दुसऱ्या कोणालाही मिळणार नाही, ती तुलाच मिळेल- हे मला प्राक्तन किंवा पुर्वसंचिताचे गाठोडे असावे असे वाटते.

- गवताचे छप्पर असलेल्या खोपटे.
- त्या शेजारची मधमाशांचे पोळे
- न हरवणारी पिशवी
- उंच माणूस
- तो पुढे काय बोलणार आहे याची आधीच माहिती असणे
- नागफणा
- मद्याची बाटली व कासवाच्या आकाराची संगमरवरी पेटी
- त्रिशूळ

- तरुण स्त्री
- डावे व उजवे दार
- सहज दुभंगणारे पाणी
- त्या पाण्यातील झुडपे
- निळसर माशांचा थवा
- जांभळे प्राणी- एखादे वस्त्र असावे असे एकत्र पण अचानक ठिकऱ्यांसारखे विलग होणारे
- सांगाडा
- अंगठी
- एक टप्पा पुढे असलेला मित्र
- लाल सावली
- पुन्हा त्याच जागी परत येणारे आवर्तन

दिपस्तंभ १ मधील या सर्व प्रतिमांचा अर्थ न लावता पुढे जाता येणार नाही.

राजेश उनवणे : 👌 👍 योग्य विश्लेषण सर. 🙏

ही कथा मानवास जन्म-मृत्युच्या येरझाऱ्या कराव्या लागणाऱ्या मार्गावरील प्रवास (दीपस्तंभ-१).. तसेच,

या जन्म-मृत्युच्या फेऱ्यातून सुटून मुक्तीच्या मार्गावरील मर्त्य मानवाचा प्रवास (दीपस्तंभ-2) यावर आधारीत आहे.

आपणास ओ. हेन्री यांची 'Roads of Destiny' ही कथा अभिप्रेत असावी, असे वाटते. त्यातील मेंढपाळ व कवी असलेल्या डेव्हिड या नायकाची ती कथा

आहे. त्यामध्ये कसेही गेलात.. डावीकडे, उजवीकडे, सरळ कोणत्याही मार्गाने प्रवास केलात तरी जे नशिबात आहे, नियतीच्या मनात जे आहे, तेच घडून येईल त्यावर ओ. हेन्रीची ही कथा भाष्य करते.

आपण म्हणता त्याप्रमाणे दीपस्तंभ वाचताना या कथेची आठवण होते, हे खरे आहे.

जीए यांनी या ओ. हेन्री यांच्या या कथेचे भाषांतर ‘अदृश्यांच्या वाटा’ या नावाने अतिशय प्रभावीपणे केलेले आहे.

🙏

राजेश उनवणे : खरे आहे सर... ! ही एक रुपक कथा आहे.

'यातील प्रतिमांचा अर्थ न लावता पुढे जाता येणार नाही' हे आपले शेवटी असलेले वाक्य अगदी योग्य आहे.. !

कथेतील काही रूपक समजून येत नाही. जीएं ना नेमके काय सुचवायचे आहे, याचे कोडे पडते.

पिशवी म्हणजे पूर्वसंचिताचे गाठोडे हा आपण सांगितलेला अर्थ अगदी योग्य वाटतो.

सुनीळ सामंत: • गवताचे छप्पर असलेल्या खोपटे.

- त्या शेजारची मधमाशांचे पोळे - मोह आणि त्याचबरोबर येणारे धोके.
- न हरवणारी पिशवी - पुर्वसंचित

- उंच माणूस - ज्ञानी माणूस
- तो पुढे काय बोलणार आहे याची आधीच माहिती असणे - कोरडे ज्ञान
- नागफणा - पुढे जायला पायबंद घालणारे विचार.
- मद्याची बाटली व कासवाच्या आकाराची संगमरवरी पेटी - मद
- त्रिशूळ - क्रोध
- तरुण स्त्री - काम
- डावे व उजवे दार -
- सहज दुभंगणारे पाणी - काळ.
- त्या पाण्यातील झुडपे -
- निळसर माशांचा थवा
- जांभळे प्राणी- एखादे वस्त्र असावे असे एकत्र पण अचानक ठिकऱ्यांसारखे विलग होणारे
- सांगाडा - मृत्यूची जाणीव
- अंगठी - ओळख
- एक टप्पा पुढे असलेला मित्र - मार्गदर्शक
- लाल सावली - मृत्यूचा विचार
- पुन्हा त्याच जागी परत येणारे आवर्तन – पुनर्जन्म

- सुनीळ सामंत

खरं तर दिपस्तंभ या कथेवर बरीच चर्चा अपएक्षित होती. केवळ तीन चार पानांच्या या कथा वाचायला वेळ लागत नाही. आणि समजायला अनंत वेळ लागतो. गोषवारा विलासजींनी दिलाच आहे. पण जर खोलात शिरलं तर भिरभिरायला होतं.

दिपस्तंभ २ तशी फ़ारच (१च्या मानाने) सरळ आहे. त्यात म्हटलं तर चारच प्रतिमा आहेत

कृष्णकमळ- मन रमवणारे जग

रत्न- धन

स्तन - सुख साधन

दिवा - ज्ञान

यातल्या कशाहीच्या मागे गेलं तरी मृत्यू आणि अंत अटळ आहेत.

पण अस्तिस्तोत्र च्या पुढचे पाऊल हे की मानवाच्या हाती निवड आहे असे जीए इथे सांगतात. भले तो निवड शेवटी त्याच अंताकडे नेईल. पण प्रवासाचा मार्ग, जीवनाचा अर्थ, अनुभवसमृद्धी हे प्रत्येक माणूस आपल्या निवडीनुसार मिळवू सकतो असे ही कथा सूचित करते.

तरीही ही कथा समजल्याचे समाधान मिळाले नाही. बरेच काही धूसर धुके आहे.

- सुनीळ सामंत

राजेश उनवणे : सुनिळजी, बऱ्याच रूपका बाबत काही धूसर धुके आहे. हे खरे आहे.

यापूर्वीच्या पोस्ट मधील आपले विचार ---- ‘पण जीएंच्या कथेचा अर्थ लावणे हे आपल्याला क्रमप्राप्त आहे. दुसरे म्हणजे जीए को्णताही शब्द विनाकारण,

केवळ छान वाटला म्हणून वापरत नसत. त्यामुळे त्यांच्या शब्द न शब्दाची छाननी करणे ओघाने येतेच. ' --- हे मननीय आहेत.

त्यादृष्टीने दीपस्तंभ कथेतील सुरवातीच्या, म्हणजे प्रवाशाचा प्रवास सुरू होण्यापूर्वीच्या रुपकांविषयी जाणवणारा अर्थ सांगण्याचा हा अल्पसा प्रयत्न ---

१) माणूस मृत्युच्या जवळ आल्यावर, त्याचा शेवटचा म्हातारपणाचा प्रवास सुरू होते.

( 'त्याने आपल्या हाताकडे पाहिले, ते सुरकतून हताश दिसत होते आणि पायातील नाड्यादेखील वेदनेने एकतारीसारख्या थरथर ठणकत होत्या. आता अंगातील रक्ताचे पंखही गेले होते व मागे राहील होता तो केवळ एका ठिणगीला चिकटून राहिलेला निर्जीव मांसाचा थर!' --- इति जीए).

म्हणजे शरीर थकलय, म्हातारपण आलय, पण ते चैतन्य, ती ठिणगी, तो आत्मा अजून शरीर सोडून गेलेला नाही. अंतिम प्रवासास सुरवात झालेली आहे. कथा येथून सुरू होते.

२) उंच पुरुष- काळपुरुष (नियतीचे एक रूप) जीएंनी त्याचे केलेले वर्णन वाचनीय.

३) गवताचे छप्पर असलेले खोपटे –

काळपुरुषाच्या ताब्यात असलेले हे विसाव्याचे ठिकाण म्हणजे हे खोपटे वाळलेल्या गवताचे आहे. पण समोरचा रस्ता मात्र हिरव्यागार झाडीत नाहीसा होतोय.

शरीर थकल्याने विश्रांतीसाठी खोपटातील कोंदट खोलीत एक बाजले आहे. प्रवासी अंग सैल करण्यासाठी बाजल्यावर पडतो. पण पडताना 'अंगावरचे कपडे न काढता' तो पडतो.

तो बाजल्यावर पडतो न पडतो तोच उंच पुरुष/काळपुरुष येऊन सांगतो, ( "सांगत असे" — इति जीए),

"आता फारसा वेळ उरलेला नाही. !" प्रवासी दमलेल्या अंगाने प्रवास सुरू करताच तो हात पुढे करून म्हणतो, "मी तुमची पिशवी आत ठेवतो; पण आधी तुम्ही दीपस्तंभाकडे जाऊन या. आता फारच थोडा वेळ उरलेला आहे. " येथे पिशवीचा प्रथम उल्लेख येतो.

पिशवी म्हणजे पूर्वसंचिताचे गाठोडे--- हा रूपकात्मक अर्थ आपण सांगितलेला आहेच. प्रवासी पिशवी देतो. पण लगेच प्रवास सुरू करीत नाही. कारण काळपुरुष अजून काही सांगणार आहे. याची प्रवाशास निश्चित कल्पना आहे.

("उंच माणसाचे बोलणे पुरे झाले नव्हते, हे त्याला माहीत होते. " —जीए)

किंवा

("वळणानंतर काय दिसणार आहे याची त्याला पूर्वकल्पना होती, ")

किंवा

("यापूर्वी तो रस्त्यावर आला होता तेव्हा अनेकदा सकाळ होती, दुपार होती. " "आता संध्याकाळ होत आलेली आहे")

या सर्व रुपकांचा अर्थ – हा प्रवास सतत चालू आहे. 'जन्म-मृत्यु- पुन्हा जन्म- पुन्हा -मृत्यु....... ' असा हा प्रवास सतत चालू आहे.

कथेतील प्रवासी हा या पृथ्वीतलावरील (/मृत्यु लोकातील)

मर्त्य माणसाचेच रुपक आहे.

या प्रवाशाचे अनेक जन्म-मृत्यु झालेले आहेत. (भगवान श्रीकृष्ण गीतेतील चौथ्या अध्यायात अर्जुनास म्हणतात--'माझे व तुझे अनेक जन्म झालेले आहेत. मी ते सर्व जन्म आठवू शकतो, तुला आठवत नाहीत. ')

अनेकवेळा हा प्रवास केल्याने वळणानंतर व दीपस्तंभापर्यंत काय-काय दिसणार आहे याची प्रवाशास माहिती आहे. त्यामूळे हा जन्म=मृत्यूचा, ये-जा करावयास लावणारा प्रवास संपणार तरी कधी असा त्याला प्रश्न पडलाय.

५) मधमाशी माणसाप्रमाणे कुटुंबात, समूहाने राहते. कुटुंबासाठी ती परागकणातून मध गोळा करते. (माणसासारखीच) मधाची साठवणूक करते. त्यासाठी--- ‘त्या पेटीतून सारखी ये-जा करते. ’- इति जीए.

यानंतर प्रवाशाचा दीपस्तंभकडे प्रवास सुरू होतो..

.. दीपस्तंभ-2 मध्ये मात्र वर्णन जीए लिहीत नाहीत. पुनरुक्ती टाळतात. व ती कथा प्रवासी दीपस्तंभा पर्यन्त पोहोचल्यावर सुरू होते.. !

'दोन्हीतील रुपके व त्याचे अर्थ शोधल्या शिवाय कथा समजल्याचे समाधान नाही, ' हे सुनीलजी, आपले म्हणणे पटते.

.... जीएंच सर्वच क्षेत्रातील वाचन अफाट होते.. -विशेष करून ज्ञानेश्वरी त्यांना अधिक प्रिय होती.. कारण त्यामध्ये अशीच रूपकांची रेलचेल आहे.. !

सुनीळ सामंत: राजेशजी. अतिशय सुंदर. नेमके अर्थवाही. विवेचन. पण अजूनही अपुरे आहे.

ते जांभळ्या वस्त्रासारखे - जलचरांचा थवा- अचानक तुकडे होणारे. काय असावे बरे?

असे काही, जे एकत्र असते तेव्हा एकसंध वाटते.

समजत नाही तोवर चैन पडणार नाही

राजेश उनवणे : धन्यवाद सुनीळजी.

मलाही कथेच्या दोन्ही भागातील काही रूपकांचा अर्थ समजलेला नाही. नागफणा, मद्याची बाटली व संगमरवरी पेटी (कासवाच्या आकाराची), त्रिशूळ या रुपकांचा आपण सांगितलेला अर्थ योग्य आहे.

माझ्या वरील पोस्टमध्ये फक्त प्रवासापूर्वीच्या प्रतिमाबाबत लिहिले आहे.

त्रिशूलबाबत असेही वाटते की, --

नागफणा, मद्य-पेटी झाल्यावर त्रिशूळ हे सर्वात शेवटी येते. ते एका कोपऱ्यात पुरलेले आहे. निळसर आहे. म्हणजे प्रत्येक स्मशानभूमीत असलेल्या शंकराची, निळी मूर्ती येथे अभिप्रेत असावी. त्रिमूर्तीतील महेश हा विनाश करतो. त्यामूळेच त्रिशूळास रक्ताचा टिळा कोणीच लावलेला नाही. कारण रक्त असणे म्हणजे हे शरीर अजूनही जिवंत असल्याचे लक्षण आहे. आणि स्मशानात शरीर तर मृत झाल्यावरच नेले जाते. अशाही अर्थाने जीएंनी त्रिशूळचे रुपक वापरले असावे.

मधमाशीविषयी काही वैज्ञानिकांनी पूर्वीच अनुमान केले आहे की, जोपर्यंत पृथ्वीवर मधमाशा असतील तोपर्यंतच पृथ्वीवर जीवन असेल. जेव्हा

मधमाशा नष्ट होतील, तेव्हाच सर्व सजीवसृष्टी संपलेली असेल. जीए तर वाचकप्रभू होते. हे वैज्ञानिक अनुमान त्यांना माहिती असल्यानेच त्यांनी मधमाशीची ही प्रतिमा वापरली असावी.

सुनीळ सामंत: राजेशजी, आपले त्रिशूळ बद्दलचे विधान सयुक्तिक वाटते. त्याचा संपूर्ण कथेशी अर्थही लागतो.

मधमाशांबद्दल जीएंनी वाचले असण्याची शक्यता आहेही आणि नाहीही. शिवाय त्याचा कथेच्या केंद्रिय कल्पनेशी (पुनर्जन्माचा फ़ेरा) धागा जुळत नाही असे मला वाटते.

कदाचित ही कथा पुन्हा कधीतरी विचाराला घ्यावी लागेल.

दिलिप बडे: दिपस्तंभ कथेत तरूण स्त्री व ऊंच माणुस हे जिवात्मे आहेत.

दिपस्तंभ कथेतील प्रवासी एकमेव नाही. "प्रत्येक खेपेला ते नाव तुम्ही का पहाता? ते नाव तुमचे आहे. यावरून दरवेळेचा प्रवासी वेगळा आहे. प्रवाशांनी हा प्रवास मानसिक पातळीवर केला आहे. कुणीही- कुठेही गेलेल नाही.

# नाग-- जी ए कुलकर्णी ( पारवा )

यतीन गुळवणी : वकिलांच्या परसातील समोरासमोरील चार खोल्यांत चार गरीब परिवार रहात असतात. मधोमध असलेली फरशी मात्र सार्वजनिक!

पहिल्या खोलीत न्हाव्याची गोजराई दोन पोरांसह रहाते. शेजाऱ्यांकडून भात भाजी मागून ती दुपार भागवत असते.

दुसऱ्या खोलीत वृद्ध रमाकाकू रहाते. विहिरीतून पाणी काढून वकिलांच्या घरी भरण्याचे तीचे काम. तीचा रिकामा वेळ पुराणे, कीर्तने यांतच जात असे.

तिसऱ्या खोलीत कोकणातील जनी रहात असते. भांडखोर स्वभावाच्या त्या बाईला माघारी सर्व 'ढमाल जनी' म्हणत असतात. जनी लोकांच्या घरी भांडी घासून आपला चरितार्थ चालवत असते. पण परिसरातील सर्व भानगडींची तिला माहित असते.

शेवटच्या खोलीत बाबाजी, त्याची बायको लक्ष्मी व मुलगी तुळशी रहात असतात. बाबाजी पोस्टात पॅकर होता पण त्याच्याकडून एक बॅग गहाळ झाल्यावर त्याला घरी बसावे लागलेले असते. त्यामुळे लक्ष्मीला चार घरी धुणी भांडी करून चरितार्थ चालवावा लागत असतो. मुलगी तुळशी मात्र नटवी असते व तीच्या नटण्याला आईची फूस असते.

अशा त्या चार खोल्यांच्या आयुष्यात खासगी काही नसते. गोजराईच्या घरी लसणाची फोडणी झाली इथपासून तुळशीने नवी चड्डी घेतली इथपर्यंत सारे त्या निसरड्या फरशीप्रमाणे पूर्णपणे सार्वजनिक असते.

बाबाजीच्या खोलीजवळच उकिरडा असतो व तिथेच थोड्या मोकळ्या जागेत बाबाजीने दोन चार वाशांवर जाईचा एक वेल चढवलेला असतो. जाईची थोडी फुले वेलीवर शिल्लक रहात व त्यांचा वास दरवळे. नोकरी गेल्यापासून बाबाजी तिथेच एका घडवंचीवर बसून वेळ घालवीत असे.

एका संध्याकाळी बसलेला असतो. आदल्या दिवशी त्याने पोस्टातल्या एका कारकूनाकडून जुन्या ओळखीच्या आधारे एक रूपया काढलेला असतो. ती दौलत त्याच्या खिशात सारखी जळत असते. वर जाईच्या धुंद वासाने तो अस्वस्थ असतो. ताणलेल्या तारेला स्पर्श करावा त्याप्रमाणे त्याचे अंग थरथरत असते. कुठेतरी विलक्षण वेदना जागी होत असते, भाजत असते. त्याचे मन भरकटत असते. त्याला वाटते 'खिशातल्या एका रूपयात त्या मळकट घुसमटणाऱ्या जीवनातून क्षणभर तरी बाहेर पडण्याचा मार्ग आहे. क्षणाचे धुंद सुख, स्वतःच्या नाईलाजऱ्या, मुर्दाड आयुष्याचा तातपुरता विसर!' (कारण त्याला बायको, मुलगी अपमानित करत असतात व त्याला कुणी कुत्रे देखील विचारत नाही हे त्याला माहीत असते. ) त्या आसक्तीत लक्षुमी चालली असती पण

बाबाजीची भूक समजताच तिने त्याच्या चिंध्या केल्या असत्या या जाणीवपूर्वक भीतीने तो बावरते. अस्वस्थेने बाबाजी घडवंचीवरून उठून फरशीवर आला तर पाय सोडून बसलेल्या जनीच्या बांधेसूद पोटऱ्या पाहून बाबाजी आणखी बेचैन होतो.

अशा परिस्थितीत वकिलांच्या घरी काम करणारी राधा आंब्याच्या सालींचा कचरा उकिरड्यावर टाकण्यासाठी बाबाजी समोरून येऊन कचरा टाकून जाऊ लागली. तिच्या चालण्याने तिच्या परकराला मिळणारा हेलकावा, तिच्या अंगाचा

रेखीव उभार बाबाजीच्या उपाशी नजरेतून निसटली नाहीत. बाबाजीने हाक मारताच राधा निरागसपणे जवळ येते. हावरेपणाने बाबाजी तिला फुले पाहिजेत का म्हणून विचारतो. राधा फुले नाकारते. बाबाजी वेडा होतो. खिशातील रूपयाचे नाणे काढून राधेचा हात धरून त्यावर ठेवतो. त्याचा हात तिच्या छातीवर चाचपडू लागला.

राधा किंचाळणे. आवाजाने जनी, गोजराई मुलांसह जमा होतात. राधेने रुपयाचे नाणे बाबाजीच्या डोक्यावर फेकले त घरंगळून गटारात पडले. राधेने उकिरड्यातील चप्पल उचलून बाबाजीच्या छातीवर हाणू लागली. तोंडाने सरबत्ती चालू केली "हलकट कुठला! मी तुझ्या मुलीसारखी. तुझी तुळशी माझ्यापेक्षा मोठी आहे की! आणि माझा हात धरतोय, भिकारडा रूपया देतोय. "

जनी अंग घुसळून हसते. तिच्या दृष्टीने मनोरंजन. कलकलाटाने लक्षुमी खोलीबाहेर येते. झाला प्रकार कळून ती शरमेने काळवंडते. ती बाबाजीला हाताला धरून खोलीत ढकलून सांगीते " पड जा आता घरी कुत्र्यासारखं"

बाबाजी खोलीत जाताच ती राधेच्या मुस्काटात देते. "माहीत आहे जा ग सटवी!" लक्षुमी हात नाचवत म्हणाते, "हत्तीच्या पावलाएवढी अब्रूवाली मला माहीत आहे जा- धरला असेल हात! अशी काय तू मोठी तालेवार लागून गेली आहेस!"

सारा जोम ओसरून राधा रडत धावत घरी जाते. जनी फिदीफिदी हसते व लक्षुमीच्या बोलण्याला दुजोरा देत राधेच्या चहाड्या सांगू लागते.

काही न बोलता लक्षुमी खोलीत येते व दरवाजा लावते.

आत बाबाजी वळकटीत तोंड खुपसून हुंदके देत असतो. त्याच्या दुबळ्या शरीरात एक लाथ झाडावी असे तिला वाटते.

फाडफाड तोंडात मारून घेत तो म्हणतो "शप्पथ, कशी माती खाल्ली देव जाणे. आता मात्र कधी नाही. "

या त्याच्या शब्दांनी तीच्याच कंबरेत कुणीतरी लाथ मारल्यासारखे तिला वाटते. तिला राग तर नव्हताच; पण तिरस्कारही वाटत नव्हता. बाबाजीवर थुंकण्याच्या श्रम तिने घेतले नसते; पण तिच्या मनात खोल कुठेतरी शरम होती. कारण दोन महिन्यांपूर्वीच आपल्यातले चढलेले विष तिला आठवते. डॉक्टरांच्याबरोबरचा तो बेभान प्रसंग, त्या बदल्यात मिळालेल्या पंधरा रूपयांतून तुळशीला घेतलेले सॅडल्स व त्यानंतरचे शरमिंदेपण तिला आठवतो.

तोच तिला बाबाजीच्या रूपयाच्या नाण्याची आठवण येऊन ती खोलीबाहेर येते व तवंगलेल्या घाण पाण्यात पाय घालून रूपया बाहेर काढण्याचा प्रयत्न करणाऱ्या गोजराईच्या दोन्ही पोरांना धमकावल

. " ए माकडाने तिथला रूपया तर जाऊ दे, हाडेच घालते लोणच्यात एकेकाची. "

जीएंची ही कथा खूप आवडली. कारण

१ वेगळ्या वातावरणातील कथानक

मध्यमवर्गीय, ब्राह्मणी, ग्रामीण इत्यादी विविध समाजातील परिस्थितीवर लिहिणाऱ्या जीएंनी तितक्याच ताकतीने 'घरकाम करणाऱ्या' या घटकांवर, त्यांच्या परिस्थितीवर, त्यांच्या मनोवृत्तीवर लेखन केले आहे.

२ बाबाजीच्या मनातील घालमेल, त्याला झालेली विषयासक्ती, लाचार, कुचकामी आयुष्याचा क्षणभर विसर पडण्यासाठी स्वतःच्या मुलीपेक्षा लहान

मुलीचा विनयभंग करण्याचा अविचार हा एक मानसशास्त्रीय संशोधनाला विचार पुरवणारा विषय आहे.

३ लक्षुमीच्या भावना मांडताना सर्वसाधारण स्त्री-मन उलगडून दाखवले आहे.

४ व्यावहारिक फोडणी देताना लक्षुमी बाबाजीचा गटारातील तवंगणाऱ्या घाण पाण्यात पडलेला रूपया विसरत नाही. हा प्रसंग गमतीशीर वाटतो.

५ जीएंची तपशीलवार माहीती व मुद्देसूद बांधणी यामुळे कथा वाचकाला एका अत्त्युच्च पातळीवर नेते.

सुनीळ सामंत: खुप छान यतीनजी. कथेचा गोषवारा तर पुर्ण आहेच पण शेवटी दिलेले पाचही मुद्दे महत्त्वाचे आहेत.

पारवा या कथासंग्रहातील जवळपास सर्व कथा या मानवी संबंध आणि त्यातूनही स्त्रीपुरुष संबंध, आकर्षण याभोवती गुंफ़लेल्या आहेत.

तुम्ही दिलेल्या पाच वैशिष्ट्यांच्या प्रकाशात पुन्हा कथा वाचतो आणि अधिक लिहितो.

विलास वाघोलीकर: नाग -. पारवा मधील ही कथा, जी एं च्या सुरुवातीच्या कथांतील आहे. - त्यामुळे लहान गावातले हातातोंडाशी गाठ असलेले कुटुंब, त्यांच्यातील ताणतणाव हे दाखवले आहेत. बाबाजी व त्यांची बायको यांमध्ये भांडणे होतात. त्याला आर्थिक, सामाजीक, मानसिक व लैंगिक अशी कारणे आहेत. बाबाजीची बायको त्याला कवडीची किंमत देत नाही. त्यामुळे त्याचे पिसाळणे जास्त वाढत जाते. नाग हे रूपक - नाग निघतो हा प्रसंग, यांमधून हे दाखवले आहे.

रूपकाच्या सर्व पैलूंचा आविष्कार करून जी ए कथा फुलवतात. उदा - सर्प, मत्स्यकन्या, तुती, कैरी या यशस्वी कथा वाटतात. जी एंच्या भाषा प्रभुत्वामुळे कथा वाचनीय वाटते. धन्यवाद. विलास वाघोलीकर

सुनीळ सामंत: या कथेचे नाव ’नाग’ का ठेवले असेल?

१) नागाचे अस्तित्व जमिनीखाली असते. (subconscious mind)

२) तो कोणत्या क्षणी अचानक प्रकट होईल माहित नसतो.

३) तो जीवघेणा दंश करतो

४) तो येतो तसाच मागमूस न ठेवता नाहीसा होतो

५) नाग आणि नग्न हे जवळचे शब्द आहेत

६) तो सरळ चालत नाही, नागमोडी चालतो.

मानवाच्या विषयवासनांचे प्रतिक म्हणून जीएंनी नाग हे शिर्षक दिले असेल का?

यतीन गुळवणी : अगदी बरोबर! शिवाय नाग (आणि वासना) कुठेही प्रकट होऊ शकतात. चार खोल्यांच्या चार कुटुंबांतल्या एखाद्या भिंतीत

(आणी बाबाजी सारख्या फाटक्या माणसात वा लक्ष्मी सारख्या कामसू स्त्रीत), क्षणभर का होईना!

विश्वेश्वर नांदेडकर: नाग हा अडम इव्ह च्या कथेपासून वासनेचे प्रतीक आहे.

माधव पुराणिक : https://youtu.be/_wyB21MpKrA

नाग कथेचे अभिवाचन

Gauri Deshpande: छान झालं आहे हे अभिवाचन. योग्य तो ग्रामीण ठसका आणि लहेजा यामुळे कथा श्रवणीय झाली आहे. पार्श्वसंगीत सुद्धा अनुकूल आहे.

उत्तम निर्मितीसाठी अभिनंदन!

कथा 'नाग '(कथासंग्रह 'पारवा'), ९ पानी, ' जीवनदर्शन ' कथा

विवेचक डॉ माधव पुराणिक

अस्तित्ववादी कामवासनेचा अटळ, विसंवादी कोलाहल

रतिसुखाच्या कांचनमृगामागे धावणारे स्त्रीपुरूष

१ कथेची मुख्य संकल्पना

या कथेत, नागाच्या आयुष्यातील विविध भावनांशी संवाद साधत, मानवी वासनेच्या विविध अवस्था चित्रित केल्या आहेत . या सर्व लैंगिक प्रतिमा आहेत . त्यांचा वापर वासनांना किंवा मूलगामी प्राथमिक स्वरूपाच्या इच्छांना दृश्यमान करावे म्हणून केला आहे. तसेच या कथेत स्त्री - पुरुषांच्या कामनेच्या संदर्भात निष्ठा व चंचलता यातील द्वंद्व चित्रित केले आहे. कामवासनेच्या सर्जनशील व सुंदर रूपापेक्षा तिचे विध्वंसक व अनैतिक रूप चित्रित केले आहे. कामवासनेच्या अस्तित्ववादी रूपावर मुख्य भर दिला आहे.

२ कथेचा परिसर, घटनास्थळ, मुख्य पात्रे, सुरुवात, व शेवट

कथेचा परिसर

सर्व पात्रे अत्यंत गरिबीत, एका खोलीत संसार करणारी, अशिक्षित, मध्यमवयीन व जगण्याकरिता रोज तीव्र संघर्ष करणारी आहेत. गलिच्छ व पराकोटीचा अस्वच्छ अशा चौकाच्या चारी बाजूला असलेल्या एकेका खोलीत ती रहात असतात. दिवसरात्र यातील कोणत्याही खोलीत घडणारी घटना बाकी तीन खोल्यातल्या सर्वांना माहित असते.

'त्या चार खोल्यांच्या आयुष्यात खाजगी काही नाही सारे त्या निसरड्या फरशीप्रमाणे पूर्णपणे सार्वजनिक होते. '

परिसरात खालील गोष्टी येतात-

१ उकिरड्याजवळ जाईचा एक वेल

२ बाजूला जुनी घडवंची

३ कोपऱ्यात कचऱ्याचा ढीग

४ उंबराखालचे गटार

५ जवळच पाणी भरण्यासाठी विहीर

६ वकिलांच्या परसातल्या ४ खोल्या

परिसरातील ओंगळपणा, अस्वच्छता, गलिच्छपणा यांनी जणू सर्व पात्रांच्या जगण्याला वेढले आहे . जणू त्यांचे अस्तित्वच कुरूप व विरूप केले आहे . त्यांना या परिस्थितीचा अटळपणे स्वीकार करावा लागला आहे.

कथेची सुरुवात

' उन्हाळ्यात त्या ( निसरड्या, वापरून वापरून झिजलेल्या )फरशीवर माश्यांचा अगदी गो घोळका जमत असे पावसाळ्यात गटारातील पाणी उंबऱ्यावर

चढवून आतील जमीन अर्धी ओली होत असे व उंबऱ्याच्या कडेने हिरवट नासके शेवाळ तरारून उठे.

कथेचा शेवट

'गोजराईची दोन्ही पोरे तवंगलेल्या घाण पाण्यात पाय घालून रूपया बाहेर काढण्याचा प्रयत्न करत होती. '

कथेची मध्यवर्ती ( कामवासनेचा आविष्कार करणारी ) घटना घडते ती ( गलिच्छ )जागा -

' राधा हातात आंब्याच्या साली घेऊन कचऱ्याच्या ढीगाकडे चालली होती. साली टाकून ती परतली माश्या घुईं वर उठल्या व पुन्हा स्थिरावल्या . तार छेडल्याप्रमाणे जाईचा वास क्षणभर थरारला. इतका वेळ धुमसत असलेले बाबाजीचे मन ठिणगी पेटल्याप्रमाणे पेटले. '

कथेतील मुख्य पात्रे

खोली नंबर १

१ बाबाजी - वय वर्षे ४० नोकरी गेलेला बेकार, निरुद्योगी, चंचल

२ लक्षुमी- बाबाजीची पत्नी - वय वर्षे ३५, भांडी घासून घर चालविणारी, चंचल

३ तुळसा - वय वर्षे १४, या दोघांची मुलगी,

खोली नंबर २

१ न्हाव्याची गोजराई 'चार घरुन अन्न गोळा करून जगणारी'

२ गोजराईची दोन मुले

खोली नंबर ३

१ रमाकाकू, - म्हातारी, कीर्तनात वेळ घालविणारी

या वयोवृद्ध तर आहेतच पण शारीरिक दृष्ट्या ही विकल झाले आहेत. आता सर्व भावना भक्तीत रूपांतरीत झाल्या आहेत.

त्या संपूर्ण एकाकी आहेत व हे दुःखमय अस्तित्व

'त्यांनी पाणी भरण्याचं नियमित काम खोलीकडून विहिरीकडे व विहिरी कडून खोलीकडे तसेच उरलेल्या वेळात खोलीकडून देवळात व देवळातून खोलीकडे 'या चौकटीत सामावून घेण्याचा प्रयत्न केला आहे रमाकाकूंचे या जगात कोणीच नाही- पती, मुलबाळ, इतर नातेवाईक . या नियतीच्या अनाकलनीय खेळाला हतबल होऊन सामोऱ्या गेल्या आहेत.

खोली नंबर ४

१ कोकणी ढमाल जनी- भांडखोर, सर्व गावची माहिती असलेली, एकटी राहणारी

इतर पात्रे

१ राधा -चंचल, १३/१४ वर्षांची, नजरेने घायाळ करणारी, लुटत चालणारी

'या पोरीच्या डोळ्यांत पाहणाऱ्याला घायाळ करणारी विखारी काजळरेषा आताच अगदी स्पष्ट दिसत होती.

पण ती एखाद्या काळया धगधगीत ज्योती प्रमाणे दिसे.

..... त्याप्रमाणे अतिशय आकर्षक अशी लचक तिच्या अंगभर पसरे. '

२ डॉक्टर - चंचल स्वभावाचा

३ गोरटेली शिंपीण - तिचा नवरा चंचल स्वभावाचा

४ गणाराम -चंचल स्वभावाचा

५ शिंपीणीचा नवरा - चंचल स्वभावाचा

३ कथेतील पति-पत्नी संबंध

हे कमालीचे बिघडलेले व तणावपूर्ण आहेत.

१ बाबाजी एकही पैसा मिळवत नाही . त्यामुळे लक्ष्मीला भांडी घासावी लागतात.

ती ढमाल जनीला सांगते ' करायचं काय! अगं, लग्नात सांगितलं मला यानं, तुला इतकी सुखात ठेवीन आणि आता चार घरची भांडी घासल्याखेरीज पोट जळत नाही. बघ माझे हात कसे झाले आहेत तरी ' -लक्ष्मीने आपले हात जनीपुढे केले.

लक्षुमी बाबाजीला खेकसून म्हणते ' खायला काळ, भूमीला भार'

याचा परिणाम लग्नानंतर जे पतिपत्नीतील शारीरिक/ मानसिक सुखाचे/ आपलेपणाची समाजमान्य संकेत आहेत त्यावर होतो - बाबाजीवर होतो.

२ शिंपीणीचा नवरा तिला सोडून गेला आहे.

त्यामुळे तिला इतरांचा सर्व प्रकारचा त्रास विशेषतः कामवासनेशी संबंधित प्रत्यक्ष /अप्रत्यक्ष त्रास होतो. एकटीलाच यांचा सामना करायची वेळ आली आहे. ती त्याला सामोरी गेली आहे . पण जुन्या शृंगाररम्य आठवणींची खूण म्हणून 'जोडव्यांच्या चकचकीत चमक्या 'पायात ठेवल्या आहेत. ही गोष्ट जी ए नी कलात्मकरीत्या टिपली आहे.

३ गोजराईचा नवरा न्हावी - यांच्याबद्दल कथेत संदर्भ नाही.

गोजराईचा नवरा तिच्याबरोबर राहत नाही.

अशा पुरुषावर अवलंबून असलेल्या स्त्रीची स्थिती सर्व बाजूंनी कोंडमारा करणारी असते . त्यांना पोटभर अन्न मिळत नाही. इतरांच्या केवळ दया बुद्धीवर अवलंबून राहून- जे मिळेल त्यात समाधान मानणे हेच भोग त्यांच्या वाट्याला येतात.

जी ए यांनी अशा एकाकी, सर्वस्वी गरीब आणि मुलांची जबाबदारी असलेल्या स्त्रियांचे चित्र अतिशय करूण रेखाटले आहे.

४ 'नाग' कथेचे मुख्य प्रमेय (उपमेय)

१ मानवी अस्तित्व हे अजस्त्र विश्वात अर्थशून्य, विसंगत, दु:खमय, एकाकी व भयव्याकुळ करणारे आहे.

२ सर्व रूपात 'मानवाचे अस्तित्व' हेच रूप महत्त्वाचे आहे.

३ (१)माणसाचे अस्तित्व हे खालील सहजप्रेरणांतून व्यक्त होते -

अ) सुख -वस्तूपासून वा व्यक्तीपासून सुखाची इच्छा. त्या व्यक्तीबद्दल मोह उत्पन्न होतो.

आ) दु:ख ( sadness)- ज्या वस्तूपासून वा व्यक्तिपासून दु:ख होते, द्वेष वाटतो ती नको वाटते. त्या व्यक्तीचा राग येतो. तिच्याबद्दल उबग ( disgust ) वाटतो. या दोन्हींमधून तिरस्कार ( contempt )निर्माण होतो.

इ) जिज्ञासा - काही तरी नवीन समजावे अशी इच्छा

ई) कृतीशीलता - काहीतरी करण्याची इच्छा

उ) स्मृती/ आठवणींमुळे उत्पन्न होणारा खेद

ऊ) भय - भविष्यातील संकटाबद्दलची कातरता, व्याकुळता, चिंता, काळजी ( भीतीची भावना ). शेवटी घबराट (panic) होते. भीती आणि दुःख यातून अपराधीपणाची ( guilt) भावना उत्पन्न होते.

ए) अतृप्ती - कितीही व कितीदाही विषयांचा ( स्त्री, सत्ता, संपत्ती, समाजातील स्थान - राजा, अमात्य इ ) उपभोग घेतला तरी तृप्ती न होणे. हवे असलेले कितीही मिळाले तरी समाधान न होणे. यामुळे माणसाची भोगलालसा अनिवार वाढते.

३(२) प्रेरणा आणि भावना -

भूक, तहान, कामवासना (लैंगिक गरजा), प्राणवायू, झोप अशा शारीरिक गरजाच माणसाच्या वागणुकीमागच्या प्रेरणा आहेत. या सर्वांशिवाय माणूस जगू शकत नाही .

भावना (e-motion) म्हणजे शरीरात निर्माण होणारी सूक्ष्म मानसिक शक्ती आहे. यांच्या द्वारा एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला साद (प्रतिसाद) देते. ( क्रिया - प्रतिक्रिया)

मानसिक अवस्थांमुळे भावना जाग्या होतात व त्यामुळे काही गोष्टी करायची प्रेरणा मिळते. तसेच प्रेरणांमुळेही भावना निर्माण होतात.

४ नंतर माणसाची १ राजकीय, २ सामाजिक, ३ सांस्कृतिक ४ कौटुंबिक ५ शैक्षणिक ६ निसर्गाशी संबंधित ७ शारीरिक रूपे येतात

५ कौटुंबिक व सांस्कृतिक नातेसंबंध भयावह व हास्यास्पद असतात. पण यातूनच व्यक्तीला अधूनमधून भावसाफल्याचा अनुभव येतो.

६ मानवी अस्तित्वावर, वरिल सहजप्रएरणांवर, नातेसंबंधांवर नियती या सर्वव्यापी, अनाकलनीय शक्तीचा निर्णायक प्रभाव आहे.

ऊ) 'नाग' कथेतील प्रतिमान (उपमान)

या कथेतील मुख्य व्यक्ती - बाबाजी, लक्ष्मी, राधा, जनी, गोजराई या आहेत. या व्यक्तीरेखांतून, घटनांतून, भाष्यातून सुख, दु:ख, भय व प्रामुख्याने वासनेची अतृप्ती या सहज प्रेरणा प्रामुख्याने कौटुंबिक व सामाजिक नातेसंबंधातून व्यक्त होतात. कामवासनेच्या विविध छटा चित्रीत केल्या आहेत. पण या पृष्ठभागाखाली असलेल्या अस्तित्वाच्या असे संदर्भ नसलेल्या मूळ प्रेरणा जाणवतात.

५ 'नागा'चे प्रतीक

नाग म्हणजे फणाधारी सर्प. नागाच्या फण्याच्यावर पुढच्या बाजूने दहाच्या अंकासारखे चिन्ह असते.

नागाच्या वर्ण हिरवट, काळपट किंवा पिवळा असतो.

त्याच्या तोंडात विष धारण करणारे दात असतात. नागाची जीभ दुहेरी असते.

नाग, त्याचा फणा, त्याच्या फण्यावरचे दहा आकड्यासारखे चिन्ह हे सर्व कामवासनेशी संबंधित आहेत

नागाची गती वक्र व विचित्र असते. त्याचे शरीर आकर्षक असते. नाग आपली कात टाकून पुन्हा तरूण होतो. त्याचा दंश घातक असतो. नागपूजा ही प्रचलित आहे.

नाग हा शरीरातील सुप्त, साडेतीन वेटोळे घालून निद्रिस्त असलेल्या कुंडलिनी शक्तीचे ही प्रतीक आहे.

६ अस्तित्ववादातील कामवासना

'वस्' धातूचा अर्थ बसविणे. जी मनास विषयात बसविते ती वासना. कामवासना म्हणजे जी 'कामास ( लैंगिकतेस )' मनात बसविते ती.

अस्तित्ववादात मानवी अस्तित्व ही वस्तुस्थिती मानून विचाराला प्रारंभ होतो. मानवी अस्तित्व हे सात सहज प्रेरणांतून ( भावनांतून) व्यक्त होते. त्यामध्ये सुख, दुःख, जिज्ञासा, स्मृती किंवा आठवणी, कृतिशीलता, भय व कामवासने पासून अतृप्ती या सहजप्रेरणा येतात.

'कामप्रेरणा आहे' याला व्यक्तीमधील 'कामप्रेरणेचे अस्तित्व' (existence ) म्हणता येईल तर व्यक्तीमधील 'कामप्रेरणा काय आहे' याला कामप्रेरणेचे सारतत्व (essence) म्हणता येईल. माणसाच्या संदर्भात 'अस्तित्व आधी, सारतत्त्व नंतर 'अशी या अस्तित्ववादाची (existentialism)विचारसरणी आहे. सारतत्व म्हणजे अस्तित्वाच्या ठिकाणी अपरिहार्यपणे, अत्यावश्यकरीत्या काही गुणधर्म असतात व हे सारभुत गुणधर्म असतात .

कामभावनेची इच्छा कोणत्या ना कोणत्या तरी उद्देशाशी संबंधित आढळते. म्हणजे माणसाच्या मनात उत्पन्न होणारी भावना यात सुख, दुःख, भीती इत्यादी येतात विविध परिस्थितीत वेगवेगळया भावना माणसाला कार्यप्रवण बनवतात.

कामभावना प्रथम फक्त 'असते', (Being, ) व तिचे स्वरूप किंवा सारतत्व निर्माण झाले तर स्त्रीपुरूष कामभावनेच्या अभिव्यक्तीला जे स्वरूप देतात तेच स्वरूप तिला प्राप्त होते. प्रत्येक व्यक्ती आपल्या कामभावनेचे स्वरूप ठरवते व ते आपल्या कृतीतून व विचारातून व्यक्त करते. हे स्वरूप वयाप्रमाणे, व्यक्तीच्या नैतिकतेच्या समजुतीप्रमाणे, परिस्थितीप्रमाणे, संस्कारांच्या मते सतत बदलत असते. (Becoming, )

कामवासनेच्या अनुभवाने शरीर व मन फुलून येते . या सुखाला स्वर्गीय सुख म्हणतात. दर्प, गर्व, अहंकार यांच्या प्रभावाखाली माणसाला हे कामपूर्तीचे क्षणिक सुख सर्व काही आहे असे वाटते.

मग माणसाचा स्वतःच्या मनावरचा ताबा नाहीसा होतो. तो या मोहाला बळी पडतो व त्याला नंतर अपराधी वाटून तो दु:खी होतो.

'नाग' कथेत अनेक ठिकाणी जी ए नी हे सर्व स्पष्ट दाखवून दिले आहे.

कामभावनेचे कोणतेही सर्वसामान्य, सर्वसाधारण असे नियम किंवा लक्षणे सांगता येत नाहीत कारण प्रत्येक माणूस हा वेगळा असतो असे अस्तित्ववादात मानले जाते. माणूस प्रतिकूल परिस्थितीने जखडला जातो व याचा कामवासनेच्या प्रकटीकरणावर खूपच परिणाम होतो . याचीही उदाहरणे 'नाग' कथेत दिसतात.

७ कथेतील पुरुष पात्रांतील कामवासनेच्या / नागाच्या प्रतिमा

१ कथेमध्ये बाबाजी अनिवार आकर्षणाने राधेकडे ओढला जातो व त्या क्षणाच्या धुंदीमध्ये जे करतो त्या मनस्थितीकडे जाणारे भाव खालील 'भगवद् गीते' मधल्या श्लोकात व्यक्त झाले आहेत.

' १ विषयांचे म्हणजे कामवासनेचे चिंतन करणाऱ्या पुरुषाची सदर कामवासनेच्या ( स्त्रीच्या ) ठिकाणी सलगी वाढत जाते. २ यापासून पुढे ती कामवासनेची संबंधित व्यक्ती / स्त्री आपल्याला पाहिजेच ही वासना उत्पन्न होते.

३ ही कामवासना तृप्त होण्यास अडथळा आला म्हणजे कामापासून क्रोधाचा उद्भव होतो.

४ क्रोधापासून मोहाची सुरुवात होते

५ व त्यापासून स्मृतीभ्रंश अविवेकी, अविचार ) होतो.

६ व स्मृतीभ्रंशापासून बुद्धीचा ( वास्तव तर्काचा, logical reasoning) चा नाश होतो.

७ व बुद्धीच्या नाशापासून अशा कामातुर पुरुषाचा विनाश होतो. ( पूर्णपणे उद्ध्वस्त होतो)

कारण कामवासनेमुळे मिळणाऱ्या सुखाची तृप्ती कधीच होत नाही ती पुन्हा पुन्हा आणखीन निर्माण होते, क्षणिक असते व नाशवंत असते. कामवासनेचा पुरेपूर उपभोग घेतला तरी त्यापासून निवृत्ती होत नाही. पण निवृत्ती होते या भ्रामक कल्पनेत ( कांचनमृग ) स्त्रीपुरूष आयुष्यभर राहतात.

वरील सहज प्रेरणा / भावना यांच्या संदर्भात बाबाजीच्या कामवासनेने कथेत खालीलप्रमाणे वर्णन आले आहे.

'क्षणाचे धुंद सुख स्वतःच्या निलाजऱ्या, मुर्दाड आयुष्याचा तात्पुरता शेवट करण्यासाठी' / अनुभवण्यासाठी आपली मुलगी शोभेल अशा राधेच्या हातात रुपया ठेवून त्याचा हात आंधळ्या नागाच्या फण्याप्रमाणे तिच्या ... आणि त्याने एकदम..

( अनाकलनीय शक्तीचा मनावर अनावर प्रभाव)

२ नागाला ठेचावे तसा बाबाजी राधेकडून व बायकोकडून ठेचला जातो. ( अनियंत्रित, अनैतिक मोहाचे तत्काळ वेदनामय परिणाम)

३ एखादा साप स्वस्थ पडून असल्यानंतर डोके अर्धवट वर करून इकडे तिकडे पाहू लागावा त्याप्रमाणे त्याच्यात काहीतरी जागे होत होते. ( अचानक, सावकाश, अस्तित्वाच्या खोल तळातून वर येणाऱ्या कामवासनेची अस्पष्ट जाणीव)

४ 'त्यांच्यातील प्रसन्न शालीनता आज कुठच्या कुठे गेली होती. सारी फुले एकदम झिंगल्याप्रमाणे तो वास धुंद फसफसणारा तर्र करणारा झाला होता. जणू त्या

(जाईच्या) वेलाचाच नाग होऊन वासाने मिरवत असल्याप्रमाणे बाबाजी वाऱ्याच्या दर झुळकीबरोबर वेडावत होता भेदरत होता. कुठल्यातरी अज्ञात वासाने कुत्रे बेभान होऊन धावत सुटते त्याप्रमाणे त्यांचे मन सारखे ओढाळत होते. त्यांचे जीर्ण शरीर धापत होते...... बाबाजीच्या मनाला चटका देत होत्या. '

(येथे जाईच्या वेलाच्या सुगंधात पडलेला फरक तसेच अज्ञात वाहनाने येणारी बेभानता या गंध संवेदनेत नागाची / वाऱ्याच्या झुळूकीची स्पर्श व रुप प्रतिमा नेमकी व अतिशय कलात्मक आहे. त्यात अज्ञात या शब्दाने अनाकलनीयताही सूचित केली आहे. )

५ ' या किड्या ऐवजी जर एखादा जाडजूड नाग असता तर बरे झाले असते !जर का लक्ष्मी-जनीने आपणाला हातात लोखंडाची कांब घेऊन, त्वेषाने फुत्कार टाकणाऱ्या एखाद्या नागाला ठेचून काढताना पाहिले तर साऱ्यांचे चेहरे कसे त्या खेटरासारखे होतील!' ( अपयशी, निरूद्योगी, दुर्बल, रिकाम्या मनाची भ्रामक, पोकळ अवस्था)

६ 'बाबाजी वळकटीत तोंड खूपसून हुंदके देत होता. त्याचे सारे अंग आपल्या आता सापाच्या कातीप्रमाणे मळकट, निर्जीव होऊन थरथरत होते. ( क्षणिक धुंद, संजीव, सामर्थ्यवान सुखानंतर तीव्र दु:खाची विरोधलय, सापाच्या काती मधून कलात्मक पद्धतीने साधली आहे )

७ ' लक्ष्मीच्या गोऱ्या दंडावर वेताने दोन निळसर वळ उठावेत, एखाद्या पिकल्या पेरूत दात रुतवावेत, त्याप्रमाणे तेथे दातांनी दंश करावा असे त्याला वाटले ' ( अतृप्त, शारीरिक पीडेकडे निर्देश करणारी दंडात्मक वासना - सापाच्या दंशाप्रमाणे)

८ 'तिच्या( जनीच्या )काळया शरीराला शिसवी आकृती प्रमाणे घोटीव गोलाई होती त्या बांधेसूद पोटऱ्या पाहून बाबाजी ला धापल्यासारखे झाले व ओठ किंचित विलग करून तो तिच्याकडे बोकडहावरेपणाने पाहू लागला. ' ( अप्रत्यक्षपणे, संधी सापडेल तेव्हा, लांबून नजरेतून व्यक्त होणारी, , मनातून लालसा निर्माण होऊन शारीरिक अवस्थां कडे अटळ प्रवास सुरु करणारी भावना )

९ 'गोरटेल्या नाकेल्या चेहऱ्याच्या शिंपिणीच्या पायात चांदीची जोडवी होती आणि मशीन वर पावले झरझर हलू लागली की त्याच्या गतीवर जोडव्याच्या चकचकीत चमक्या हलताना दिसत होत्या. बाबाजीच्या मनाला चटके देत होत्या. ...... बाबाजी चिडून पुटपुटला पण त्याची नजर मात्र तेथून सरकली नाही. बराच वेळ तो तेथे धुमसत असलेल्या शेणखुटाप्रमाणे बसला. '

( रिकाम्या मनातली कामवासनेच्या जुन्या, सवयीची हवीहवीशी वाटणारी अभिव्यक्ती)

शिंपणीचा नवरा तिला सोडून गेला होता. त्यामुळे ती कष्टमय, खडतर, उपेक्षित व अपमानित जीणे जगत होती. पति सोडून गेलेल्या स्त्रियांच्या मागे समाजकंटक लोक लागतात.

हे कठोर वास्तव जी यांनी या कथेत कलात्मक रित्या व्यक्त केले आहे.

१० ' तार छेडल्याप्रमाणे जाईचा वास क्षणभर थरारला इतका वेळ धुमसत असलेले बाबाजीचे मन ठिणगी पेटल्याप्रमाणे पेटले अंगावरील म्हातारा बुरसा जडला... '

( जणू नाजूक, तरल, गूढ नियतीच्या शक्तीने अवकाशात धुंद वाऱ्याची तार छेडल्याने मधुर कंपने निर्माण झाली व जाईच्या वासाने रोमांचक गीत म्हटले व त्याने मनाच्या तळाशी असलेली सुप्त कामवासनेची राख वर उडविली व त्या खालची सहज प्रेरणा एकदम धगधगीत झाली )

११ 'बाबाजीचे मन आज फार अस्वस्थ होते. घडवंचीवर बसला जाईचा वास आला की ताणलेल्या तारेला स्पर्श करावा त्याप्रमाणे त्याचे सारे अंग एकदम थरथरत होते. कुठेतरी विलक्षण वेदना जागी होत होती, भाजत होती त्याचे मन सारखे भरकटत होते. ' ( वरिलप्रमाणे कलात्मक उपमा पण आता भावनेचे रूप ओबडधोबड, तणावपूर्ण आहे)

१२ ' बाबाजी मेल्याप्रमाणे घडवंचीवर कोसळला. त्यांचे मन पायाखाली चिरडलेल्या किड्याप्रमाणे आडवे, फुटके झाले.. आणि त्याला शरमेने मान वर करवेना . मघा साऱ्या अंगभर लाल तारेप्रमाणे जळणारी वेदना आता फुंकून टाकल्या प्रमाणे मेली होती. ' ( वरील प्रतिमांमधून तार आता त्याला जाळणारी झाली आहे. नव्हे त्याला चिरडून त्याचा भावनिक मृत्यू करणारी झाली आहे. एकाच तारेच्या प्रतिमेत जी ए नी प्रभावीरीत्या या अमूर्त भावनांची अभिव्यक्ती केली आहे.

१३ राधा बाबाजीला म्हणते ' मी तुझ्या मुलीसारखी. तुझी तुळशी माझ्यापेक्षा मोठी आहे की आणि माझा हात धरतोय'.

(असंस्कारित, अनावर, अनियंत्रित, अतृप्त कामवासनेने अनैतिक, नकारात्मक, निराश आविष्कार)

८ कथेतील स्त्री पात्रांतील कामवासनेच्या / नागाच्या प्रतिमा

१ 'लक्षुमी शून्य मनाने बसली. तिला राग तर नव्हताच पण तिरस्कार ही वाटतं नव्हता. पण तिच्या मनात खोल कोठेतरी शरमेच्या सापाची पिल्ले वीत असल्याप्रमाणे तिचे सारे शरीर विकल झाले होते. दोन महिन्यांपूर्वीच आपल्यात एकदम चढलेले विष तिला आठवले, खिजवू लागले. '

'तिने हात उंच केले तो तिच्या पदर ढळला . ती तशीच समोरील भव्य सोनेरी चौकटीच्या आरशात आपल्याकडे आसुसलेल्या अतृप्त नजरेने पहात राहिली त्याच वेळी डॉक्टर मागच्या बाजूने परसात चालले होते त्या क्षणी तिचे सारे शरीर बेभान झाले त्या धुंद, निर्बंध क्षणी ती डॉक्टरांकडे पाहून उत्तेजक हसली होती..... पण तो क्षण गेल्यावर मात्र तिला मेल्यासारखे वाटले. त्या बेवकूफ बाबाजीला पाहून ती शरम, ते आंबलेले एखादा साप दिसल्याप्रमाणे चिरडलेले मन लक्षुमीला एकदम आठवले होते. '

२ 'गल्लीतील कोणत्याही मिशाळ सोटबाप्या पुढे जनीने आपला पदर सावरला नसता. खरे म्हणजे नऊवारी लुगडे नेसून इतके अंग उघडे टाकू शकणारी दुसरी बाई अख्या गावात मिळाली नसती. '

(बाबाजी प्रमाणेच बऱ्याच प्रमाणात कामवासनेने अभिव्यक्ती. परिस्थितीमुळे गाजलेली. रोजच्या जेवणाकरिता खूप कष्ट करणारी. मुलींची वाजवी हौस पुरी करु न शकणारी.

वरील प्रसंगानंतर मिळालेल्या पंधरा रुपयांचे लक्षुमी, तुळशी (१५ वर्षे )करता sandals घेते. मग तुळशी' झिरझिरीत पातळे नेसून नटून थटून बाहेर जाते')

३ 'कस्सा तुळी एवढा होता साप तो आणि त्याच्या अंगावर बघा चांगले वीत-वीत भर केस होते आत्ता काय सांगावं, अहो जातीवंत नाग तो, देवाचा, आल्यावर फुलासारखा कसा घमघमाट सुटला बघा होता, ... ढमाल जनी

'.... तर सारा वीतभर किडका साप आणि म्हणे घमघमाट सुटला होता'... गोजराई

( नागाबद्दल पूजनीय भाव व्यक्त झाला आहे. नाग आल्यावर - अद्भुत रूपातून दिव्य वास येतो. असे ढमाले जनीला वाटते तर गोजराईला तो नाग क्षुद्र प्राणी वाटतो. ही विरोधलय कलात्मक आहे)

९ जी एं ची प्रतिमा सृष्टी

१) चिमण्यांच्या विटक्या प्रकाशाप्रमाणे तेथे बऱ्याच माणसांचे आयुष्य धुरकटत संपत होते.

तिच्या बाजूच्या खोलीत विरलेल्या वस्त्राप्रमाणे दिसणारी मेल्या डोळयांची रमाकाकू राहत होती.

२) खोलीत पिकला फणस ठेवल्याप्रमाणे सारे कुंद वाटत होते.

३) ... हात झालेत म्हशीच्या कातड्यासारखे

४) तुकडेतुकडे बोचकारून टाकलेल्या भिंतीच्या चार खोल्या...

५) लालभडक ताप आल्यासारखा चहा कपात ओतला .

. ६) .. मेलेल्या सपाट आवाजात.

७ ) बोटे गळून पडणार कि काय अशा रीतीने कापत होती.

८ बाबाजीला किडा व फणीची उपमा

' समोर त्या चार खोल्यातील कचऱ्याचा ढीग पडला होता त्या तसल्या कुजट ढिगात नवे देश, नवे समुद्र शोधत असल्याप्रमाणे एक मोठा चकचकीत निळया रंगाचा किडा ऐटीत हिंडत होता. आपले आकडे समाधानाने थरथरवीत होता. त्या ढिगाच्या भोवती कडेला एक जुनी वहाण पालखी पडलेली होती आणि तिच्यावर बरेचसे दात पडलेली, पारदर्शक हिरव्या रंगाची एक फणी होती'

१० समारोप -' नाग' या कथेत जी ए कुलकर्णी यांनी कामवासनेच्या सहज प्रेरणेचा 'नाग' प्रतिमेतून अत्यंत प्रतिभाशाली, कलात्मक व अस्तित्वावादी शोध घेतला आहे.

कामवासनेची अनेक रूपे - वयाप्रमाणे, संस्काराप्रमाणे, परिस्थितीप्रमाणे, शेवटी प्रत्येक व्यक्तीच्या वेगळेपणाने चित्रीत केली आहेत. असे या विषयावरचे चित्रण मराठी कथेत दुर्मिळ, अनोखे व विलक्षण आहे.

म्हणून 'नाग' ही कथा मला खूप आवडते.

डॉ माधव पुराणिक, भ्रमणध्वनी ९६२३४४२२२१

तू ट्यूब चॅनेल @krishnskamal1665

# निळया चेहऱ्याची आकृती

राजेश उनवणे : निळया चेहऱ्याची आकृती

क्षितिजाला टेकलेले वाळवंट. मध्यभागी एक मनोरा उभा. त्यास दोन्ही बाजूनी एकाखाली एक उघड्या खिडक्या व अगदी खाली प्राचीन, गंजून गेलेला, सताड उघडा दरवाजा. मनोऱ्यापासून काही अंतरावर पाच तंबू.

वेळ रात्रीची. तंबूमधून चार वयोवृद्ध माणसे बाहेर पडून मनोऱ्याच्या दरवाजाजवळ येतात. एकमेकांस अभिवादन करून मनोऱ्याच्या चार बाजूला जाऊन बसतात. रेशमी वस्त्रातून काचेचा एक गोलक काढून ध्यानस्थ होतात. अनेक वर्षे चालू असलेल्या या साधनेमागे त्यांची एक श्रद्धा आहे. येथून ही कथा सुरू होते.

कथेचा माझ्या अल्पमतीस भावलेला अर्थ खालीलप्रमाणे--

ही कथा --- 'अटळ असलेला मृत्यु व त्या मृत्यूवर विजय मिळवून अमरत्व प्राप्त करण्याची मानवी प्रवृत्ती'--- यावर आधारीत आहे.

१) चार वृद्ध हे त्या मानवी प्रवृत्तीचे प्रतिक आहेत.

२) मृत्यु हे नियतीची जी अनेक रुपे आहेत, त्यापैकी एक रूप आहे. निळया चेहऱ्याची आकृती ही नियतीच्या एका रुपाचे म्हणजेच मृत्यूचेच प्रतिक आहे. निळा रंग (नियती व तिची रुपे) निसर्गात भरून राहिलेला आहे.

३) मनोरा-- हे कथेमध्ये मृत्यूचे निवासस्थान दाखवले आहे. वाळवंट जसे क्षितिजाला टेकलेले आहे तसे वाळवंटात मध्यभागी उभा असलेला हा मनोरा आकाशाला टेकलेला आहे.

दोन्ही बाजूच्या उघड्या खिडक्या म्हणजे संपूर्ण वाळवंटावर असलेले मृत्यूचे लक्ष.

प्रत्येकास मृत्यु कधी ना कधी येणारच आहे. मनोऱ्यात जावेच लागणार आहे. म्हणून त्याचा दरवाजा सताड उघडा आहे. जीवन-मृत्युचा हा खेळ अनादी काळापासून चालू असलेने हा दरवाजा प्राचीन व गंजलेला आहे.

४) अमरत्व प्राप्त करण्याची इच्छा मानवास पूर्वापार आहेच. वृद्धांची साधना त्यासाठीच चालू आहे. त्यांची एक पवित्र अशी श्रद्धा आहे. --- "आपल्या साधनेवर प्रसन्न होऊन मनोऱ्यातील निळया चेहऱ्याची आकृती मनोऱ्यातून बाहेर येईल. जीवनाचे सूत्र सांगेल. ते दिव्य ज्ञान आपणास प्राप्त होईल. अनंत कालची प्रतीक्षा संपून जाईल. " --- या श्रद्धेवर जगत, अनेक वर्षापासून ते दर रात्री चिंतन करीत आहेत.

म्हणूनच या श्रद्धेला/साधनेला जो कोणी धक्का पोहचवेल त्यास मृत्युदंड देणे, त्याची हत्या करणे हे त्यांच्या दृष्टीने एक अटळ कर्म आहे.

५) सुरवातीस ते पाचजण होते. त्यापैकी पाचव्याचा संयम सुटला. "निळी आकृती जर मनोऱ्यातून बाहेर येत नसेल तर आपणच मनोऱ्यात जाऊ" असे तो म्हणतो.

याचा अर्थ---

मृत्यु स्वत:हून दर्शन देत नसेल तर आपणच मृत्यूला भेटायला जाऊ असा त्याचा हेतू आहे. मनोऱ्यात उघड्या दारातून आत जाणे म्हणजे स्वत:लाच मृत्यूच्या ताब्यात देणे. आत्महत्याच करणे. हे पाप आहे. श्रद्धेचा अपमान आहे. म्हणून

पाचव्याची हत्या झाली. त्या हत्येने कटयारी ओल्या झाल्या. त्यास रक्त लागल्याने त्या ओल्या कटयारी पुसून ते चार वृद्ध परत साधना चालू ठेवतात.

६) पण उघड्या दरवाजातून आत जाण्याचा, म्हणजे स्वत:ला मृत्यूच्या हवाली करण्याचा विचार या प्रत्येकाच्या मनात कधी ना कधी आला होता. पण त्यांनी तो मनात खोलवर दडपून टाकलाय. तसे करताना त्यांना खूप प्रयत्न करावे लागले व असंख्य यातना झालेल्या आहेत.

चौथा वृद्ध मात्र हा विचार पूर्णपणे दडपून टाकू शकलेला नाही. अमरत्वापेक्षा मृत्यु त्यास जास्त चांगला व जवळचा वाटतो. म्हणून कथेतील वेडा त्यास आपला भाऊच मानतो. भावाचे मित्र असलेने इतर तिघे वृद्ध हे सुद्धा माझे भाऊच असल्याचे वेडा सांगतो.

७) **हा वेडा कोण आहे?**

वेडा हे निळ्या आकृतीने म्हणजेच मृत्यूने घेतलेले शरीररूप आहे. कारण हे शरीर म्हणजे फक्त सांगाडा आहे. त्यावर चार चिंध्या आहेत. कातडी आहे, पण रक्त नाही.

ज्याच्या दर्शनाची आस चारी वृद्धांना लागली आहे, ती निळ्या चेहऱ्याची आकृती म्हणजेच नियतीचेच रूप असलेला मृत्यु या सांगाड्याच्या शरीररूपातून त्यांना दर्शन देतो. (ठिपका-दुरून येणारा, हळूहळू मोठा होत जाणारा. - इति जीए) अमरत्वाची ही साधना म्हणजे एक वेडेपणा असल्याचे तो खात्रीपूर्वक सांगतो. पण वृद्ध त्यालाच वेडा ठरवतात.

८) गोलकात पहात चालू असलेल्या वृद्धांच्या साधनेची वेडा निर्भत्सना करतो. 'निळ्या चेहऱ्याची आकृती मनोऱ्याच्या पायाजवळ बसून

दिसायची नाही. ती मनोऱ्यापासून दीर्घ अंतरावरून प्रथम दिसेल', असे तो खात्रीपूर्वक सांगतो.

त्या आकृतिविषयी तो म्हणतो,

"वरच्या या तेजस्वी आभाळाच्या गोलकात पाहा. ही नक्षत्रे, हे तेजस्वी तारे, त्यांचे मूक शब्द आपल्यासाठी आहेत. या मोकळया वाळवंटात विश्वाच्या हृदयाचे स्पंदन ऐकायला मिळेल. सकाळी वाऱ्याबरोबर उडणाऱ्या वाळूच्या कणातून निर्माण होणारे- नवीन आशा निर्माण करणारे संगीत, संध्याकाळी जांभळया संधिप्रकाशात येणारी उदासीनता व मध्यरात्रीचे मुक्त आक्रंदन, वाळवंटात पाझराच्या साक्षीने खडकाआड उमलेले रानफूल, वाळवंटात कुडचाभर पाणी दिसताच त्यात पाय बुडवून, त्या पाण्याने आपली चोच भरुन घेणारा समाधानी पिवळा पक्षी. "

वेडयाने दिलेले हे दिव्य ज्ञान आहे.

त्याचा अन्वयार्थ -- 'निळया आकृतीचे दर्शन हवे असेल तर मनोऱ्यापासून दूर जा. म्हणजे मृत्यूचे विचार काढून टाका. दूर म्हणजे जीवनाकडे जा. नियतीची या विश्वात भरून राहिलेली निरनिराळी रुपे पहा. त्यामध्ये तिचे दर्शन तुम्हांला होईल. चराचरात ती व्याप्त आहे. हा साक्षात्कार मला झाला आहे व तो चिरंतन आनंद मला सापडला आहे. त्याचा वाटा तुम्हास देण्यासाठी दशदिशा धुंडाळत, तुम्हाला शोधत आलो आहे. '--

वृद्धांची ही साधना म्हणजे निव्वळ वेडगळपणा असल्याचे तो सांगतो. तेव्हा पहिला वृद्ध त्यास आपल्या वाट्याने जाण्याचे व परत येथे आलास तर जिवंत जाणार नाहीस असे कठोरपणे सुनावून ते तीन वृद्ध कटयारी बाहेर काढतात. ते पाहून चौथाही चाचपडत आपली कट्यार काढतो.

९)	तेव्हा वेडा खळाळून हसतो. न बोलता वाळूत पावले उमटत निघून जातो. त्याच्या वाळूतील पाऊलखुणा संथपणे वाहणारा वारा पुसत क्षितिजापर्यंत जातो. शेवटी त्या वेड्यालाही पुसून टाकतो.

याचा अर्थ – वेड्याची कोणतीच खूण मागे रहात नाही. पाऊलखुणा सुद्धा पुसल्या जातात. पुढे कथेत चौथ्या व तिसऱ्या वृद्धाचा शोध मात्र त्यांच्या वाळूतील पाऊलखुणा वरूनच घेतला जातो.

१०)	एके रात्री मनोऱ्याभोवती मंद निळसर प्रकाशाचे एक वर्तुळ पसरुन वरवर जाते. नाहीशा झालेल्या मनोऱ्याच्या टोकावर एक निळा तारा निर्माण झाल्याप्रमाणे प्रकाश दिसतो व त्याच्या मध्यभागी खाली पहात असलेला चेहरा क्षणभरच स्पष्ट दिसून नाहीसा होतो.

चारी वृद्धांना ही त्या वेड्यानेच केलेली फसवणूक आहे असे वाटते. “तो मनोऱा चढून गेला असावा. रात्री हे सोंग वठवून आपल्या पवित्र श्रद्धेचा धिक्कार त्यांने केला आहे” असे पहिला वृद्ध म्हणतो. त्यास मारण्यासाठी ते चौघेही दिवसा निघतात.

११)	त्यांनी सात टेकड्या ओलांडल्यानंतर तो वेडा (अस्त्यावस्त पसरलेल्या झुडुपाच्या आडोशाला प्रसन्न चेहऱ्याने पडलेला-इति जीए) दिसतो.

येथे अज्ञात शक्तीचे वास्तव्य सातासमुद्रापार असल्याचे एक कल्पित चित्रण पौराणिक कथेमध्ये असते, याची आठवण होते. म्हणून या सात टेकड्या.

१२)	वृद्धांच्या चाहुलीने उठून त्यांच्या स्वागतासाठी हात गोलाकार फिरवून वेडा म्हणतो, “अखेर तुम्ही आलात, बंधुनो. मी तुम्हाला बोलावले त्यावेळी

तुम्ही आला नाहीत, पण झाले तेच बरोबर झाले. दृष्टी आतून स्वच्छ व्हावी लागते. तुमचे स्वागत असो. सगळयांना सांभाळून कुशीत घेण्याजोगे हे वाळवंट विशाल आहे. ” पण त्यांनी कठोरपणे कटयारी काढून त्याच्या सांगाड्यासारख्या शरीरात खुपसल्या. त्यावेळी चौथा मागे होता. तिघा वृद्धांनी त्याच्याकडे पाहताच लगबगीने तो कट्यारीचा निसटता वार करतो. पण त्या वारामुळे वेड्याच्या कातडीवर ओरखडा निघतो.

या हत्येचे वेळी रक्त निघत नाही. कटयारी ओल्या होत नाहीत. त्या पुसल्या जात नाहीत. सुरवातीला झालेल्या पाचव्याच्या हत्येवेळी हे सर्व घडून आले होते.

१३) पुन्हा एके रात्री तो तेजस्वी निळसर चेहरा थोडा खाली उतरून एका खिडकीतून क्षणभरासाठी डोकावतो. तेव्हा चौथा साधना सोडून गेल्याचे तिघा वृद्धांच्या लक्षात येते. त्याच्या ‘पावलांच्या खुणांनी’ ते त्याचा माग काढतात. ‘तीन टेकड्या ओलांडल्यावर’ चौथा सापडतो. वेडा आपला भाऊ आहे व त्याच्यावर कट्यार चालवण्याचे पाप माझ्याकडून घडलेने त्याची क्षमा मागणेसाठी आल्याचे, चौथा सांगतो. वृद्धांच्या दृष्टीने साधना सोडून जाणे म्हणजे त्यांच्या श्रद्धेची विटंबना. त्यास एकच प्रायश्चित्त असलेने ते कटयारीने त्याची हत्या करतात.

१४) तिसऱ्याची हत्या होते, तेव्हा रात्री तो तेजस्वी निळसर चेहरा आणखी ‘थोडा खाली उतरून’ एका खिडकीतून क्षणभरासाठी डोकावतो. तिसरा साधना सोडून गेलेला असतो. एक टेकडी ओलांडल्यावर तो सापडतो. आता त्याच्या डोळयाखाली व हनुवटीखाली निळा रंग वृद्धांना दिसतो. याचा अर्थ---- वेड्याने सांगितलेले निसर्गातील दर्शन त्यास घ्यावयाचे आहे. साधनेतील फोलपणा त्याच्या लक्षात आलेला आहे. वेड्याने दिलेले दिव्य ज्ञान त्याला पटले आहे. त्याने

ते स्वीकारलेले आहे. म्हणून तो निळा रंग. पण साधना सोडल्याचे प्रायश्चित त्यास कटयारीने दिले जाते. आता दोघेच वृद्ध उरतात.

१५) दोघांचीच साधना सुरू राहते. साधनेसाठी मनोऱ्याच्या अलीकडे व पलीकडे ते बसत असतात. ते थकलेत. दृष्टीला मनोऱ्यापलीकडचे दिसेना झालंय. एका रात्री पुन्हा तेजस्वी निळा प्रकाश व निळया चेहऱ्याची भव्य आकृती दिसते, ती पहिल्या खिडकीत. प्रकाश मावळतो. दोघांनाही आकृती एकाचवेळी दिसलेली असते. ते एकमेकास सांगणेसाठी पहिला मनोऱ्याच्या अलिकडून व दुसरा पलीकडून जातो. त्यामूळे त्यांना एकमेकांचे दर्शन होत नाही. आपली प्रतारणा केल्याची दोघांची एकमेकाविषयी भावना होते. दुसऱ्यादिवशी संध्याकाळी पुन्हा साधनेसाठी मनोऱ्यासमोर दोघे येतात. पण एकमेकाविषयी असलेला विश्वास विषमय झाल्याने ते परस्परांची कटयारीने हत्या करतात. (रक्ताची काळपट धार तहानलेल्या वाळूत सोडत कोसळले व ते मनोऱ्याच्या उघड्या दरवाजासमोर आडवे झाले. -इति जीए)

आता सर्व क्षितिजापर्यंत निळा प्रकाश पसरला. मनोऱ्यातून ग्रहताऱ्यांच्या मुकुट असलेली दिव्य, निळया चेहऱ्याची आकृती बाहेर आली. तिची नजर दोघांच्या निर्जीव शरीराकडे व ओलसर कटयारीकडे गेली. ते दृश्य पाहून ती आकृती पायरीवर बसली व चेहरा झाकून अश्रू ढाळू लागली.

१६) निळया चेहऱ्याची आकृती अश्रू का ढाळू लागली?

नियती व तिची विश्वातील अनेक रुपे यांचे सतत दर्शन विश्वात घडत असते. सर्व साकार, जीवपदार्थ शारीरिक रूपात वेगवेगळे प्रतीत होत असले तरी ते सर्व त्या एकाच परम शक्तीचेच रूप आहेत. दृष्टी आतून स्वच्छ व्हावी लागते हे या कथेतील वेड्याच्या तोंडी असलेले वाक्य म्हणूनच महत्त्वाचे. आपण सगळे भाऊच आहोत,

हे वेडा अगदी सुरवातीलाच सांगतो. या परम शक्तीलाच आव्हान देणारी ही साधना म्हणजे एक वेडगळपणा आहे. वृद्धांची श्रद्धा पवित्र आहे. म्हणून तर वेड्याच्या रूपात परम शक्तीने त्यांना दर्शन दिले. पण वेड्याने सांगितलेले दिव्य ज्ञान वृद्ध त्वरित स्वीकारू शकत नाहीत. कारण मृत्युवर, या निसर्गावर, विजय मिळवून अंमरत्व प्राप्त करण्याची त्यांची ईर्षा, अहंमन्यता यास कारणीभूत आहे. अनेकप्रकारे, अनेकवेळा, अनेकजण या निसर्गाशी, या नियतीशी असलेले आपले नाते आत्तापर्यंत या जगात सांगत आलेले आहेत. पण ही मानवी प्रवृत्ती त्याची अनुभूति तर दूरच पण त्याचा साधा स्वीकारही करत नाही, उलट तिलाच आव्हान देते, तिलाच नष्ट करण्याचा प्रयत्न करते याचे या परमशक्तीला, नियतीला, म्हणजेच कथेतील निळया चेहऱ्याच्या आकृतीला होणारे दु:ख म्हणजे हे अश्रु.

जीए सलाम.. !

--- राजेश उनवणे

सुनीळ सामंत: राजेशजी.

निळया चेहऱ्याची आकृती' या अतिशय सुंदर पण तितक्याच (मला) अगम्य कथेचे तुम्ही केलेले विश्लेषण भावले. मला जे वाटले त्याहून हे अगदीच वेगळे होते. मी या कथेकडे जीवनाकडे पाठ फ़िरवून, समोर दिसणाऱ्या सत्याला माया समजून, जीवाचा प्रत्यक्षानुभवाचा आनंद नाकारून जगणाऱ्या लोकांचीकथा समजत होतो. चवथ्याचा भाऊ मला बाभ बोरकर, पुलं, मंगेश पाडगांवकरच वाटत. पण या अर्थाने कथा वाचली तर त्यातील अनेक घटनांचा अन्वयार्थ लावता येत नाही. आता तुम्ही लावलेला अर्थ समजून घेऊन पुन्हा कथा वाचतो.

सांजशकुन या पुस्तकातील कथांचा क्रम हा शून्यवादाकडून अहमवादाकडे आहे. त्यात ही कथा शेवटाकडे झुकणारीआहे. त्या अर्थानेही ही कथा समजून घ्यायला हवी.

सुनीळ सामंत: @ विलास वाघोलीकर, @GA Art Vijayraj Bodhankar

ही कथा चित्रमय आहे. ही कथा वाचताना माझ्यासारख्या अ-कलाकारालाही रेखा आणि रंग यांतून काहीतरी साकारावे अशी सुरसुरी येते. तुम्हालाही आली असेल.

विलास वाघोलीकर: निळया चेहऱ्याची आकृती -

प्रतिसाद - व्ही एस् वाघोलीकर -

1 ) राजेशजींनी या कथेचे कथानक व मतितार्थ सविस्तरपणे सांगितला आहे. याबद्दल आभारी आहे. विशेषतः सांजशकुन पुस्तकातील काही कथा, वाचकांना नेटाने वाचाव्या लागतात व अर्थाचे पैलू पहावे लागतात. माझ्या पैलूतून मी या कथेकडे पहात आहे.

2 ) निळया चेहऱ्याची आकृती म्हणजे, विश्वाचे सार समजून घेण्याचा माणसाचा प्रयत्न. याला नियतीचे स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न, असेही म्हणता येईल.

- विश्व तर भोवताली आहेच. पण ते अनंत, अनिर्वचनिय, अनाकलनीय आहे. विश्व समजून घेताना, माणसाचे, मानवाचे जीवन संपून जाते. पण जाणीव असलेल्या माणसाला विश्वाचे सार समजून घेण्याची साधना करावी वाटते.

- याला एक मार्ग रमल. कथेतील साधक, काचेच्या गोळ्यावर एकाग्र चित्त ठेवून त्याची साधना करतात.

- कथेत सुरुवातीला ज्ञात विश्वाचे रूप संकेतांनी दाखवले आहे. विस्तिर्ण वाळवंट - वारा - जांभळी संध्याकाळ - ताऱ्यांनी भरलेले आकाश - कधीतरी पाणी त्यात चोच बुडवून पिणारा पक्षी - इत्यादी.. हे विश्वाचे दृश्य रूप आहे.

- जी ए लिहितात - विशाल विविध जीवनाचे सूत्र सांगणारी निळया चेहऱ्याची आकृती मनोऱ्यातून - अवकाशातून - कधीतरी खाली येईल अशी साधकांची श्रध्दा असते.

- पण मनोऱ्याचा दरवाजा उघडा असला तरी, त्या आकृतीकडे आपल्याला जाता येणार नाही. येथे दरवाजा म्हणजे ज्ञात विश्व.

- मनोऱ्यातील आकृती दीर्घ अंतरावरून प्रथम दिसेल. म्हणजे अनंत विश्व, पृथ्वी बाहेर जावून पाहता येईल का, असा काहींचा विचार होतो.

- माननीय राजेशजींनी कथेतील मध्यवर्ती उतारा दिला आहे - " वरच्या या आकाशाच्या गोलकाकडे पहा --- - " तो कथेचा गाभा आहे. व तो उतारा दिल्यामुळे कथा समजायला खरोखर मदत झाली आहे.

- कथेशेवटी निळया चेहऱ्याची आकृती येते, तेव्हा तिच्या भोवती निळा प्रकाश व ग्रह तारे यांचे वलय असते. हे विश्वाचे अनंत रूप दाखवले आहे. मला हे महत्वाचे वाटते.

- भव्य विश्वाचे ओझरते दर्शन झाले तरी, माणसाची दृष्टी मर्यादित असल्याने, ते दर्शन भासमान वाटते " साधकाला दैदिप्यमान निळा तारा निर्माण झाल्याप्रमाणे

प्रकाश दिसला व त्याच्या मध्यभागी चेहरा दिसला " असे नंतरही घडले. पण साधकांना ते सत्य न वाटता मोह वाटतो.

- साधक माणसे आहेत. त्यामुळे त्यांच्यात आस, तपश्चर्या आहे, पण मोह, मत्सर, अहंकारही आहे, असे कथेत दाखवले आहे. त्यांमुळे मानवजात स्वतःला संपवणार नाही का - हे नाटयमयतेने दाखवले आहे. अशी जाणीव असलेली मानवजात, क्रोध, मत्सराने संपल्यावर काय होईल?

- अनंत विश्वा ला प्रकट व्हावेसे वाटले तरी माणसाच्या शब्दांत, संवेदनांत विचारात प्रकट होता येत नाही. त्यामुळे सर्व साधकांचा - मानवजातीचा नाश झाल्यावर निळया चेहऱ्याच्या आकृतीला - विश्वाला - शोक करण्याशिवाय पर्याय रहात नाही. व विश्व -नियती - तशीच अनाकलनीय, अनिर्वचनीय राहते.

- विश्वस्वरूप भाषेत पकडता येईल का? जी ए म्हणतात " तुमचे डोळे पहातात तर काचेचा निर्जीव गोळा. व माझी जीभ बोलते काय तर कोरड्या शब्दांच्या कवड्या ! " भगवत् गीतेत विराट रूप दाखवण्यापूर्वी अर्जुनाला विराट दृष्टी द्यावी लागते. याची येथे आठवण होते -

- अशा प्रकारे कलात्मक रीतीने मूलभूत प्रश्न उपास्थित करणारी ही कथा आहे. धन्यवाद. - विलास वाघोलीकर

सुनीळ सामंत: अतिशय सुंदर विवेचन आहे विलासजी.

--

आज पुन्हा वाचताना मला ही कथा जीवनाचा आस्वाद न घेता चिकित्सकपणा करून जीवनाच्या आनंदाचा विचका करणाऱ्यांची कथा वाटली.

यावर थोडं विस्तृत लिहायचं आहे. नेमकं काय आणि कसं लिहावं ते समजत नाही. आज रात्री किंवा उद्यापर्यंत लिहीन.

मी इतरांच्या इनपुट्सचीही वाट पहात आहे.

सुनीळ सामंत: निळया चेहऱ्याची आकृती

-

कथेच्या शीर्षकातच या कथेचे वेगळेपण आहे. निळा चेहरा. आकृती वेगळी. तिचा चेहरा निळा. निळा रंग हा अथांगतेचे द्योतक आहे. थांग लागू न देणारं आकाश, ज्याचा थांग लागत नाही असे असा समुद्र असा समुद्र डोळयांना निळे भासतात पण असतात मात्र बिन रंगाचे बनलेले. तसेच आकृतीचा चेहरा, मुखवटा, भास जरी निळा असला, तरी ती आकृती मात्र निळी नाही. ती तेजस्वी आहे. मुळात ती आकृतीच नाही. ती तेज आहे. ती ब्रह्म आहे म्हणा किंवा ती बिग बॅंग आहे म्हणा. ती क्षणभरासाठीच चमकते आणि पुन्हा सारे जैसे थे होऊन जाते. पण स्थिर नाही. वारे वहात रहातात. जीवन वाहते रहाते.

त्या मुळे निळया रंगाच्या अथांगतेचा शोध घेताना बिन रंगातून जावे लागते. म्हणून काचेचे लोलक.

हा शोध घेतला कुठे जातो तर शुष्क अशा वाळवंटात जिथे वाऱ्यामुळे वाळवंटावर रेशमी वस्त्रा सारखी नजाकत आली आहे.

हे **पाच जण का? पाचच जण का? पाच काय?**

आपण ज्ञान कशाच्या आधारे मिळवू शकतो? ज्ञानेंद्रिये कोणती आणि किती? पाच इंद्रियं. चक्षू, जिव्हा, स्पर्श, कर्ण, नासिका. या पाच इंद्रियांद्वारेच आपण हे

ब्रह्मज्ञान मिळवू शकतो. पण या पाचांवर नियंत्रण ठेवणे सोपे नाही. या पंचेंद्रियांना जगातील समोर असलेली असंख्य सुखं बाजूला लोटून त्या बिन रंगी पण निळया भासणाऱ्या विशालतेचा शोध घ्यायचा आहे. हा शोध घेण्यासाठी मानवाकडे आपली पंचेंद्रिय सोडून दुसरा कोणताही ज्ञानमार्ग नाही. आणि ही इंद्रिये केव्हाही फ़ितूर होऊ शकतात, मोहाला बळी पडू शकतात. आपणही त्या उघड्या द्वारातून आत जावे आणि आनंदाचा आस्वाद घ्यावा हा विचार जातीवंत सर्पाप्रमाणे त्यांच्या मनात कधी ना कधी आलाच होता. पण त्यांनी महत्प्रयासाने, असीम यातनांनी, तो खोल तळात दडपून टाकला होता.

त्यातले पहिला बंडाचा झेंडा वाढणारा कोण बरे? जिभ?

तुमचे डोळे पहातात काय तर हा काचेचा निर्जीव गोळा? आणि माझी जीभ बोलते काय तर कोरड्या शब्दांच्या कवड्या?

शब्दांत न सामावणारे, डोळयांना दिसूनही न दिसणारे, आणि न दिसताही जाणवणारे, ते भव्य सत्य पहायचे असेल तर पाचही इंद्रिये मुक्त सताड उघडी ठेवून "त्या" चा आनंद घ्या असेच ही कथा सुचवते काय? नाहीतर "त्या"च्या निर्मितीचा अपमान करून, स्वतःच्या प्रेरणांना मारून, इंद्रियांना मारून मुटकून आवरून, तुम्ही "त्या"ला अश्रू ढाळायला लावता आहात. तुमच्या कट्यारी, तुमचे निर्मितीचा द्वेष करणारे विचार, त्या तेजस्वी निर्मिकाच्या नखासारखे आहेत. त्या कट्यारी म्यान करा. नखे कापून फ़ेकण्यासाठी असतात. शून्यवादी विचारांचा, कोरड्या वाळवंटाचा, बिनरंगी लोलकाचा त्याग करून जगाचा आस्वाद घ्या. पाच इंद्रिये मुक्त होऊ द्या.

मग जेव्हा ते सत्य वेगवेगळ्या रुपांत तुम्हाला दर्शन देईल तेव्हा ती माया आहे, फ़सवणूक आहे असे मानून तुम्ही स्वतःची फ़सवणूक करणार नाही. तुम्ही त्याला सामोरे जाल आणि ’त्या ’ चा भाग बनाल. ’सत्य’ ही बाह्य पंचेंद्रियांनी नाही तर ’आत’ शिरून अनुभवायची ती गोष्ट आहे.

सांजशकुन या संग्रहातील कथा शून्यवादाकडून हळूहळू आशावादाकडे, अस्तित्वाच्या अर्थपूर्णतेकडे प्रवास करताना दिसतात. त्यातली ही महत्वाची कथा आहे. असे मला वाटले.

यतीन गुळवणी : धन्यवाद सुनीळ सर! आपल्या चिंतनशीलतेने आपण एक नवीन आयाम दाखवून कथास्वाद घेण्यास मदत केलीत.

विलास वाघोलीकर: धन्यवाद सुनीळजी. चांगले मुद्दे. I ) साधक अथांगाचा शोध घेण्याचा प्रयत्न करत आहेत. 2) पंचेंद्रियांकडे संकेत केला आहे. इत्यादी मुद्दे महत्वाचे आहेत. गुड डे. विलास वाघोलीकर

राजेश उनवणे : सुनीळजी नमस्कार,

'निळया चेहऱ्याची आकृती' ही कथा अगम्य आहे हे जे आपण लिहीलेले आहे ते शंभर टक्के खरे आहे. कथा वाचल्यावर वाचक विचारातच पडतो. ही कथा नेमकी काय सुचवते असा प्रश्न पडतो. प्रत्येक रसिक वाचक आपापल्या परीने तिचा भावार्थ शोधत असतोच. पहिल्यांदा वाचल्यावर तर मी अगदी गोंधळून गेलो होतो.

नंतर जे काही सुचले ते लिहीत गेलो.... !तरीसुद्धा अशा अगम्य कथेवरील विश्लेषण आपणास भावले हे वाचून खूपच आनंद झाला. धन्यवाद.. !

जीएंच्या कथावर जाहीरपणे लिहू असे मला तर आयुष्यात कधीच वाटले नव्हते. आपण हा ग्रुप स्थापन करून जीएंच्या कथावर प्रेम करणाऱ्या वाचकांना लिहिते केलेत याबद्दलही आपणास मनापासून धन्यवाद. 🙏

राजेश उनवणे : वाघोलीकर सर नमस्कार,

आपण एका वेगळ्याच दृष्टिकोनातून कथेसंदर्भात लिहिलेले खरोखरच चिंतनीय आहे. आपण अनेक वेगळ्या मुद्द्यांनाही केलेला स्पर्श भावला. कथेतील अनेक बाबींवर लिहायचे राहून गेलेले आहे, याची जाणीव झाली. विशेषत: आपण नमूद केलेले निळ्या चेहऱ्याच्या आकृतीचे वर्णन, शब्दांच्या कवड्या इत्यादी... !

आरती प्रभू यांनी जीएंना लिहिलेल्या एका पत्रात लिहिले आहे की, --- ‘आपल्या कथालेखनाने दिपवून टाकणारी जी वळणं घेतलेली आहेत ते पाहून मला असे वाटते की निर्मितीच्या गर्भाशियात बसून कुणीतरी एक तपस्वी ॐ काराचा जप करीत असावा. ’--

आणि जीएंबाबत हे योग्य वर्णन आरती प्रभू यांनी केल्याचे त्यांच्या कथा समजून घेताना लक्षात येते.

जीएं त्यांच्या चिंतनातून मानवी दुःख, वेदना, अहं यावर जशी कथा लिहितात तशीच काली, गीतपाखरू, दीपस्तंभ अशा स्वरूपांच्या कथा मधून अज्ञाताचा वेध घेणाऱ्या कथाही लिहितात.

कलात्मक रीतीने मूलभूत प्रश्न उपस्थित करणारी ही कथा आहे हे आपण केलेले वर्णन अगदी योग्य आहे.. !

ही चित्रमय कथा आपल्या सारख्या दर्दी कलाकाराने खरोखर चित्रबद्ध करावी असे मनापासून वाटते... वाट पहात आहे... धन्यवाद!

विश्वेश्वर नांदेडकर: अगदी परफेक्ट. पाचच का? आपण नेहमी म्हणतो जी ए एकही शब्द विनाकारण लिहीत माहित. आणि कथेच्री पात्रे तर कधीच विनाकारण वाढवत नाहीत. आपण केलेले विवेचन अगदी बरोबर आहे असे मला वाटते. अर्थात वृद्धांची तपस्या, त्यांचे वागणे, स्तांच्या तपश्चर्येचे फळ, त्यांची विचाराची मानसिकता या बद्दल प्रत्येकाचे आपापले मत आसू शकते आणि ते आपापले ठिकाणी बरोबरच आहे. पण मूळ कथेचा गाभा हाच आहे की मनुष्याला अंतिम सत्याकडे जायचे आसेल तर पांचेंद्रियांवर ताबा मिळवला पाहिजे. आणि त्या साठी कठोर झाले पाहिजे. तरच तुमच्या माती प्रमाणे सत्याचा साक्षात्कार होवू शकतो. अर्थात तोच अंतिम आणि तुम्हाला अभिप्रेत साक्षात्कार का हा पुन्हा वादाचा मुद्दा. पण जे काही दिसेल समजेल त्यामुळे तुम्हाला तुमच्या तपश्चर्येचे फळ मिळाले आसी समज झाला की मिळणारा परमानंद सर्वोच्च कोटीचा आनंद आणि समाधान, तेच तुमच्या तपस्येचे साध्य.

अंतिम सत्य बाबत कशी विचाराची मत भिंन्नता आसू शकते या बाबत जी ए नी प्रवासी, माणसे अरभाट चिल्लर या कथांतून खूप सुंदर विवेचन केले आहे

ही कथा वाचताना आपल्याला कथा समजून घेण्या साठी त्याची मदत होते. कारण जे तुम्हाला तपस्या पूर्ण झाल्यावर कळाले, मिळाले, दिसले तेच अंतिम सत्य असे छाती ठोक पणे कोण सांगू शकते. त्याही पलीकडे काही आसू शकते.

अर्थात आपल्या हिंदू धर्मात यावर उत्तर ही आहे

तुमची समज तुमचे ध्यानाची गांभीर्य आणि उत्कटता यावर ते अवलंबून असते

हत्या म्हणजे शब्दश नव्हे. इतर इंद्रिय द्वारे त्या वासनेचे दमण करणे. इंद्रियावर विजय मिळवणे आसा त्याचा अर्थ आहे

अलका तडकलकर : हाताची पाच बोटे एकत्र येऊन काम करतात. एक बोट जरी तुटले/कमी झाले की काम सुरळीत होण्यास कठीण. मग त्या उरलेल्या बोटाची कसरत सुरू होते. उणीव असल्यास कामातील नेमकेपणा हरवतो. परीणाम मनासारखा मिळत नाही. असेही असावे

अलका तडकलकर : पाच पैकी तुटलेला अंगठा म्हणजे पहिली व्यक्ती. बाकीचे चारजण अमृतासारख्या गोष्टीचा शोध घेत धडपडत आहेत

# पडदा- निळासावळा

यतीन गुळवणी : सत्यकथेच्या एप्रिल १९५५ च्या अंकात छापून आलेली जी. ए. कुलकर्णी यांची पडदा ही कथा जानेवारी १९५९ मध्ये प्रकाशित झालेल्या निळासांवळा या कथासंग्रहात समाविष्ट करण्यात आलेली आहे. रूढ अर्थाने पडदा ही कथा वाटत नाही. पण मानवी मनाची तगमग आहे.

प्रिन्सिपॉल ठकार या व्यक्तीच्या मनातील विचारांचे सूक्ष्म व सुरेख रेखाटन या कथेत आहे. प्रिन्सिपॉल ठकार हे अत्यंत कला व वाङ्मय व्यक्ती असतात. त्याना चित्रकला व काव्य या विषयांत खुप अभिरूची असते. आपल्या अभ्यासिकेची त्यानी छान सजावट केलेली असते. 'आयुष्यच्या प्रवासात त्यांच्या काव्यलोलुप तरल मनावर आलेले कोमल तरंग त्यानी या ना त्या वस्तूच्या रूपात मूर्त केलेले असते. '

समोरच्या भिंतीवर संगमरवरी दगडांचे लहान तुकडे शिसवी लाकडात बसवून काप्री बेटाचे निसर्गदृष्य (खुद्द काप्रीलाच विकत घेतलेले) असते. त्या लहानशा चौकटीत सुरेल रेशमी रेषांचे धुंद ...

दिलिप बडे: होकुसाय या कवि बद्धल मोठा लेख शनिवार किंवा रविवारच्या लोकसत्ता मधील पुरवणीत आला आहे. प्रसिद्ध लाटेच चित्रसुद्धा आलेल आहे.

यतीन गुळवणी : पण जीएंनी तर होकुसायच्या 'लाटा' चित्राचे वर्णन केले आहे. त्या अनुषंगाने मी खाली तशाच दृश्याचे चित्र खाली देत आहे. Institute Menezes Braganza Hall च्या प्रवेशद्वारातल्या आतल्या खोलीतल्या भिंतीवर tiles मध्ये सदर चित्र आहे.

विशाखा आपटे : माझ्यामते कथेतला उल्लेख "The Great Wave off Kanagawa" ह्या Hokusai च्या प्रसिद्ध छापाचित्राच्या प्रतिकृती चा आहे.

सुनीळ सामंत: जी एं ची पडदा ही अगदी सुरुवातीची कथा आहे. १९५५ म्हणजे वयाची बत्तीशी. साहित्याची आवड व अभ्यास असणारे जी ए यांनी वयाच्या तिशीपर्यंत फ़ारशा कथा प्रसिद्ध केल्या नाहीत. (हे अर्ध्या हळकुंडाने पिवळ्या होणाऱ्या व प्रसिद्धीच्या मागे हात धुवून लागलेल्या लेखकांनी आवर्जून नोंदले पाहिजे) आणि जेव्हा ते प्रकाशात आले तेव्हा पूर्ण तयारीनिशी, अभ्यास करून आणि आपल्याला काय साध्य करायचे आहे याचा पूर्ण ठाम विचार करूनच आले. उथळपणाचा त्यांना तिटकारा असावा हे स्पष्टच आहे. मिडिऑक्रिटी, तडजोड, जमेल तसलं काहीतरी लिहून प्रकाशकांना पाठवणं हे त्यांच्या स्वभावाविरुद्ध असावं. प्रत्येक शब्द तोलून मापून विचार करून मांदणारे जीए होते.

आपल्या या स्वभावावरच त्यांनी ही कथा लिहीली आहे की काय असे वाटावे. आपले सर्व साहित्य हे एकाहून एक दर्जेदार असावे आणि त्यात एकही शेवाळी पडद्यासारखी ओळही नसावी असा त्यांचा ध्यास असावा. हे सर्व या कथेते प्रतीत होतं.

या स्वभावाची काही किंमतही मोजावी लागते. विशेषतः जवळची काही माणसं तुटतात, काही तुटक होतात. काहीवेळा नाईलाजाने तडजोडही करावी लागते. याची त्यांना जाणीव होती आणि तीही या कथेतून त्यांनी व्यक्त केली आहे.

मनुष्य स्वभावाचा सखोल अभ्यास, जागतिक दर्जाचे संगीत, कला यांची जाण आणि मराठी शब्दांवर हुकूमत यांचा त्रिवेणी संगम या कथेत आहे. काहीशी मोपांसां च्या वळणावर जाणारी ही कथा आहे. पण त्यातला जीए टच खास त्यांचाच आहे.

विलास वाघोलीकर: सुनीळजींनी 'पडदा 'कथेचे सविस्तर विवेचन केले आहे. त्यामुळे सर्व कथाच डोळयासमोर उभी राहते. मला वाटणारा प्रतिसाद थोडक्यात, स्पष्टपणे द्यावासा वाटतो..

जीएंनी वयाच्या 33 व्या वर्षी ही कथा लिहिली. कदाचित तेव्हा त्यांचे, व्यापक- सूक्ष्म असे एम ए- इंग्लीशचे शिक्षण झाले होते. व कदाचित तेव्हा ते इंग्लीश चे प्राध्यापक झाले होते. या कथेत ज्या लेखकांचे उल्लेख आहेत ते त्यांनी रसिकतेने, सूक्ष्मपणे तेव्हाच वाचले होते. एका पत्रात त्यांनी लिहीले आहे की " मी प्रोफेशनल वाचक आहे" त्याप्रमाणे या कथेत शब्दकलेचे खूप उल्लेख आहेत. त्यांमध्ये काव्य, महाकाव्य, नाटके, प्रवासवर्णने, इतिहास, चरित्रे, यांचे रसिक उल्लेख आहेत. चित्रांचे तर सविस्तर उल्लेख आहेत. चित्रांत आकार, कॉपोझीशन, रंगाची रचना, रंगांच्या बारीकसारीक शेडस्, भावना दाखवण्याचे कसब, हे सर्व दाखवले जातात. शिल्पकलेचे खूप संदर्भ आहेत. ग्रीस मुलीच्या चेहऱ्यावरचे कारुण्य, बुध्दाचा शांत चेहरा, काल्पी बेटाचे शिल्प इत्यादी शिल्पकलेचे उल्लेख आहेत. संगीताचा उल्लेख आहे. वस्त्रकलेचे संदर्भ आहेत. हिंदचे गालीचे, विणकाम, शर्टचे कापड, टायचे

डिझाईन्स यांची पारख दाखवली आहे. बागकामाचे संदर्भ आहेत. मॅग्नेशिया फुलाचा टपोरेपणा सांगीतला आहे. मोजून ध्यावा अशा काटेरी हलव्याच्या पाककलेचा संदर्भ आहे. मला ही कथा म्हणजे कोणाचे तरी प्रतिबिंब दाखवणारे व्यक्तीचित्रण वाटते. त्यामुळे या व्यक्तीचित्रणातून प्रिन्सीपल ठकारांच्या मनातील विचार, भावना स्पष्ट होतात.

कथेत कथानक, अगदी चित्राच्या चौकटी सारखे आहे. बायकोला रंगसंगतीचे ज्ञान नसते. मुलाला पुस्तकांत रस नसतो. तो यशस्वी व्यावसायिक होवून घर घेण्याइतका पैसा कमवतो. सुरळीत संसार करतो. कथेत भांडण कोणाशीही नसते. तरीही ठकारांमध्ये माणसांबद्दल अलिप्तपणा, कोरडेपणा असतो. पटले नाही तर चहाही घेणार नाही. फोटोकडे पाहणार नाही. इतका तीव्र अलिप्तपणा येतो. इतक्या वाचनानंतर त्यांची सहनशीलता का वाढत नाही याचे कोडे पडते. ( लेखक म्हणून जीए तटस्थपणे वागले. पण त्यांना साहित्येतर माणसांचा लोभ होता. ) अतिरसिक माणूस अतिटोकाला कसा जाईल याची, जीएंची, स्वत:च्या तरुणपणी कल्पना दाखवणारी ही कथा वैशिष्ट्यपूर्ण वाटते. धन्यवाद - विलास वाघोलीकर

सुनीळ सामंत: व्वा व्वा व्वा.

Last line best. Showing his psychological knowledge too.

# पत्रिका

अलका तडकलकर : सांजशकुन

कथा.. पत्रिका

................................

ऑगस्ट 1970.. सत्यकथेत प्रकाशित ही कथा

पत्रिका या शब्दाचा भावार्थ:पत्रिका म्हणजे बोलावणे. कुणीतरी कुणाला तरी कोणत्या तरी निमित्ताने मग गृहप्रवेश... विवाह समारंभ.. मंगलकार्य.. किंवा सार्वजनिक समारंभ.. इत्यादीं कारणे माहिती देणारा छोटा कागद. त्यात यजमानांचा नाव.. वेळ.. ठिकाण.. संदेशवजा मजकूर व पाठीमागे ज्यांना द्यायची आहे त्याचे नाव व पत्ता टाकलेला असतो.

कथाभावार्थ

या कथेचा भावार्थ असा की जन्म मरणाचीही पत्रिका असते. ती नियतीने लिहिलेली. प्रत्येकासाठी. त्यानुसार मृत्यूचे ठिकाण, वेळ, प्रकार सारे काही लिहून ठेवलेले असते.

कथानायक स्वतःहून मृत्यूच्या प्रासादात जातो. कष्ट घेत घेत का जातो? या प्रश्नाचे उत्तर खुद्द त्यालाही कळत नसते. एकीकडे मन उद्विग्न करणारे जीवन तर दुसरीकडे पायऱ्या (संसाराच्या) चढत जाऊन मृत्यूला भेटायचे ही तऱ्हा. असे जीवनाचे चित्र.

कथेचे वैशिष्ट्य

नेमकेपणाने मृत्यूबाबतची पत्रिका जी. ए. सरांनी खूप वेगळ्या कल्पनेने अर्थातच गूढार्थाने मांडली आहे. लहानशी कथा आहे. परंतू विचार.. चिंतन करायला लावणारी व मनाला सत्याचे दर्शन घडविणारी आहे. पुन्हा एकदा जी. ए. ना सलाम.

कथाशय

घनदाट निश्चल वाटणाऱ्या झाडांच्या गर्दीतून चढ चढत कथानायक एका भव्य प्रासादाकडे येतो. त्या प्रासादाचे भव्य झगझगीत असलेले साखळदंड युक्त महाद्वार सहजपणे उघडून तो प्रासादात शिरतो. आत नुसता अंधार व भीतीचे वातावरण असते. इथूनच एका अनामिक भीती नायकास जाणवू लागते. थोडाही आवाज होता त्याचा प्रतिध्वनी निघावा एवढा विस्तीर्ण ती वास्तू. नायक आत शिरतो पण कुणीच दिसत नाही. कारण आत कुणीच नसते. नाही म्हणायला नमस्कार एक कृष्णवस्त्रातील आकृती असते. मूर्ती रूपात. जी स्वतःच्या मुक्तीसाठी पत्रिकेची (निमंत्रण) वाट पहात एका जागेवर थांबलेली असते.

प्रासादात शिरताच येथे कोण आहे का? असा प्रश्न नायक विचारतो. व पुढे जात असतो. पण त्याला उत्तर मिळण्याऐवजी त्याचाच प्रश्न त्याला प्रतिध्वनीत ऐकायला येतो. म्हणजे अजून भय वाटावे असे चित्र. त्याला कुणी उत्तर देत नाही.

नायक पुन्हा पायऱ्या चढून निश्चयाने पुढे सरकतो. तेव्हा ती कृष्ण वस्त्रातील आकृती दिसते. मी तुला खालून साद घातली तर तू उत्तर का दिले नाहीस? नायक विचारतो. त्यावर आकृती बोलते मी तुला तर तात्काळ उत्तर दिले. तुला ऐकू आलेले प्रतिध्वनी तीच माझी उत्तरे होतीमग कथानायक आपल्या हातातील पत्रिका पुढे करत

आता तरी ही पत्रिका सत्वर स्वीकार कर व मला मुक्त कर. असे म्हणतो व त्या दोघांच्या मध्ये असलेला कालसर्प उंबरठा ओलांडून आकृती जवळ जातो. त्या सर्पाच्या विषाचा परीणाम म्हणुन नायकाचे पाय काळवंडून जातात. हातातील पत्रिका त्या मूर्तीच्या हाती ठेवून आता तरी मी परत फिरण्यास मोकळा झालो असे धापा टाकीत म्हणतो. कारण आतापर्यंत तो खूप दमलेला असतो. तो पूर्ण वितळलेला असतो (भरपूर उर्जा वापर )

नाही, हा उंबरा एकदा ओलांडल्यावर तुला माघारी जाता येणार नाही. हे अंधाराचे प्रकाशवस्त्र आहे. जे आता तुझेच आहे*तू माझ्या ठिकाणी असाच बंदिस्त होऊन राहशील जोपर्यंत तुला तुझी (जशी मला तू दिलीस तशी) पत्रिका घेऊन येणारा भेटणार नाही तोपर्यंत

ती आकृती उघडण्यात आलेल्या महाद्वारातून अदृश्य होते आणि नायक अंधारात त्या खांबाला टेकून स्वतःच्या पत्रिकेची वाट पहात उभा राहतो.

मरे एक त्याचा दुजा शोक वाहे अकस्मात तोही पुढे जात आहे या ओळी इथे आठवतात.

धन्यवाद

✒ डॉ. अलका प्र. तडकलकर

अंबाजोगाई

सुनीळ सामंत: डॉ. अलकाजींनी अतिशय सुंदर तऱ्हेने कथेचे विवेचन केले आहे. ज्यांनी ही कथा वाचली नसेल त्यांच्या मनात उत्सुकता निर्माण होईल.

माझ्यासारखे जे कथा वाचूनही समजले नसतील अशांना या कथेचा अन्वयार्थ लागेल. किंवा किमान विचारांना दिशा मिळेल.

सुनीळ सामंत: पत्रिका ही कथा लहान असली तरी त्यातील आशय सहजासहजी समजून येत नाही. ती अनेकदा वाचावी लागते. कथेचा नायक ज्या ठिकाणाहून येतो त्याची त्याला स्मृती राहत नाही. मागे झाडांची गर्दी आणि अस्पष्ट असा जल आभास त्याला दिसतो. त्याच्या हातात रक्तवर्णी पत्रिका असते त्यावरची मुद्रा त्याला परिचित नसते. तो जेव्हा महाद्वारात च्या समोर येतो तेव्हा ते द्वार आपल्या ताकदीने उघडले जाईल असे त्याला वाटत नाही पण ते सहज उघडते. समोर सर्वत्र अंधार असतो. अस्पष्ट दिसणारे लहान असे अनेक दरवाजे असतात. तो दोन वाक्य बोलतो आणि त्याचा प्रतिध्वनी त्याला ऐकू येतो. “येथे कोणी आहे का?” आणि “मी आलो आहे”. पण नंतर मात्र तो खरेच प्रतिध्वनी होता की तिथल्या व्यक्तीनेच ते म्हटले याचा संभ्रमही निर्माण होतो.

नंतर त्याला एक जीना दिसतो ज्याला वेटोळी आहेत आणि वर कृष्ण वस्त्रे घातलेली एक व्यक्ती आहे. त्या व्यक्तीकडे पत्रिका देण्यासाठी त्याला उंबरा ओलांडावा लागतो आणि एकदा उंबरा ओलांडला की दुसरा कोणीतरी येऊन पत्रिका देईपर्यंत त्याला बाहेर पडता येत नाही.

या कथेतील १ झाडांची गर्दी २ जलआभास ३ रक्तवर्णी पत्रिका ४ मुद्रा ५ प्रचंड महाद्वार ६ अंधार ७ अस्पष्ट दिसणारे लहान दरवाजे ८ वळणावळणाचा जिना ९ कृष्ण वस्त्रे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे पत्रिका या नऊ प्रतिमांचे अनेक वेगवेगळे अर्थ लावणे शक्य आहे ग्रेसांच्या कवितेप्रमाणे या कथेचेही अनेक अर्थ निघू

शकतात. अलका जींनी या कथेतून जीवन व मृत्यू यांचा अर्थ काढला आहे तो चुकीचा आहे असे अजिबात नव्हे पण या कथेतून तो एकच अर्थ काढता येऊ शकतो असेही नाही. या कथेतील वर दिलेल्या सर्व ९ प्रतिमा सार्थ होतील असा अर्थ काढणे आवश्यक आहे.

जीवन आणि मृत्यू हा अर्थ काढताना मी अडखळलो कारण जीवन मिळताना दुसऱ्या कोणाला तरी मुक्ती मिळते आणि आपल्याला मुक्ती मिळण्यासाठी दुसरा कोणीतरी यावा लागतो असे होत नाही. दुसरे म्हणजे जिना चढताना नायक इतका थकतो इतका विकलांग होतो की त्याला तो उंबरा ओलांडणे ही प्रचंड कष्टाचे पडते. याउलट जेव्हा तो येतो तेव्हा मात्र प्रचंड मोठे महाद्वार तो सहजपणे उघडतो, या दोन्ही घटनांचा अर्थ मला जन्म आणि मृत्यू या अर्थाने लावणे कठीण झाले.

मी या कथेवर विचार करत आहे तसेच आपल्या या ग्रुप वरील इतर विचारवंतांच्या चिंतनातून काय निघते याची वाट पाहत आहे.

डॉ. अलकाताईंचे या कथेचे सुयोग्य सुतोवाच करण्यासाठी मनःपुर्वक आभार.

सुनीळ सामंत.

अलका तडकलकर : धन्यवाद सर 🙏

जी. ए. सरांच्या साहित्यावर समर्पक चर्चा करणार हा ग्रूप आहे.

मी आता थोडा प्रयत्न करत आहे. अजूनही खूप चर्चा व्हावी. म्हणजे विचारकोष समृद्ध होण्यास मदत होईल. मला आपण संधी देता. हे आपले थोरपण आहे.

पुनश्च एकदा धन्यवाद.

दिलिप बडे: पत्रिका कथा काहीच आठवेना म्हणत सुरू होते. आणि या क्षणी कशाचा प्रांरंभ झाला की अंत झाला. अशा संभ्रमात संपते. मधुनच आवाजाचे सुद्धा प्रतिध्वनीच ऐकु येतात. सर्पाच्या अंगाचा ऊंबरा, प्रकाशमय कृष्णवस्त्र-अंधारमय कृष्णवस्त्र दोन्ही एकच आहेत. ती व्यक्ती म्हणजे तो स्वतःच समोर ऊभा होता. हा ऊल्लेख. हे वस्त्र आता तुझेच आहे. माझा क्षण येऊन ठेपला आहे. तुझी पत्रिका प्राप्त झाली की माझ्याप्रमाणे तुझी देखील मुक्तता होईल. तु मला मुक्त केलेस-मी तुझा फार कृतद् न्य आहे. ती आकृती जिना ऊतरत लहान होत गेली. या सर्व ऊल्लेखातून भ्रम-विभ्रमातून ही कथा ऊलगडत जाते. ती व्यक्ती-ती आकृती हे केवळ भास आहेत. महाद्वार हा सुद्धा भासच आहे. आत्मा अमर आहे. तो फक्त शरीर बदलतो जस आपण वस्त्र बदलतो. जन्म घेताना माणसाला इतरांकडुन वस्त्र - पत्रिका मिळते जाताना ते वस्र्-ती पत्रिका कुणाला तरी प्राप्त होते.

विलास वाघोलीकर: पत्रिका - प्रतिसाद - डॉ अलका मॅडम यांनी या अवघड कथेचे छान विवेचन केले आहे. त्याबद्दल त्यांचे आभार मानतो. कथा विचार करायला लावणारी आहे. पण पासवर्ड कळाल्यावर कॉँप्युटर चालतो. त्याप्रमाणे 'पत्रिका ' शब्दाचा आधार घेवून, ही जीवनातून मृत्यूकडे जाण्याची पत्रिका आहे, हे मॅडमनी लक्षात आणून दिले. त्यामुळे कथा पुन्हा वाचावी वाटली.

मृत्यूचा त्रयस्थ विचार काय होवू शकतो? जाणीव असलेला मानव, मृत्यूबद्दल दोन प्रकारे विचार करतो

I ) माणूस मरण पावला की संपला. नंतरचा विचार करण्याचे कारण नाही, असे चार्वकाने म्हटले होते- "भस्मिभूतस्य देहस्य पुनरागमन : कुत: । राख झालेल्या शरीराचे परत येणे शक्य नाही. "

2 ) दुसरा विचार जास्त गुंतागुंतीचा आहे. विश्वात सजीव तयार झाला. म्हणजे विश्वातील वस्तुमान व ज्ञात - व अज्ञात उर्जांचा - वापर करूनच सजीव झाला. ताऱ्यांनाही मृत्यू असतो. तसा सजीव ही काही काळानंतर मृत होतो. मृत ताऱ्यांतून मेघ होवून दुसरा तारा होतो. त्याप्रमाणे ज्यातून सजीव झाला ते ज्ञात व अज्ञात असे सर्व जे आहे ते, विश्वात दुसरा सजीव होण्यासाठी परत जाते. असे हे चक्र आहे, हा दुसरा विचार आधारहीन म्हणता येत नाही. आता या कथेत मृत्यूचे व पुन्हा जीवनाचे अनेक संकेत दिसतात.

कथेत जीवन मृत्यूचे अनेक संकेत दिसतात उदाहरणार्थ -

महाद्वार होते -. ते ढकलल्यावर साखळदंड खळखळला व आत अंधार होता. नायक खूप प्रवास करून उजेडातून अंधारात गेला.

- जिन्याच्या पायऱ्या चढताना शक्ती सांडत गेली.

- अंग विकलित झाले व पत्रिकेचा भारही सोसवेना.

- उंबरा सर्पाचा होता तो ओलांडताना विषारी फुत्कारांनी पावले काळवंडली.

- एकदा उंबरा ओलांडला की माघारी जाता येणार नाही.

- या कारागृहात तू असशील व तुला पत्रिका मिळाली तर सुटशील.

- वस्त्र उतरल्यावर नायकाने पाहीले तर ती समोरची व्यक्ती तोच होता.

- प्रकाशमय अंधारवस्त्र हा उल्लेख दिवस -रात्र जावून जीवन काळ संपत जातो, त्याचा वाटतो.

- कशाचा प्रारंभ झाला की अंत झाला, हे त्याला कळेनासे झाले. इत्यादी अनेक उल्लेख, " पुनरपि जननम् पुनरापि मरणम् ", सारखे वाटतात.

- विश्वात जीव जन्मतात व संपतात. ही लीला विश्वच करत असते. वस्तुमान, ज्ञात- अज्ञात चैतन्यातून, विश्व जीव जन्माला घालते. हे लक्षात घेतल्यावर व्यक्तीला, जन्म -मरण हे सुख -दुःख वाटले तरी, विश्वाच्या द्रुष्टीने ही लीला आहे. नियती आहे.

कथेच्या गाभ्याबदल मी माझ्या दृष्टीने हे वरील मत मांडले आहे. तपशीलाबदल जे समजले, ते खाली मांडतो -

सर्वसाधारणपणे मृत्यूविश्व हे गुहेसारखे दाखवले जाते. येथे अंधारी मोठा प्रासाद, वाडा घेतला आहे. वाडयाची रचना, विस्तार परक्याला कळत नाही. तसे येथे मृत्यूविश्व, अंधारी, गूढ, चक्रव्यूहाप्रमाणे वाटते.

रक्तवर्णी पत्रिका - म्हणजे जीवाचे रक्त शेवटी संपणार असते. तो त्याचा मृत्यूलेख असतो.

अनेक दारांचा दरवाजा - ( कदाचित ) जीवांचे अनेक प्रकार दाखवतो.

नायक सुरुवातीला बाह्य, म्हणजे नेहमीच्या विश्वातून थकून, जरा -जीर्ण होवून, वाडयाकडे पत्रिका घेवून येतो. मृत्यू येणारच त्यामुळे महाद्वार सहज ढकलल्यावर उघडले जाते. ( मृत्यू जीवावर, हजार दिशांनी, दर क्षणी घाला घालत असतो. असे कालीदासाने म्हटले आहे. )म्रुत्यूची प्रक्रिया सुरू होते. मोठा पण अंधार असलेला प्रासाद, मृत्यूविश्व दाखवतो. कोणी रहात नसलेल्या बंद अंधारी वाड्यात आपण एकटेच गेलो तर, येथे पूर्वी रहात असलेली माणसे समोर येतील का, असे (उगीचच) वाटते.

प्रतिध्वनी येतो - जो नायक वाड्यात जातो तो पुनर्जन्म होवून (वेगळ्या रुपात) बाहेर येतो. म्हणजे आत्मा म्हणून, चैतन्य म्हणून, ते एकच असतात.

- वेटोळा जीना आहे - ही पुनर्जन्माची प्रक्रिया आहे.

सिंहमुद्रा - ही सर्वभक्षक मृत्यूची मुद्रा आहे.

उंबरठा ओलांडतो. -हा कालसर्पाचा मृत्यूक्षणाचा उंबरठा आहे. तो विषारी आहे. व त्यानंतर परत जीवनात, आहे त्या रूपात, परत येता येणार नाही. पण पुनर्जिवित जीव मात्र सहजपणे जीवनात येतो.

जीएंनी एकदा पत्रात लिहिले आहे. - माझ्या कथा प्रमेयांसारख्या आहेत. त्यांतील कोणी प्रकाशक छापतील असे वाटत नाही. तर तोटाच होईल असे धरून, स्वखर्चाने, त्याचे छोट्या आवृत्तीचे पुस्तक काढावे असे वाटते. आपल्या सुदैवाने त्यांची अनेक पुस्तके निघाली. आता ही प्रमेये सोडवणे आपले काम आहे.

माननीय अलका मॅडमना पुन्हा धन्यवाद देवून येथे थांबतो. - विलास वाघोलीकर

सुनीळ सामंत: क्या बात है बडे सर.

पहिल्याच ओळीला षट्कार. खरेच. ही कथा विस्मरणातून सुरू होते आणि संभ्रमात संपते.

वाह वाह वाह.

सुनीळ सामंत: जी एं च्या अनेक कथा मी आजवर अशाच वाचत आलो. विशेषतः सत्तर नंतरच्या कथांना एक वेगळेच सौंदर्य आहे.

आताआताशा कुठे अर्थ लावायचा प्रयत्न करतो आहे. आणि त्याचीही मजा वेगळीच आहे. म्हणजे एकाच कथेतून दोन आनंद मिळतात. एक नशेचा, जाणीव हरवण्याचा आणि दुसरा जाणीवेच्या समृद्धीचा.

सुनीळ सामंत: विलास सर, सुंदर विवेचन. अलका मॅडमनी दिलेले सूत्र धरून तुम्ही पुढची उंची गाठली.

माझी समज व तुमचे विवेचन यात बराच फ़रक होता.

१) मी महाद्वार उघडणे याला जन्म समजत होतो. म्हटले तर अत्यंत कठीण असे हे द्वार. पण उघडते सहजच विनासायास, जलाचा आभास म्हणजे आईच्या पोटात असतानाचे जल. हा माझा समज होता.

२) पत्रिका पोहोचवणे- याला मी जीवितकार्य समजत होतो.

३) ध्वनी आणि प्रतिध्वनी यांना मी जीवनात होणारे जगाशी संपर्क समजत होतो.

४) जीना हे म्हातारपण, उअतारवय, आणि उंबरठा हा मृत्यूक्षण अशी माझी समज होती.

मला वाटते पुनर्जन्माच्या अर्थाने तुम्ही लावलेला अन्वयार्थ या कथेला अधिक चपखल बसतो. म्हणजे महाद्वाराशी येणे म्हणजे मृत्यूच्या जवळ येणे.

पण मग - महाद्वारा आधीचे काही न आठवणे हे जुळत नाही.

अलका तडकलकर : मा. वाघोलीकर सर.. दिलीप सर सामंत सर आणि सर्वजण

आता कुठे कथासूत्र उलगडत अहे. आणि बऱ्याच शब्दांचे प्रतिमांचे अर्थ उलगडण्यात मदत होत आहे. खूप छान कथा आहे ही

दिलिप बडे: पत्रिका-रक्तवर्णी पत्रिका-DNA test-हाच प्रवास एका वृद्धाच्या चिंतनातून कथेत मांडला आहे. जस आजोबा-मुलगा-नातू या क्रमाने ही रक्तवर्णी पत्रिका चक्राकार फिरत रहाते. जन्माला येणे म्हणजे अनुवंशिकता प्राप्त होणे. हीच पत्रिका.

सुनीळ सामंत: हे सुद्धा लागू पडतं.
पिढी- वारसा - या अर्थानेही ही कथा वाचता येते.
पण या अन्वयार्थाने काही अर्थ लागत नाहीत.
उंबरठा, जल आभास, चर्क्राकार जिना

अलका तडकलकर : 1. उंबरठा..... track changing line/boundary
2. जल... life
3. आभास.... illusions in life
4. चक्राकार जिना... DNA model
असे काहीसे अर्थ मी लावलाय

# पराभव- जी ए कुलकर्णी – कथासंग्रह- रक्तचंदन

सुनीळ सामंत: पराभव- जी ए कुलकर्णी – कथासंग्रह- रक्तचंदन

रक्तचंदन हा जी ए कुलकर्णी यांचा प्रसिद्ध झालेला दुसरा कथासंग्रह आहे. पराभव ही 1962 साली प्रसिद्ध झालेली कथा. जीएंच्या सुरुवातीच्या कथा या मानवी जीवनातील सूक्ष्म संबंध टिपणाऱ्या कथा होत्या. या कथांचे वैशिष्ट्य हे की त्यात सहसा कोणी खलनायक नसे तर परिस्थिती व एकमेकातील संबंध हेच खलनायकाचे काम करत. जीएंच्या 1968 नंतरच्या तत्वज्ञान विषयक आणि अस्तित्ववादी दृष्टांतकथांहून या कथा अगदी वेगळ्या व तत्कालीन जुन्या घाटाच्या वाटतील. मात्र वि स खांडेकर किंवा ना सी फडके या त्यांच्या पूर्वसुरी पेक्षा त्यांच्या कथा अनेक योजने पुढच्या होत्या. केवळ घाट आणि भाषा या अर्थानेच नव्हे तर आशय आणि मानवी मानसशास्त्रीय समज या दृष्टीनेही.

पराभव या कथेमध्ये तीन पात्रे आहेत एक आई आणि तिची दोन मुले माधव कामत व रुक्मिणी. रुक्मिणी आणि आई यांचे संबंध अतिशय बिघडलेले असतात. एकाच घरात राहून वेगवेगळ्या चुलीवर जेवण करणाऱ्या दोघीजणी. जेव्हा माधव घरी येई तेव्हा रुक्मिणी त्याला आईकडे जाऊ देत नसे. आई आपल्या व भावाच्या वाईटावर टपलेली आहे तसेच तिनेच आपल्या वडिलांचेही वाईट केले आहे असा रुक्मिणीचा ठाम समज आहे.

माधव एका ओळखीच्या मुलीवर प्रेम करतो त्याच्या आईला हे लग्न मान्य असते. पण तिने होकार दिला तर रुक्मिणी रागावून बसेल व नकार देईल म्हणून आई

माधवशी गुप्तपणे बोलून या प्रस्तावाला उघडपणे विरोध करते. त्या विरोधामुळे रुक्मिणी पुढाकार घेऊन ते लग्न लावून देते.

पण नंतर मात्र एके दिवशी आई आणि माधव यांचे बोलणे तिच्या कानावर पडते आणि तिला आपला पराभव झाल्याचे जाणवते. ज्या भावाला ती आपल्या गटातील मानत होती व जो तिचे सर्वस्व होता तोच मुळी आपल्या आईच्या गटात सामील झालेला पाहून तिला अत्यंत दुःख होते.

तिच्या या मनोवस्थेचे जीएंनी केलेले वर्णन मुळातून वाचण्यासारखे आहे.

मुठी घट्ट आवळून रुक्मिणी सोवळयाच्या काठी प्रमाणे ताठ निर्जीव उभी होती. त्या सुन्न क्षणी देखील माधवला वाटले, त्या कोपऱ्यात उभी असलेली रुक्मिणी अगदी आई सारखीच दिसते. आतल्या धगीमुळे चुरमडत असल्याप्रमाणे ओढलेला चेहरा, गोठलेले डोळे, किंचित थरथरणारे ओठ, सारे काही अगदी तसेच आहे. रुक्मिणी त्याच्याकडे लक्ष न देता, काहीच न पाहणारे भकास डोळे त्याच्यावर रोखून, स्तब्ध उभी होती. जणू आईने दिलेले शरीर चेहऱ्याच्या शिक्क्यानिशी तेथे फेकून रुक्मिणी अगदी संपून गेली होती

रमा गर्गे: या पराभव कथेला टीव्हीवर पण पाहिलं आहे।भक्ती बर्वे यांनी रुक्मिणीची भूमिका केली होती।

पराभव कथेतील गौण पात्रे पण तशी कथा उभी रहाण्यासाठी महत्वाची आहेत।एक म्हणजे माधव कामतचे वडील, ज्यांचा अनौरस मुलगा होता।आणि दुसरे माधवचे काका, जे त्याच्या लग्नासाठी पुढाकार घेतात।

रुक्मिणी बहीण म्हणून किती प्रेमळ होती हे कथेत ठायी ठायी दिसते

तिने आणलेल्या छत्रीत माधवच्या शाळेतील सोबती पण येत असत, लहानपणीचे पावसाचे ते दिवस माधवला आठवतात, त्याला बहिणीचा आधार वाटतो।

तिचे सौन्दर्य पण छान पद्धतीने सांगितले आहे।तिच्या कुड्या आपल्या डोळ्यासमोर चमकून जातात।

बहीण हा जीएंचा जिव्हाळ्याचा विषय, इथेही तसाच उमटला आहे!!

मला ही कथा आणि भोवरा ही कथा यादृष्टीने फार आवडतात

सागर कुलकर्णी: आपले या कथेत संदर्भातले विवेचन खूप आवडले..

याच कथेतली आई ही अतिशय महत्वाची.  असहाय, करूण कहाणी व्यक्त करणारी आई इथे आहे असं मला वाटतं.

ही कथा अनेक मानसिक ताणतणाव यांनी निर्माण झालेली आहे.

ही आई म्हणजे जीवनाच्या व्यामिश्र, अनाकलनीय लढाईत खऱ्या अर्थाने पराभूत झालेली आहे.

पती सुखाला पारखी झालेली आहे, तिचा संसार हा केवळ नावापुरताच, तिचं जगणं कमालीचं दुस्तर,

स्वतःच्याच रक्तामासाची मुलगी तिला दुरावते.  हा एक पराभव.

आणि नवरा तिच्या पासून दूर जातो हाही एक पराभव.

या पलीकडे जाऊन तिला एक मुलगा आहे. माधव नावाचा.  त्याच्याकडून तिलाही काहीच मिळत नाही. तिच्या आयुष्यात असे अनेक पराभव येतात.

स्वतःच्याच माधवच्या लग्नात ती उपऱ्या सारखं, चोरासारखा वावरते. तिच्या नियतीत लिहिलेलं असतं असं मला वाटतं. आणि याच वेळी ती तिसऱ्यांदा पराभूत होते. अख्खं आयुष्य ही बाई एका जीर्ण वस्त्र प्रमाणे पराभूत अवस्थेत जगणारी आहे.

पण आपल्या मुलांच्या भल्यासाठी तळमळणारी आई रसिकांच्या अंतःकोशात घर करून राहते आणि हेच कथेच्या यशाचे गमक आहे. जी ए यांच्या अनेक कथेमधून आई येते पण ही पराभूत आई तिला सुद्धा या कथा साहित्यात महत्त्वाचं स्थान आहे...

अतिशय दर्जेदार असणारी ही कथा.

अपार माया, दुधावरच्या सायीसारखी आपल्या रुक्मिणीला आणि माधव मुलांना वाढवते ही आई.

माधव आणि रुक्मिणीच अतिशय विलक्षण असं नातं रंगवलेल आहे.

आईची वेदना या कथेमध्ये सांगितली आहे.

ती वाचून आपल्या सारख्या प्रत्येक रसिकाचं हृदय अक्षरशः चिरत जातं.

फाटत जातं आणि लेखकाशी एकरूप होत जात..

जी ए च्या एखाद्या स्त्री व्यक्तिरेखेत चा बंडखोरपणा आपण बघितलेला आहेच. पण ही पराभवाची परिस्थिती असणारी स्त्री तितक्याच ताकदीनं या ठिकाणी जी ए रंगवतात.

या ठिकाणी मला जी ए यांच्या कथेतील अनेक स्त्री व्यक्तिरेखा डोळयासमोर येऊन जातात.

धन्यवाद.

डॉ. सागर कुलकर्णी अंबाजोगाई

सागर कुलकर्णी: भोवरे कथेतली नमूताई ही मराठीतील सर्वश्रेष्ठ व्यक्तीरेखा आहे.

मानसशास्त्राचा बारीकसा अभ्यास जी ए यांचा होता.

एका वेगळ्याच प्रकारचं चिंतन जाणीव नेणिवेच्या पातळीवर करणारे जीए या कथेमध्ये आपल्याला दिसतात.

भोवरा या कथेवर आपण नंतर कधीतरी असेच विस्तृत बोलू शकतो..

जीएंच्या कथेतील स्त्रिया हा वेगळा विषय होऊ शकतो असे मला याठिकाणी वाटते...

जीएंच्या एकूणच कथा साहित्यात भोवरे मधल्या नमू ताईने जी उंची गाठली आहे त्या उंचीवर जाणारी इतर दुसरी व्यक्तिरेखा मराठी साहित्यात नाही असं माझं ठाम मत आता झालेल आहे.

नव्हे तर ती दुर्मिळ आहे असं मी या ठिकाणी नक्कीच म्हणू शकतो...

वाचकाला सुन्न, बधीर करणारी ही नमू ताई ही व्यक्तिरेखा आपल्याला इथं सापडते आणि ती असंख्य भोवऱ्यात सापडलेली आहे...

तिची वेदना आहे ती आपल्या हृदयाला घर करून जाणारी आहे.

परिपूर्ण स्त्री म्हणून ती नमूताई आपल्या कायमच लक्षात राहील.

अनन्यसाधारण स्त्री जीएंनी या कथेत उतरवलेली आहे.

नक्की जरूर, आवर्जून भोवरे ही नावाची कथा आपण वाचावी...

बहिण, मुलगी, पत्नी या स्त्री व्यक्तिरेखा जी ए नी आपल्या कथेत आणलेल्या आहेत.

हा स्त्रीवादाचा वेगळा दृष्टिकोनही होऊ शकतो..

यतीन गुळवणी : छान विवेचन केले आहे. प्रत्येक पात्रच्या मनाच्या गाभ्याला भिडून आपापल्या परीने त्यांच्या मानसीकतेचे समर्थन करत करत वाचकाला गुंतवत नेमके कोण चूक कोण बरोबर हे ठरवण्याच्या संभ्रमात पाडण्याची जीएंची हातोटी आहे. शिवाय तटस्थपणे कथन करून निष्कर्ष काढण्याची जबाबदारी वाचकावर सोपवण्याचा त्यांचा हातखंडा आहे.

वैविध्यासाठी म्हणू फार तर पण जीएंनी या कथेकरीता कोकणची पाश्र्वभूमी निवडून अत्यंत परिपूर्णपणे रंगवली आहे.

विश्वेश्वर नांदेडकर: कोकणात आश्या अनेक फॅमिली आणि घरे आहेत. घराचे परिसराचे वर्णन अगदी प्रत्ययकारी

सुनीळ सामंत: डॉ. सागरजी, तुम्ही एक अतिशय महत्त्वाचा मुद्दा समोर आणला आहे. 'पराभव' या कथेत केवळ बहिणीचा पराभव नाही तर आईचाही ठायी ठायी पराभव होत आला आहे. आणि कथेच्या अखेरी गुपित फुटल्यामुळे भावाचाही पराभवच झाला की. आता बहिण भावामधले ते आधीचे विश्वासाचे नातेही इथेच संपले. या पराभवाचा आवाका बराच मोठ आहे. केवळ बहिणीपुरता नाही.

सागर कुलकर्णी: होय. सर

पराभूत आई हीच केंद्रस्थानी आहे.

एकूणच कथेतलं वातावरण, शब्द रचना, लिखाणाची शैली आणि प्रसंग यातून कथा उभी झालीय.

या कथेत शहरीकरणाचा, लोकसंख्या वाढीचा मुद्दाही जी ए सहज समोर आणतात.

एक दोन वाक्य परिणामकारकपणे येतात खास करुन कंसात ( ) जी ए लिहतात... मुंबईतल्याच लोकांना इतकी कशी मुलं होतात....

सुनीळ सामंत: कोण चूक कोण बरोबर हे ठरवण्याच्या संभ्रमात पाडण्याची जीएंची हातोटी आहे. शिवाय तटस्थपणे कथन करून निष्कर्ष काढण्याची जबाबदारी वाचकावर सोपवण्याचा - या जीएंच्या वैशिष्ट्यांवर नेमके भाष्य करून, यतीनजी तुम्ही जीएंना नेमके समजून घेतले आहे असे म्हणता येईल.

मात्र ही कोकणची पार्श्वभूमी नसावी. कोकणात तेव्हा जवळपासही रेल्वे नव्हती. तेव्हा हे कर्नाटकातीलच मंगलोरपुढील एखादे गाव असावे. बहुधा उडुपी.

सागर कुलकर्णी: फ्लॅश बॅक प्रकार वापरून ही पराभव कथा लिहली आहे...

सुनीळ सामंत: तुम्ही कथा बारकाईने वाचता अगदी.

जीए एकही शब्द उगीचच लिहीत नाही. त्यामुळे वाचकानेही प्रत्येक शब्दावर थोडे घुटमळावे, विचार करावा हेच योग्य. केवळ कथेचा सारांश नव्हे तर ही कलाकुसरही समजून घ्यायला हवी.

विश्वेश्वर नांदेडकर: अगदी बरोबर. वाचकांनी प्रत्येक पात्राच्या वागण्याचा विचार करावा आणि आपापल्या मगदुराप्रमाणे आर्थ काढावा आसा त्यांचा कथेतून प्रयत्न आसायचा. सरधोपट पने कथा वाचून सरळ जे दिसते ते तसेच होते असे न समजता एखादे पात्र दुस्टपणे वागले आसेल तर त्याची पण काही बाजू आसू शकते असे त्यांचे म्हणणे होते

विलास वाघोलीकर: पराभव - प्रतिसाद - विलास वाघोलीकर

या कथेतील नायक, आई, बहिण हे कुटुंब, चांगल्या स्वभावाचे आहे. पण भूतकाळात वडीलांच्या व्यभिचार - व्यसन - गुन्हा - परागंदा होणे, इत्यादी कृत्यांमुळे नंतर कसे स्वभावांत काटेरी बदल होतात. हे पाहण्यासारखे आहे. कथा ही लघुकादंबरी आहे. व त्यातील घटना दैनंदिन दृष्टीने चक्रासारख्या गतीमान वाटतात. अनेक कुटुंबावर व्यसनाचे थोड्या काळात व दीर्घ काळात, परिणाम होतात ही वस्तुस्थिती असते. आईचा सदानंदवर, जो संशय किंवा खात्री असते, त्यामुळे रुक्मीणीचे जीवन उध्वस्त होते. त्यामुळे होणारी घरातील भांडणे, दररोजची - कडाक्याची व, एकाने हो म्हटले की दुसऱ्याने नाही म्हणायचे, या प्रतिक्षिप्त क्रियेसारखी होतात. त्यातून नायक माधवचे जीवनही कोंडलेले, उध्वस्त होते. या संदर्भात कथेतील जी एंचा हा परिच्छेद महत्वाचा वाटतो -

*"माधवने जेवण केले व संध्याकाळपर्यंतचा वेळ ढकलण्यासाठी आणलेल्यांपैकी एक कादंबरी त्याने चाळायला सुरुवात केली. थोडी पाने वाचल्यावर त्याच्या मनात एक लहरी कल्पना आली. त्याला वाटले, आपण,*

*रुक्मिणी, आई, ही खरी माणसे नसून एका कादंबरीतील पात्रेच आहोत. उलट कादंबरीमधील माणसे ही खरी माणसे आहेत आणि ती पुस्तकातील पानांच्या खिडकीत गर्दी करून आपल्याकडे लक्ष देऊन पाहात उभी आहेत ! त्या कल्पनेने त्याला बराच वेळ खेळवले, नंतर त्याचे डोळे जड झाले त्याला नकळतच त्याच्यावर अस्वस्थ व अपराधी झोपेची झापड पडली. "*

या कथेत जीएंनी मानवी जीवनातील विस्कळीतपणा, एकाकीपणा स्पष्ट दाखवला आहे. घटनांची गुंतागुंत, गुन्ह्यांची साखळी, व भावनांचे उद्रेक हे सर्व घडतात व दुदैवी कुटुंबाच्या वाट्याला येतात. माणसे चांगली असतात, पण फासे दुर्दैवी पडतात. त्यामुळे मन सुन्न करणारी ही कथा वाटते. धन्यवाद - विलास वाघोलीकर

सागर कुलकर्णी: जीएंच्या कथेबद्दल ढोबळमानाने असे म्हणता येईल कि जी ए यांची प्रत्येक कथा ही सर्वसमावेशक खोल-खोल आशय रुजविणारी, कथेची कक्षा आणि कथेचा कॅन्व्हास वैश्विक करणारी, परिणामकारक अशी आहे.

जीए ची कथा घट्ट विणीची. कुठेही विसविशीत न होणारी.

सुमार दर्जा कडे न जाणारी. अत्यंत संयत अशी वर्णन करून जाणारी.

तसेच काही पात्र ही डोक्यात खिळा मारावा आणि तो खिळा पक्का बसवावा त्याप्रमाणे कायमचा मनाचा ताबा घेणारी अशी आहेत...

विलास वाघोलीकर: थोडी मोठी - गुंतागुंतीचे कथानक असणारी ही कथा, वाचकाला सुन्न करते. सुनीळजींनी कथानक अभ्यासपूर्वक सांगीतल्यामुळे समज सुलभ झाली. सुनीळजींचे मी आभार मानतो. विलास वाघोलीकर

सागर कुलकर्णी: माणसाचे आयुष्य दुःखी असले तरी संपणारे आहे. आणि मृत्यू हा माणसाचा मित्र आहे.

-जी ए कुलकर्णी

अती सुखाच्या क्षणी माणसानं सावध असावं, कारण माणसाचे अति सुख दैवाला पाहवत नाही

-जी ए कुलकर्णी

अलका तडकलकर : खूप खरे आहे

बरेचदा सावध असूनही उपयोग नसतो. हार ठरलेली असते

# 'पाणमाय ' - सांजशकुन

विलास वाघोलीकर: जी. ए. कुलकर्णी यांची कथा - पाणमाय - {पुस्तक सांजशकुन} - भाग १.

जी ए कुलकर्णी यांच्या भावलेल्या कथांमध्ये, वरच्या क्रमांकावर, सांजशकुन पुस्तकातील 'पाणमाय' ही कथा आहे. ज्यांनी ही कथा वाचली आहे, त्यांनाही या कथेची पुन्हा ओळख करून द्यावीशी वाटते. म्हणून या लेखाच्या भाग १ मध्ये कथेची ओळख करून दिली आहे. लेखाच्या भाग २ मध्ये या कथेच्या अनेक पैलूंचे विवेचन करता येईल.

जीएंच्या अनेक कथांप्रमाणे, या कथेतही, नायिकेला नाव नाही. बालपण, संसार, निवृत्तीवय व शेवटी अंत, असा तिचा जीवनपट या कथेत दाखवला आहे. एका मध्यम गावात ती रहात होती. माहेरी दारिद्र्य होते. वडील कष्ट करत असत. पण ते समजूतीच्या गोष्टी सांगत. उदाहरणार्थ,

.... 'तेव्हा वडील म्हणत, "माणसाचे पूर्ण सुख दैवाला पाहवत नाही. " पण त्यांच्या आयुष्यात असे सावध राहण्याची वेळ कधीच आली नाही... '

नंतर सासरीही सुरुवातीला गरिबी होती. तीन मुलगे, एक मुलगी, असा संसार वाढला. पण नवरा, त्याच्या स्वभावामुळे कधी स्थिर झाला नाही. तिच संसारासाठी कष्ट करत गेली. आयुष्यभर तडजोडी करत गेली. "प्लेगमुळे साऱ्या झोपड्या

माळावर पडल्या होत्या. आणि त्याबरोबर कधीतरी मिळणारी कामेही संपून गेली. " शेवटी एका रात्री, ती भ्रमिष्टासारखी वैतागून, गावाबाहेरच्या विहिरीच्या पायऱ्या उतरून पाण्यात उतरली..

विहिरीत पाणमाय होती. तिने नायिकेचा हात धरून, खोल ओळखीच्या पायऱ्या उतरवून नेले. व सोन्याच्या नाण्यांनी ओटी भरली. मात्र एक बजावले की, "ही गोष्ट कोणालाही सांगितली तर परत येवून, पायऱ्या उतरून पाण्यात यावे लागेल."

ती घरी परत आली, व तिने शहाणपणाने संसार केला सोन्याची नाणी व्यवस्थित वापरून, बागायती जमीन, वाडा, गाय, गुरे घेतली. हादग्याच्या खिरापतीसाठी ती पंचवीस सफरचंदे पाठवून देई. पण तिला दारिद्र्याची जाण होती व "घेतला वसा न टाकण्याचे व्रत" ती करत होती.

कालांतराने मुलग्यांची लग्ने झाली. मुलीचे लग्न झाले. नातवंडे आली. पण पुन्हा पुन्हा निघणाऱ्या सापाप्रमाणे, सगळेजण तिला हे श्रीमंतीचे गारुड कसे आले याचे गुपित वारंवार विचारात होते.

कथेची सुरवात होते, तेंव्हा घरातील सगळेजण विरुद्ध झाले होते. विवाहित मुलगी माहेरपणाला आलेली असते. मुलगे, सुनाही असतात. धाकटा मुलगा म्हणाला, "आज पैज आहे, तू ते गुपित सांगितल्याशिवाय मी जेवणार नाही. " ती म्हणाली, "ते गारुड मी सांगितले, तर त्याच दिवशी मी मरून जाईन बघ. मी मेले तर चालेल?" "हो चालेल. " धाकटा ओठ पुढे काढत म्हणाला. विवाहित मुलगीही गप्प बसली. मग तिला व्रत मोडून, सोन्याच्या नाण्यांचे सर्व गुपित सांगावे लागले.

कुटुंबातील एकाही माणसाला ही गोष्ट खरी वाटली नाही. इतकी सर्वजण मनाने तुटली होती.

संध्याकाळी दिवे लागण झाल्यावर ती मागील दाराने बाहेर पडली, व विहिरीजवळ आली. ती पायऱ्या उतरून पाण्यात गेली, तेंव्हा तिला हलके वाटले. मायने हाताला धरून तिला आत नेले व माय म्हणाली, " आता खाली बसायचे नाही, चौरंगावर बसायचे... कोणीतरी कठड्यावर येईल व तू कोणाचीतरी ओटी भरशील.

"मग कोणी टाकलेली म्हणून येईल, तर तू तिला चौरंगावर बसवशील. मग मी जशी निघाले आहे, तशी तू देखील निघून जाशील. येथे चौरंगावर बसले, की कोण कसे आले आहे, ते सगळे काही उपजतपणे समजेल तुला... असे ओंजळीने ओंजळीने देत राहणे एवढाच आपला शेर!" तिने मायला कुंकू लावले. काही न बोलता मायने तिला माया केली. व ती वळून निघून गेली.

आता ती चौरंगावर एकाकी बसली. मग पाण्याने तिला सर्व बाजुंनी आपुलकीने स्पर्श केला. व आपल्यात माहेरी आणले.

***************

*भाग २*

जीए कुलकर्णी यांची कथा-- पाणमाय ( पुस्तक, सांजशकुन)---भाग २.

या लेखाच्या भाग १ मध्ये, सारांशाने 'पाणमाय' कथा सांगितली आहे. अर्थात कलात्मक अनुभव घेण्यासाठी, कथा मूळातून वाचली पाहिजे. ही कथा, अनेक पैलूंच्या हिऱ्यासारखी आहे. या भागात त्या कथेचे पैलू पाहता येतील.

१) काहींना कथेतील गारूड मान्य होणार नाही. त्यांना वैज्ञानिक दृष्टीने, कथेतील मतितार्थ पाहता येईल. पाणमायने सोन्याची नाणी दिली. त्याऐवजी, माहीत नसलेली वडिलोपार्जित संपत्ती एकदम मिळाली. किंवा जमिनीची किंमत अचानक अतोनात वाढली. इत्यादी प्रकारे एकदम पैसा येवू शकतो. तरीही कुटुंबातील ताणतणाव राहतात. कारण, मानवी स्वभावातच, क्षुद्रता, दंभ, लोभ, अहंकार इत्यादी प्रकारचे, तडकणारे असे काहीतरी असते. वर उल्लेखलेल्या गटातील वाचकांनी या दृष्टीने, ही कथा वाचावी ही विनंती.

२) ही कथा एका दृष्टीने संसार कथा आहे. जीएंच्या अनेक कथांप्रमाणे या कथेतील नायिकेला नाव नाही. एका स्त्रीचे, शारिरीक, मानसिक, आर्थीक, सामाजिक, कौटुंबिक, (व आत्म-विश्व दर्शनाचे आध्यात्मिक) जीवन दाखवले आहे. त्यांमध्ये, माहेरचे दारिद्र्य, कष्ट करणारे वडील, सासरची गरिबी, कष्ट टाळणारा नवरा, वाढलेला संसार; व नंतरची अचानक आलेली श्रीमंती, या संसाराच्या घटना दाखवल्या आहेत. तसेच तिचा जीवनपट दाखवला आहे. त्यात तिचे बालपण, सासर, संसार, निवृत्तीवय ; व अंत, हा सर्व जीवन पट दाखवला आहे. त्यात तिचे कर्तृत्वही दाखवले आहे.

. ........... -स्त्री पुरुषापेक्षा श्रेष्ठ आहे---- म्हणून स्त्री व पुरुष समान नाहीत.............. या कथेत जीएंचा स्त्रीयांबद्दलचा दृष्टीकोन स्पष्ट झाला आहे.

३) ही कथा धार्मिक कहाणीसारखी आहे. कहाणीत, व्रत सांगताना म्हणतात, " उतू नको, मातू नको, घेतला वसा टाकू नको. " व्रत घेणारी व्यक्ती ते मान्य करते. त्या व्यक्तीला व्रताचे फळ मिळते. पण व्रत मोडले, तर जन्माची शिक्षा मिळते.

उदाहरणार्थ, शुक्रवारच्या देवीच्या कहाणीत, स्त्रीचा गरिबीत अपमान होतो. पण धन आले की मान मिळतो. त्या कहाणीतीलही, कुटुंबातील माणसे मनाने तुटलेली असतात. त्या कहाणीत, हळदकुंकू लावून, ओटी भरणे, इत्यादी व्रत आहे.

आदित्यनारायणाच्या व जेष्ठागौरीच्या कहाण्यांतही व्यक्ती गरिबीमुळे पाण्याकडे ( आत्महत्येसाठी) जाते; तेथे म्हातारीच्या रुपात जेष्ठ गौरी येवून अलौकिक धन मिळते.

कहाणीत भारलेले वातावरण असते. घटना भराभर घडतात. शब्द मोजके असतात. त्यांमध्ये लय असते. कहाणी मनापासून वाचली जाते. जीएंच्या या कथेला, कहाणीचा सुगंध आहे.

४) कथेत, कुटुंबातील दारिद्र्य व श्रीमंती, ही दोन्ही रूपे दाखवली आहेत.

समाजातील गरिबी संपायला पाहिजे. पण गरिबीतून श्रीमंतीत आल्यावरही, अनेक माणसांच्या मनात, तडकणारे असे काहीतरी असते. कथेत दाखवल्याप्रमाणे, ती माणसे पैजा करतात, "तू मेली तरी चालेल"असे म्हणतात, गुपित सांगीतल्यावर थट्टाही करतात. श्रीमंती आल्यावर मनाचा मोठेपणा आपोआप येत नाही.

गरिबीतही मनाचा मोठेपणा, आपोआप येत नसतो. धनाच्या लोभाने किती प्रकार होवू शकतात, हे जीएंनी या कथेत सांगितले आहे.... " वीरभद्राच्या देवळाजवळची तानीमावशी, मेहंदळयांची रमा, यांना पाणमायने सोने दिले, पण घरच्यांना आणखी सोने हवे होते. "... अशा घटना कथेत दाखवल्या आहेत.

५) कथेतील वातावरण, प्लेगचे संकट आले, त्या काळातील आहे. पण संपत्ती अचानक मिळून गरिबी जाणे, संसार करणे, संसार वाढून सगळे स्वतंत्र होणे व मनातून दुसऱ्यापासून तुटून जाणे, व मुख्य म्हणजे बऱ्याच मनांमध्ये, बऱ्याच वेळी अहंकार

असणे, हे आजही दिसेल. शहरातही दिसेल. म्हणून ही कथा सार्वकालीक आहे. हा कथेचा महत्त्वाचा पैलू आहे.

६) कथेत मृत्यूचे रुप दोन वेळा दाखवले आहे. एकदा ती नायिका, दारिद्र्याला वैतागून स्वत: पाण्यात उतरते. पाण्यातील माजघरात पाणमाय तिची समजूत काढून, सोने देते. हा मृत्यूपर्यंत जाण्याचा कथेतील एक अनुभव आहे.

दुसऱ्यांदा, व्रत मोडल्यामुळे ती स्वत:हून पायऱ्या उतरून पाण्यात उतरते. पाणी, हा पारदर्शक, मुलायम पदार्थ, जीवनाला आवश्यक असतो. पण जेव्हा तो एखाद्या माणसाला वेढतो, तेव्हा त्या माणसाचा मृत्यू होतो. हे जीएंनी शेवटी काव्यमय शब्दांमध्ये सांगितले आहे.. " तिने पाण्यात पाऊल टाकले... मग पाण्याने तिला सर्व बाजूंनी आपुलकीने स्पर्श केला व आपल्यात माहेरी आणले. " याप्रमाणे मृत्यूचे चित्रण हा कथेचा महत्त्वाचा पैलू आहे.

७) बालपण, सासरचे दारिद्र्य, कामेही बंद होण्याचा धक्का; पाण्यात उतरते, अचानक सोने मिळणे; कर्तृत्वाने श्रीमंत होणे; कोंडीत पकडले जावून व्रताची अट मोडणे; स्वीकारलेला पण अपरिहार्य अंत, हे सर्व दाखवताना जीएंची शब्दकला किती अलौकिक आहे हे दिसते. गोष्ट सहजपणे कळण्याचा अनुभव मिळतो. अशा नाट्यमय गोष्टी इतिहासातही पहायला मिळतात.

८) या कथेत, नियतीची अनाकलनीयता अधोरेखित होते. तुम्ही सापाला कितीही टाळले, तरी आपल्या वाट्याचा साप अचानक समोर येतो, व तेव्हा आपण कोंडीत पकडलेले असतो.

अस्तित्ववादाप्रमाणे, कथेत तिला, शेवटी, अटळ, एकाकी, निर्णय घ्यावा लागतो. व ती व्रताची अट मोडते.

श्रीमंतीचे सर्व पाश तोडून तिला मृत्यूला सामोरे जावे लागते. म्हणजे अनाकलनीय नियती, तिच्यावर घाला घालते.

अस्तित्ववादातील, अटळ एकाकी निर्णय; व "कोणीतरी" घटना ठरवणारी अनाकलनीय नियती, यांचे मिश्रण करून " जीएंचा नियतीवाद" येतो. तो या कथेत प्रकट झाला आहे.

९) नियतीचा पैलू-- आधी तिने पाणमायकडून दान घेतले. नंतर कथेशेवटी, ती दुसऱ्याला दान देणारी पाणमाय झाली. माणूस एका परिस्थितीत दुसऱ्यांसाठी नियती होतो. वेगळ्या परिस्थितीत, तो माणूस दुसऱ्यांकडून, नियतीचा बळी होतो. मात्र हे लक्षात ठेवले पाहिजे की, या सर्वांसाठी नियती अनाकलनीय असते. हा पैलू या कथेत दाखवला आहे.

१०) नियती अटळ घटना तटस्थपणे पहात असते. चौरंगावर पाणमाय बसली की, तिला बाहेरचे सर्व कळते. पण ते सर्व तटस्थपणे पाहणे, व नियतीप्रमाणे अंताची घटना घडवणे, एवढेंच पाणमायच्या हातात असते. हा नियतीचा तटस्थपणा या कथेत दाखवला आहे.

११) कथेतील शेवटच्या भागातील, भरतवाक्यांचा परिच्छेद अलौकिक आहे. माणूस म्हणून सगळयांची काळजी घेत जगलो, कष्ट केले, अनेकांना नावारुपाला आणले. तरी त्यांचा स्वार्थ संपल्यावर, तुमची काळजी घेतली जाईल; तुमच्या मनाचा विचार केला जाईल, की नाही, हे अनाकलनीय नियतीवर ठरते. या पुढे दिलेल्या भरतवाक्यांमध्ये स्त्रीजीवनाची कहाणी आहे---

"पुन्हा कुठेतरी, कुणाचीतरी, बहीण, मुलगी, बायको, आई, म्हणून खेळ मांडावा लागेल. --हा तुझा काय, माझा काय, सगळयांचाच शाप आहे.

आमच्याखेरीज त्यांचे क्षणभर चालत नाही. आम्ही नसलो, तर ती माणसे निखाऱ्यावरच्या फटिकाच्या लाहीसारखी फुटतील.... असे ओंजळीने, ओंजळीने देत राहणे, एवढाच आपला शेर! मग तू देखील एक ओझे होशील. तू आणखी जगावेस, असे कुणालाही काळजापासून वाटणार नाही. "... हा भरतवाक्यांचा परिच्छेद शब्दप्रभू जीएंनी लिहिला आहे.

१२) कदाचित शब्दकोशात नसलेला, 'पाणमाय' हा शब्द जीएंनी या कथेत आणला आहे. ती पाण्यात असते, म्हणून 'पाणमाय'. तसेच ती--माय--माई--आईची आई--असते. ती बाहेरच्या जगातील पिचलेल्या स्त्रियांची माय असते. याप्रमाणे या कथेत शब्दप्रभू, प्रतिभावंत, जीए प्रकट होतात. व या कथेच्या रुपाने, अनेक पैलूंचा हिरा वाचकांना मिळतो.

धन्यवाद - विलास वाघोलीकर

विलास वाघोलीकर: छंद म्हणून मी चित्रे काढतो. वर पाणमाय वर चित्रे देत आहे. त्यांचा क्रम कथानकावरून जास्त कळेल. l ) नायीका कष्ट करून घर चालवते. 2 ) नायीका विहिरीत उतरते. 3 ) पाणमाय - क्रेडीट मोरे मॅडम. 4 ) नायीका घर दार घेते. पण मुले गुपित काढून घेता त 5 ) सर्व चित्रांचे कोलाज. धन्यवाद

दिलिप बडे: निळया चेहर्याची आकृती'या कथेतील वेडा, पत्रिका कथेतील ती व्यक्ती, दिपस्तंभ कथेतील ऊंच माणुस व तरूण स्रि. आणि पाणमाय कथेतील पाणमाय'ही सर्व कथापात्रे अदृश जगातील आहेत. हा एक समान धागा या पात्रांमध्ये जाणवतो.

# पातक- जी ए कुलकर्णी- सांजशकुन

सुनीळ सामंत: पातक- जी ए कुलकर्णी- सांजशकुन

जी ए कुलकर्णी हे महान लेखक यात यत्किंचितही शंका नाही, तरीही इतर अनेक लेखकांच्या मानाने त्यांना प्रसिद्धी फार कमी मिळाली. त्यांचे आणि त्यांच्या लेखनाचे चाहते अनेक आहेत, त्यांना जीए एखाद्या देवासमान वाटतात. मराठीतल्या इतर लेखकांशी तुलना करणेही त्यांच्या चाहत्यांना अवडत नाही. पण सर्वसामान्य वाचकांमध्ये मात्र जीए म्हणावे तितके रुजले नाहीत. जीएंची प्रसिद्धीमराङ्मुखता हे एक कारण आहेच. इतरही काही कारणे आहेत. ही कारणे जशी मराठी वाचकांच्या सुलभ आणि उथळ आवडींमध्ये आहेत, तशीच ती जीएंच्या काही कथांमध्ये दुर्बोधता असणे यातही आहेत. जीए यांच्या काही सुरुवातीच्या कथा एका वाचनामध्ये समजून येतात; काही कथा पुन्हा पुन्हा वाचल्यावरच समजतात; काही कथा दुसऱ्याने त्यातील महत्त्वाचा भाग समजावून दिल्यानंतरच समजतात; तर काही समजतच नाहीत. याहूनही एक पुढचाही प्रकार आहे, काही कथांचे अर्थ जीए मुद्दामच असे धूसर ठेवतात की वाचणारी प्रत्येक व्यक्ती त्याच्या समजूतीनुसार किंवा संस्कारानुसार त्याचा वेगवेगळा अर्थ लावेल.

पातक ही कथा त्यातीलच एक आहे. यात दोन मुख्य आणि एक तिसरे पात्र आहे. या कथेचा नायक आपल्या पत्नीवर संशय घेतो; आणि त्या संशयापायी तो तिच्या नवपरिणित बहिणीची हत्या करतो. त्यानंतर तो विद्रुप होतो, त्याचा चेहरा कोणी पाहू शकणार नाही इतका भयंकर होतो; आणि त्याने जर त्याहूनही एखाद्या

मोठ्या पाप्याला, पातक्याला स्पर्श केला तरच त्याला मुक्ती मिळेल असा उःशाप त्याची पत्नी त्याला देते.

अनेक वर्षे गेल्यावर आणि अनेक पापी माणसांना स्पर्श केल्यावरही त्याला मुक्ती मिळत नाही.

एके दिवशी त्याला एक दरोडेखोर भेटतो. त्याने एकदा एका हरिणीला छळ करून मारलेले असते आणि तेव्हापासून त्याच्या शरीरात अशी एक विकृती निर्माण होते की त्याला एकाहून एक मोठी पातके करत रहावे लागतात. या जगातले सर्वात भीषण पातक केल्यावरच त्याला मुक्ती मिळणार असते. या दोघांची भेट झाल्यावर नायकाला अशा पाप्याच्या स्पर्शाने आता मुक्ती मिळेल असे वाटते. पण तसे होत नाही.

तेव्हा तो दरोडेखोर नायकाला, वेगळ्या तऱ्हेने विचार करण्याचा, एखाद्या सत्पुरुषाला स्पर्श करण्याचे सल्ला देतो. आणि एका महायोग्याकडे पाठवतो. तो साधू एका मोठ्या जनसमुदायासमोर असे जाहीर करतो की तो स्वतः ईश्वर आहे आणि आपल्या या कथेच्या नायकाला तो स्पर्श करतो. या स्पर्शाने नायक शापमुक्त होतो व त्याचा चेहरा पूर्ववत होतो आणि थोड्यावेळाने तो विरून जातो. परंतु विरून जाण्यापूर्वी त्याला असे वाटते की दरोडेखोराने स्वतःच्या मुक्तीचा मार्ग शोधला आहे पण त्याला तो दिसत नाही. तो आपणच सांगायला हवा. तसे सांगण्यासाठी तो पुन्हा दरोडेखोराकडे येतो. पण दरोडेखोर गेलेला असतो. त्यामुळे त्याची मुक्ती राहून जाते.

या कथेतून जीएना नक्की काय सांगायचे आहे ते मला तरी समजलेले नाही. ज्या अनेक शक्यता यातून येतात त्या मी खाली देत आहे.

एक - स्वतःला देव भासवणारा तो साधू हा सर्वात मोठा पातकी आहे पापी आहे. ते पातक सर्वात भयंकर आहे.

दोन - आपण आयुष्यभर जी गोष्ट सर्वात महत्त्वाची आहे असे मानतो ती चुकीची असून कदाचित त्याच्या बरोबर उलटी गोष्ट बरोबर असू शकते म्हणजे जसे नायक स्पर्श करून घेण्यासाठी साधूकडे गेला तसेच दरोडेखोराने सुद्धा एखादे सत्कृत्य करून पहावे व त्याला मुक्ती मिळेल.

तीन - स्वतःच्या सत्शील पत्नीवर संशय घेणे याहून मोठे पाप नाही. तसेच मुक्या प्राण्याला छळ करून मारणे याहून मोठे पाप नाही. पण या दोहोंपेक्षा लोकांना देव आहोत असे सांगून फ़सवणे हे पाप आहे. दरोडेखोराने दरोडे घालणे सोडून देऊन असेच महंत बनावे असेच नायकाला सुचवायचे असेल.

कदाचित याहूनही वेगळे असे काही जीएंना सुचवायचे असावे. ही प्रमेय कथा आहे. नायक दरोडेखोराला काय सुचवू इच्छित होता ते शेवटपर्यंत स्पष्ट केलेले नाही. आणि वाचकानेच ते समजून घ्यावे असे जीएंनी कलात्मकरित्या धूसरपणे सोडून दिले आहे.

विलास वाघोलीकर: छान लिहिले आहे. धन्यवाद. पुन्हा एकदा पातक ही कथा वाचतो. गुड डे. विलास वाघोलीकर

सुनीळ सामंत: पातक ही कथा मला समजलेली नाही हे स्पष्ट करतो. इतरांची वेगवेगळी मते ऐकण्याची इच्छा आहे.

रमा गर्गे: साधू कठोर परिश्रमाने इतरांहून वेगळे असे 'व्यक्तित्व' निर्माण करतो. मात्र ते त्याचे स्वाभाविक प्रकटीकरण नसावे। समोरच्याच्या नजरेत देव ठरण्याच्या महत्वाकांक्षेमुळे तो नाटकी वागत असावा। असे व्यक्तित्व सतत सांभाळत बसावे लागते। अंत:प्रज्ञेशी सतत झगडावे लागते, किंवा तिच्याकडे दुर्लक्ष करावे लागते. हे माणूस म्हणून मोठे पातक आहे, असे लेखकाला म्हणायचे असेल का?

साधुकडे नसलेल्या करुणा आणि प्रेमाच्या भावना तो दर्शवत असावा, ते मोठे पातक असेल का?

सुनीळ सामंत: विचार करण्यासारखे.

जीएंची धार्मिकतेबद्दलची मते त्यांच्या पत्रांतून स्पष्ट होतात. पण कथेमधे मात्र धूसर असतात.

ही कथा अगदी उलट अर्थाने म्हणजे "पुण्यात्म्यामुळे पापाचे क्षालन होते" अशा अर्थानेही वाचली जाऊ शकते. त्यांनी महंताचे जे वर्णन केले आहे (पाच बोटांतील रत्नजडित अंगठ्या वगैरे) तसे ते वर्णन नसते तर? समजा बुद्धासारखे किंवा महावीरासारखे ते वर्णन असते तर?

रमा गर्गे: इथे जो उ:शाप आहे, त्याला सत्य मानले पाहिजे।त्यानुसार साधूकडे पहायला हवे।सर्वसंगपरित्यागी संन्यासी आणि मठ आश्रमाचा बडेजाव असलेले साधू यात भेद असतोच।अर्थात सरसकटीकरण नसावे, पण सामान्य संसारी मनुष्यप्रामाणेच देहबुद्धीचा विस्तार या मठपती मध्ये असू शकतो।

विलास वाघोलीकर: पातक - प्रतिसाद - विलास वाघोलीकर.

सुनीळजींनी कथेचे कथानक थोडक्यात चांगले सांगून चर्चा सुरु केली आहे. याबद्दल त्यांना धन्यवाद देतो.

- ही जी ए शैलीतील रूपककथा वाटते. पापी व्यक्ती, शतकानुशतके पापातून मुक्तीसाठी राहते व नंतर विरून जाते, हा ' अश्वत्थामा 'सारखा संदर्भ वाटतो. त्याव्यतिरिक्त इतर घटना या वास्तविक वाटतात. जी एंचा धर्मविषयक दृष्टीकोन या कथेत आला आहे. कथेतील पाप - पुण्य, शाप - उःशाप, बंधन -मुक्ती, या कल्पना वापरल्या आहेत. म्हणजे कथा पूर्ण धर्मविरोधी नाही.

- सात्विक धर्माची आवश्यकता असते. बुद्ध, येशू, ज्ञानेश्वर, विवेकानंद यांनी मोहाला बाजूला सारले. त्याग केला. "पापाला बाजूला सारा व सदगुण बाळगा" असा त्यांनी, वाणीतून व कृतीतून उपदेश केला.

- पण काही माणसे, सापाच्या दोन जिभांसारखी बोलतात - वागतात. धर्माच्या भाषेत लोकांना भुलवतात. देणग्या गोळा करतात. खूप अनुयायी जमा करतात. त्यांच्यावर सत्ता गाजवतात. श्रीमंत मठ बांधतात. त्यांनी सांगितलेल्या कथा, या भूलथापा असतात. त्यामुळे त्याआधारे ते लोकांना भुलवून सत्ता वाढवतात.

- एक उदाहरण आठवते. पूर्वी ख्रिश्चन धर्मातील पोपने स्वर्गात जागा राखून ठेवण्यासाठी पोपच्या नावाने पत्रे छापली व विकली. त्यातून प्रोटेस्टंट पंथ तयार झाला. अशी उदाहरणे अनेक धर्मांमध्ये झाली आहेत. म्हणून कलात्मक पद्धतीने, या कथेत धर्माचे विकृत रूप दाखवले आहे.

- मला समजलेला कथेचा मतितार्थ दिला आहे. धन्यवाद. - विलास वाघोलीकर

सुनीळ सामंत: सर, तुम्ही काढलेला अर्थच सर्वात जास्त सुसंगत वाटतो हे खरं. पाचही बोटांतील रत्नजडित अंगठ्यांमुळे तसाच अर्थ निघतो.

पण एक गोष्ट समजत नाही- नायकाला स्पर्श करण्यापुर्वीच धर्मगुरू जे बोलतात आणि आपण हे करू शकणार याचा त्यांना आत्मविश्वास असतो तो कशामुळे?

दुसरे, नायक दरोडेखोराला काय सांगायला जातो? कारण जरी आपल्याला तसे वाटले तरी तो त्या स्थानाला आणि धर्मगुरूला "पवित्र मानत असतो.

विलास वाघोलीकर: धर्मगुरू जे बोलतात ते असे की, मी पूर्ण परमेश्वर आहे. ते ढोंगीच असतात. म्हणून असे बोलू शकतात. समजा नायक व्याधीतून बरा झाला नसता तरी, फलज्योतीषी सांगतात, तसे त्यांनी एखादे व्रत करायला सांगितले असते. अशा शंकेखोर प्रश्नांना कसे बंद करायचे, हे त्यांना माहीत असते.

"सर्वात जास्त पापी धर्मगुरू आहे. तो ढोंगी आहे. तूही तसेच ढोंगीपणाने वागलास तर सर्व भीषण पापे करून मुक्त होशील" हे नायक दरोडेखोराला सांगायला जातो. पण दुर्दैवाने दरोडेखोर तेथून गेला होता. आपल्या प्रश्नांना, कथेआधारे ही उत्तरे सुचली. विलास वाघोलीकर

विश्वेश्वर नांदेडकर: हेच बरोबर आहे. प्रवासी कथा वाचा. जॉन judas ला काय सल्ला देतो. तू एवढे मोठे पाप करून ही मोठा धर्मगुरू होवू शकशिल. फक्त पश्चातप झाल्याचे नाटक करून दर वर्षी एका भक्ताचे पाय धुवून ते पाणी पिण्याचे नाटक करायचे. तुला लाखो भक्त मिळून तू मोठा धर्मगुरू होशील

विलास वाघोलीकर: या कथेच्या संदर्भात आपण योग्य कथेचा संदर्भ दिला आहे. आपले वाचन बारकाईचे आहे याचा आनंद झाला. धन्यवाद. गुड डे. विलास वाघोलीकर

दिलिप बडे: पातक//खुणी नायक-दरोडेखोर-स्वत्ःला पुर्ण परमेश्वर मानणारे धर्मगुरू हे तिघेही पापी आहेत. शतकानुशतके मुक्तीसाठी प्रयत्न करताहेत. पातक-पाप हे चक्र असेच सुरू रहाणारे आहे. नायकाचा जन्म राजघराण्यातील आहे. दरोडेखोराचा जन्म देखील ऊच्च कुळातील आहे. दरोडेखोर अत्यंत पापी असुनही त्याच्या स्पर्शाने नायक मुक्त होत नाही. तो मुक्त होतो, दांभिक-धर्मगुरूच्या स्पर्शाने. दरोडेखोर ही धर्मगुरूच्या हत्येने मुक्त झाला असता. पण त्याची व नायकाची भेट झाली नाही. खुणी नायक व दरोडेखोर ओळखता येतात पण नैतिकतेचे ढोंगी -संपत्तीचे दांभिक -अति नम्रपणामुळे आलेलेली गर्विष्ठता, असे धर्मगुरू तरी समाजाला मुक्ती देऊ शकत नाहीत. हेच जि. एं. ना सुचवायचे असेल.

सुनीळ सामंत: 👌

धर्मगुरु ची हत्या करून

की

स्वतः तसं बनून?

दिलिप बडे: धर्मगुरू जर लबाड-ढोंगी-गर्विष्ठ आहे तर दरोडेखोराने धर्मगुरू बनण्याचा प्रश्न येत नाही. दरोडेखोराने सर्व भिषण पातके केल्याखेरीज दरोडे खोराला

मुक्ती नाही. धर्मगुरूची हत्या हे आणखी एक मोठे पातक दरोडे खोराकडुन घडले असते. व तो मुक्त झाला असता. दरोडेखोराने धर्मगुरू बनुन पापातून मुक्त व्हावे हे संभवत नाही.

गौरी देशपांडे: हा प्रश्न मला योग्य वाटतो. कारण सर्वात मोठ पातक जर धर्मगुरू करत असेल तर तेच पातक करण हाच दरोडेखोराच्या मुक्तीचा मार्ग आहे. पातक करणाऱ्या माणसाची हत्या हे पुण्यकर्म झाले. पाप नाही.

अलका तडकलकर : मला वाटते पाप आणि पुण्य ह्या गोष्टी सापेक्ष असतात... त्याही संदर्भानुसार

गौरी देशपांडे: खरं आहे. पण ह्या कथेत पाप कशाला म्हणायच आणि पुण्य कशाला म्हणायच हे बऱ्यापैकी क्लिअर आहे. फक्त धर्मगुरू च्या बाबतीत G. A. नी ते indirectly सांगितले आहे असं मला वाटत.

सुनीळ सामंत: अगदी बरोबर.

आपण पाप आणि पुण्य या कल्पनांवर आपली मते मांडत नाही तर या कथेतून जीएंना काय सुचवायचे असावे (किंवा काय काय सुचवले जात आहे) याचा शोध घेत आहोत.

# पारधी

विलास वाघोलीकर:............

पारधी - विवेचक - विलास वाघोलीकर

- या कथेत मोजकी पात्रे आहेत. जीएंच्या काही कथांत श्रीमंती वातावरण दाखवले आहे. तशी ही कथा आहे.

- दादासाहेब यशस्वी वकील आहेत. जवळजवळ सर्व खटले जिंकतात. त्यांचे घर मोठे आहे. घरासमोर बाग आहे. घरात मोटार, ड्रायव्हर, गडी, स्वयंपाक करणाऱ्या काकू आहेत. ते क्लबमध्ये जातात. मात्र त्यांचे लहानपण माधुरी मागण्याइतक्या गरीबीत गेले. परिणामी त्यांना माणसांची, त्यांच्या विचारांची पारख होत असते.

- पहिल्या पत्नीच्या निधनानंतर दादासाहेबांची दुसरी पत्नी, माई येते. पत्नी माई ही तशी श्रीमंतीत वाढलेली होती. तिच्या वडीलांना धंद्यात कर्ज झाल्यावर हे लग्न झाले. त्यामुळे माई, श्रीमंतीच्या तोऱ्यात राहतात. अत्तर लावतात. माणकाच्या कुड्या घालतात. बिनधास्त वागतात.

- पहिल्या पत्नीचा मुलगा, सुधीर क्लबमध्ये जावून, दादासाहेबांचे पैसे उधळणारा आहे.

- या कुटुंबात डॉक्टरांचे पात्र येते. एका खटल्याने त्यांची डॉक्टरकी बसली. दादासाहेबांच्या समोरच्या छोट्या घरात ते राहतात. कथेत दाखवले आहे की, माई व डॉक्टरांचे संबंध असतात.

- दादासाहेब एकटेच कर्तृत्ववान आहे. असे हे श्रीमंत घर आतून विखुरलेले, पोखरलेले आहे.

- कथेच्या दिवशी दादासाहेबांनी कोर्टात एक खटला जिंकलेला असतो यल्लूभीमाने त्याच्या बायकोच्या प्रियकराला, देवण्णाला ठरवून मारले होते. व तो पोलीसांत हजर झाला होता. दादासाहेबांनी लढवलेल्या त्या खटल्याचा निकाल लागून यल्लूभीमाला जन्मठेप होते. पण त्याला वाईट वाटल्याचे दिसत नाही. तो सर्वांना व शेवटी दादासाहेबांना नमस्कार करून, पोलीसांबरोबर जातो.

- दादासाहेब घरी येतात. तर्ककठोर दादासाहेबांना वाटत असते की, प्रत्येकाचे सुप्त विचार ते ओळखू शकतात. पण त्यांना यल्लूभीमाचा सुप्त विचार कळत नसतो.

- घरात आल्यावर त्यांना दिसते की, दगडकाम करणाऱ्या यलूभीमाच्या घराप्रमाणे, आपल्या घरातही, ते, माई व डॉक्टर असा त्रिकोण वावरत आहे. इतके दिवस त्यांनी दुर्लक्ष केले होते. आपण पारधी असून ही सर्व कळसूत्र बाहुली आहेत, या विचारात ते होते. पण आज यल्लूभीमाने त्यांच्या पुढे प्रश्न ठेवून, त्यांची शिक्षा सुरु केली. मला खूनाचे फळ - तुरुंगवास किंवा फाशी - भोगावी लागेल. माझी त्याला तयारी आहे का? यल्लू -भीमाचे उत्तर 'होय ' होते. यल्लूभीमाने त्यांना उपाय सुचवला.

शिक्षा तर केलीच पाहीजे

माईला शिक्षा करून उपयोग नाही. ती घरादाराला शिक्षा होईल

डॉक्टराना शिक्षा केली पाहीजे.

- त्यांच्या मनातले विचारयुद्ध कथेत सविस्तरपणे दाखवले आहे. ते कथेत वाचण्यासारखे आहे. तू काय करणार, या प्रश्नाचे उत्तर त्यांना उलगडले.

- ते व डॉक्टर दोघेच घरात असताना माळ्याने कोनाड्यात ठेवलेला कोयता दादासाहेबांनी घेतला व डॉक्टरांकडे रोखला. त्यावेळी डॉक्टरांची गाळण उडाली. डॉक्टरांचा नेहमीचा काळा चष्मा पडून अळीसारखे डोळे असलेला, त्यांचा घाबरलेला चेहरा दिसला. दादासाहेबांना वाटले - ही क्षुद्र अळी आहे. याला मारून काय सत्व बाहेर पडणार. डॉक्टर गेले. व दादासाहेब पुन्हा पारधी झाले. शेवटी जी ए लिहितात - 'आणि पारध्याचा दिवस संपला '

(जीए व )दादासाहेबांनी क्षमा, शांतीचे मार्ग सुचित केले नाहीत. हे महत्वाचे आहे.

- जीएंचे दिशादर्शन - या कथेत जी ए सामाजिक, कौटुंबिक, मानसिक, गुन्हेगारीची गुंतागुंत बारकाईने दाखवतात -" गुन्हा करणारा माणूस अकस्मात जन्मला व मेला. " त्रिकोणातील पुरुषाने जास्त प्रतारणा केलेली. म्हणून त्याला शिक्षा झाली पाहीजे. तुला शिक्षा होईल हे दाखवल्यावर, डॉक्टरांनी गुन्हा जणू कबूलच केला. आता यापुढे ते दडपणाखाली वागतील किंवा घरात येणारही नाहीत. माई दुसरे प्रकरण करतील किंवा या उदाहरणाने दबून जातील. पण विजय दादासाहेबांचा झाला.

- हे विवेचन लिहीताना, अतुल ठाकूर यांनी केलेली समिक्षा उपयोगी पडली. त्याबदल मी त्यांना क्रेडिट देतो.

- वेगवेगळ्या परिस्थितीत माणसाला अटळ दुःख भोगावे लागते हे जी ए दाखवतात -. यल्लूभीमाप्रमाणे - अपयश जीवघेणे ठरते व यशही परिपूर्ण नसते. अस्तित्ववादाप्रमाणे माणसाला, एकाकी, अटळ निर्णय घ्यावा लागतो. तो निर्णय यल्लूभीमाने घेतला. दादासाहेबांनी तो अटळ, एकाकी निर्णय घेतला. हे जीएंनी या प्रत्ययकारी कथेत दाखवले आहे. धन्यवाद - विलास वाघोलीकर

परमजित सिंग: पारधी ह्या कथे वर खूप लीहता येईल आणि मी लिहीन ही. तुम्हा सगळ्यांना खूप वेळेस वाचली असेल. मी ही खूपदा वाचली. माझ्या एका मित्राने मला एक प्रश्न विचारला तू इतक्यादा पारधी वाचलास मला एक सांग की. माई ही दुस्त्यापणावर खाली मान टाकून दादा साहेबाच्या घरात आली आणि दादा साहेबाची शिकार संपली. आणि दादासाहेबांनी क्लब मधून बिलियर्ड खेळून घरी यायची वेळ अकराची त काही बदल केला नाही. आणि तो पर्यंत माई झोपले ल्या असतं. जर दादा साहेबाना काही कराच्यत नव्हते तर त्यांनी लग्न का केले. ह्याचे उत्तर आपल्या पैकी कोणी देईल काय. मी तर त्याला उत्तर दिले

विश्वेश्वर नांदेडकर: साधे उत्तर आहे घरात एक हक्काची जिच्यावर सहज कोणाचाही आणि कशाचाही राग काढता येईल आणि एक कायम हक्काचा घरकाम गाडी मिळेल आसा विचार दादा साहेबांनी केलाच नसेल असे नाही.

परमजित सिंग: नाही एक दंम चूक. फारच चुकीचे उत्तर

विश्वेश्वर नांदेडकर: Mi hi katha vacun vis varsh zhalet. Vachto parat ekda. जी ए कोणतेही प्रश्न मुद्दाम ठरवल्या शिवाय आणुत्तरित ठेवत नाहीत

परमजित सिंग: येस मला ही हेच सांगायचं

परमजित सिंग: अरे कोणी तरी उत्तर द्या. नाहीतर तस सांगा. मी सांगतो

सुनीळ सामंत: अत्यंत उत्कृष्ट विवेचन केले आहे सर.

पारधी ही जिएंच्या मनोविश्लेषणात्मक कथांपैकी सर्वात उत्कृष्ट कथा म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

ही कथा सुरू होते- अखेर पारध संपली- या वाक्याने

आणि संपते- एका पारध्याचा दिवस संपला- या वाक्याने.

या मधे बावळटपणाचे सोंग घेऊन धूर्तपणे जगणाऱ्या व्यक्तीचे सर्वात उच्च कोटीचे उदाहरण आहे. या प्रकारची माणसे आपल्या आजुबाजूला दिसतात. 'येडा बनके पेढा खानेवाले' अशी यांची गणती केली जाते. जे यांना नीट ओळखत नाहीत ते - खुदा मेहरबान तो गधा पेहेलवान- असे यांच्याबाबत म्हणतातही, पण ते खरे नव्हे.

'पारध्याने पावलांचा माग घ्यायचा असतो, पण स्वतःच्या पावलांचा माग मागे ठेवायचा नसतो' हे दादासाहेबांचे मत या कोटीतील लोकांना लागू पडते.

खुद्द जीए तसे होते का?

जीएं बद्दल अनेकांचे (त्यांच्या प्रत्यक्ष आयुष्याची माहिती असणाऱ्यांचे) मत 'साधा माणूस' असे होते. पण जीएंच्या कथा वाचून मात्र जीएंचा मनुष्यस्वभावाचा

अतिशय खोल असा अभ्यास होता. त्यांना गृहित धरून त्यांच्याशी गैर वागलेल्या लोकांना ते चांगलेच ओळखून असावेत. आणि स्वतःच्या पावलांचा माग न ठेवता त्यांनी बाह्य जगात फ़ारसे व्यक्तिगत ठसे उमटू दिले नाहीत. सध्याच्या सामाजिक जीवनात दोन प्रकारचे लोक दिसतात. एक छोट्या छोट्या पुरस्कारांसाठी किंवा फ़ायद्यांसाठी लाचार असलेले. आणि दुसरे आपण जे मिळवले आहे त्यावर कोणाची (ईडी) नजर पडून ते हिरावले जाऊ नये म्हणून कायम धास्तावलेले. जीएं या दोन्ही प्रकारांत येत नाहीत. आणि म्हणुनच ते माराठी साहित्यच नव्हे तर एकूणच सामाजिक व्यवहारातले शुद्ध सोने होते.

ही कथा वाचताना मला जीएंच्या स्वतःच्या मनोविश्लेषणाच्या खोलीचा अंदाज आला असे वाटले म्हणून हे लिहिले. आणि म्हणूनच मला ही कथा त्यांच्या सर्वोत्कृष्ट कथांपैकी वाटते.

ही कथा अनेकदा वाचावी. अभ्यासावी. सखोलपणे समजून घ्यावी.

विलासजींनी केलेल्या सूतोवाचा साठी त्यांचे आभार.

सुनीळ सामंत: व्वा परमजित सर, तुम्ही दहापैकी एखाद्याच कथेवर लिहीता पण वेगळे लिहिता. तुमचे मत ऐकायला आवडेल. सांगा.

परमजित सिंग: त्याच अस आहे मी मित्राला सांगितले की कथा फार बारकाईने वाचल्या पाहिजेत. जी. ए फार विचार पूर्वक लिहतात. त्यांनी माई ला घरी आणल्या नंतर जी ए नी एक लाईन लिहली. माई च्या पुष्ट आणि आग्रही देहाला केव्हां हात

लावले होते ते आठवत होते पण अशी हात लावायची इच्छा केव्हां झाली होती हे मात्र त्यांना आठवेना. ह्यात सर्व आले

रमा गर्गे: या कथेत एक सटल् बाब लपलेली आहे।देवणा आणि यल्लूभीमाची बायको यांच्यात असलेल्या सबंधांवर यल्लूभिमाने स्वतःच्या कोर्टात योग्य तो न्याय केला।त्यामुळे त्याला खंत खेद नव्हता।तो अशिक्षित रानटी माणूस होता।

दादा साहेबांना माई आणि डॉक्टरांच्या बाबतीत सर्व काही माहीत आहे।परंतु ते अडाणी यल्लूभिमा सारखा बदला घेत नाहीत।तर निळया दोऱ्याने बांधलेल्या नोटा ओळखून न ओळखल्या सारख्या दाखवणे असेल, किंवा डॉक्टरांच्या गॉगल आडच्या भित्र्या नजरेची गंमत घेणे असेल, ही एक प्रकारची सुशिक्षित पारध आहे।

असे अनेकजण आपल्याला भोवती आढळतात।जे वरवर अत्यन्त यशस्वी व्यावहरिक जीवन जगत असतात।

परमजित सिंग: याच यल्लू भीमा विशई जी ए लिहतात की पन्नास साठ वर्ष जगल्याला माणसआला बाई ने विश्वास घात केल्या वर इतकं आश्चारय का वाटावे. आपण सापा ला दूध पाजवता अंगा खाद्य या वर खेलवता पण त्याने दंश केल्या वर आपल्या ला आश्चचर्य वाटते काय

परमजित सिंग: आणि निळया दोऱ्या ने बांधलेले पैशे फेकून एक माकड नाच्वल्या मिळते हे ही लीहलेवशे

विलास वाघोलीकर: या विवेचनात एक टीप द्यायची अनावधनाने राहीली आहे. पारधी कथेत महिलांसंबंधी जी वाक्ये आहेत - ती लेखकाची मते आहेत असे मी समजत नाही. ती वाक्ये म्हणजे त्या पात्रांची मते आहेत. लेखकाने त्यांच्या मनातील विचार व्यक्त केले आहेत - एवढेच. कृपया ही टीप किंवा ताजा कलम लक्षात घ्यावा ही विनंती - विलास वाघोलीकर

वैभव कुलकर्णी : मला वाटते जीएनी पारध हे नाव फार जाणीव पुर्वक ठेवलेले आहै. शिकार आणि पारध यात खूप फरक आहे. पारध ही एक हौस आहे, एक धुंदी आहे, काहीतरी मिळवण्याची जीगर आहे, जिंकण्याची असमाधानी हाव आहे.......

पारध करणे हीच एक वृत्ती आहे. एखाद्या गोष्टीसाठी जीवघेणे प्रयत्न करून ती मिळाल्यावर त्या गोष्टीतला इंटरेस्ट संपतो. एखादी गोष्ट मग ती वास्तु, स्त्री, दादा साहेबां साठी कोर्टाचा निकाल वगैरे वगैरे मिळाल्यावर त्यातील जिवंतपणा, संपून त्याचे निर्माल्य होते,

दादासाहेबांना कोर्टात केस जिंकेपर्यंतच्या मन ताणणाऱ्या अनुभवाची धुंदी मिळवायची आहे... , निकाल लागल्यावर त्यातील मजा निघून जाते.... यल्लुभीमा नमस्कार करून निघून गेला........

तसेच माईना मिळवण्याची ईर्षाच महत्वाची आहे. माईना लग्न करून आणल्यावर पारध संपली..... बाकी काही नाही.

वैभव कुलकर्णी : शब्दकोशा नुसार - पा —प्रयत्न, सतत पाठलाग, मागोवा

र, रा —मिळणे, संपुर्ण हस्तगत होणे, स्वतःचे होणे.....

ध, धा --मोक्ष मिळणे, शांती मिळणे, सार्थक वाटणे......

सुनीळ सामंत: हे फ़ार महत्वाचे विधान आहे.

एकूणच साहित्यकारांबाबत.

महाकवी व्यासांच्या पात्रांच्या तोंडी अनेक विधाने आहेत, जी परस्पर विरोधी आहेत. ती व्यासांची मते समजणे अयोग्य. कारण मग गोंधळच होईल. दुर्योधनाच्या तोंडी असलेले वाक्य जर व्यासांचे मत समजलो तर चालेल का? तसेच एखाद्या लेखकाच्या पात्रांच्या तोंडची वाक्यं ही त्या लेखकाची मते समजणे अयोग्यच होय.

विलासजी, आपण एक अगदी महत्वाचा मुद्दा मांडला आहे. जिओ!

सुनीळ सामंत: व्वाह वैभवजी

अगदी वेगळा मुद्दा.

रमाजी. कथेतील पारध या शब्दाला हाही एक आयाम आहे.

तुम्ही सटल हा अतिसय योग्य शब्द वापरला आहे. मराठीत त्याच्या जवळचा शब्द सुप्त, पण तो नेमका नाही. जीएंच्या कथा वाचताना या सहज न दिसणाऱ्या सुप्त सटल गोष्टी नीट समजून घ्याव्या लागतात तरच मजा येते. एखाद्या खास खाद्यपदार्थात पटकन न जाणवणाऱ्या पण सटल असणाऱ्या चवीसारख्या.

परमजित सिंग: वाघोलिकर्जी विषय हा नाही की ते वाक्य पत्रा चे आहेत की जी ए यांचे आहेत. मला हे सांगायचे आहे की आपण जी ए chya कथा बारकाईने

वाचत नाही. जी ए नी एका पत्रात लीहले होते की मी माझे पात्र कथा लीहताना खूप कष्ट घेतो तर वाचकांनी ही बारकाईने वाचावे. आपण एक कथा चर्चेत घेता आणि तीच कथा थोड्या फार फरकाने ग्रुप वर वाचता. पारधी मध्ये याल्लू भीमा बदल लिहतात की त्याच्या चेहऱ्यावर खुळया वासराची काळआ होती. खरकान त्याचा चेहरा डोळया समोर येतो. ह्या गोष्टी ही चरचील्या जाने गरजेचे आहे

दिलिप बडे: त्यांना वाटले, म्हणावे, -जा चालता हो!माईला घेऊन जा. निळसर दोर्यांनी बांधलेल्या आणखी नोटा घेऊन जा. तुला शिक्षा कसली?शिक्षेला सुडाला माणूस बरोबरीचा हवा. पारधी दादासाहेब कथेतील सर्वपात्रांच्या दोर्या -धागे आपल्या हाती बाळगुन होते. दुबळी शिकार त्यांनी सोडून दिली. पण आपणच शिकार झालो आहोत काय?असा संदिग्ध प्रश्न त्यांनी आपल्याला सोडवायला दिला आहे.

दिलिप बडे: (1)पारधी-असे आहे, हे असे घडते, हे पाहत आपण वेड्यांच्या जगात जास्तच वेडाचे सोंग घेऊन वावरलो. नाटकात एक लहानसे नाटक केले. एकेक अळी ज्ञानाचा कण म्हणुन उचलली व डोक्यात साठवली. आणि शेवटी समजले काय?तर ज्याला आपण सोंग समजलो तेच आपले खरे स्वरूप ठरले. पारधी होताना आपलीच पारध होऊन गेली. (अशा अनेक विचारांवर )पुस्तके लिहावी लागतील. हे जग वेड्यांचे. आपण जास्तच वेड्याचे सोंग घेऊन वावरलो. आणि हे सोंगच आपले खरे रूप ठरले अस दादा साहेबांना वाटणे. हे जग एक मोठे नाटक. आपल जिवन म्हणजे या नाटकातील एक छोटे नाटक. आणि कहर म्हणजे (एकेक

अळी, ज्ञानाचा कण म्हणुन डोक्यात साठवणे. ज्ञान कण म्हणजे अळी) ही जि. ए. ची उपमा निवड. (विचार करताना मेंदू हँग होतो). 2)त्यांचे सौजन्य हे फक्त स्वतःच्या मिजासीसाठी होते. नाहीतर समोर बसलेल्या प्रत्येका विषयी त्यांच्या मनात विषारी ऊपहास होता(आपल अस अनेक वेळा होत. उपहासाने हसणे, टाळ्या वाजवणे. कौतुक करणे3)बाहेरच्या सौम्य हसण्यामागे त्यांचे स्वतंत्र असे एक खाजगी हास्य लपलेले आहे. व ते टपलेल्या पारध्याप्रमाणे सदैव जागे असे. व ते मात्र कुणाला माहिती नव्हते. हास्याचा हा प्रकार अनुभवता येण कठीण आहे. 4)रम-रमा-रमी मध्ये न रमणार्या शिकारी दादासाहेबांचे व्यक्तीचित्रण जि. एं नी अत्यंत बारकाईने केले आहे.

परमजित सिंग: पारधी ह्या कथे वरील सर्व विवेचन वाचले. त्या वर काही लिहू अस वाटत होते. पण एक भीती ही होती की काहीना माझे मत पटत नाहीत पण दादासाहेब असे का वागले थोडे सागने मनात येत होते म्हणून थोडे लिहीत आहे. दादासाहेब जेव्हा माईच्या वाडीला कडे जातात तेव्हां माई त्यांना काही आदर देत नाही आणि त्या मिजासी पोरीने ढुंकून ही त्यांचा कडे पाहिले नाही. त्या वेळेस पहिली ठिणगी पडते. नंतर लग्न झाल्या नंतर ही माई ला आपल्या श्रीमंती विसर पडत नाही. चहात चमचा ठेऊन दादासाहेब कधीतरी चहा पिऊ लागले की ती थटेच्य स्वरात म्हणे अजून मधुकरीआयुषाच्या रंग तुमच्या वरून गेला नाही. प्रथम प्रथम दादासाहेबाना या थटे तील धर जानवे तिच्यातील विषामुळे दिवस खराब होत असे. महाभारत ही अश्या कुत्झित बोलण्या मुले घडले होते. आता माई चे चरित्र. माई ने आपले जीवन सिनेमाचा पडदा केले होते टेबलावरची नुसते वर्तमानपत्र घेताना जर कोणी पाहत असेल तर ती अंगाला अकारण लचके देते. पदर जरुरी पेक्षा जास्त

बाजूला करते. आणि दादासाहेब ना डॉक्टर विषयी सगळे माहीत असते...... ते म्हणतात माई काय दाडसहेस्त्रीच आहे डॉक्टर नाही तर वैद्य नाही तर प्राध्यापक अगती नाही तर भूगोल चे मास्तर. वेली काय वनिता काय टेकण्यासाठी उकिर्डिया च्य भिंती वर चाडतील.

आता दादासाहबांनी मुद्दाम मुलगा सुधीर साठीही ह्याच तिरस्कराच्या भावना होत्या..

विश्वेश्वर नांदेडकर: वेगळे पण महत्त्वाचे कथेचे अंग. दुर्लक्षिले गेलेले. माईंच्या आष्य वागण्यामुळे तीसिही दादासाहेबांनी सावज म्हणूनच गणती केली हे नक्की

परमजित सिंग: आणि यालू भीमा बद्दल त्याची बाई जी ठेवलेली असते तिच्या साठी तो खून करतो तिच्या बदल छया आसक्ती ने असे केले महणावे तर ती शिसारी येण्या एव्हडी करू होती. आणि जी ए नी प्रत्येक वेळी याळू भीमा चे उदाहरण दिले आहे

दादासाहेब यांना शेवट पर्यंत याल्लु भीमा कळत नाही त्याने खून का केला

स्त्री चे धोका देणे इतकं नवीन का वाटे ह्याचे त्यानं खूप आश्र्यकारक वाटत असे

सुनीळ सामंत: उत्कृष्ट विवेचन परमजीतजी. वेगळं आहे.

सर्वांना सर्वांचे म्हणणे पटणे अशक्य असते. म्हणून म्हणणे सोडू नये

कोणी खोडले तर वाईट वाटून घेऊ नका. होऊ द्या चर्चा.

जयश्री जंगले : मला वाटतं, 'पारध' मधले दादासाहेब माईंच्या वडीलांकडे गेले तेव्हा माईंच्या सौंदर्यामुळे त्यांची पारध झाली.

माईंच्या वडीलांना आर्थिक मदत करून त्यांच्यावर उपकाराचे ओझे टाकून माईंचा एक प्रकारे सौदा करताना दादासाहेब शिकारी होते.

पण पुढे ते माईंच्या सौंदर्याच्या जाळ्यातून बाहेर पडले आणि डॉक्टर अडकले. माईंमधलं श्वापद त्यांना कळलं होतं.

म्हणूनच बहुतेक दादासाहेबांना डॉक्टर त्यांच्या तोडीचे वाटले नाहीत.

जयश्री जंगले : सुधीरच्या चोऱ्या आणि खोटे बोलणे हे माईंच्या आणि डॉक्टरांच्या निलाजऱ्या व्यभिचारासारखेच आहे.

जयश्री जंगले : डॉक्टरांना दादासाहेबांना काय वाटले ते कळले आणि जीवदान मिळाल्यामुळे तर ते दादासाहेबांचे मिंधे झाले. पुन्हा एकदा पारध.

दिलिप बडे: डॉक्टरांनी माईची शिकार केली. दादासाहेब पारध ठरले.

सुनीळ सामंत: पारध आणि शिकार यांच्यातील फरकावरही चर्चा झाली होती

सुनीळ सामंत: मला वाटते जीएनी पारध हे नाव फार जाणीव पुर्वक ठेवलेले आहै. शिकार आणि पारध यात खूप फरक आहे. पारध ही एक हौस आहे, एक धुंदी आहे, काहीतरी मिळवण्याची जीगर आहे, जिंकण्याची असमाधानी हाव आहे.......

पारध करणे हीच एक वृत्ती आहे. एखाद्या गोष्टीसाठी जीवघेणे प्रयत्न करून ती मिळाल्यावर त्या गोष्टीतला इंटरेस्ट संपतो. एखादी गोष्ट मग ती वास्तु, स्त्री, दादा साहेबां साठी कोर्टाचा निकाल वगैरे वगैरे मिळाल्यावर त्यातील जिवंतपणा, संपून त्याचे निर्माल्य होते,

दादासाहेबांना कोर्टात केस जिंकेपर्यंतच्या मन ताणणाऱ्या अनुभवाची धुंदी मिळवायची आहे... , निकाल लागल्यावर त्यातील मजा निघून जाते.... यल्लुभीमा नमस्कार करून निघून गेला........

तसेच माईना मिळवण्याची ईर्षाच महत्वाची आहे. माईना लग्न करून आणल्यावर पारध संपली..... बाकी काही नाही.

वैभव कुलकर्णी

महेश आफळे : पारध असो वा शिकार

शब्दच्छल कितीही करता येईल

किंवा अगदी समागम व त्यानंतरची पतनक्षणाची जी एं च्या भाषेत"खडकावरून अंग फेकून द्यावेसे भावना"

किंवा प्रेम व त्यानंतर झालेला प्रेम विवाह, या पैकी काहीही असो

शेवटी एकच सत्य की - कोणतीही फलश्रुती ही कधीही एकटी येत नाही, ती आपल्या बरोबर काहीशी हताश रिक्तता घेऊनच येते

# पाळणा- जी ए कुलकर्णी- पारवा(1960)

सुनीळ सामंत: पाळणा- जी ए कुलकर्णी- पारवा(1960)

जीएंच्या कथांवर निराशावादाचा आणि नियतीवादाचा पगडा होता व मनुष्याला नियतीसमोर काहीही करून दाखवणे अशक्य आहे हे त्यांच्या अनेक कथांचे सूत्र होते असे मानले जाते. अर्थात या मानण्यालाही छेद देणाऱ्या अहम सारख्या कथा आहेतच.

पाळणा ही कथा मात्र मानवी आयुष्याचे कःपदार्थपण, क्षुद्रता, दुबळेपण जाणवून देणारी टोकदार कथा आहे. साधारण तासाभरात घडणारी ही कथा.

सुप्रसिद्ध वकील दादासाहेबांचा सुपुत्र राघवेंद्र. तोही हुषार, पण आत्मविश्वासाने शून्य. बोलण्याच्या वेळी छातीत धडधडते. त्यामुळे सर्वत्र अपयशी. त्याची पत्नी सुतीकागृहात गेलेली आहे, आणि कधीही तिची बातमी येईल अशी वेळ आहे. राघवेंद्र जायला घाबरतो कारण आपला पायगुण तिथे बाधेल अशी त्याला भिती आहे. त्याची, लग्न राहून गेलेली बहिण, सावित्री बाळाच्या चाहुलीने आनंदित झालेली आहे.

[पाळण्याकडे कौतुकाने पाहत ती तेथेच भिंतीला टेकून उभी राहिली. या नव्या घडीने ती लहान मुलीप्रमाणे खुलली होती. मुलाचे नहाणे तर तिने केव्हाच ताब्यात घेतले होते. रात्रीबेरात्री त्याच्या रडण्याने सगळयांची झोप उडाली पाहिजे. त्याच्या सरबराईच्या धांदलीत कुणाला खायला देखील उसंत मिळता कामा नये. त्याने दादांची पोथ्यापुस्तके अस्ताव्यस्त करून सोडली पाहिजेत. असे अगदी तळापासून

घरातील आयुष्य ढवळून निघाले पाहिजे. हा भाबडा भोळसर भाऊ. याचे आयुष्य वठल्यासारखे झाले आहे. तो देखील आनंदाने कातावून जावा... ]

अखेर तीच सुतिकागृहात जाऊन आली. आणि बाळ बाळंतीण सुखरूप आहेत, पण बाळाला डोळेच नाहीत अशी विषण्ण करणारी बातमी घेऊन आली. आनंद मानावा की दुःख हे न दादासाहेबांना कळे न राघवेंद्राला. [काळाचा पाळणा पुढे गेला की मागे?]

जीएंच्या कथांच्या शिर्षकांवर या समूहात अनेकदा चर्चा झाली आहे. पाळणा या नावातून काळाचे, मनाचे, सुखदुःखांचे दोलायमान स्वरूप वाचकापर्यंत पोहोचते. हा बाळाचा नाही तर काळाचा पाळणा आहे. दादासाहेब यशस्वी की अयशस्वी? राघवेंद्र हुषार आहे की नाही? बाळाच्या जन्माचा आनंद करावा की न करावा? पुढे काय?

जीएंच्या कथांतून अनेक प्रश्न निर्माण होतात आणि वाचक त्यांच्या कुवतीनुसार आणि त्या त्या वेळच्या मनोवस्थेनुसार त्यांची वेगवेगळी उत्तरे शोधतात. या कथेतून तुम्हाला काय दिसले?

या कथेतला कोणता भाग तुम्हाला विशेष वाटला?

या कथेचे जीएंच्या इतर कथांहून काय वेगळेपण आहे?

आपण यावर बोलूया.

विलास वाघोलीकर: कथेचा छान परिचय करून दिला आहे. ग्रुपमध्ये, प्रत्येकाने प्रयत्न करून, कथेवर किमान दोन तीन परिच्छेदांत असा प्रतिसाद दिला, तर त्यास ग्रुपच्या चर्चेचे स्वरूप राहील. धन्यवाद.

एखादा मांजराने बशीतील दूध अगदी चाटून पुसून पिऊन स्वच्छ करावे, त्याप्रमाणे जीएंनी दुःखे व्यक्त केली. पुत्रजन्माने आनंद पण त्याला मिळालेल्या व्यंगाने दुःख, अशा स्थितीतील राघवेंद्रचे चित्रण जी एं नी केले आहे. उद्या काय होईल हे आज सांगता येत नाही, अशी अनिश्चित स्थिती दाखवणारी ही कथा लक्षणीय आहे. धन्यवाद. विलास वाघोलीकर

+91 93071 10317: सुखबरोबर दुःखही येते हा संदेश देणारी फार खोल वेदना देणारी कथा आहे

सुनीळ सामंत: जीएंच्या इतर अनेक कथांप्रमाणे ही कथाही एक नाट्यानुभव आहे असे मला वाटले.

१- कथेचा काळ तास दोन तासांचा आहे.

२- कथा एकाच ठिकाणी(नेपथ्याच्या दृष्टीने) घडते

३- कथेत मोजून तीन पात्रे आहेत.

पण कथा आहे मात्र अनंत अनुभव देणारी. सुन्न करणारी.

सुनीताजींनी म्हटल्याप्रमाणे निर्भेळ आनंदाची अपेक्षाच नाहीशी करून टाकणारी.

महेश आफळे: पाळणा म्हणजे शारीरिक नव्हे तर मानसिक वांझ कुशीचे खिन्न स्वगत

या कथेचा इम्पॅक्ट माझ्यावर इतका खोल होता की मी लगेच"सुरवंट"नावाची अश्या एका अपयशी एल आय सी agent च्या आयुष्याचे दर्शन घडवणारी कथा लिहायला घेतली.

ती अर्धवटच राहिली हे मराठीचे सुदैव

पाळण्यात अर्भका ऐवजी कधी वरवंटा ठेवतात त्याकडे बघताना जसे वाटेल तसे उदास उदास होतो आपण

+91 94224 32730: पाळणाः

सुखाला दुःखाची किनार …

दुःखातून सुखाचा अंकुर …

पण.. किती सुख.. किती दुःख हे काळाच्या हातात… माणूस काळाच्या हातातील.. एक कठपुतली बाहुल्याप्रमाणेच.. कटू सत्य..

सुनीळ सामंत: खरे आहे.

ही कथा वाचताना आपले मन कधी राघवेंद्र च्या दुःखात समरस होते तर कधी सावित्री सुखात आणि दुःखात आणि शेवटी दादासाहेबांच्या दुःखापर्यंत येऊन पोहोचते.

वरवंट्याचा उल्लेख आई बापांच्या मनाची अवस्था दाखवणारा.

जीएंच्या कथांत व्यक्तींच्या नावांनाही काही संदर्भ असतात. या कथेत तसे जाणवले नाहीत. मलातरी.

वैभव कुलकर्णी : होय.

आधी मलाही तसेच वाटले होते.

पण असे बघा ------दादासाहेब कृष्णराव. म्हणजे कर्तुत्ववान.

राघवेंद्र—राघवांचा राजा म्हणजे राम ! पराक्रमी, योद्धा, बांधेरूद सुडौल वगैरे वगैरे..... आणि यातील नावाशी जुळणारा एकही गुण नाही.

सावित्री —एक श्रेष्ठ पौराणिक पतीव्रता...... पण कथेतील सावित्रीचे लग्नच जमत नाही.....

..... राघवेंद्रच एके ठीकाणी म्हणतो. ——कृष्णरावां नंतर कृष्ण ! आपण चुकून रांगेत आलो......

या कथेतील प्रत्यक्ष समोर न आलेल्या व्यक्तीरेखाही स्पष्टपणे डोळयापूढे ऊभ्या रहातात ————कडेसरीला चिल्लर म्हणून आठ बाराशशे बाळगणारा पाटील, आबाराव कारकून,

हातावरील शिरा टचटचीत निळसर दिसणारी, फिकट चेहऱ्याची पद्मा, फोटोतून स्थिर नजरेने पहाणारी, मोठे कुंकू आणि नथ घालणारी, राघवेंद्रचा ऊदंड अभिमान बाळगणारी आई !

साधना डोंगरे: कथा अतिशय सुन्न करणारी आहे.

सुख दु:ख या सापेक्ष कल्पनांभोवती फिरणारा मानव....

काळाला त्याचे काहीही सोयर सुतक नाही...

काळाच्या पटलावर नवे आगमन कालचक्रात फिरण्यापुरतेच.

बाकी काळ पुढेच सरणारा पाळणा मानवी मनाचा सतत दोलायमान असणारा

सौ साधना डोंगरे

गौरी देशपांडे : " तूच घडवीसि, तूच तोडीसी

कुरवाळीसि तू, तूच ताडीसि

नकळे यातून काय जोडीसि

देसी डोळे, परी निर्मिसि,

तयापुढे अंधार "

असा हा नियतीवाद आहे.

महेश आफळे: काळोख्या खोलीतील एखाद्या रिक्त नारळ करवंटीने दोन्ही घुबडडोळयांनी अंधार बघत राहावा तसा अनुभव देणारी कथा

रमा गर्गे: ही कथा जितकी राघवेंद्राची आहे, तितकीच सवित्रीचीही आहे!दादा भूतकाळाविषयी जे काही बोलतात ते सारे राघवेंद्राविषयी असते, आपल्याबद्दल ते काहीच बोलत नाहीत, हे तिला जाणवते।ती आपले अस्तित्व जणू नाहीच अशी वावरत रहाते।अण्णा आणि वहिनीच्या संसाराच्या टोकाला धरून ती जगत असते।तिचे दिसणे ओबडधोबड आहे, पण ती गुणी आहे, संवेदनशील

आहे!तिला तिच्या हक्काचे अवकाश मिळालेच नाही, पण तरीही ती सारे मनाआड करून भावाच्या आनंदात आपला आनंद शोधत असते।

वैभव कुलकर्णी : जीए कोणताही शब्द अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण रितीने वापरतात.

या कथेतील थिलथिलित या शब्दाने लक्ष वेधून घेतले !

शक्यतो थूलथूलीत असा शब्द प्रचलित आहे.

थिलथिलीत वाचल्यावर पाण्याने भरलेली आकारहीन प्लॅस्टिकची पिशवी डोळ्यापुढे येते.....

रमा गर्गे: काल पाळणा कथेचा विचार करत असतांना एकदम वास्तुपुरुष हा भावे-सुकथनकर द्वयीचा चित्रपट आठवला।कदाचित त्यातही देशपांडे आडनाव, वाडा असाच प्लॉट असल्याने असेल। भास्कर देशपांडे वडिलांचे गांधीवादी नष्टचर्य आणि भावंडांचे, काकांचे सरंजामी मार्ग ओलांडून डॉक्टर होतो तो आपल्या आईच्या प्रेरणेने।

पाळणा मधली आई असती तर तिने राघवेंद्रला उभारी दिली असती का?बीजवर का असेना, पण सावक्काला हक्काचे घर मिळवून दिले असते का?परिस्थितीपुढे पुरुष होतात तितकी स्त्री कधीही हतबल होत नाही, ती आभाळ फाटले तरी जमेल तितके टाके घालण्यासाठी उभी राहते।आई असायला हवी होती।तिने नातवाचे नाव सूरदास ठेवून दुःखाला दूर केले असते, पद्माला धीर दिला असता।

महेश आफळे: सुचकतेतून अश्या अनेक शक्यता निर्माण करणे हे जी एं च्या बहुतांशी कथांचे खरे वैशिष्ट्य

म्हणून तर ती जिथे संपते तिथे वाचकमनात नव्याने सुरू होत असते

आणि अरेबियन नाईट्स ना अंत नसतोच

सुनीळ सामंत: पाळणा या कथेबद्दल अधिकाधिक विचार करताना हे सुचलं.

पाळणा आणि झोपाळा हे दोन्हीही पुढे मागे होतात. पण झोपाळ्यातली व्यक्ती झोका ठरवते. पाळण्याची दोरी मात्र दुसऱ्याच्या हातात असते. स्वतःचा पाळणा स्वतःला अजिबात हलवता येत नाही. पाळण्यात बाळ असते जे स्वतः काहीही करण्यास निर्बल असते.

या कथेतील सर्वात कर्तृत्ववान दादासाहेबही काहीही करू शकले नाहीत या दोरी धरणाऱ्या हातासमोर. काय करू शकले असते? ते मुलाला शिकवू शकतात, पण जगात धीट करू शकत नाहीत. कष्टाळू सावित्रीही निर्बलच ठरते. काय करील बिचारी? राघवेंद्रकडे सर्व काही असूनही तो काहीही करू शकत नाही. पाळण्याची चौकट ओलांडू शकत नाही.

रमाजींनी राघवेंद्रच्या आईची शक्यता दाखवली आहे. कदाचित त्यामुळेच जीएंनी आईचा मृत्यू कथेआधीच घडवला आहे. (एका अर्थी या पाळण्याची दोरी लेखकाहातीच आहे असेही वाटले)

पण समजा आई असती. तरी जीएंनी तिच्या पाळण्याचीही चौकट आखलीच असती.

॥ श्री॥

Page No. (9)
Date 15/6/22


सैजीत सावरगांवकर 7350002870


कथा: पाळणा कथासंग्रह: पारवा (१९८९ प्रत)

जी.ए. च्या कथांचे वैशिष्ट्य हे की तुम्ही त्या जितक्या वेळा वाचाल तितक्या वेळेस तुम्हाला त्या कथेचे विविध दृष्टीकोनातून आकलन होत जाते. मग ती कथा तुम्ही परत परत वाचत जाता.
त्यांच्या सर्व कथांमागे कथाबीज काय आहे? काय असेल? तर ते कथेतील संदर्भित (सांगतात वाक्यामधून दिसतो गर्भित अर्थ उलगडत जातो.
पाळणा या कथेत आलेल्या खालील वाक्यांचा परामर्श घेतला तर कथा जास्त नीटपणे उलगडत जाते. ह्या सर्व वाक्यांचे कथा केंद्रस्थ विशेषण! कथेच्या शेवटच्या दोन-तीन पॅराग्राफ मध्ये चपखल पणे जाणवते. ही वाक्ये वाचकाला कथेत ओढवती येतात त्यामुळे पटकन लक्षात येत नसीत.

1) वांझपणातून फक्त आणखी वांझपणाची उत्पत्ती (कैद) येत होती
2) एकंदरीने त्या आवारावर, त्या घरावरच, आंधळ्या डोळ्यातील आत्यंतिक उदास कळा होती.
3) राघवेंद्राने खिन्नपणे त्या कळाटाकडे पाहिले व त्याच्या साऱ्या वांझोट्या जीवनाचे अपयश उमटून आले.
4) आपल्या (राघवेंद्रच्या) या चिकणमातीच्या हातांना यश नाही हे खरे.
5) त्या (आईच्या) फोटोच्या स्थिर नजरेकडे आपणाला पाहवत नाही.
6) पण येथे मात्र वेळ आपणाला थबकून मागे मागे जाते. पुढे सरकतच नाही.
7) (दादांचा विचार) हल्ली राघू थकला की काय? तो आता पूर्वीसारखा दिसत नाही.
8) त्याला (राघवेंद्राला) खूप बोलायचे होते. हे त्याने बोलण्यासाठी तोंड उघडले, पण शब्द उमटेनात, आंधळ्या प्रमाणे ते नोडलेल्या तोंडातच धडपडले व मागे गेले
9) (सर्वात महत्वाचे वाक्य) (दादांचे) राघवेंद्राने हा

एकच आयात पाहिला. आपण तर दोन आयात (पद्धती)
10) (दादा यांना विचार) मला फार आशा होती, एकच आशा होती, एवढे तरी देवाने करायास पाहीजे होते रघु।
11) (शेवटचे वाक्य) कारण तो (पाळणा) आंधळे पणाने निर्विकार हेलकावत होता.

जी.ए. कोणतेच वाक्य निरर्थक व कशेशी संदर्भ नसणारे लिहित नाहीत त्याचे हे सुंदर उदाहरण.

आता आपण कथेकडे व कू. कथेतील कॅरेक्टरसिचे अचुक वर्णन व त्यांनी मानसिकता जी.ए. काही वेळा पारदर्शक पणे लिहतात, तर कधी कधी शब्दांनी.

कथेचा विचार दादा, राघवेंद्र व नुकतेच जन्मलेले आंधळे बाळ, यांच्या भोवती एवढ्या स्थितीत परिधान करण्याचे ही योजले आहे.

पाळणा कथा वाचतांना दादांच्या व्यवसाय वृद्धीच्या चढता आलेख. त्यांनी समाज मान्यता याची व्यवसाय त्यांचा वकील मुलगा राघवेंद्र याने नावलौकिक त्याच तोडून तरी धरावा, कोसळू देऊ नये एवढीच माफक अपेक्षा दादा वकील, त्यांचे वडील यांनी ठेवली होती. पण म्हणतात ना मोठ्या झाडाखाली, त्याचेच बीज असलेले छोटे झाड वाढत नाही, हे खरे, पण छोट झाड जीवंत राहु शकते, पण तसेही घडले नाही.

राघवेंद्राचे व्यक्तीमत्व जी.ए. डेव्हलप करतांना तो त्याच्या जीवनरसाने जगत नाही ए हे सांगायला वकील होणे व वंशपरंपरागत वकीली न चालणे हे एका वाक्यात सांगितले आपल्या या चिकण मातीच्या हातांना (कुठेही) यश नाही हे खरे! तो कधी घरामध्ये, दादांच्या नंतरी, लाड करण्याने, स्वत:च्या हिमतीवर, Confidently

आता आला पाळणा, त्याचा इतिहास. भूतकाळातून त्याला परत वर्तमानात अस्तित्व आले कारण काय तर राघवेंद्राची पत्नी गरोदर राहून वंशवेल वाढविण्यास मदत करणारी सून. पाळणा आता सज्ज होतोय ~~दादांच~~ दादांच्या तिसऱ्या पिढीचा वारसा सांगणारा त्यांची इच्छा फलद्रूप करणारा नातू व त्याचा जन्माची वाट पाहत भविष्यातील स्वप्नांना आकार देऊ शकणारा पाळणा.
पाळणा हे द्योतक वंशवृद्धी, घराची, व्यवसायाची वृद्धी, अपूर्ण राहिलेल्या स्वप्नांची पूर्तता या ~~अ~~ व्यापक अर्थाने पाळणा आयुष्यवृद्धी करणारा व्हावा, ही संकल्पना.

दादांच्या मनात पालवी फुटते. राघवेंद्रही स्वप्नरंजनामध्ये मग्न होतो पण सावित्रीच्या रडण्याने व त्या एकाच वाक्याने 'पण बाळाला डोळेच नाहीत रे अजिबात!' दोघांनी जमिनीवर आणते.

मग त्या बापलेकांची घालमेल होते. राघवेंद्र बोलावयास जातो तर तो धडाधडा बोलू शकत नाही आणि इतक्या वर्षांच्या दादांच्या मनातील सल 'राघवेंद्राने हा एकच आघात पाहिला, आपण तर दोन आघात! दुसरा आघात तर आता घडलाय. पहिला केव्हा घडला? राघवेंद्रचे बिन डोळ्यांचे आयुष्य हाच पहिला आघात असावा कारण पत्नीवियोगाचे दुःख दादांच्या तोंडी नाहीच.

अन मग कथा उलगडायला लागते. संदर्भ लागत जातात वरील वाक्ये आठवण करून मागे जाऊन वाचतो व कथा वाचन पुढे चालू ठेवतो ते शेवटच्या ३ पॅराग्राफ पर्यंत.

दादा आजोबांच्या स्वप्नात नातवामुळे येणारी भविष्यातील घराची, घराण्याची, व्यवसायाची प्रगती पाहत असतात. पाहणार असतील ते, सटवाई पण पाहत असते. पण घराचे प्रारब्ध, घरातील व्यक्तींचे कायम

नकारात्मक आयुष्याचे विचार व सर्वांचेच
नुतन जन्माला येणाऱ्या बाळासह यांचे प्रारब्ध
याचा परिणाम म्हणून दृष्टीहीन बाळ
जन्माला येणे. अकल्पितपणे 'पाळणा'
सहज होतो पाळण्याचा वारसा निश्चय
यांचा होऊन जातो. सहदेवाबाबतही
असेच घडले. ती अनुकंपेची गोष्टीच
नाही. वंशदिवा 'दृष्टीहीन' राहिला.

दादा काय, राघवेंद्र काय, यांच्या
दृष्टीत पुढील आयुष्याचे vision दिसण्या
करिता कधी मध्ये कोणतेही सकारात्मक
विचार घातले नाहीत.

आणि म्हणून वर लिहिलेली वाक्ये
जेव्हा आपण या मांडता विचारांबरोबर वाचतो
तेव्हा कशाकडे पाहण्याचा दृष्टिकोन. मग हे
त्या त्या (व्यक्तीमत्वाकरता) कॅरेक्टरचे वागणे.
विचार करणे, बोलणे हे खूप सूचक होऊन जाते.
हे आपल्या G.A.नचे वैशिष्ट्य.

शेवटी दादाच रघुशी बोलतात, पण
खरे ते स्वगतच आहे. "राघवेंद्रच्या
नजरेतून खोलीचं पाळणासाठी व तो क्षणात
संपूर्ण घराचे आयुष्य पाळण्यामध्ये येते.

हा काळाचा पाळणा पुढे गेला की
मागे गेला हे समजलेच नाही कारण तो
आंधळेपणाने निर्विकार हेलकावत होता.
एक वेगळा दृष्टिकोन कथा वाचनाचा.

आता परत कथा वाचन करणे आवश्यक
आहे.

कोथरूड, पुणे लेखन सीमा १५/१०/२०२२
रात्री ८.३०
९३४०००२५६०

# पुनरपि', पुस्तक - काजळमाया

पुनरपि - काजळमाया - लेखक -जी ए कुलकर्णी

विवेचक - व्ही एस वाघोलीकर

ही कथा, लहान गावात स्वतंत्र राहणाऱ्या वृद्ध जोडप्याची आहे.

कथानक - गाव लहान आहे. नायिका वृद्ध आहे. 3 मुलगे व एक मुलगी लांब गावी स्थिरावलेले आहेत. नवरा यशस्वी वकील होता. माडीचे घर आहे. त्याला आवार ठेवले आहे. पण नवरा रुग्णाईत झाल्यावर, शेजाऱ्यांच्या मदतीने ते रहात आहेत. मुला मुलीच्या, नातवंडांच्या आठवणी येतात. पण ते दूरगावी असल्याने इलाज नाही.

गावातच लांब अंतरावर नवऱ्याची वयस्कर, जुळी बहिण रहात होती. तिचे निधन झाल्यावर तो बातमी सांगावी - न सांगावी या द्विधा स्थितीत असताना, नायिका ती बातमी नवऱ्याला सांगते. तो हाय खातो. कथेच्या दिवशी रात्री त्याचे निधन होते. व मुले येईपर्यंतचा काळ नायिकेला घालवावा लागतो.

मृत्यू चिंतन - या कथेत वय झाल्यामुळे झालेला माणसाचा मृत्यू दाखवला आहे. पण त्याच वेळी लाडली मांजरीला पिल्ले होतात. असा हा मृत्यू - जन्माचा खेळ, काळपुरुष करत असतो, हे दाखवले आहे.

याचाच उपअर्थ, इन्व्हर्शन, असा की आपण जगात आलो तेव्हा कोणी तरी बाजूला सरकले होते. ही हादरवून सोडणारी अनुभूती नायिकेला येते. त्याच वेळी गर्भार असलेली काळी मांजरी येवून नायिकेचा मृत्यू सूचित केला आहे.

वातावरणवर्णन - काही वाक्ये - हिरवा अंधारामुळे गजबजलेले आवार, रोपांच्या नावासह दाखवले आहे. सीताफळे येतात. पण न तोडल्याने काळी पडतात. नवऱ्याने घेतलेली, कातडी बांधणीची जाड पुस्तके, थडग्यावरील शिलालेखाप्रमाणे जड होती. मृत्यू म्हणजे बिनपरतीचा प्रवास. -- दिवसाला दिवस चिटकावत रहात होते.

मांजराला आधी मृत्यू समजतो, या पाश्चिमात्य लोकसमजुतीची पार्श्वभूमी दाखवली आहे. भारतीय वातावरणातही पाल चुकचुकते, घुबडे, कोल्हे दूरवर ओरडतात, या लोकसमजुती आहेत. संस्कृत भाषेतील " पुनरपि जननम् । पुनरपि मरणम् ।".... नंतर जननीच्या उदरात रहावे लागते.... हा श्लोक प्रसिध्द आहे. भारतीय विचारधारणेत जन्म मृत्यूचा फेरा चाललेला असतो. ही श्रद्धा आहे. जन्मानंतर मृत्यू अटळ आहे हे उघड सत्य माणसाला दिसते. पण जन्म संपून मृत्यू आला तरी, वेगळ्या स्वरूपात, सजीवाचा जन्म होतो. अशी ही श्रद्धा आहे. अर्थात् याचा विपर्यास केला जावू नये. या श्लोकाचा वापर या कथेत केला आहे. विश्वातील आपल्याला ज्ञात -अज्ञात वस्तुमान व उर्जा वापरून, सजीव हा जन्माला येतो. व मृत्यूनंतर ते सर्व परत विश्वात गेल्यास, तेच ज्ञात - अज्ञात वस्तुमान व उर्जा वापरून सजीव परत अवतरू शकतो, ही श्रद्धा आधारहीन नाही.

मांजरे व इतर प्राणी, सहजप्रवृत्तीवर जीवन जगतात. घरात, लोकवस्तीत आवाज न करता पाळीव मांजराचा केव्हाही शांत वावर चालू असतो. दृष्टी, वास, आवाज, यांबद्दल त्यांची शक्ती माणसापेक्षा जास्त असते. विशेषत : पाळलेली मांजरे, मृत्यूसमयी माणसाच्या जवळ बसून राहतात. कदाचित त्यामुळे ही लोकसमजूत घट्ट झाली आहे.

बंगल्याचे जुने वातावरण, झुडुपांनी गिजबीजलेले आवार, विस्कटलेली माणसे, वातावरण चित्रित करून, ( इतरांच्या दृष्टीने) म्हाताऱ्या माणसाचा मृत्यू व त्यावरील चिंतन दाखवणारी ही कथा लक्षणीय झाली आहे. धन्यवाद. विलास वाघोलीकर

दिलिप बडे: सिताफळे येतात पण न तोडल्याने काळी पडतात. बर्याच ठिकाणी अन्न आहे पण भुक नाही-किंवा खाणारे नाहीत अशी अवस्था येथे स्पष्ट होते. 2)नवर्याने वाचलेली पुस्तके थडग्यावरील शिलालेखा प्रमाणे जड होती. या ठिकाणी ज्याचे मोल त्याला'असा एक अर्थ स्पष्ट होतो.

सिताफळे येतात पण न तोडल्याने काळी पडतात. येथे एका ठरावीक वयानंतर घटना-प्रसंग- व्यक्ती -वस्तु सुखदुःख, पापपुण्य फायदा -तोटा अशी अनेक दंद्वे बोथट होतात. असा अर्थ निघत असावा.

सुनीळ सामंत: धन्यवाद विलासजी.

आपण अगदी नेमक्या शब्दांत कथेचे विवेचन केले आहे. ज्यांनी कथा वाचली असेल त्यांना पुनःप्रत्यय यावा आणि ज्यांनी वाचली नसेल त्यांची उत्सुअकता जागी व्हावी असे.

पुनरपी ही कथा जीएं च्या इतर कथांच्या मानाने अधिक संथ आहे असे मला वाटले. (जीएंच्या कथा वेगवान नसतात इस्किलार, प्रवासीसारखे काही अपवाद वगळले तर). पाळणा या कथेप्रमाणेच पुनरपी सुद्धा फक्त एकाच ठिकाणी घडते. काळाचा पटही एका रात्रीपुरताच आहे. आणि यात व्यक्ती सुद्धा एकच आहे. म्हणजे

पार्श्वभूमीला इतर अनेक व्यक्ती आहेत; जशी दादांची जुळी बहीण ताई(जिचा याच आठवड्यात मृत्यू झाला), रत्नाकर, नारायण, छोटा संजीव घनश्याम, कांचन आणि त्यांची मुले याशिवाय देसाईंकडचा गडी दाजी व गुरखा ही पात्रे आहेत खरी, पण कथेमध्ये मात्र माई लाडली आणि दादा अशी तीनच पात्रे आहेत. त्यातही दादांकडून काही उत्तर नाही, बोलणे नाही, हालचाल नाही. माईच्या हालचाली सुद्धा वयानुसार संथ. आठवणी मात्र वेगाने या टोकापासून त्या टोकापर्यंत आणि या काळापासून त्या काळापर्यंत झरझर वाहत असतात. पेपरवेट, पुस्तके शेल्फ दौत टाक विलास मंदिर अशा असंख्य आठवणी भराभर तिच्या मनात येत जात असतात. दादांचे काही न बोलता जाणे त्यांना अधिकच अस्वस्थ करते. अशा त्या एकलकोंड्या रात्री माईंना संगत केवळ एका मांजराची आणि दादांच्या मृत्यू सोबतच लाडली ला झालेल्या पिलांची. आधार गुरख्याच्या येण्याचा पण जेव्हा गुरखा येऊन माईजी अशी आरोळी ठोकतो तेव्हा मात्र माईंना उठण्याची धडपड फक्त मनातल्या मनातच करता येते. शब्द संपल्याप्रमाणे खरखरीपलीकडे आवाजच फुटत नाही आणि मांजरीकडे हताश पहात गप्प माई निर्जीव बसून राहतात.

ही कथा अनेक अंगानी वाचता येऊ शकते. माईचा एकटेपणा. अवाढव्य घरातील बिन सोबतीचे जगणे. मृत्यू आणि जन्म यांच्या चक्राचा एकाच वेळी झालेला साक्षात्कार हे तर या कथेत आहेतच पण त्याहीपलिकडे जाऊन एकूणच जगण्यामरण्याच्या अस्तित्ववादाच्या प्रश्नांना ही कथा अधोरेखित करते.

प्रमोद कुलकर्णी: तरणीताठी भिंत. झिप्री कळा.

अंथरलेले उन.   हिरवट अंधार. लोकरी पावले. गौरीची शिळी आरास.

हजार मोगऱ्यांची फुलां सारखा भरगच्च संसार.

सावलीच कापली.  जुनाट कातड्याचा चेहरा.

अंधारावर घड्याळाच्या टिकटिकीचे थेंब.

जि. एं. च्या उपमा.

सुनीळ सामंत: 👌 तुम्ही हे फार छान नेमकं निवडलं. ताईचा संसार हजार मोगऱ्याच्या फुलांसारखा एवढे एकच वाक्य वाचूनही तो पूर्ण संसार ते घर डोळ्यासमोर उभे राहते. ताई बद्दल इतर काहीही लिहिलेले नाही. तरीही एका वाक्यात एखादे व्यक्तिमत्व स्पष्टपणे उभे करण्याचे जीएंचे कसब दाद देण्यासारखे आहे

मंजिरी देशमुख: जी. एं. च्या कथा कालातीत असतात. काळ मर्यादेत त्या मर्यादित नसतात हे पुनरपि या कथेतून पुन्हा वाचकाला जाणवत रहातं. नात्यातील अपरिहार्य दुरावा, त्यातून वृद्धांना आलेलं एकाकीपण, व वयानुरूप त्यांना आलेली विकलांगता हे आज जास्त प्रकर्षाने भेडसावणारे प्रश्न आहेत जे जी ए ज्या काळात कुटुंबे ब-यापैकी एकसंघ होती तेव्हा पाहू शकले. यामुळेच जी एं. च्या कथांचे विषय कालबाह्य होत नाहीत. मृत्युची काजळमाया पूर्ण कथेवर पसरलेली वाचकाला जाणवत रहाते आणि बेचैन करते.

॥ श्री ॥



कथा: पुनरपि कथासंग्रह काजवमाया
कथा आस्वादक संजीव सावरगांवकर.

जी.ए. नची कथा वाचावयास घेतल्यानंतर प्रथमदर्शनी वाचून होते. शेवटापर्यंत वाचक जातो आणि मग त्याला कथेबाबत प्रश्न पडू लागतात. तो उत्तर शोधू लागतो आणि परत कथेचे वाचन चालू करतो.

या पुनरपि कथेच्या व कथेत कसा योगायोग आहे पहा. आपण मागील वेळेस आस्वाद घेतला पाळणा या कथेचा. या कथेचे पुनरपि चे वाचन केले तर तिथेही कथा नायक दादा व्यवसायाने वकील, मोठा पसारा, भरपूर नाते संबंध असलेले मोठे घर, दादांची कायद्याची पुस्तके, चार मुलांचे जन्म पाहिलेला पाळणा, मुलासुनांचा, मुलींचा, नातवंडांचा गोतावळा व नंतर हळूहळू संसार आटतोय हे समजून मोठ्या मोठ्या घरात दादा आणि माईचे रहाणे व त्यात दादांचा मृत्यु ही मुख्य घटना व त्याचे माईवरचे विचार परिणाम या परिघात कथा फिरते.

मला तर वाटते पाळणा कथेतील चित्राचा कॅलीडोस्कोप जी.ए.नी हलवून लेखकाचे लेखन स्वातंत्र्य घेतले की काय? आणि दुसरे कथानक तयार झाले. दोन्ही कथांचा कथा काळ एकच जाणवतो.

पाळणा मध्ये एका जीवाचा जन्म झाला व कथा संपुष्टात आली. पुनरपि मध्ये दादांचा मृत्यु झालाय आणि तरीही माईची जीवनरेखा चालू रहाण्याची माईची मूक धडपड आहे.

जी.ए. ना कथा आधी सुचून ते लिहावयाचे का कथेचे शिर्षक आधी लिहून ते कथा लिहायचे याबाबत कुठे जास्त ऊहापोह किंवा वेगळे संदर्भ मिळत नाहीत. पण जी.ए.च्या कथेचे शिर्षक कथासार सांगून जाते हे निश्चीत.

DATE 15/07/22

तुम्हाला तो श्लोक आठवतोय का!

पुनरपि जननं पुनरपि मरणम्
पुनरपि जननी जठरे शयनम्!
इह संसारे बहु दुस्तारे,
कृपया पारे पाहि मुरारे।

जन्म मृत्युच्या चक्रामधील आयुष्य हे पुन: पुन्हा मानवाला भोगावे लागते पण मुक्ती क्वचित मिळते। म्हणून कथेचे नाव पुनरपि।

कथेतील भाऊ बहीण एकाच वेळेस जन्मले। भरपूर आनंद दायी आयुष्यही जगले। मात्र आयुष्याच्या उतारावर जातांना मागील दहा वर्षात भावा बहिणींची भेट नाही. जेव्हा भाऊ बहिणीला भेटला तेव्हा बहिणीला जगण्याची जाणच नव्हती तर भाऊ (दादा) त्यांच्या मृत्युनंतर दर दोन दिवसांनी, तिची सर्व माहिती असतांना सुद्धा तिच्या सख्यांची माहिती घेण्याची प्रेमाची आसोशी शेवटपर्यंत टिकवून ठेवतात। खरे कथात जीवन जगण्याचा ध्यास ते धरून आहेत.

आयुष्याच्या उतारावर घराचीही अवकळा झालीय. संभाषण (स्वत: शी व प्रॉपर्टीशी ही) मुश्कील झालंय. भाऊ बक नाहीत. या सर्व काळात ताई बहिनींचा मृत्यू व तो ऐकल्यानंतर दादांची सैरभैर अवस्था व काही दिवसात त्यांचाही मृत्यू या घटनांच्या सुत्यावर, पाकळ्यावर भाई विचारांच्या रवाईत स्वत:ला गुंतवून घेत चालल्या आहेत. त्यांच्या समोर दुसऱ्या बाजूला जन्म घडला आहे तो मांजरीच्या चार पिल्लांचा व उघारनीत एक पोटुशी मांजर पाहून त्या भांबावल्या आहेत. याचे कारण त्यांच्या मनातील विचार वादळ. त्या त्यांच्या स्वत:च्या मृत्युबाबत स्वतःशी विचार करतात की त्या स्वत: या रेषेत कुठे आहेत? दादांच्या हद्दीमध्ये (मृत्युजवळ) की लाडलीच्या पिल्लांच्या बाजूला (नवे आयुष्य जगण्याची इच्छा) त्या विचार आंदोलनात त्या अविरत पण विचारहीन बसून

राहतात.

मृत्यु येतो व येण्याआधी तो त्या वास्तुत वातावरण निर्मीती करतो (कालौघाने ते घडत असते) हे जी.ए.नी घर, घराशेजारचा परिसर, बाग, बागेतील वृक्ष, लता, वेली, फुलझाडे कश्या हळूहळू होणारे, झालेले ऱ्हास जी.ए.नी काही वाक्यात सुरेख केला आहे व मृत्यु हळूहळू घरात कसा प्रवेश करत झाला आहे हे सुचकपणे लिहिले आहे.

मरून जायचे म्हणजे नेमके काय होणार याबाबत माई स्वतःच्या मृत्युबाबत व नंतरचे काहि संबंध राहणार नाहीत याचा विचार करत असतांना तिकडे शेजारी दादींचा मृत्यु शांतपणे घडल्याचे त्यांना समजलेच नाहि. कळलेच नाहि. आणि जेव्हा कळाले तेव्हा दादींना बिन-परतीच्या प्रवासाचे वेळी मात्र एकही शब्द बोलायचे कसे सुचले नाही? इथे त्यांची विचारधारा स्तब्ध होते.

थोडक्यात परत परत जन्म, परत परत मृत्यु, परत परत गर्मी निश्वास हे माणसाचे आयुष्य चक्र असेच चालायचे असेल तर मग मुक्ती केव्हा? असा विचार मनी धरूनच माई हताशपणें पाहात गप्प निर्जीव बसुन राहिल्या.

माहित नसलेले पुढील आयुष्य कंठण्यासाठी, जगण्यासाठी पुनरपि.

—x—

सुनीळ सामंत: संजीवजी सावरगांवकर, आपण अतिशय सूक्ष्मपणे कथा वाचली आहे आणि त्यातील प्रत्येक महत्वाच्या शब्दावर चिंतन केले आहे हे जाणवते. राघवेंद्र आणि दादासाहेब स्वप्ने पहात असताना सटवाई वास्तव पहात असते, हे आपले वाक्य या कथेचा गाभा दाखवते. प्रारब्ध हा आपण वापरलेला शब्द या कथेला नेमका लागू पडतो. पाळणा राघवेंद्रच्या जन्माच्याही आधीचा असणे यातून पुढील पिढ्यांची नाळ व मागील पिढ्यांची स्वप्ने यांचे ते प्रतिक आहे हे आपले म्हणणे विचारणीय आहे.

जीए कोणताही शब्द अनावश्यक लिहीत नाहीत, पण वाचकाला त्या प्रत्येक शब्दाचे महत्व जाणवणे कठीण(माझ्यासारख्याला तर अशक्य) असते. आपल्यासारख्या सूक्ष्म वाचकामुळे तो लाभ होतो.

असेच लिहीत रहा. मनापासून धन्यवाद.

सुनीळ सामंत: संजीवजी सावरगांवकर यांस साष्टांग दंडवत. आपण कथा ज्या तऱ्हेने सूक्ष्मपणे वाचता व त्यावर जितका सखोल विचार, चिंतन करता त्याला दंडवत.

आपण पाहिलेले व वाचलेले पण कथा अनेकदा वाचूनही माझ्या नजरेतून सुटले असे-

१) शिर्षकाचा दूरवरचा अर्थ. पुनरपि श्लोकातून येणारे ध्वन्यार्थ

२) दुसऱ्या गर्भार मांजरीमुळे माईंच्या मनाची अवस्था(हे तर माझ्या अजिबात लक्षात आलेच नसते). हे दुसरे मांजर सुद्धा पुनरपि या शिर्षकासाठी आहे का?

३) ताई आणि दादा यांच्या जीवनातील साम्य आणि भेद

४) पाळणा चा कॅलिडोस्कोप(अहाहा, कसला जबरदस्त विचार आहे हा. )जीएंच्या सर्वच्या सर्व कथांवर कॅलिडोस्कोपीक नवीन कथा होऊ शकते. पण त्या ताकदीचा लेखक पाहिजे. यावर या ग्रुपमधे चर्चा झाली आहे आणि बहुधा कोणातरी कुलकर्णींनी(वैभव बहुतेक की नागेश, प्रमोद, पद्माकर, राम, वीणा, अभय नक्की आठवत नाही पण कुलकर्णी नक्की) अशी एक कथा लिहायला घेतल्याचे वा लिहिल्याचे आठवते. जीएंची कथा(बहुतांश) संपत नाही. ती अनेक शक्यतांना जन्म देते. तसेच दुसऱ्या कोनातून पाहिले तर अगदी वेगळीच असू शकते. जीए हे मुद्दाम करत असावेत.

५) जीएंनी स्टाईनबेक यांचे एक वाक्य एके ठिकाणी लिहीले आहे(या ग्रुपवरील प्रा. जयश्री जंगले यांनी त्याची आठवण करून दिली) Shallow people demand variety. But I have been writing the same story again and again cutting nearer the aching nerve. मी काही लेखक नाही आणि नर्व्हच्या जवळ जाण्याची कुवत नाही. पण या ग्रुपवर होणाऱ्या चर्चेतून असे वाटते की I should be reading the same story again and again cutting nearer the aching nerve. आपण या सर्जरीमधे करत असलेल्या मदतीबद्दल मनापासून आभारी आहे.

विलास वाघोलीकर: 'पुनरपि ' वरील सर्व पाने वाचली. कथेतील वातावरण - भावना - विचार आपण योग्य रीतीने व्यक्त केले आहेत. श्लोकाचा संदर्भ बरोबर आहे. एकाच गावात राहणाऱ्या जुळयांचे भावबंधन हा महत्वाचा मुद्दा आपण मांडला आहे. मला वाटते - या कथेचा हा महत्वाचा पैलू आहे. खूप चांगल्या

पद्धतीने - सविस्तर रीतीने आपण केलेले विवेचन लक्षात राहील. धन्यवाद. विलास वाघोलीकर

जयश्री जंगले : 'पुनरपि' शीर्षक वाचताक्षणी 'पुनरपि जननं... ' हा श्लोक आठवतो.

कथेतील वठत जाणाऱ्या झाडांचा तपशील वाचून एडगर ॲलन पो यांच्या 'हाऊस आॅफ अशर' या कथेची आठवण झाली. त्यात घरातच मृत्यू पावलेली जुळी बहीण आणि तिचे जतन करून ठेवलेले प्रेत आहे. कदाचित् त्यामुळेच असेल, हाऊस आॅफ अशर ची गोठवून टाकणारी गूढ भीषणता 'पुनरपि'त वाटत नाही. शिवाय यात मुला - नातवंडांचा मोगरीच्या फुलांचा उल्लेखही आपला मानसिक भार कमी करतो.

'पाळणा'मधील नवजात अर्भकाचं दृष्टीहीनत्व हे केवळ त्याचं एकट्याचं नाही आणि केवळ शारीरिकही नाही. ते वाचकांसहित सर्व पात्रांचं आहे. तसाच 'पुनरपि' मधला मांजराच्या पावलांनी दबकत येणारा मृत्यू.

शेवटच्या क्षणी नेमके काय वाटते, काय सांगायचे ते कुणालाही कळत नाही.

सुनीळ सामंत: तुमचं शेवटचं वाक्य काळजाला भिडणारं आहे.

बहुतांश व्यक्ती व कुटुंबांतलं हे सत्य जीएंनी या कथेत नेमकं मांडलं आहे.

मृत्यूवर(फ़क्त मृत्यूवर) अशी जीएंची ही एकमेव कथा असावी. त्यांच्या कथेत मृत्यू अनेकवार येतो पण तोच कथेचा विषय नसतो. इथे मात्र अगदी हळुहळू

आलेला, आगाऊ जाणवलेला नैसर्गिक मृत्य़ू आहे. तरीही बोलायाचे राहून गेले ही वेदना ठळकपणे आहे.

महेश आफळे: जीवन आणि मृत्यू म्हणजे एकाच अस्तित्वमुद्रेच्या(नाणी शब्द जी एं च्या बाबतीत चिल्लर ठरतो म्हणून मुद्रा) दोन अभिन्न बाजू आहेत, हे जी एं नी ज्या प्रकर्षाने मनावर ठसवले, त्याला तोड नाही

अस्तिस्त्रोत्र आणि पुनरपि यात ते अविरत मृत्यूचक्र नेमके दिसते

आणि स्वामी त तर माणूस नव्या बीज वेल रुपात आपण कधी न कधी नक्की वर मोकळ्या आभाळात जाऊ ही दुर्दम्य आशा बाळगतो

मृत्यू हे फक्त रूपांतरण आहे, नाण्याची दुसरी बाजू आत्मसात करणे होय

जी एं ची कथा जगताना मृत्यूची रंगीत तालीम अन मरताना जगण्याची रंगीत तालीम दाखवत राहते

प्रयोग मात्र ज्याच्या त्याच्या पाशी

# कथा- पुरुष- जी ए कुलकर्णी- संग्रह रक्तचंदन

सुनीळ सामंत: कथा- पुरुष- जी ए कुलकर्णी- संग्रह रक्तचंदन

जी एंच्या काही कथांमधे नैतिकतेच्या व्याख्येवरच प्रश्नचिन्ह असते. गिधाडे, हिरवी मखमल गोरा हात, जन्म, अंजन, कसाब, अशा काही कथांमधे सामाजिक नैतिकतेत न बसणाऱ्या वर्तणुकीवची जीए दुसरी बाजू मांडतात. एक प्रकारे ते डेव्हिल्स एडव्होकेट होतात असे जाणवते. जीएंची परिणामकारकता इतकी की ती बाजूही आपण समजू शकतो. पुरुष ही कथा मला त्याच मालिकेतली वाटते.

एक भाबडा लेखक विश्वनाथ, प्रत्यक्ष जीवनात अतिशय रुक्ष, त्याची शरीरसुखाला आसुसलेली पत्नी तारा, त्याची वयात आलेली बहिण कुमी आणि या तिघांच्या स्व-भावाचा फ़ायदा घेऊन त्यांच्याशी खेळणारा प्राध्यापक निकम. कथा निकम या पुरुषाबद्दल आहे. विश्वनाथला साहित्यिक असण्याची असोशी आहे. तो त्याच्या छंदात बुडालेला आहे. याचा फ़ायदा घेऊन प्रा. निकम त्याच्या घरी येऊन एकीकडे त्याच्या पत्नीशी शारीरिक लगट करतो. पण त्यात त्याला रस नाही. तिला स्पर्श करताना त्याला शिळ्या भाताला स्पर्श केल्यासारखे वाटते. पण तरीही तो तिचे लाड पुरवतो आणि त्यासाठी पैसे विश्वनाथकडूनच उकळतो. या व्यतिरिक्त बाहेर तो विश्वनाथच्या बहिणीशीही संबंध ठेवून आहे आणि ती त्याच्याशी भावनिक दृष्ट्या गुंतलेली आहे. या साऱ्यामागे निकमच्या आयुष्यात त्याला फ़सवणाऱ्या स्त्रिया आणि घरमालक यांच्यामुळे त्याच्या मनात निर्माण झालेला गंड आहे आणि त्या सर्वांचा सूड म्हणून तो असे वागतो.

ही कथा मला फ़ारशी भावली नाही. (हे वाक्य, तेही या ग्रुपवर लिहिताना मला फ़ार अवघड वाटते आहे)

निकमची बाजू मांडण्याचा प्रयत्न जीएंनी फ़ार ओढून ताणून केला आहे असे मला वाटले.

मला पडलेले प्रश्न

१) प्रत्येकच गैरवर्तनी माणूस आपल्या वर्तनाचा संबंध भूतकाळातील अन्यायाशी जोडू जाईल तर ते योग्य होईल का?

२) लेखकाने समाजातील नैतिकतेच्या कल्पनांवर प्रश्नचिन्ह उभे करणे हे त्याचे एक कर्तव्य आहे हे मान्य केले तरी नैतिकता, मूल्यं आणि सदसदविवेकबुद्धी (morality, values, ethics) यांत फ़रक असावा.

३) वरील दोन प्रश्नाहून वेगळा- एक लेखक म्हणून जीए या कथेत मला तरी convincing प्रभावी वाटले नाहीत. मला असे वाटले की ते त्यांना स्वतःला न पटलेली गोष्ट पटवण्याचा प्रयत्न करत आहेत. निकम बद्दल सहानुभूती निर्माण करताना त्यांना स्वतःअलाही त्यांच्याबद्दल सहानुभूती नाही असे मला इथे जाणवले. मी उल्लेख केलेल्या इतर कथांत मला तसे वाटले नाही. उलट जीएंच्या लेखणीची ताकद इतकी होती की मी त्या व्यक्तीरेखांशी काही प्रमाणात तादत्म्य पावू शकलो. तसे इथे घडले नाही.

या कथेवरील चर्चेत माझे म्हणणे खोडले गेले तर मला आनंद होईल हे मी प्रामाणिकपणे म्हणत आहे. जीएंची एखादी कथा न आवडणे हे मला क्लेशदायक आहे. आणि जे नाही आवडले ते आवडले असे म्हणणे त्याहून अधिक.

महेश आफळे: मी आपले म्हणणे नीट समजून घेतले, सुंदर मांडणी आहे आपली, पण

मी अवश्य लिहीन काही उलट बाजूने यावर. सविस्तर नंतर लिहीन, सध्या एकच नमूद करतो की ही तुम्ही म्हणता तशी निव्वळ सूडकथा नव्हे, आपल्या झोळीत पडले तेच दामदुप्पटीने परत करणे एवढेच नव्हे, याचा शेवट नीट बघितला तर इतके सर्व सहज साधूनही प्रा निकम ला स्वतःचा पराभव झालाय याच जाणिवेने ग्रासलेले दिसते.

कारण विश्वनाथ हे जणू त्याच्या भूतकाळाचे प्रतिबिंब बनून गेलेय, म्हणून केवळ. म्हणजे त्याला सरतेशेवटी आपल्या विजयाचा कुठलाही उन्माद नसून उलट तो स्वतःचाच पराभव केलाय अश्या अपराधी भावनेच्या वळणावर उभा आहे

राहिला प्रश्न नैतिकतेचा. माणसे तिला उजेडात शोधत बसतात आणि ती तर लपलेली असते अंधारात… सदैव

मला तर या कथेतली एकांकिका नेहमीच खुणावते, अजून योग् आला नाही इतकेच

विश्वेश्वर नांदेडकर: जी ए कोणताही खळपुरूष एकदम पूर्णपणे खल दाखवत नाहीत. त्याची ही एक बाजू आसू शकते मग ती तुम्हाला पटो आगर न पटो. पण त्या खल पुरुष कडे त्याच्या वाईट वागण्याचे काहीतरी स्पष्टीकरण असतेच. असे ते कथेतून सांगायचं प्रयत्न करतात बरेचदा ते आपल्याला पटत नाही.

या बाबत प्रदक्षिणा या कथेतील दादा साहेब नाव आता आठवत नाही. याला त्यांनी पूर्ण खळपुरुष दाखवले आहे त्या कथेत दादासाहेबांच्या दुष्ट वागण्याचे कोणतेही स्पष्टीकरण नाही. त्यामुळे अनेकांना ही कथा खूप आवडली आणि त्यांनी पत्र पाठवून जी ए चे अभिनंदन केले. याच्या उत्तरात जी ए नी लिहिले आहे की मला जेंव्हा ही पत्रे मिळाली तेव्हा माझे मत मात्र ती कथा पूर्ण पने फसल्याची माझी भावना झाली. माझी अपेक्षा होती की वाचकांनी कथा वाचल्यावर त्यांना दादा साहेबांची पण एक बाजू आसायला हवी असा प्रश्न पडायला हवा होता.

महेश आफळे: म्हणून तर आता आताच मादक उष्ण भासलेला तारा चा स्पर्श त्या क्षणी त्याला शिळया भातात बोटे खुपसल्या प्रमाणे भासतो

पण कितीही झाले तरी शेवटी पुरुष च तो

पुन्हा तो नंतर कधीतरी त्याच तारा कडे हावऱ्या लालसेने जाणारच

विलास वाघोलीकर: धन्यवाद.

जी एंनी स्वतःच्या कथेची पूर्ण तपासणी केलेली असते. तरी वाचकाला उणीव वाटते अशा जी एंच्या काही कथा असू शकतात हे मान्य केले पाहीजे. l) मलाही पुरुष कथेबद्दल कथानक विस्कळीत वाटते. निकमाचे पात्र मध्यभागी आहे असे वाटतच नाही. जरी त्याच्यामुळे कथेत घटना घडत जातात. 2) हस्तलिखीत लिहीण्याचे विश्वनाथचे बाळबोध लेखकपण - अखेरचा दिवस मध्ये नानांच्या रूपात आले होते. तरीही तो ठीकपणे जगून संसार करतो हा योगायोग वाटतो. 3) निकमांच्या वासना क्रिया उडत उडत आल्या आहेत. रक्तमुखीत वासना

धगधगीतपणे येतात. त्याचा येथे अभाव जाणवतो. ऑर्फियस स्वामी विदूषक - लिहीणाऱ्या लेखकाचा सुरुवातीचा प्रयोग म्हणून या कथेकडे मी पहातो. धन्यवाद.
विलास वाघोलीकर

यतीन गुळवणी : मला पुरुष कथा समजून घेताना पारध कथा समोर आली. योग्य की अयोग्य माहीत नाही पण या दोन कथांची तुलना होऊ शकेल का यावर मी विचार करत आहे.

नेमकं का हे समजत नाही. पण प्रयत्न करतो.

साम्य : पारध मध्ये दादासाहेब पारध करण्यास तर पुरुष मध्ये निकम सूड घेण्यासाठी सावज शोधतात.

विरूद्ध

पारध मध्ये दादासाहेब तोडीचे सावज शोधतात(व डॉक्टर तोडीचे नाहीत म्हणून सोडून देतात अगदी डॉक्टरांच्याकडून फसवणूक होत असल्याचे माहीत असून सुध्दा) तर पुरुष मध्ये निकम आयत्या समोर आलेल्या सावजांवर(विश्र्वनाथ, तारा व कुमी) सूड घेतात.

दादासाहेब बुध्दीमत्ता वापरतात तर निकम तावडीत सापडलेल्या विश्र्वनाथ व त्याच्या घरच्यांना खेळवतात.

एकंदरीत दोन्ही कथेंच्या आराखड्यांत(plots) एक प्रकारच्या समान विचारसरणीची जाणीव होते. आणखी थोडा विचार करून लिहायचा प्रयत्न करतो.

सुनीळ सामंत: पुरुष आणि पारध या कथा खरे तर कालपरवाच संजीवजी सावरगांवकर यांनी वापरलेल्या कॅलिडोस्कोप या शब्दाची आठवण करून देतात. यतीनजी तुम्ही अगदी नेमके हेरले याबद्दल अभिनंदन.

पारध मधल्या डॉक्टरची जागा पुरुषमधल्या निकमने घेतली आहे.

पारधमधे दादासाहेबांना सर्व काही कळलेले आहे. याउलट विश्वनाथ ला निकमने ३५ रुपयांचे ३० केले हे कळूनही बोलायला संकोच वाटतो.

पारधमधे पत्नी डॉक्टरला(परपुरुषाला) दादासाहेंबांच्या निळया धाग्यातल्या नोटा देते तर पुरुषमधे निकम नवऱ्याच्या नोटा बायकोला देतो.

पारधमधले सगळेजण "पोचलेले" आहेत तर पुरुषमधले सगळेजण या ना त्या अर्थाने "बिचारे" आहेत.

कॅलिडोस्कोप किंचित हलवला आणि चित्र पार बदलूनच गेले.

आपल्या सर्व ९८ कथा झाल्यावर अशा जोड्या लावायला हरकत नाही.

हे जीएंनी हेतूपुरस्सर केले यात शंकाच नाही. इथे मला पुन्हा स्टाईनबर्गचे ते जीएंनी उद्धृतकेलेले वाक्य आठवले.

Shallow people demand variety.

But I have been writing the same story through out my life, every time trying to cut nearer the aching nerve.

- Strindberg

सुनीळ सामंत: विश्वेश्वरजी. आपण म्हणता ते खरेच आहे.

उत्तम लेखक कवी हा(पत्रकाराप्रमाणे) प्रस्थापित नितीनियमांबाबत प्रश्न निर्माण करणाराच हवा. श्रेष्ठ आणि ज्येष्ठ यांच्यात तोच तर फ़रक आहे. जे न देखे रवी ते कवीला दिसावे. जीए रूढ अर्थाने कवी नसले तरी काव्याच्या व्याख्येनुसार मी तरी त्यांना कवीच मानतो.

या एका कथेबाबात मात्र मला त्यांच्या लेखणीची ’ती’ चमक जाणवली नाही. मात्र एक. या कथेतही जीए जिथे पोहोचले तिथवर मराठीतले फ़ारसे कोणी पोहोचल्याचे मला जाणवले नाही. (माझे वाचन कमी असल्यामुळे असेल)

सुनीळ सामंत: विलासजी.

१९६३ ची कथा ही जीएंची सुरुवातीचीही नाही. रक्तचंदन हा त्यांचा चवथा कथासंग्रह आहे. कदाचित सुगंध या मासिकाच्या दर्जानुसार त्यांनी दिली असेल.

मनमोहन आंबेकर: जी एं च्या कथेमध्ये, नायक निश्चित करणे, हे माझे मते फार कठिण आहे.

बरेच वेळा, दोन कथा एकाच वेळी समांतर जात असाव्यात असे वाटते. त्यांना स्वतःला रुपक कथा ही संकल्पना स्विकारार्य नव्हते असे त्यांचे पत्र व्यवहारातून दिसते.

विश्वेश्वर नांदेडकर: पण त्यांनी या कथा एकदम अस्विकरार्ह नाहीत हे पण दाखवून दिले. या कथा पूर्णपणे कपोलकल्पित नाहीत जीवनात अनुभवलेल्या किंवा कथित सहाव्या इंद्रियाला जाणवलेल्या या कथा आहेत असे त्यांचे समर्थन होते

मनमोहन आंबेकर: त्यांच्या कथांना रुपककथा असे संबोधले जात आहे, हे त्यांना जाणवले. हे संबोधन त्यांना फारसे रुचले नाही.

बालकविंच्या ब-याच कविता, निसर्ग कविता वाटत असल्या, तरीही त्यामध्ये गूढार्थ व तत्त्वचिंतनात्मक अंतर्भूत होते असे समिक्षकांनी विश्लेषण केलेले आहे. ऊदाहरणार्थ द. भि. कुलकर्णी यांनी.

पु ल यांना एका वाचकाने, तुमच्या प्रत्येक कथेत, लेखात शेवटी कारुण्याची छटा असते काय असे विचारले असता

" माझ्या प्रत्येक कथा, लेखात, कारुण्याची झालर, अगदी सुरवाती पासूनच असते. "

असा खुलासा केला होता.

यतीन गुळवणी : नमस्कार सुनीळसर

थोडी दुरूस्ती

१ विश्र्वनाथ संकोच वाटला तो निकमनी ३५ रूपयांचे ३० केले याचा नाही तर ३० रूपयां आधीचे ३५ रूपये बाकी आहेत(जे निकम सोयीस्करपणे विसरले आहेत)

हे फार महत्त्वाचे नाही.

२ पुरुष मधील( पारधीमधल्या इतके) "पोचलेले" नसले तरी "बिचारे" नाहीत(विश्र्वनाथ सोडून). निकम ठरवूनच त्याना गुरूस्थानी मानणाऱ्या

विश्र्वनाथच्या पत्नी व भगीनी यांच्याशी चाळे करतातच वर त्याला भुलवून, फसवतात.

तारा निकमांशी अनैतिक संबंध ठेवते. शिवाय सहाच महिन्यात वाढदिवसानिमित्त निकमना फसवून पैसे उपटते. कुमी निकमांशी प्रेमाचे खेळ रंगवून त्यांच्याशी लग्न जमवण्याचा प्रयत्न करते. ते नाहीच जमलं तर देशपांडेचा विचार करते. शिवाय तिने सुधाकर नाईकला "स्टॅन्डबाय" वर ठेवलेला आहेच. तात्पर्य पारधी प्रमाणे याही व्यक्तीरेखा बिलंदर आहेत.

पण मुद्दा वेगळाच आहे. मला त्रस्त करणारा भाग असा आहे की थोडा फेरफार करून एका चित्रातून दूसरे चित्र निर्माण केले असावे का?

मला असा विचार करताना फार क्लेश होतो. कारण जीए असे करतील ही कल्पनाच करवत नाही. मानणे दूरच!

अजून दोन्ही कथा परत परत वाचून विचार करतो आहे.

संजीव सावरगांवकर: कथा पुरुष, कथासंग्रह रक्तचंदन. आस्वादक संजीव सावरगांवकर.

G. A. यांच्या सर्व कथा उत्तम, वाचनीय, थोड्या गूढ गर्भित, वेगळा विचार देणाऱ्या असतीलच याला ही कथा छेद देते. हे एकदम प्राथमिक अवस्थेतील लेखन वाटते आणि कथा पसरत गेलेलीच आहे हे ठाम पणे म्हणावेसे वाटते. लेखक विश्वनाथ, तारा, कुमी, निकम अत्यंत सर्वसाधारण पातळी वरील माणसे, त्यांच्या शारीरिक वासना, एकमेकांना वापरुन घ्यायच्या पद्धती अगदी बालिश वाटतात. या व्यतिरिक्त आपण सर्वांनी या कथेवर येवढ्या वेगवेगळया पैलूंनी लिहिले आहे की

मी वेगळे काही लिहावे असे वाटत नाही. खटकते ते हे की मूळ कथा वाचून त्याचे कथा मुल्य जी. ए. च्या ताकदीचे आहे का? नसेल तर का नाही? इतर कथा बरोबर comparison का केली जातीय? ह्या कथेत वासनेने ओथंबलेले निकम, पत्नी सुख नसल्याने ओळखीतल्या तारा करीता "बैलोबा" विश्वनाथ नवरा म्हणुन ठरवितात.

जीए कथा लिहिताना कॅरेक्टर ची नावे शोधून शोधून देतात असं वाटतंय. आजच्या कथेमध्ये कथेचे शीर्षक आहे पुरुष पण कथा नायक आहे बैलोबा विश्वनाथ. त्याचे नाव निवडताना विश्वाचा नाथ हे अभिप्रेत असताना हा या कथेत जवळजवळ अनाथ. साहित्याच्या विश्वात रमणारा पण संसार व व्यवहारात शुद्ध बैलोबा. त्याला स्वतःला हे नाव त्यालाच मिळाल्याचे माहित नाही. इतका आत्ममग्न  ओबडधोबड शरीरचना, अंगावरचे कपडेही धड नाहीत, म्हणून व्यंग अर्थाने पुरुष पण व्यवहारात बैलोबा हा आपला कथानायक. त्याची बायको तारा, बहीण कुमी व  प्राध्यापक निकम ( त्यांचे नाव नाही पण आडनावच आहे)  इथे स्त्री कॅरेक्टर्स यावर कथासंपन्न होते. कथेचे मध्ये प्रत्येक ठिकाणी संयतपणे वासनेचा वापर केलेला असून कथानायक सोडला तर बाकी जण त्यात जास्त गुंतलेले दिसतात. आपण कदाचित सर्प लीला  या बाबत वाचलेले असेल. दोन्ही सापांची ती नैसर्गिक धमक ,त्यांचा उभार, त्यांचे आकर्षण, असोशी, ते सर्प युगुल द्वीपेढी वेणी सारखे कायम सळसळत राहून जमिनीचा कणभर आधार घेत बेभानपणे सर्प नृत्य करत असतात. बेभानपणे जगतात आणि निवतात. शांतपणे निघून जातात. आता हे त्यांचे शारीर आकर्षण का निसर्गदत्त संयोग हे ज्याचे त्याने आपापल्या परीने ठरवायचे आहे. प्रत्येकाचा दृष्टिकोन वेगळा असेल. इथेही आणि कथेमध्ये या कथेत वासना शिरते ती प्राध्यापक निकम यांच्या प्रवेशाने. सूचक ,संयत पण ठोसपणे दिसणारी एकमेकांची ती नाती ही तीन पिढी वेणी सारखी नुसतीच विसावणारी आणि

त्यातील तिसरे पेड कायमच न्यूट्रल. म्हणजे आपला कथानायक विश्वनाथ. त्याचे काय नशीब तर तारा  हे निकमाने सुचविलेले, पुढे आणलेले स्थळ. तिच्या लग्न बैलबा विश्वनाथ ची झालेले पण तिचे उत्सुक शरीर ,निकम्मांना तिच्या डोळयांची आठवण येऊन त्यांचा देह  सुखावतो. तिच्या वासनेची धग,  उफाड्याचे आणि वाढलेले उत्सुक शरीर निकम यांना आव्हानच देते. विश्वनाथ च्या घरी आल्यावर ती तिचा गोरा दंड दिसल्यावर ते चळल्यासारखे होतात.  ताराने सवयीने सर आले हे सांगून सराईत पणे दरवाजाला कडी  घातली. लाटेवरून पांढरी किनार यावी तशी ती पूर्णपणे त्यांच्याकडे आली मग तिचा चेहरा धुंद होऊन शांत झाला. आणि निकमंच्याकडे तिने रक्कम मागितली एक पातळ घेण्यासाठी.  निर्ढावलेली अभिसारिका आहे ती कारण तिच्यामागे कुंकवाचे बळ आहे आणि आत्मविश्वास आहे की बैलोबा साहित्यात रममाण होणारा, प्रेमात, संसारात व रमणी मध्ये नाही. बायको मध्ये तर नाहीच नाही. पण त्याच्यात ती धग कुठे दिसत नाही. असा हा पुरुष का एक कापुरुष असा प्रश्न पडतो व कथा वाचून संपल्यानंतर विश्वनाथ याचे षंढत्व लक्षात येते.

महेश आफळे: अमान्य

प्रतिवाद मी नक्की मांडीन इथे लवकरच

संजीव सावरगांवकर: चालेल.

शिवाजी कुऱ्हाडे: रक्तचंदन आणि निळासावळा हे कथासंग्रह जी. एं चे अगदीच सुरुवातीचे आहेत. त्यामुळे जास्त अपेक्षा ठेवू नयेत असे वाटते.

महेश आफळे: समागमाच्या अत्त्युच्च उत्कट कडेलोट क्षणी पुरुष जसा हतवीर्य होऊन बावळट होतो -दिसतो, निदान स्वतःला तरी

या कथेतला प्रा निकम सरतेशेवटी याच मानसिक अवस्थेत आहे

कारण विश्वनाथ हे आपले प्रतिरूप आहे

पुरुषी अहंकार- इगो आणि पुरुषार्थ या सर्व व्याख्या पुन्हा तपासून पाहायला लावणारी ही कथा

विश्वेश्वर नांदेडकर: एखादे कथाबिज लेखकाला आकर्षित करते पण एकाच प्रयत्नात त्यांना अपेक्षित परिणाम मिळत नाही त्यावेळी तो थोडाफार फरकाने दुसरी तिसरी कथा लिहितो. त्यावेळी असे होते.

नासिर हुसेन ने सुरुवातीला एकच कथेवर दिल देके देखो, तुमसा नाही देखा, फिर वही दिल लाया हू आणि जब प्यार किसिसे होता है हे चार सिनेमे सात वर्षात बनवले. चारही उत्तम चालले. तसेच लेखकाच्या बाबतीत ही जाणवते. शिवाजी सावंतांच्या मृत्युंजय कादंबरी नंतरच्या कादंबऱ्यांवर ही छाप स्पष्ट जाणवते

दिलिप बडे: पुरूष'1)खेळ इतक्या गंभिरपणे खेळायचा नसतो. असे म्हणत इनामदार बरोबर नाते जोडणारी पत्नी मंदाकिनी 2)चेअरमनला नमस्कार केला नाही

म्हणुन नोकरी वरून काढुन टाकण्याची घटना 3)वाढवलेल घरभाडे दिल नाही म्हणुन पाऊस पडत असता घरमालकाने घरावरील कौले काढल्याची घटना 4)तारा, कुमी, विश्वनाथ यांच्या मध्ये सुद्धा स्वतःचा भाबडेपणा, स्वतःला झालेली वेदना निकमांना जाणवली. या सर्व पात्रांकडे निकम खेळातील प्यादी म्हणुन पाहतात. खेळ मात्र भाबडेपणा मुळे झालेल्या वेदनेत आहे. ही वेदना कमी करायची असेल तर गोरिलाची क्रूर बोटे आणि लाबं धारेची सुरी जाड मानेत रूतायला हवी.

सुनीळ सामंत: Shallow people demand variety.

But I have been writing the same story through out my life, every time trying to cut nearer the aching nerve.

- Strindberg

हे उद्धरण पुन्हा एकदा देत आहे.

लेखक एखाद्या कथाबीजावरून एक कथा लिहितो(किंवा सिनेमा, किंवा कविता) त्यावेळी जर तो १०० टक्के समाधानी झाला तर तो खरा कलाकारच नव्हे.

कलाकार आपल्या निर्मितीबाबत कायम असमाधानी असावा. आपली सर्वोत्कृष्ट कृती अजून जन्माला यायची आहे असेच त्याला वाटत रहावे आणि त्यासाठी तेच कथाबीज घेऊन पुन्हा पुन्हा समाधान होईपर्यंत कलाकार ते लिहीत राहील.

अनेक चित्रकारांची चित्रे तशीच वाटतात. याचेही कारण तेच असावे.

गौरी देशपांडे: खरंय... चित्रकाराच नव्हे तर संगीतकार सुद्धा याला अपवाद नसतात. कितीतरी उत्तम संगीतकारांनी त्यांच्या अनेक सुंदर रचना रचण्यासाठी एकाच रागाची निवड केली. कारण एकच rag त्यांना समुद्रासारखा खोल दिसत असतो.

महेश आफळे: 100% सत्य

असमाधान-अतृप्ती खेरीज नवनिर्मितीच शक्य नाही

जयश्री जंगले : 'पुरूष' ही कथा आत्ता माझ्यासमोर नाही. पण तरी काही प्रश्न आहेत -

१. निकम सगळ्यांना खेळातली प्यादी समजतात.

खेळ कोणता?तो खेळण्यात निकमांचा फायदा काय?

२. दादासाहेब तोडीचे सावज शोधतात. कशासाठी? डॉक्टर तोडीचे नाहीत, असं त्यांना का वाटतं? मुळात पारध कोण करत आहे?कशासाठी?

: अगदीच निरर्थक वाटत असतील प्रश्न तर सोडून द्यावेत.

एखाद्या कथेत जी. एं. ची भट्टी जमली नसेलही. पण ते काही गंभीर सांगावयाचे नसल्यास कथानिर्मिती करतील असं वाटत नाही. आणि 'सुगंध'साठी म्हणून यथातथा? तसं पटत नाही फारसं.

महेश आफळे: पुरुष ही मला व्यक्तिशः अत्यंत यशस्वी कथा वाटते

पत्त्यांचा बंगला कोसळण्यासाठी एक पत्ता कोसळणे पुरेसे असते. इथे पुरुषी अहंकार-वासना यांची अध:पतनाची दहीहंडी अशीच कोसळलेली दिसते. पात्रे एकमेकांना घेऊनच कोसळतात. आणि पात्रे कोसळली म्हणून कथा अयशस्वी ठरते असे नव्हे

जयश्री जंगले : बरोबर.

ती का आणि कशी कोसळतात हे कौशल्याने दाखवले असेल, तर ती यशस्वी कथा.

महेश आफळे: तेच तर दाखवलंय कथेत चपखल

भाबड्या सुमार लेखकांचा कधीच तोटा नसतो आपल्याकडे.. विश्वनाथ त्यांचे प्रतीक. आपण पुरते नागवले जातोय याची त्याला जाणीव देखील नाही

पण असा विश्वनाथ देखील तोच एक हुकुमी एक्का ठरतो, तथाकथित विजयानंतरही निकम सरांना पराभवाच्या शेवटी खोल गर्तेत नेणारा

दिलिप बडे: मी तीन मुद्दे लिहीले आहेत. 1)पत्नीने केलेला विश्वासघात - फसवणुक 2)क्षुल्लक कारणावरून नोकरीतून काढल्याचा अपमान 3)पाऊस पडत असताना घराची कौले काढुन घरमालकाने दिलेला पश्चाताप. अशा घटनातून माणुस विष्यन्न होतो. नैराशातून काही चुका करून बसतो. जसं मनासारखं काही घडत नसेल तर माणुस व्यसनी बनतो. पण मुळातून अशी माणसे सस्कांरीच असतात.

निकम सर 25टाय वापरायचे, रूमालाला कोलन वॉटर लावायचे. कविता करायचे. पत्रे लिहायचे. विषन्नतेत त्यांनी कुमा-तारा-विश्वनाथचे शोषण केले. माझ्या गत आयुष्यात भाबडेपणाचा पांढरा कोंब होता. या मुळे माझी नोकरी गेली. पत्नीने फसवले. घरमालकाने त्रास दिला. त्याचा गर्भपात झाल्या शिवाय आपली सुटका नाही. तो कोंब डागण्यासाठी जास्त प्रखर डागण्या हव्यात.

सुनीळ सामंत: उत्तम.

सर्वांची मते ऐकल्यावर पुरुष कथा पुन्हा वाचत आहे.

या कथासूत्रावर १९७० नंतर जीएंनी काही लिहिले आहे का तेही शोधतो.

आणि कथेचे शिर्षक ’पुरुष’ का आहे त्याव्रही विचार करतो.

दिलिप बडे: निकम सर म्हणतात माझ्या भाबडेपणाचा फायदा घेऊन मंदाकिनी-प्रिन्सिपॉल-घरमालक यांनी मला वेदना दिल्या. पण कुमा-तारा-विश्वनाथ यांच्या भाबडेपणाचा फायदा निकम सरांनी घेतला. चौघांची वेदना सार्वत्रिक आहे. या वेदना तुमच्या माझ्या सर्वांच्या आहेत. मुख्य मुद्धा वेदनेला डाग देण्याचा आहे. ज्या मुळे वेदना शमेल.

श्रीकांत देशमुख : फार छान चर्चा व विश्लेषण. या समुहावरील चर्चेत अनेक आयाम उलगडत जाते. आणि अनेक बाबींवर प्रकाश पडतो.

परमजित सिंग: मला फक्त इथे हेच सांगायचं आहे की. ही कथा जमली नाही किंवा असेच काही तरी जी ए नी लिहून प्रकाशित केले असे होत नाही जी ए नी हजारो कथा मनाला पटल्या नाहीत म्हणून फाडून फेकून दिल्या. जो पर्यंत त्यांचे समाधान होत नव्हते तो पर्यंत ते काहीच प्रकाशित करत नसत.

मनमोहन आंबेकर: हे तुमचे अवलोकन अत्यंत महत्त्वाचे आहे.

जी ए त्यांना उचित वाटल्या शिवाय कथा प्रसिद्ध करत नसत. कोणत्याही कथांचा तौलनिक आढावा घेणे रास्त वाटत नाही.

प्रत्येक कथेमध्ये वेगवेगळे शक्तीस्थान, सौंदर्य स्थान अतर् विरोधी मुद्दे असू शकतात.

कोणाला कोणता जाणवेल हे सांगणे कठीण. माझे याचाच ऊहापोह व्हावा असा ग्रुपचा ऊद्देश असावा.

कोणाचेही अवलोकन चूक किंवा बरोबर असे म्हणणे बरोबरच ठरणार नाही.

जी एंचेच मत पाहता सत्याचे अनेक पैलू असतात.

सर्व एखाद्यास ज्ञात आहेत असे कोणीही समजणे चुकीचे आहे. या शिवाय ते व्यक्ती व कालसापेक्ष देखील आहे.

हाच दृष्टीकोन त्यांचे कथांना लागू होतो, असे मला वाटते.

दिलिप बडे: आपल्याला काय वाटते हे सांगण्यासाठीच हा ग्रूप आहे. आपले मत कुणाला पटेल न पटेल हा मुद्धा विचारात न घेता आपण व्यक्त व्हायला पाहीजे. हे स्वातंत्र्य येथे आहे. अनेक मते येऊन कथेची मांडणी अचुक होईल. 2)जी. एं. नी सर्व कथा परिपुर्ण झाल्यावरच त्या प्रकाशीत केल्या हे सिंग यांच मत 100% बरोबर

आहे. पुरूष ही कथासुद्धा परिपुर्ण आहे. या कथेत जी. एं. नी कुठेही कथामुल्य हरवलेल नाही.

परमजित सिंग: मला ही हेच म्हणायचे आहे. आता पाहा काही लेखकांना एक शब्द सुचत नाही. जी ए नी एका एका शब्दा वर चार चार उपमा देतात आता पारधी मध्ये यल्लु भीमा ला प्रत्येक वेळी एक शब्द...... त्याचा चेहऱ्यावर खुळया वासराची काळा होती.... त्याच्या जुन्या वहाणा सरख्या चेहऱ्यावर वर हर्ष दिसला असता की नाही.... तो कपड्याचा चींध्या नी शिवल्या प्रमाणे अगदी फाटक्या अंगाचा होता...... असला फडतूस माणूस. ताण ओसरल्यावर यालु भीमा ओल्या भिंतीवरील पोपड्य आ सारखा झाला होता..... यलू भीमा चे माळके कपडे त्याने नमस्कार साठी उचल लेले कुत्र्या च्य्या पाया सारखे हात...... अश्या अनेक उपमा देतात. इतक्या सहज सहजी होत नाही.

निकम बदल ही एक दोन दिवसात लिहणार आहे

महेश आफळे: जी एं ची प्रत्येक कथा म्हणजे परिपूर्ण रसरंगगंधयुक्त संजीवक शिल्प आहे. निव्वळ शब्दचित्रांच्या पलीकडली.

मानवी इंद्रियांना इतक्या मर्यादा आहेत की आपण साधा एखादा रबरी चेंडू देखील संपूर्ण समग्र नजरेच्या कवेत घेऊ शकत नाही(कोणताही गोल आपल्याला अर्धगोलच दिसतो). त्यामुळे कितीही चर्चा झाली, मुद्दे ताणले तरीही जी ए कथारथ चार अंगुळे वरूनच चालतो

मनमोहन आंबेकर: कदाचित या पार्श्वभुमी मुळेच, जी एंची ही कथा जमलेली नाही, हे वाक्य खटकते.

तरी देखील, प्रत्येकास त्याचे स्वतंत्र मत असणे व त्याने ते मांडणे हे उचित आहे.

जयश्री जंगले : बरोबर. म्हणूनच मी काही प्रश्न उपस्थित केले होते.

परमजित सिंग: अश्या चर्चा होऊ शकतात आणि झाल्याचं पाहिजेत पण कृपया जी ए नच्या कथा लिहणे च्यय सामर्थ्या बद्दल काही शंका उपस्थित करू नयेत

महेश आफळे: आपण काही मिळवतो त्या क्षणी काहीतरी संपूनच गेलेले असते. पारध वा पुरुष वाचताना याचे भान ठेवल्यास नवी दृष्टी प्राप्त होऊ शकते वाचताना

विश्वेश्वर नांदेडकर: एकदम खरे आहे. ज्या धेयाच्या पाठीमागे आयुष्य भर पळालो ते ध्येय गाठता एक मोठी पोकळी, आता मिळवायचे काहीच राहिले नाही ही भावना, आता पुढे काय ही भावना येतेच येते

दिलिप बडे: डॉक्टरांनी माईंची शिकार केली. दादासाहेबांची शिकार झाली.

संजीव सावरगांवकर: या सर्व विचारांच्या धबधब्यात पार गुदमरून गेलो तरीही चर्चा आनंददायक वाटली. धन्यवाद

जयश्री जंगले : आता मिळवायचे काहीही राहिले नाही यापेक्षाही मिळवले ते फोल होते, ही भावना.

संजीव सावरगांवकर: ओंजळ रिती होण्यासाठी ती भरावी लागते. मगच रिते पणा समजतो.

गौरी देशपांडे: फलश्रुती झाल्यानंतर ते फल हा एक आभास होता ही भावना G. A. यांच्या प्रत्येक नायकाला शेवटी होतेच. पण हा अनुभव घेऊन वाचक स्तंभित होतो.

सुनीळ सामंत: पुरुष आणि पारध या कथांवर फार उत्तम चर्चा चालली आहे. वेगवेगळी मते व दृष्टिकोन वाचायला मिळत आहेत. त्यामुळे ही चर्चा अजून थोडे वेळ चालू ठेवू. खरे तर त्याच धरतीची प्रदक्षिणा ही कथा आज चर्चेला येणार होती पण ती थोडी पुढे ढकलत आहोत मात्र सर्वांनी प्रदक्षिणा ही कथा वाचून ठेवावी. दादासाहेब या व्यक्तीची ओळख या कथेतून होते व ही कथा वाचताना पारध व पुरुष या कथांची आठवणही होते. या कथेवरही चर्चा रंगावी.

# प्रदक्षिणा(काजळमाया) ही जी ए कुलकर्णी

सुनीळ सामंत: प्रदक्षिणा(काजळमाया) ही जी ए कुलकर्णी यांची एक अत्यंत कौशल्य पूर्ण रचना म्हणावी लागेल. एकाच ठिकाणी, अगदी एकाच ओसरीवर घडणारी ही घटना आहे. साधारण पाच ते सहा तासात ही घटनांची मालिका संपते. जणू काही एक नाटकच. नाटकाच्या सुरुवातीला निलगिरीच्या उंच झाडाप्रमाणे उंच उंच वाटणारे दादासाहेबांचे व्यक्तिमत्व कथेच्या शेवटी खुरटे होऊन जाते.

दादासाहेब यांचा नुकताच मृत्यू झालेला आहे. गेले काही दिवस सारी वर्तमानपत्रे त्यांचे गुणगान गात आहेत. सकाळपासून संध्याकाळपर्यंत त्यांच्या पत्नीला शांताक्काला भेटायला लोकांची रीघ लागलेली आहे. घरामध्ये त्या निमित्ताने प्रथमच शांताक्काची बहीण जान्हवी, मुलगा रामकृष्ण आणि घराच्या मागे दादासाहेबांचा सख्खा भाऊ ही माणसे सुद्धा जमलेली आहेत. आबाजी हे दादासाहेबांचे मानलेले भाऊ या सर्वांची सोय पहात आहेत.

जान्हवी जायला निघते तेव्हा तिचे आणि दादासाहेबांचे संबंध शांताक्काला कळतात तर जान्हवीच्या मनामध्ये(दादासाहेबांनी) काय(भरवले) होते ते जान्हवीच्या तोंडून शांताक्काला कळते. ते इतके भयानक असते की शांताक्का आयुष्यात प्रथमच बहिणीवर हात उचलते. मुलगा रामकृष्ण लग्नानंतर प्रथमच घरी आला आहे त्याला शांताक्काने दादासाहेबांच्या म्हणण्यानुसार जे पत्र पाठवले त्याने तो दुखावलेला आहे. दादासाहेबांनी शांताक्काबद्दल त्याच्या मनात जे विष कालवले त्यामुळे तो आईचा द्वेष करतो आहे. हेही शांताक्काला आत्ताच कळते. जेव्हा दादासाहेबांच्या भाऊ बाहेर पडतो तेव्हा शांताक्काला कळते की ज्या

अफरातफरीसाठी तिने त्या भावाला घराबाहेर काढले होते ती अफरातफर खरे तर दादासाहेबांनीच केली होती. यानंतर दादासाहेबांनी मानलेला भाऊ आबाजी घरी जायला निघतो. तेव्हा शांताक्काची समजूत असते की आबाजीला दादासाहेबांनी हजारो रुपये दिलेले आहेत. परंतु आबाजी सांगतो की ते सर्व पैसे दादासाहेबांनी स्वतःच घेतले. शेवटचा घाव पडतो तो दादासाहेबांच्या मृत्युपत्राचा. मृत्युपत्रात दादासाहेबांनी आपली सर्व संपत्ती शांताक्काची बहीण जान्हवी आणि मुलगा रामकृष्ण यांना दिलेली असते. घर भावाला दिलेले असते. ज्या घरातून शांताक्कांनी त्या भावाला घराबाहेर काढल ते घर अखेरीस भावाकडे येते व भाऊ मोठ्या मनाने शांताक्काला ते देतो.

अतिशय घट्ट विणीची ही कथा आहे, . यातले प्रत्येक बंध, प्रत्येक नाते आणि प्रत्येक घटना इतक्या सहजपणे एकमेकात गुंफलेली आहे की एखादा कुशल कलाकारच ते करू जाणे. यात प्रत्येक घटना दादासाहेबांच्या दुहेरी ढोंगी व्यक्तिमत्त्वाचा एक एक पैलू दाखवत जाते. वाचताना ते कुठेही अवास्तव वाटत नाही. कथेची भाषा, कथेतील वेगवेगळ्या उपमा, या तर खास जीए शैलीतीलच आहेत आणि त्या वाचताना कथेचा संपूर्ण पट डोळ्यासमोर उभा राहतो.

पारध, पुरुष आणि प्रदक्षिणा या जीएंच्या वेगवेगळया काळात लिहिलेल्या परंतु काही साम्य असलेल्या कथा आहेत हे मला आत्ताच जाणवले. या तीनही कथांमध्ये स्त्रीलंपट पुरुष आहेत. दुहेरी ढोंगी जीवन जगणारे पुरुष आणि त्यांच्याभोवती भोळे सरळमार्गी स्त्री-पुरुष असा खेळ जीएंनी या तीनही कथांमध्ये रचलेला आहे. परंतु कथेची वीण पाहता प्रदक्षिणा ही कथा अत्यंत कुशल कुसरीची आहे.

जीएंच्या कथांमध्ये सहसा खलपुरुष खलनायक किंवा खलनायिका नसते. परिस्थिती वा नियती हीच खलनायक असते. उलट सामाजिक दृष्ट्या अनैतिक मानल्या गेलेल्या कृत्यांच्या समर्थनार्थ(किंवा त्यांची दुसरी बाजू दाखवणाऱ्या) अनेक कथा आहेत. मात्र प्रदक्षिणा ही कथा तर सरळ सरळ एक खलपुरुष व त्याने ज्यांचे आयुष्य बिघडवले असे अनेक जवळचे लोक अशा प्रकारची कथा आहे.

या कथेमध्ये मला तरी कोणतीही तात्विक चर्चा दिसली नाही जी मला जीएंच्या सर्वच कथांमध्ये दिसते. तशा तत्त्वज्ञानात्मक कथांमुळे जीएं चे एक विशिष्ट स्थान त्यामुळे माझ्या मनात निर्माण झाले आहे. मात्र सामाजिक दृष्ट्या खरोखरच फार चांगले काम करत असलेल्या एखाद्या व्यक्तीचे व्यक्तिगत आयुष्य अतिशय खलनायकी असू शकते याची जाणीव मात्र ही कथा अधोरेखित करते. या अर्थाने ही एक वेगळी कथा आहे.

यतीन गुळवणी : सुनीळसर

आपण छान आटोपशीर व पूर्ण विवेचन केले आहे.

आपण पारध, पुरूष या कथांचा उल्लेख प्रदक्षिणा या कथेच्या संदर्भात केला आहेच तर त्या अनुषंगाने पराभव या कथेचा विचार करता येईल. प्रदक्षिणा कथेतल्या प्रमाणेच दादांच्या कथित गैरकृत्यांमुळे माधवची आई व बहीण एकमेकांपासून दुरावल्या. अर्थात प्रदक्षिणा कथेतल्याइतका दादासाहेबांच्या मृत्यूनंतर त्यांच्या(गैर) वर्तनाचा ढळढळीत पुरावा पराभव कथेत दादा मागे न ठेवता परागंदा होतात. पण परिणामी दोन्ही परिवारांत मागे राहिलेल्यांना त्रास होतो.

विश्वेश्वर नांदेडकर: मी या आधीही सांगितले आहे की जी ए नी त्यांच्या या कथेला एक फसलेली कथा म्हटले आहे. त्याचा उलगडा करताना त्यांनी एका पत्रात असे म्हटले आहे की मला आणेकानी खूप चांगली कथा लिहिली म्हणून अभिनंदन केले व कथेची तारीफ केली. पण मला हे अपेक्षित होते की या कथेत दादा साहेबांची ही एक बाजू असणार आहे. ते मेल्यामुले त्यांची बाजू मांडणारे कोणी नाही, पण वाचकांच्या मनात या बाबत विचारमंथन व्हायला हवे होते पण दुर्दैवाने कोणीही तसा विचार केला नाही त्यामुळे मला ही कथा फसलेली वाटते. माझ्या कडे पत्रव्यवहार चे खंड नाहीत नाहीतर पूर्ण संदर्भ दिला आसता.

आपल्या ग्रुप मध्ये मराठी नाट्य परिषदेचे कोषाध्यक्ष नाथा चितळे आहेत त्यांनी एका राज्य नाट्य स्पर्धेत या कथेवर नाटक बसवले होते त्यात त्यांनी दादासाहेब भिंतीवरील फोटो मधून आपली बाजू मांडतात असे दाखवून दादासाहेबांची बाजू मांडली होती, आणि ती अतिशय पटणारी होती. मी त्यांना विनंती करतो की त्यांनी सविस्तर ती बाजू येथे मांडावी

दिलिप बडे: https://youtu. be/iw-xBbmLul4

दिलिप बडे: ऐसी अक्षरे रसिके या मालेत शरद आढाव यांनी युट्युबवर ही कथा प्रसारीत केली आहे. 1. 25लाखावर व्युव्हआहेत. काॅपी राईटचा मुद्धा ऊपस्थित होणार नाही. तरी कथा श्रवण व्हावे. विनंती आहे.

विलास वाघोलीकर: - या कथेचे सूतोवाच माननीय सुनीळ सामंत यांनी मुद्देसूदपणे केले आहे. या मोठ्या कथेचा, थोडक्यात आढावा घेतला आहे. धन्यवाद.

- कथेत, दादासाहेब हे यशस्वी पुढारी दाखवले आहेत. ते ग्रामकेंद्रे चालवतात. अनाथाश्रम सुरू करतात. दलित कल्याण केंद्रे सुरु करतात. त्यांच्या बँकेत ओळखी असतात. ते दौरे काढतात. फंड जमवतात. पेपरमध्ये त्यांच्या बातम्या येतात. कोणी त्यांचा अर्थपुतळा करतात. निधनानंतर लोकांची रीघ लागून फुले वाहून श्रध्दांजली अर्पण केली जाते.

- पण ते रमी(पैसा) रमा यांचे लोभी आहेत. आबांना ढोंगीपणाने पैसे देवून, मृत्यूच्या सहा महिने आधी( त्यांना मृत्यूची चाहूल लागली असेल का?) पैसे काढून घेतात. मोठे घर असते नोकर, स्वयंपाकीण असतात. पुण्यात जान्हवीकडे मुक्काम करतात.... नाटकी रडतात. थापा देवून लोकांना भूलवतात, गुन्ह्यांमध्ये अडकवतात. यशस्वी, लोकसंग्राहक पुढारी असेच असतात. स्वातंत्र्य मिळाल्यावर एकपक्षीय लोकशाहीत, जिल्ह्या - जिल्हयात असे पुढारी झाले आहेत.

- भोवतालची माणसे त्यांच्यापुढे दबून असतात. अशा लोकांचे कुटुंब कसे असते, हे या कथेत आले आहे.

- विशेषतः बायको - शांताक्का दबलेली असते. तिला बाहेरचे व्यवहार कळतही नाहीत. त्यांना पैसा दिसतही नाही. त्यामुळे दादासाहेबांचे कारनामे सहजपणे चालतात. ते सहजपणे एकतर्फी मृत्यूपत्र करतात. शांताक्काना कथेच्या दिवशीच ते कारनामे कळतात. राजाभाऊ, रामकृष्ण, आबा व शांताक्का यांचा एकमेकांशी संपर्क, अनेक वर्षे नसतो. कदाचित त्यांच्या राग येण्याच्या स्वभावानेही, माणसे आणखी तुटतात. व शेवटी शांताक्का व प्रत्येकजण विलग होतो. जी एंनी,

विलगपणा व एकाकीपणा हा मानवी जीवनाचा शाप आहे, हे कथेत प्रखरपणे दाखवले आहे. त्यामुळे ही कथा यशस्वी झाली आहे. धन्यवाद. विलास वाघोलीकर.

मिहीर ठकार: प्रदक्षिणा

औक्षणाच्या तबकातील सुपारी जशी फिरवली जाते, तेच नेमके वाटते 'प्रदक्षिणा' वाचताना !

जिथून सुरु केली तिथेच येऊन पोहोचलो तर ती प्रदक्षिणा. तुरुंगात इतके अत्याचार सोसूनही डोळ्यातून पाणी न काढणारे दादासाहेब मनाने किती कणखर असले पाहिजेत, पण एका अनाकर्षकाकड़े ते ओढले जावेत हे अस का?

त्या नंतरचा खलपुरुष मामाच्या हस्तक्षेपाने झाकला जातो, पुन्हा सत्पुरुष होतो आणि शेवटी खलत्व उघडे पडतेच.

'खूप सोसले बाईने' असे जिच्याबद्दल वाटते ती कदाचित कर्मांचे न्यायदान भोगीत आहे. तिच्या दृष्टीने कर्मफेरा(प्रदक्षिणा) पूर्ण झाला.

मिळालेल्या वाईट वागणुकीचा वचपा काढायची संधी असताना त्यावर गंगाजल ओतून त्याचे तीर्थ करणारा राजाभाऊ, त्याने वेगळ्या पद्धतीने पूर्ण केलेली प्रदक्षिणा.

जे चांगले वाटते ते वाईट ठरते, जे वाईट भासते ते चांगले दिसते. आयुष्य पूर्णत्वाला येत असताना देखील चांगल्या वाईटाचा हिशेब करता येत नाही.

प्रदक्षिणा सातत्य दाखवते, कधी देवाचा चेहरा कधी पाठ दाखवते.

बाकी "आयुष्यावर पडलेली हीच काय ती पाच सहा बेलाची पाने... " हे वाचून आपण कुठेच नाही हे फार जाणवले..

मिहीर ठकार

दिलिप बडे: कथेची सुरवात दादासाहेबांच्या अर्धपुतळ्या समोर होते. आणि शेवट, शांताक्का पुर्णपुतळ्या सारख्या दादासाहेबांच्या अर्धपुतळ्यासमोर बसुन राहतात. अशी प्रदक्षिणा पुर्ण होते.

+91 94053 43507: दुःखाच्या कार्यकारण भावापेक्षा माणसामाणसातील भावसंबंधांवर त्या दुःखाचा होणारा परिणाम यावर लक्ष वेधण्याचा प्रयत्न जीए त्यांच्या कथांमधून करतात.

मृत माणसाच्या बेगडी सामाजिक प्रतिमेवर त्याच्या मृत्यूनंतर लगेच ओरखडे काढून त्याच्या मृत्युपेक्षाही जगणाऱ्यांचे जगणे पश्चात्तापदग्ध करून टाकणारी 'प्रदक्षिणा' ही कथा आहे.

प्रत्येक पात्राला स्वतःच्या नव्या दृष्टीकोनाचा पण पश्चात्तापाचा तोच आरसा फिरून दाखवणारी ही कथा आहे.

दिलिप बडे: सर्व नाती, सर्व आशय शांताक्का भोवती फिरत राहतो. ही कथा नायिका प्रधान आहे. आजुबाजूला सर्व नाती असतात. तरीही प्रत्येक व्यक्ती म्हणजे एक स्वतंत्र मशिनच असते. स्पेशल आणि एकाकी.

॥ श्री ॥

PAGE NO. 1
DATE 25/04/22

कथा: प्रदक्षिणा कथासंग्रह: काजळमाया.
संजीत सावरगांवकर 7350002870

कथेला समर्पक शिर्षक असणे हे तर जी.ए. यांचे वैशिष्ठ्य. प्रदक्षिणा हे शिर्षक वाचल्यानंतर वाचक विचार करतो कशाची प्रदक्षिणा, कोणा भोवती प्रदक्षिणा. कशा करीता प्रदक्षिणा आणि त्याच्या मनात येणारा सामान्य विचार असतो, अर्थ असतो, एखाद्या भोवती फिरणे, किंवा देवाला प्रदक्षिणा घालतो तेव्हा एक वेगळा भाव असतो. प्रदक्षिणा, कार्यभाग पूर्ण झाल्यावर देवाला नमस्कार करून आपण समाधानाने बाहेर पडतो. या कथेमध्ये मात्र तसे होत नाही. कथेमध्ये प्रदक्षिणांची मुळमुळेच्या होतो, चक्रव्युहात अडकल्यासारखे होते व कथा वाचतांना आपण चक्रात सापडतो, कथेतून, कथेतील कॅरेक्टर मधूनही आपण बाहेर पडु शकत नाही.

दुसरा मुद्दा लेखकाने कथा लिहिली आणि वाचकाने वाचना साठी, तिचा उपभोग घेण्यासाठी. आनंद घेण्यासाठी सुपुर्द केली की ती कथा, तिचा आस्वाद आपापल्या वकुबाने घेतला जातो. ओशो बरेच वेळा सांगतात तुम्हाला जे वाचायचे आहे तेच तुम्ही वाचता. जे बोलायचे आहे तेच तुम्ही बोलता. मुळ विषयाची ज्ञानप्राप्तीची संधी तुमच्या समजावर अवलंबून राहते. त्यामुळे प्रत्येकाचा Perspective वेगळा राहतो व तो तसा असावा यातच लेखकाचे लेखक पण दडलेले असते.

कथेची सुरवात सीताक्का एका वेताच्या खुर्चीत शुन्यपणे बसल्या आहेत त्यांच्या मनात विचार आला आपले आयुष्य देखील आता असेच शांत दुरवाने, आठवणींने ओसाडलेल्या घरा सोप्यावर आले आहे.

या कथेच्या कथानायिकेची पूर्ण आयुष्याची परवड, गेल्या पंचवीस वर्षातील

भोगलेल्या ते न भोगलेल्या आयुष्याची कथा सांगत आहे.

संपूर्ण कथा हा फक्त सहा तासांचा कालावधी आहे. शांताक्कांचे ~~का~~ पती दादासाहेब यांचा ७५ दिवसापूर्वी मृत्यू झाला आहे. आणि त्यांचे बाबत वाचत असतांना शांताक्कांच्या ७५ वर्षांचा आलेख, एक मोठा कॅनव्हास, त्यांचे आयुष्यात कसे रंग भरत गेले आहे हे दाखवितो. जीएंनी हा सर्व क्षणचित्रे क्षणोक्षणी वापरून कथा फुलविली आहे. लेखक म्हणून कुटुंबातील नाते संबंधाचा एक अनोखा पण वेळोवेळी धक्का देणारा अनपेक्षित आलेख रेखाटला आहे.

या कथेस एक स्थिर वृत्ती विचार ठेवून शांताक्कांच्या नात्यात, संपर्कात आलेल्या व्यक्तींनी शांताक्कांचे आयुष्य त्यांच्या विचारधारेत कसे आहे ही त्या त्या व्यक्तींची म्हणजे दादासाहेब पती जान्हवी बहीण, रामकृष्ण मुलगा, राजभाऊ दिर, यांनी शांताक्कांबाबत घेतलेली भूमिका ही एक बाहेरची प्रदक्षिणा पण कथा संपतांना शांताक्कांना स्वतःला माहीत नसलेल्या गेल्या ७५ वर्षातील घडलेल्या प्रसंगांची माहीती होऊन त्यांची जाणीव जागी होणे व त्याबाबत त्यांनी विचार करणे ही त्यांची आतली प्रदक्षिणा. आयुष्य म्हणजे काय, संसार म्हणजे काय याची माहीती नव्हतीच, घडलेल्या घटनांमुळे जगण्याची ऊर्मी नव्हती, पण जगत राहण्याची धग ह्या कथेत जीए फार कमी शब्दात सांगतात.

पती, बहीण, मुलगा, दिर यांनी त्यांच्या सर्वांच्या समाजमान्य प्रतिमा तयार केल्या आहेत, त्यानंतरही त्यांचे आयुष्य जगणं चालू ठेवले. त्यांच्या या प्रतिमा म्हणजे स्वतःचे धकले आयुष्य एक त्या प्रत्येकाच्या प्रतिमेची काळी बाजू म्हणजे शांताक्कांच्या संदर्भातील, शांताक्कांचे कोणतीच अपेक्षा नसलेले, दुर्लक्षित आयुष्य.

(3)

शांताक्का ह्या कुटुंबातील एक असा कोपरा होता कि जिथे त्यांना दोष देण्याचा, बदनाम करण्याचा घरातील प्रत्येकाने त्यांना वापरले आहे.

या कथेची नायिका म्हणावे तर एकेक कांच्या नाते संबंधां मुळे तिचे अस्तित्व तुकड्या तुकड्याने कळते. हेच असे सर्व तुकडे पाहिले कळते की दादासाहेबांचे कुटील, सर्वबाजे, त्यांच्याच शब्दात चोख खणखणीत ना त्यांच्या चपखल गैरवापर करण्याची विलक्षण राजकीय धोरणी हातोटी, स्वतः नामा निराळे राहण्याचे वैशिष्ट्यपूर्ण कसब (रामकृष्णाचे पत्र, राजाभाऊंच्या फ्रॉड, जान्हवी बरोबरचे अनैतिक संबंध) ही दादासाहेबांची शांताक्कांना न दिसलेली, समजलेली पण शांताक्कांच्या आयुष्याची सर्वाधिक परवड करणारी ही एक काळीकुट्ट प्रदक्षिणा.

दादासाहेब हे व्यक्तिमत्व कथेमध्ये Larger than Life रंगवून त्यांच्या स्वभावाच्या करड्या, कुटुंबित छटा व वेळोवेळी प्रसंगा नुरूप शांताक्कांना सर्व बाजूनं वाईट नाते संबंधाची स्त्री (पत्नी नव्हे) हे ३० वर्षे इतरांवर बिंबवून ~~जग~~ जगण्याची कला छान साधलीय. स्वतःच्या मृत्यूनंतरही स्वच्छ प्रतिमा मलीन न होऊ देणे हा चांगले जमलंय. त्यांना कोणी जणू निरोधक नव्हते ना कुटुंबात ना राजकीय. त्यांच्या मनोविचारांचे, नितीमत्ता बाहेरचे वैचारीक कृत्य, स्वार्थलोलुपता

^मुद्दाम शांताक्कांबद्दल एकांगी करून दिलेले दंड ~~मुद्दाम~~ गैरसमज म्हणजे खरं अन्यायकी आयुष्य शांताक्कांना त्यांच्या मृत्युनंतर कळते. शांताक्कांची होणारी वैचारीक फरपट घुसमट, आयुष्यातील न सुटलेली कोडी, विस्कटीत आलेलं आयुष्य घडी शोधती ही कथा फिरते. आपली आपली ~~प~~ प्रदक्षिणा घालते.

→

(४)

मागील ३०/३५ वर्षांत न कळलेले आयुष्य खऱ्याचे जगणे कशाकरीता व का करीते हे दादासाहेबांच्या मृत्युनंतर ३५ दिवसांनी त्यांच्या ५०(वा) मशीन प्रतिमांमुळे इतरांकडून अकळते, तेव्हा त्या पुस्तकात दिग्मुढ होऊन जातात. या संदर्भात त्यांच्या तोंडी असलेली वाक्ये वैयक्तिक विचार देऊन जातात. प्रत्येक वाक्याचे संदर्भ वेगळे वेगळे आहेत. उदाहरणार्थ

" आता हे घर सोडून जाणार तरी कोठे, मला माझ्या माहेरच्यांचा कधील पदर पुरेल नाही"

दादासाहेबांनी केलेला बलात्कार हा प्रेम होते का (त्यांची/तिची) शारिरीक ओढ होती ही समज नसलेली शांताक्का पुढील ३५ वर्षे पत्नी होते (समाजाकरीता) पण त्यांनी ती ३५ वर्षे एका वाक्यात सांगतात

" लग्न झाले आणि पुरुषाचा स्पर्श नाही, लग्नाआधी पत्नी (?) झाले पण लग्नानंतर कुमार राहिले". ही त्यांच्या होरपळीची एक वेगळी पण न संपलेली प्रदक्षिणा.

जान्हवीच्या दादासाहेबांबरोबर असलेल्या पण नंतर कळलेल्या अनैतिक संबंधाबाबत त्या म्हणतात

" जान्हवीच्या वागण्याने कुंकवाला मांगोल्य आणले तर रामकृष्णाच्या, मुलाच्या, शब्दांनी " आई असुन वैधव्य व वाझपण आणले".

शांताक्कांनी आपल्या आयुष्यातील घरपण, नातेसंबंध असे सोयीसोयीने काढून टाकले. ही त्यांची त्यांच्याच आयुष्याची न संपणारी अदृश्य प्रदक्षिणा.

शांताक्कांच्या आयुष्य प्रवासात दिलासा देणारे व्यक्तीमत्व म्हणजे राजाभाऊ, त्यांचा दिर, दादासाहेबांनी दिलेले घर (खर तर ते त्यांचे का हेही हा प्रश्न अनुत्तरीत आहे) तो शांताक्कांना देतो म्हणून पुढील आयुष्याची परतीची प्रदक्षिणा वाचवणारी व स्थैर्य देणारी ही एकमेव

(५)

DATE 2५/६/२०

चांगली घटना त्यांच्या आयुष्यात घडते. तशी राजाभाऊंची प्रदक्षिणा वहिनींभोवती प्रेमाने फिरणारी व दादासाहेबांच्या मनापासून तिरस्कार करणारी आहे. शांताकूंना त्यांचे स्वतःचे लग्न सुध्दा का व केले असेल याची माहीती पस्तीस वर्षांनंतर कळणारी. हिनुमामींच्या दिवामिलीने व राजाभाऊंना नकार (?) दिल्याने दादासाहेब शांताकूबरोबर लग्न करतात खरे पण त्या स्त्रीचे पत्नीपण ते फक्त सामाजिक दृष्ट्या अस्तीत्वात ठेवतात.

ह्या कथेची ही वैशिष्ट्ये कथा पुन्हापुन्हा वाचल्यानंतरच लक्षात येतात. एका साध्या कुटुंबातील ३०/३५ वर्षांचे ताणेबाणे अवघ्या ४,५ तासात शांताकूवर एका मागोमाग भयंकर आघात करीत जातात. त्या कोलमडतात, मोडून जातात. कोसळतात आणि काहीच न करता येण्यासारखे आयुष्य जगण्याची मृत इच्छा घेऊन पूर्ण पुतळ्या प्रमाणे भकास बसुन राहतात. व इतक्या वर्षांच्या आयुष्याची एक पोकळ प्रदक्षिणा सुध्दा त्यांना साथ देण्यासाठी बरोबर नसते हे सत्य त्या अनाहूत पणे स्विकारतात. अगदी दोन घातलेल्या साध्या प्रदक्षिणेचे समाधान हि त्यांना मिळत नाही.

—×—

टी. क. ! या कथेवर नंतर जी.ए. यांना काय वाटले का दादासाहेबांची बाजू कशी स्वच्छ (?) असेल इत्यादि बाबी वाचके म्हणुन आपण वाचलेल्या कथेची समज, त्याण यावर त्यां विचारांची छाया न पडणे योग्य राहील.

धों. वि. देशपांडे यांनी जी.ए.च्या कथा ! एक अन्वयार्थ ह्यात प्रदक्षिणा कथेवर भाष्य आहे पण तो त्यांचा विचार दृष्टीकोन आहे. हे लक्षात ठेवून ते वाचन करावे असे वाटते.

संजीव सावरगांवकर 7350002870

महेश आफळे: पृथ्वी स्वतःभोवती फिरते(जे परिवलन)

पृथ्वी सूर्याभोवती फिरते(हे परिभ्रमण)

परिक्रमा आणि प्रदक्षिणा(जी एं च्या बाबतीत तर तीही खास उलटीच)

ही प्रदक्षिणा वाचकासाठी आहे वस्तुतः

पण त्यानुसार अतिवेगाने फिरणारा भोवरा स्थिर वाटतो, त्यानुसार इथेही कथा वाचताना दृष्टीभ्रमांची चळत वरचेवर कोसळत जाते

शेवटी तर दुःखालाच ढळढळीत वैधव्य आल्याप्रमाणे वाचकाचा अर्ध पुतळा होऊन जातो आणि तरीही दादासाहेबांच्या निर्विकार पुतळ्याची नजर तुमच्या वरच रोखलेली असते, विचारत असते

"तुम्ही माझी बाजू ऐकायचे कष्ट घेतलेच नाहीत तर"...

बाकी लिहिण्यासारखे बरेच काही

मंजिरी देशमुख: आपणच पिडलेल्या स्त्रीला तिच्या आयुष्यात असलेल्या व आलेल्या लोकांकडून त्यांच्या हयातीत आणि मृत्युनंतर देखील चुकूनही सुख मिळू नये याची दादासाहेब पुरेपूर काळजी घेतो.

उलट्या काळजाच्या या समाजकारणी आणि राजकारणी दादासाहेबाचा वाचकाला मनातून राग येतो. असे बेगडी दादासाहेब आपल्या आसपास खुप पहायला मिळतात.

जीए माणसं आहेत तशी प्रेझेंट करतात. कथेचा सकारात्मक शेवट करून वाचकानुनय करत नाही. जीवन जसं दिसतं तसं व माणसं जशी त्यांना भेटतात तशी


कथेत अवतरतात. परिस्थितीने पिळवटून गेलेली ही माणसं पाहून वाचकाच्या हाती केवळ निःशब्द होणं उरतं.

महेश आफळे: मीही हाच मुद्दा अधोरेखित केला आहे

हेमंत खडके: प्रदक्षिणा ही एक फसलेली कथा आहे असे जीए स्वतः कबूल करत असले तरी या त्यांच्या म्हणण्यामागे आणखी एक कारण असावे असे वाटते. जे जे खूप लोकप्रिय, सर्वसामान्य माणसाला स्पर्श करणारे ते ते दुय्यम, अशीही एक दृष्टी जीएंमध्ये दिसते. ताजमहाल, मुगलेआजम - या कलाकृती त्यांना आवडत नसत. याच न्यायाने जीएंनी प्रदक्षिणा ही लोकप्रिय म्हणून फसलेली कथा ठरवली असावी

विश्वेश्वर नांदेडकर: याचे पण उत्तर त्यांनी दिले आहे. खाली देत आहे वाचावे

इतके सविस्तर त्यांनी आपल्या कोणत्याही कथे साठी लिहिले नाही


काय होता? "Higamus, Hogamus, man is monogamous!" कपाळाला हात लावला. तर हा तो दिव्य संदेश!)

हे सारे कशामुळे? तर 'प्रदक्षिणा' या कथेच्या निमित्ताने. ती कथा आठवण्याचा प्रयत्न करा. आबाजी नेहमी म्हणत असत, ''पण माझे ऐकणार कोण?'' आबाजी गेल्यावर नोकरांच्या तोंडी तेच शब्द आहेत. पण प्रतिध्वनीप्रमाणे once removed, अस्पष्ट. शेवटी अर्धपुतळ्यासमोर शांताक्का एकट्याच बसतात. त्या ठिकाणी एक अत्यंत सूक्ष्म सूचना मला अभिप्रेत आहे. तेच शब्द, पुन्हा एकदा, पण मूकपणे त्या अर्धपुतळ्यावरून येतात असे त्यांना भासते. साऱ्या कथेत दादासाहेबांच्या बाजूचे एक तरी वाक्य आहे का? कुणास ठाऊक, त्यांच्या बाजूचे कोण ऐकणार? कथा वाचल्यानंतर दादासाहेबांच्याही बाजूविषयी हुरहूर लागणार नसेल, तर ती कथा एक केवळ satire आहे, व तिचे वाङ्मयीन मूल्य शून्य आहे. [illegible] मोठे अपयश!

विश्वेश्वर नांदेडकर: हा पत्रांची चौथा खंड आहे पान नंबर वर आहेत.

हे पत्र त्यांनी हातकणंगलेकर यांना दि. २३/३/७८ ला पाठवले आहे

विश्वेश्वर नांदेडकर: जी ए नी म्हटल्या प्रमाणे आपणही सामान्य वाचक राहायचे की कथेतील आबा साहेबांची काय बाजू आसू शकते या बाबत लिहायचे हे एवढ्या मोठ्या ग्रुप च्या सदस्यांनी ठरवायचे आहे. मी ही कथा आजुन एकदा वाचून माझ्या परीने प्रयत्न करीन.

कारण या कथेतील प्रत्येक जण आपली बाजू मांडतो. कोणीच आपल्या चुका सांगत नसतो आपल्या चुका लपवून दुसरा कसा वाईट होता माझ्यावर कसा अन्याय झाला हेच प्रत्येक जण सांगणार.

विश्वेश्वर नांदेडकर: मला आपल्या समूहातील नेहमी चर्चेत भाग घेणाऱ्या सदस्यांचे जी ए क्या पत्रातील मतावर त्यांचे अभिप्राय अपेक्षित आहेत

संजीव सावरगांवकर: मुळात G. A. यांची कथा आपण वाचक म्हणुन कशी वाटली व त्यावर भाष्य, लेखन करणे अपेक्षित आहे. आपले वर्तुळ तेवढेच आहे. ह्या कथेवर लेखकाला नंतर काय वाटले त्यावर चर्चा अभिप्रेत नाही. कारण मग तो फापटपसारा वाढत जाईल. साहित्यिक चर्चा वेगळी आणि कथेचे आपले वाचक म्हणुन निरुपण वेगळे. त्या 2 वेगळया अवस्था आहेत, राहतील. त्यामुळे कथेची enjoyment घेणे बाजूला पडेल. अन्यथा त्याला वेगळे वळण लागेल. आपणच सर्वांनीच याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा असे सुचवितो.

सुनीळ सामंत: मला वाटते की प्रत्येक कथेवर सर्व अंगानी चर्चा व्हावी. या कथेचे भाग्य हे की जीएं नी स्वतः त्यावर काही भाष्य केलेले आहे.

या कथेबाबत माझे मत थोडक्यात मी खाली देत आहे.

मराठी वाचक व बहुतांश मराठी साहित्यिक यांचा वकुब पाहिला तर ही कथा फार फार वरच्या दर्जाची आहे. परंतु जीएं चे मी वाचलेले साहित्य पाहता मात्र मला ही कथा त्यांच्या इतर साहित्याच्या दर्जाची वाटली नाही. जी ए हे मराठी साहित्यातील सर्वात उंच शिखर असे माझे मत आहे. त्या शिखराची ही कथा काहीशी निमुळती बाजू म्हणता येईल असे मला वाटते.

हे सर्व मला जीएंची पत्रे वाचण्यापूर्वी वाटले हेही नमूद करतो.

सुनीळ सामंत: हेमंत जी तुम्ही म्हणता ते काही प्रमाणात इतर काही उच्चभ्रू लेखकांच्या बाबतीत खरेही आहे. परंतु जीए तशा पैकी नव्हते असे मला वाटते माझे हे मत त्यांच्या कथा वरून झाले आहे. त्यांच्या कथांतील सामान्य व्यक्ती ज्या प्रकारे विचार करतात त्यावरून सर्वसामान्य व्यक्तींच्या विचार प्रक्रियेबद्दल जीए ना आदर असावा असे मला जाणवले. सामान्य म्हणताना मला गारुडी शेतकरी छोटे छोटे मजूर दुकानदार स्त्रिया अशी त्यांच्या कथातील पात्रे डोळ्यासमोर येतात.

हेमंत खडके: सामान्य, कष्टकरी माणसांबद्दल त्यांच्या मनात सहानुभूतीच होती; पण उथळ लोकप्रियतेच्या लाटेत वाहवत जाणाऱ्या - या अर्थाने सामान्य - माणसाच्या अभिरुचीवर त्यांचा विश्वास नव्हता असे मला वाटते

विश्वेश्वर नांदेडकर: माझे तेच म्हणणे आहे जी ए ना या कथेतून वाचकांना काय लक्षात यायला हवे होते ते त्यांनी पत्रात सांगितले. माझेही तेच म्हणणे आहे आपल्या एवढ्या सदस्यांपैकी एकालाही तो पुतळाही आपले काही म्हणणे आहे हे सांगायचा प्रयत्न करतोय असे वाटले नाही. सगळ्यांनी आपली एकतर्फी बाजू कथेत सांगितले अर्थातच त्या प्रत्येक गोष्टी साठी बाबासाहेब कडेही काही स्पष्टीकरण असणारच हे एकही सदस्याच्या लक्षात एवढ्या जी ए क्या कथा वाचूनही लक्षात येवू शकले नाही हे दुर्दैवी आहे.

जी ए नी म्हटल्याप्रमाणे तनी आयुष्यात कधीही एक पात्र पूर्णपणे दृष्ट आणि एक सोज्वळ असे कोणताही कथेत येवू दिले नाही. Satire कथांचा त्यांना मनस्वी राग होता त्या नैसर्गिक रित्या येत नाहीत असे त्यांचे म्हणणे होते

संजीव सावरगांवकर: अहो कथेतील जिवंत माणसे आपल्या व्यथा त्या दादा साहेबांनीच तयार केल्या आहेत. दादासाहेब 35 वर्षे जिवंत असतानाचा त्यांचे स्वतः बाबत एकही शब्द नाही. मग मरणोत्तर पुतळा काय सांगणार. ते सर्व कपोलकल्पित होईल. त्यांचे कथे वरील विचार हा एक वेगळा दृष्टीकोन होतो आणि मग वेगळीच कथा जन्माला येऊ शकते अशी शक्यता जाणवते.

मंजिरी देशमुख: माझे कुणी ऐकत नाही म्हणणा-या आबाजी कडे असू शकतं सांगण्यासाठी काही तरी.

महेश आफळे: माझी कालची पोस्ट वाचणे कृपया

दिलिप बडे: दादासाहेबांनाही काहीतरी सागांयचे असेल?असा प्रश्न वाचकांना(आपल्याला)पडत नसेल तर जी. ए. हे स्वतःचे मोठे अपयश समजतात. तरीही आपण सर्वांनी दादासाहेबांना काय सांगायचे असेल केवळ त्यावरच स्पष्टपणे लिहावे.

विलास वाघोलीकर: हे मान्य होण्यासारखे आहे. लेखकाने लेखन केल्यानंतर त्यांना काही कमी जास्त वाटले, तरी वाचकांना ते लेखन त्याच्या परीने पूर्ण वाटले तर आणि तरच तो कथेचा आस्वाद घेवू शकतो. त्यामुळे अगदी जीएंनी एखाद्या कथेबद्दल म्हटले तरी, ते अकेडेमीक इंटरेस्टने पहावे. प्रस्तुत कथेतील प्रसंगांवरून दादासाहेब धोरणी सत्ताधाऱ्याप्रमाणे घरात सर्वांशी वागले हे स्पष्ट आहे. पुतळा यदाकदाचित बोलला, मी योग्य केले असेच बोलणार. सत्तेसाठी हे करावे लागते. नाहीतर संन्यास घ्यावा असेच बोलणार. तशी कथा वेगळी होवू शकते. आपण दिलेल्या कथेवर चूक बरोबर हे सांगावे ही विनंती. धन्यवाद. विलास वाघोलीकर.

मनमोहन आंबेकर: या मध्ये वाक्य जर तर असे आहे. माझा संदेश वाचकांपर्यंत नीट पोहोचू शकला नसेल. त्यांना देखील कथा फसली असे वाटते हा निष्कर्ष योग्य नाही असे वाटते.

महेश आफळे: कधी अस्फुटपणे असेही वाटते की

आपल्या कथांचे असे अर्थ अनर्थ लावणारे वाचक बघून जणू

"जी ए वाचकांची गंमत तर बघत नसावेत ना?"

(इथे चक्रधरीय हत्ती दृष्टांताची आठवण अपरिहार्य)

पत्रमजकूर हा तात्कालिक मनोभूमिकेतून लिहिला गेला असतो

(आपल्या हयातीत नव्हे तर माघारी आपला पत्रव्यवहार सार्वजनिक होणार याची अंधुक का होईना कल्पना त्यांना होतीच असे निदान मला तरी वाटते, कारण आपला पत्र ऐवज ही काय चीज आहे हे निदान ते स्वतः ओळखून होतेच की)

म्हणून तर आपल्या पत्रांचे वाङ्मयीन मूल्य एका महत्तम उंचीचेच असेल याची दक्षता त्यांनी घेतली असावी

हेमंत खडके: मलाही असेच वाटते. जी. ए. वाचकांची फिरकी घेत असावेत

विश्वेश्वर नांदेडकर: त्यांनी स्पष्टच सांगितले आहे की मी माझ्या कोणत्याही कथे कोणालाही पूर्ण खलनायक केलेले नाही. मला आशा कथाही आजिबात आवडत नाहीत. एक पूर्ण सज्जन आणि एक पूर्ण दुष्ट असे आसू शकत नाही. प्रत्येक माणसात कमीजास्त प्रमाणात दोन्ही बाजू असतातच

सुनीळ सामंत: प्रदक्षिणा या कथेवर चर्चा करताना मला आठवले ते चार दिवसापूर्वी महेशजींनी लिहिलेले पहिले वाक्य. त्यांनी लिहिले आहे की जीएंना मी मराठीतील सर्वोच्च लेखक मानतो पण मी त्यांचा भक्त नाही.

त्यांना देवत्व बहाल करणे योग्य नाही असे मलाही वाटते.

एखाद्या कथेत एका बाजूला फार चांगली माणसे वा माणूस आणि दुसऱ्या बाजूला एक किंवा अनेक खलनायक अशी मांडणी करणे सोपे असते. वाचकांनाही फार मोठ्या प्रमाणावर तेच आवडते. त्या अर्थाने जीए हे कधीही वाचकांचा अनुनय करणाऱ्यांपैकी नव्हते. त्यांच्या कथांमध्ये प्रत्येक व्यक्ती त्रिमितीमध्ये येते तिचे सर्व चांगले व वाईट गुण दोष सर्वकाही त्या कथेतील महत्त्वाचे भाग असतात. या कथेमध्ये सुद्धा दादासाहेब यांच्या मृत्यूनंतर अनेक लोक शांताकाना भेटायला येणे ही त्यांच सामाजिक कार्य किमान काही लोकांपुरते तरी खूप चांगले असावे असा संकेत देते. परंतु व्यक्तिगत पातळीवर खूप ओढून ताणून विचार केल्यावरही मला तरी दादासाहेबांची कृती ही ढोंग आणि खलनायक की प्रकारची वाटते. त्यांचे हुकुमी रडणे याचा त्यांनी खोटे बोलताना केलेला वापर हा नक्कीच त्यांच्याबद्दल घृणा निर्माण करतो. दोन बहिणींमध्ये, भाऊ आणि वहिनी मध्ये, आई आणि मुलगा, यांच्यामध्ये गैरसमज निर्माण करून त्यांची मते कलुषित करणे, आणि याचा शांताकाना पत्ताही लागू न देणे, आबाजींचे पैसे परस्पर हडप करणे, हे सर्व या कथेत मांडल्यानंतर, जर कोणी दादासाहेबांच्या बाजूने लिहू शकला, तर तो खरोखरच फार वरच्या दर्जाचा वकीलच मानलं मी मानेन.

मात्र या कथेची सुडौल आणि घट्ट बांधणी, काळाचा पट उलगडताना वापरलेले कौशल्य, सर्व व्यक्तींचे स्वभाव मांडण्याची हातोटी या गोष्टी मात्र मराठीतील इतर कोणत्या लेखकाला झेपू शकल्या असत्या याची मला कुतूहल शंका आहे. या कथेतही कथालेखक म्हणून जीएंची उंची दिसतेच.

संजीव सावरगांवकर: मी या मताशी सहमत आहे. कथा खरे तर नायिकेची आहे. तिचा आयुष्य पदर कसा कसा नासत गेला हे तिला स्वतःला खूपच उशिरा कळले कारण ती या घरात पत्नी(?) म्हणुन आल्यावर कधीही घराबाहेर पडल्याचा reference नाही. कोणीही तिला कुठल्याही कारणाने उंबरा ओलांडू दिलाच नाही.

विश्वेश्वर नांदेडकर: मला काजलमया सपदात नाहीये पण मला आठवते एकदा आमची चर्चा झाली होती. त्यात प्रत्येक दोषारोपण बद्दल दादासाहेबांच्या कडे सुंदर प्रत्युत्तर होते.

त्यातील एक आठवते.

आबाजी चे खरे प्रेम पत्नीच्या बहिणीबरोबर आधी पासून होते. पण एका स्खलन मोहाच्या क्षणी ते आक्कावर अल्मोस्त बलात्कार करतात. आणि दुर्दैवाने त्याचे प्रयचित्त म्हणून तिच्या सोबत लग्न करतात. परंतु तिच्या बहिणीचे आबाजी वरचे प्रेम कमी होत नाही ती आखेर पने अविवाहित राहून त्यांच्या सोबतचे प्रेम निभवते. पण बहिणीच्या विवाहात विष कलवत नाही. पण आबाजी ना कायम या बाबत स्वतः पा दोषी ठरवतात. आणि ठरवून सुद्धा ते पत्नीला कोणतेही प्रेम देवू शकत नाहीत. आणि बहिणीच्या त्यागाचे उपकार फेडण्यासाठी आपले घर तिच्या नावावर करतात. अर्थात कथा वाचायला मिळाली तर सविस्तर लिहीन

संजीव सावरगांवकर: आबाजी नव्हे दादासाहेब म्हणायचे असेल तुम्हाला.

वस्तुतः कोणतीही कलाकृती /साहित्य कृती कधीही परिपूर्ण चिरेबंद नसते, तिच्यात काही सूक्ष्म /गुप्त फटी असतातच

का कोण जाणे, माणसाला फटींचे मोठे आकर्षण असते

वाचकवर्ग अश्या फटी शोधून काढतो, चर्चा होत राहतात अन त्यायोगे कलाकृती नव्याने परिपूर्णतेकडे वाटचाल करू लागते, अस्सल वाचकमनात

महेश आफळे: या कथेपुरते सांगायचे झाल्यास

मी हा असा का झालो/वागलो हे सांगण्याची मुभा दादा साहेबांना या कथेत नाहीय, ते अव्यक्त च राहतात

इतर कथांत उदा पारध, पुरुष वगैरे मध्ये"माझ्या पदरात जे पडले तेच मी वाढले"हे त्यांचे स्वसमर्थन आहे

जे पेरले तेच उगवते

पण बहुतेक वेळा आपण काय पेरले होते याची जाणीव ते उगवल्यानंतरच होते

शांताक्कानी जर आपल्या आयुष्यातील या विष वृक्षाला वेळीच उखडून टाकले असते तर.. ?त्यांनी सहनशीलतेचे घट्ट बीजारोपण करून ते रोपटे वाढवले मनात, त्याची राक्षसी विषवल्ली होणार होतीच कधीतरी

जीवनाला फार काळ थोपवता येत नाही कुठेही

याही वेगळया अंगाने चर्चा घडू शकेल

महेश आफळे: अन्याय सहन करणारा अन्याय करणाऱ्याच्या बरोबरीने दोषी असतो या अर्थाने ही चर्चा होऊ शकते

अर्थात पीडित शांताक्का या काही त्यामुळे गुन्हेगार ठरत नाहीत, दोषी मात्र आहेत

संजीव सावरगांवकर: असे म्हणता येईल असे वाटत नाही. त्यांचा स्वभाव पूर्ण कळण्यासाठी कथेचे मध्ये कुठे वाव नाही का विचार ही नाही.

महेश आफळे: बरोबर

पण मी त्या लिखित कथेबाबतच्या अनुषंगाने हे लिहिले नव्हते

कथा वाचल्यावर वाचकमनात नव्याने कथा सुरू होते त्या अनुषंगाने मी एक मुद्दा नमूद केला इतकेच

महेश आफळे: कारण ही चर्चा च मुळी लेखनोत्तर आहे

दिलिप बडे: जी. एं. नी स्वतःला हवा तसा दादासाहेब रंगवला. आणि आपल्यालाही सांगितले. दादासाहेबांच्या बद्धल बोला.

जयश्री जंगले : अगदी बरोबर.

संजीव सावरगांवकर: हे मात्र अगदी खरे. तरीही दादासाहेबांच्या बाजूने दादासाहेब character लिहिणे कठीणच जाणार.

Natha Chitle: प्रदक्षिणा कथा जिथे संपते तिथे दादासाहेब व्यक्त व्हायला सुरूवात होते. कथेत नाहीतर आपल्या मनात. पण माझे कोण ऐकणार ह्या वाक्याने

आपण दादा साहेबांना शोध लागतो कथेतील घटनात एखाद्याला समजुन घ्यायचे आसेल तर डोळसपणे त्याच्या भोवती प्रदक्षिणा घालावी लागते हेच कथेचे सुत्र आहे. शांताक्का, अबाजी, जान्हवी, रामकृष्ण, निमंला. , आणि समाज

महेश आफळे: नाकारता न येण्याजोगी एक अंधुक शक्यता


जर पुतळ्याला माफी मागायची मुभा क्षणभर मिळाली असती तर न जाणो त्यांनी शांताक्काचीच नव्हे तर त्या इतर सर्वांचीही माफीही मागितली असती

आणि एकदा क्षणभर का होईना हृदयपरिवर्तन झाले की आपल्याकडे वाल्याचा वाल्मिकी होतोच की

आणि त्यातही आपल्याकडे खऱ्या वाल्मिकीला काही किंमत नसते, ती असते फक्त वाल्याचा वाल्मिकी झालेल्यालाच

हे सगळे जरा जास्तच ओढून ताणून होतेय हे अगदी ठार मान्य

दिलिप बडे: दादासाहेब भाषण करीत असताना त्यांना पहिला झटका आला होता आणि चारच दिवसांनी त्यांचे आयुष्य संपले होते. शांताक्कांना वाटले, माणसाला असा तडकाफडकी मृत्यू कधी येऊ नये. आयुष्याची चढती कमान संपली की पुन्हा त्याच मार्गाने परत पुर्वस्थळी येऊन संपून जाण्याची देणगी देवाने द्यायला हवी होती. कलेकलेने जगल्यानंतर कलेकलेनेच संपून जावे. शिवाय प्रवासापेक्षा परत प्रवास जास्त संयत हुरहुर लावणारा, जास्त शहाणा, समंजस असतो. कधीच चुका न करण्याचे भाग्य देवाने माणसाला दिलेले नाही. निदान परत येताना थोडी भरपाई करण्याची संधी तरी त्याने का देऊ नये. येताना न पाहीलेले सुख पुन्हा घेता येईल. कठोर शब्दांनी केलेल्या जखमा बर्या करता येतील. (हे शांताक्कांचे स्वगत त्यांनी दादासाहेबांना क्षमा केल्याचे मानावे का?




जीवन इतके अनंतरुप आहे की अगदी संपूर्णपणे माझ्यासारखेच आयुष्य असलेला माणूस पूर्वी कधी झाला नाही व पुन्हा कधी होणार नाही. त्या दृष्टीने प्रत्येक सामान्य माणूस देखील अद्धितीय असतो. मी गेल्यानंतर एक अव्दितीय भावविश्व पूर्णपणे विरुन जाणार आहे



**जी. ए. कुलकर्णी** हे मराठी साहित्यातले रत्नच. त्यांची प्रत्येक कथा पैलूदार असे. या प्रत्येक पैलूचे नेमके आकलन होणे हे कोणा एका वाचकाला दुरपास्तच.

२०२२-२३ हे जी. ए. यांचे शताब्दी वर्ष होते! या वर्षाचे औचित्य साधून जाणत्या जी.ए.प्रेमी वाचकांनी एक उपक्रम हाती घेतला. आभासी पद्धतीने एकत्रित येऊन त्यांनी जी. ए. यांच्या १४ कथांवर विविधांगाने चर्चा केल्या, अनेक मते, दृष्टीकोन मांडले. संकलित केले. ही संकलने सात खंडांत उपलब्ध आहेत. जी.ए. यांच्या कथावाचनाचा आनंद घेतांना या चर्चा जी.ए.प्रेमी तसेच अभ्यासक-समीक्षकांना निश्चितच उपयुक्त ठरतील. हा मौल्यवान ठेवा आपल्याकडे नक्कीच हवा!